म. ग्र. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २०४२

प्रि. आगरकरांच्या समग्र विचारांचें यथार्थ दर्शन



आगरकर

गर्दी

REFBK-010915

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

किंमत ३

आगरकर-दर्शन

[प्रि. आगरकरांच्या समग्र विचारांचें यथार्थ दर्शन घडविणारा
त्यांच्या निवडक लेखांचा संग्रह]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20429 वि. 1 निवड
क्रमांक ....2082.... नोंः दिः 3.3.1964

REFBK-010915

जुलै किंमत ३ रु.

मॉडर्न बुकडेपो

मॉडर्न बुकडेपो, पुणें २.

आवृत्ति पहिली
१४ जुलै १९५६
(आगरकर जन्मशताब्दिदिन)

सर्व हक्क स्वाधीन.

प्रकाशक :
श्री. कमलाबाई भिडे,
मालक, मॉडर्न बुक डेपो,
आनंदाश्रमासमोर, पुणें २.

मुद्रक :
माधव धरणीधर गुर्जर,
आयुर्विद्या मुद्रणालय,
२६१।२, सदाशिव, पुणें २.

संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
दि
नों दि.

आगरकर—दर्शन

विषयानुक्रमणिका

साहित्य व कला

१.	कवि, काव्य काव्यरति	....	१
२.	वाचन	....	१२
३.	महाकवि शेक्सपियर	....	२२
४.	भारतीय कलांचें पुराणत्व	....	३०

चरित्र आणि आत्मचरित्र

५.	वि. कृ. चिपळोणकर	...	४४
६.	केरो लक्ष्मण छत्रे	...	५१
७.	डोंगरीच्या तुरुंगांत	....	५८

सामाजिक, राजकीय व धार्मिक प्रश्न

८.	सुधारक काढण्याचा हेतु	...	६५
९.	तरुण सुशिक्षितांस विज्ञापना	...	७३
१०.	आमचें ग्रहण अजून सुटलें नाहीं	....	८६
११.	सामाजिक सुधारणा आणि कायदा	....	९०
१२.	सामाजिक घडामोड	....	१०१
१३.	बंधनें कोण व कोणतीं घालणार ?	...	१०७
१४.	धर्मकल्पना आली कोठून ?	...	११३
१५.	मूळ पाया चांगला पाहिजे	...	१२६

१६. लोकमतांतर ... १३१
१७. राजकीय संस्थांविषयीं सामान्य विचार ... १३५
१८. धर्मसंग्राम आणि गृहकलह १४२
१९. इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार १४५
२०. महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र १५३

अर्थशास्त्र आणि व्यापार

२१. समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक–व्यापार १५९
२२. भांडवल गेलें, व्यापार गेला ! ... १६४
२३. व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं ! १६८

निसर्ग वर्णन

२४. सृष्ट्यवलोकन ... १७६

◆ ◆ ◆

[या संग्रहांतील उतारे संपूर्ण आगरकर भाग १-२-३, केसरींतील निवडक निबंध पुस्तक १–२, सुधारकांतील निवडक लेख भाग तिसरा, विकारविलसित, डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस व विविध-विषय-संग्रह या आगरकरांच्या समग्र वाङ्मयांतून घेतले आहेत.]

वि. निबंध
नं: 20849
दिनांक 9.12.72

प्रि. आगरकर यांच्याविषयीं—

[लेखक : प्रो. माधव दामोदर अळतेकर, एम्. ए.]

केसरीचे एक संस्थापक आणि आपल्या लेखणीच्या जोरावर त्या पत्राला सुदृढ स्थिति प्राप्त करून देणारे त्याचे पहिले संपादक; न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेज यांचे एक उत्पादक व फर्ग्युसन कॉलेजचे दुसरे प्रमुखाध्यापक असे गोपाळ गणेश आगरकर हे १८५६ सालीं जन्मले आणि १८९५ सालीं मृत्यु पावले. वर उल्लेखिलेल्या संस्थांसंबंधीं त्यांचें नांव प्रसिद्ध आहेच; पण विशेषेंकरून सुधारक पत्राचे संस्थापक आणि संपादक म्हणून ते सर्वांना माहीत आहेत. या पत्रांतून त्यांना जें कांहीं विशेष सांगावयाचें आणि शिकवावयाचें होतें तें त्यांनीं महाराष्ट्रास सांगितलें आणि शिकविलें. आगरकर हे केवळ समाज-सुधारक होते, राजकीय व इतर बाबतींत त्यांचें लक्ष्य नव्हतें असा समज कित्येकांनीं करून घेतला व त्याचा त्यांनीं प्रसारही केला. तो समज चुकीचा आहे इतकेंच नव्हे तर आर्थिक प्रश्न (ज्यांचें स्वरूप खरोखर राजकीय आहे) त्यांची चर्चा प्रथम आगरकरांनींच मराठींत सांगोपांग केली हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

त्यांनीं आपल्या आयुष्यांत तत्त्वनिष्ठेमुळें पुष्कळ हालअपेष्टा सोसल्या ही गोष्ट खरीच; पण लहानपणचीं सर्व वर्षें अत्यंत खडतर दारिद्र्यांत गेलीं असतांनाही चिपळूणकर, टिळक, आपटे वगैरे मंडळीबरोबर लोकशिक्षणाला अत्यंत अल्प वेतनावर स्वतःला वाहून घेण्याचें त्यांनीं जाणूनबुजून, आनंदानें ठरविलें; ह्या वेळीं मोठाल्या नोकऱ्या पदवीधरांना मिळत तरी सुद्धां,ठरविलें ही गोष्ट त्यांच्या उज्वल देशाभिमानाची निदर्शक आहे. स्वार्थत्याग आणि सेवा हीं त्यांच्या आयुःक्रमाचीं दोन महत्त्वाचीं सूत्रें होतीं; त्याबरोबर आपणांला जें खरें आणि कल्याणदायक वाटतें तें लोकांना निःसंदिग्ध भाषेंत कळवावयाचें; त्यामुळें वेळीं प्रसंगीं कांहीं लोक रागावले तरी त्याची फिकीर करावयाची नाहीं; त्यामुळें आपलें कितीही नुकसान

झालें तरी त्याची परवा करावयाची नाहीं; इष्ट असेल तें बोलणार आणि शक्य असेल तें करणार असा त्यांचा बाणा होता; आणि त्या व्रतापासून आमरण ते ढळले नाहींत; कसल्याही परिस्थितींत त्यांचा निश्चय फिरला नाहीं; कोणाच्याही कृपेसाठीं किंवा कोणाच्याही क्रोधामुळें त्यांच्या वर्तनांत चलबिचल झाली नाहीं.

आगरकरांचें चरित्र

आगरकर १८५६ सालीं जन्माला आले व १८९५ सालीं (जून १७) मृत्यु पावले. या अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यांतील पहिलीं तेवीस-चोवीस वर्षें विद्यार्जन करण्याच्या प्रयत्नांत गेलीं. हा प्रयत्न म्हणजे एक खडतर तपश्चर्या होती. घरांत अक्षरशः अठराविश्वें दारिद्र्य; कसलाही उद्योग म्हणून करावयाचा नाहीं, अशी वडिलांची प्रतिज्ञा; त्यामुळें आईच्या माहेराकडून जें साहाय्य होईल त्यावर तरुण गोपाळची सारी मदार होती. कऱ्हाडच्या शाळेंत प्राथमिक शिक्षण व इंग्रजीची सुरुवात हीं झालीं. हायस्कूलचें शिक्षण मिळविण्यासाठीं गोपाळरावांनीं कऱ्हाडहून रत्नागिरीचा पायीं प्रवास केला. तेथें जमत नाहीं असें पाहून ते कऱ्हाडास परत आले. त्या ठिकाणीं कांहींतरी मिळवावें या हेतूनें दवाखान्यांतील कांपौंडरची नोकरी कांहीं दिवस केली. पण अंतःकरणांत उच्च शिक्षण मिळवावें अशी सारखी तळमळ होती. एक मामा वऱ्हाडांत अकोल्याला होते. तिकडे गोपाळराव मामीला पोचविण्यासाठीं म्हणून गेले आणि मग तेथें राहून तेथील हायस्कूलांत प्रविष्ट झाले व अनेक हालअपेष्टा सोसून तेथून मॅट्रीकच्या परीक्षेला बसून तींत पसार झाले. या सर्व गोष्टींमुळें बराच कालव्यय झाला. टिळक आणि आगरकर यांचीं वयें सारखीं होतीं. परंतु आगरकर टिळकांच्या नंतर तीन वर्षांनीं प्रवेशपरीक्षा उतरले यांचें कारण शिक्षण मिळविण्यासाठीं धांवपळ करण्यांत त्यांचीं कित्येक वर्षें निघून गेलीं. पुढें जवळ पैसा नसतांना रा. ब. महाजनीसारख्या शिक्षकाच्या मदतीनें गोपाळराव डेक्कन कॉलेजांत गेले. तेथेंही बक्षीस मिळव, नाटक लिही, अगदीं दारिद्र्यांत दिवस काढ असें करून आगरकरांनीं बी. ए. ची मजल गांठली. यापुढें त्यांना कॉलेजांतील फेलोशिप मिळाली व दोन खऱ्या

सुखाच्या वर्षांचा त्यांना लाभ झाला. या दोन वर्षांत टिळकांचा व त्यांचा स्नेह विशेष जमला. एवढी हालअपेष्टा सोसून एम्. ए. पर्यंत शिक्षण मिळविल्यानंतर नोकरीचा मार्ग न धरतां स्वसंतोषानें, उत्साहानें देशसेवा करण्याच्या हेतूनें, शिक्षणाच्या कार्याला अत्यल्प वेतनावर राहून आयुष्य वाहण्याचें व्रत आगरकरांनीं ग्रहण केलें व त्यांत मृत्यु येईपर्यंत खळ पडला नाहीं.

अशा तऱ्हेचें कार्य करण्याची कल्पना आगरकरांच्या डोक्यांत विद्यार्थिदशेपासून घोळत होती. तिला टिळकांच्या स्नेहसंबंधानें दृढता आली व पुणें हायस्कुलांतील नोकरी सोडल्यानंतर नवीन हायस्कूल काढण्याच्या उद्योगांत या वेळीं निबंधमालाकर्ते विष्णु कृष्ण चिपळूणकर होते; त्यांचा व या दोन तरुणांचा परिचय होऊन त्या कल्पनेला मूर्त स्वरूप आलें आणि पुण्याच्या न्यू स्कूलचा व केसरी व मराठा या पत्रांचा जन्म झाला. शाळा काढून विद्यार्थ्यांना विशिष्ट शिक्षण द्यावयाचें आणि वर्तमानपत्रें काढून सामान्य जनतेला शिक्षण द्यावयाचें अशा हेतूनें या सर्व उद्योगांना सुरुवात झाली; व या उद्योगांत वामन शिवराम आपट्यासारखीं मंडळी सामील झाली. चिपळूणकर १८८२ सालीं वारले. त्याच सुमारास कोल्हापूरच्या महाराजांच्या व तेथील दिवाणांच्यासंबंधीं कांहीं लेख केसरी व मराठा पत्रांत आले. ते आपली बदनामी करणारे आहेत असें कोल्हापुरच्या दिवाणांना वाटून त्यांनीं केसरीचे संपादक आगरकर व मराठ्याचे संपादक टिळक यांजवर मुंबई हायकोर्टांत फिर्याद गुदरली व यांत कांहीं आरोप सिद्ध होऊन दोघां आरोपींना १०१ दिवस तुरुंगांत जाण्याची सजा न्यायाधिशांनीं ठोठावली. सर्व जनतेची सहानुभूति या तरुण संपादकद्वयाकडे होती. आगरकर—टिळकांचे या खटल्यांतील वकील फेरोझशहा मेहता व काशीनाथ त्रिंबक तेलंग हे मुंबईचे दोन नामांकित पुढारी होते. आगरकर-टिळकांना शिक्षा झाली हें खरें; पण कोल्हापूरच्या दिवाणांबद्दल सबंध महाराष्ट्रभर अत्यंत प्रतिकूल समज झाला व या दोन तरुण पदवीधरांच्याबद्दल लोकांत आदर अतिशय वाढला तुरुंगांत गेलेल्या दिवसांचे " आमचे डोंगरींतील १०१ दिवस " या छोटेखानी पुस्तकांत आगरकरांनीं मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे. स्वार्थत्यागाची

तपश्चर्या केल्यामुळें आगरकर-टिळक हीं चांगलीं माणसें आहेत हें लोकांना कळलेंच होतें. पण कारागृहवासामुळें त्यांची लोकप्रियता एकदम वाढली आणि मोठ्या माणसांत त्यांची गणना होण्यास वेळ लागला नाहीं.

१८८४ सालीं शाळा चालविणाऱ्या या मंडळीनें कॉलेज काढण्याचें ठरविलें. त्यासाठीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन झाली आणि तिच्या मार्फत फर्ग्युसन कॉलेज १८८५च्या आरंभाला सुरू झालें. कॉलेज सुरू झाल्यानंतर एकदोन वर्षांत संमतिवयाच्या कायद्याचा मसुदा हिंदुस्थानसरकारपुढें येऊन त्यांसंबंधीं सर्व देशभर मतभेद उत्पन्न झाला. या वेळेपर्यंत टिळक व आगरकर दोघेही नव्या विचारांचे म्हणून लोक त्यांना ओळखत होते, पण येथून पुढें टिळकांचें मत जुन्या लोकांच्या विचाराकडे झुकलें आणि ते व आगरकर यांच्यांत मतभेद उत्पन्न झाला. आगरकर पक्के सुधारक म्हणून प्रसिद्धीला आले व टिळक हे जुन्या किंवा सनातनी लोकांचे कैवारी व पुढारी झाले. या मतभेदाचे दोन परिणाम झाले. टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी राजीनामा देऊन सोडली व आगरकरांना केसरी सोडावा लागला. मराठा व केसरी हीं वर्तमानपत्रें टिळकांनीं आपल्याकडे घेतलीं व त्यासंबंधीं सर्व जबाबदारी पत्करली. कांहीं वेळा नंतर सुधारक हें नवीन पत्र आगरकरांनीं काढलें व तें केसरीइतकेंच प्रख्यात झालें. केसरीच्या यशाचा पाया आगरकरांनीं घातला व पुढें टिळकांनीं केसरीला वाढविलें व तें महाराष्ट्रांतील अत्यंत लोकप्रिय पत्र झालें.

आगरकरांच्या प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून त्यांचीं राजकीय, आर्थिक वगैरे मतें कळून येतात. हीं मतें त्यावेळीं राष्ट्रीय वृत्तीची म्हणून सुरू झालेली राष्ट्रीय सभा तिच्या पुढाऱ्यांच्या मतांना धरून होतीं हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हें सांगण्याचें कारण असें कीं आगरकरांनीं केवळ सामाजिक विषयासंबंधानेंच चर्चा केली, राजकीय विषय त्यांना वर्ज्य होते, अशी एक समजूत कोठें कोठें आढळतें, तीं अगदीं चुकीची आहे हें स्पष्टपणें कळावें हें होय. समाज आणि राजकारण हे विषय अगदीं निरनिराळे आहेत, त्यांच्यांत एक मोठी दुर्भेद्य अशी भिंत आहे, अशी समजूत आगरकरांची नव्हती व अशी समजूत शास्त्रीयदृष्ट्या बिलकूल चुकीची आहे ही गोष्ट आतां सर्वांना मान्य आहे. हिंदुस्थानाला पारतंत्र्यां-

तून सोडवून त्याची सर्व प्रकारें उन्नति कशी करावयाची हाच आगरकरांच्या सर्व विवेचनाचा विषय आहे व तें विवेचन करतांना सामाजिक म्हणजे आंतर सुधारणेला विशेष महत्त्व दिलें पाहिजे. ती सुधारणा झाल्याशिवाय दुसऱ्या सुधारणा होणें फार कठीण आहे हें मत आगरकरांनीं विशेष पुढें आणलें; पण त्याचा अर्थ त्यांनीं दुसऱ्या सुधारणांना विरोध केला किंवा त्यांची विशेष काळजी घेतली नाहीं असा मुळींच होत नाहीं. आगरकर जसे सामाजिक सुधारक होते तसे राजकीय सुधारक होते व ही गोष्ट १९१६ सालीं भरलेल्या आगरकरदिनप्रसंगीं मुंबईत भाषण करतांना खुद्द टिळकांनींच स्पष्ट केली होती.

आगरकरांची नवी विचारसरणी

आगरकरांनीं आपल्या लेखणीच्या जोरानें एक नवी विचारसरणी महाराष्ट्रांत आणली यांत शंका नाहीं; किंबहुना सामाजिक व इतर सर्व व्यवहारांना त्यांनीं विचारांची जोड दिली असें म्हणणें रास्त होईल. एखादी गोष्ट चांगली का तर आजपर्यंत चालत आली आहे म्हणून, परंपरागत आहे म्हणून, मग तिचे परिणाम सुष्ट असोत किंवा दुष्ट असोत हा प्रकार त्यांना मान्य नव्हता. जर एखाद्या गोष्टीचे परिणाम दुष्ट असतील तर ती परंपरागत कां असेना टाकून द्यावी; आणि एखाद्या गोष्टीचे परिणाम कल्याणकारक आहेत तर मग ती नवीन असली, परंपरेच्या बाहेरची असली तरी सुद्धां तिचा स्वीकार करावा अशी आगरकरांची शिकवण आहे. आणि परिणामाचा हा सुष्टपणा किंवा दुष्टपणा केवळ क्षणिक सुखावरून किंवा क्षणिक दुःखावरून ते ठरवीत नव्हते; तर शाश्वत सुख किंवा शाश्वत कल्याण यांचा पूर्ण विचार करून ते आपला निर्णय ठरवीत. क्षणिक सुखोपभोगाला आगरकर बिलकूल किंमत देत नव्हते आणि म्हणूनच त्यांना केवळ जडवादी किंवा मजावादी म्हणणें म्हणजे त्यांचें अत्यंत मिथ्या असें वर्णन होईल. आणि ते कल्याणवादी होते, श्रेयोवादी होते, प्रेयोवादी नव्हते, म्हणूनच कित्येक " सुखंच मे शयनंच मे " या तत्त्वावर समाजशास्त्राची रचना करणाऱ्यांना त्यांचें उज्ज्वल लिखाण कडू वाटलें. त्यांच्या वेळीं जुने म्हणजे आज ज्यांना आपण सनातनी म्हणतों ते लोक त्यांजवर तुटून

पडले; आज ते तसे तुटून पडतातच; पण आपण सनातनी नसून अत्यंत आधुनिक आहोंत असें म्हणणारे कित्येक " आगरकर तसे फार पुढें गेलेले नव्हते " असें सांगतांना आपण ऐकतों. याचें कारण आगरकर जसे बुद्धिवादी होते, विचारशील होते, तसे अत्यंत तत्त्वनिष्ठहि होते व " तत्त्वें बदलतात म्हणून तत्त्वनिष्ठेला जागा नाहीं " हे मत कित्येक आधुनिक म्हणून स्वतःचें वर्णन करणारे आपलें अगदीं मोठें महत्त्वाचें मत समजतात. त्यांना ही आगरकरांची तत्त्वनिष्ठा पाहून चमत्कारिक वाटते. महाराष्ट्रांत बुद्धिवादाची ध्वजा तत्त्वनिष्ठेच्या भक्कम पायावर आगरकरांनीं उभी केली आणि म्हणूनच ती भयंकर वादळांना, मोठाल्या वातचक्रांना दाद न देतां फडफडत राहिलेली आहे. आगरकर क्षणिक सुखाचे भोक्ते नव्हते; चिरंतन कल्याण त्यांना पाहिजे होतें, क्षणिक सुखाच्या लालसेनें जसे सनातनी दुराग्रही बनतात तसे एका विशिष्ट मनोवृत्तीचे " आधुनिक " उल्लू बनतात. दुराग्रही सनातनी व्यभिचाराचें व दुराचाराचें समर्थन धर्माच्या नांवाखालीं करतात तर उल्लू आधुनिक बरोबर तशाच किंवा तशासारख्या गोष्टींचें समर्थन " आधुनिकते " च्या नांवाखालीं करतात आणि म्हणून अशा दोन्ही दुष्ट लोकांवर आगरकरांनीं कोरडे ओढलेले आहेत. जुन्या लोकांच्या बहुभार्यकत्वावर प्रहार करणाऱ्या आगरकरांनीं घरीं पहिली बायको असतांना विधवेशीं लग्न लावून त्याचें पुनर्विवाह म्हणून समर्थन करणाऱ्या खोट्या सुधारकांना थारा दिलेला नाहीं हें सुप्रसिद्ध आहे. समतेच्या मुळाशीं संमति पाहिजे आणि समाजांतील व्यवहार बलात्काराच्या तत्त्वावर न होतां संमतीच्या तत्त्वावर व्हावेत असें म्हणणाऱ्या आगरकरांची विचारसरणी जशी सनातनी बलात्कारवाल्यांना कटु वाटली तशीच ती आधुनिक बलात्कारवाल्यांनाही सुखदायक वाटत नाहीं यांत नवल नाहीं. सध्यांच्या काळीं आगरकरांच्या निबंधांचें सूक्ष्म विचारपूर्वक अध्ययन हा समाजशास्त्राच्या अभ्यासाचा एक उत्तम उपाय आहे. कारण त्यांच्या निबंधांत प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांची फोड अतिशय सोपेपणानें आणि अतिशय सरळपणानें केलेली आहे, शिवाय ती पूर्ण स्वतंत्रपणानें केलेली आहे. त्यांत जुन्या बुवाशाहीला जशी जागा नाहीं तसाच नवीन " दडपशाही "च्या तत्त्वज्ञानालाही थारा नाहीं.

[७]

खणखणीत बुद्धिवाद

बुद्धिवाद म्हणजे कोणत्याही गोष्टीची सत्यासत्यता, इष्टानिष्टता ही बुद्धीच्या म्हणजे विचारशक्तीच्या (हिलाच प्राचीन ग्रंथांत तर्कशक्ति असें नांव दिलेलें आहे) कसाला लावून पहाणें. समाजांत सत्यासत्यता किंवा इष्टानिष्टता ही पुष्कळ वेळां फक्त पुष्कळ दिवस चालत आलेल्या चाली-रीतींच्या किंवा कांहींही कारणानें बहुमान्य झालेल्या देवतांच्या किंवा व्यक्तींच्या वचनांच्या अनुरोधानें ठरवितात. अशा चालीरीति किंवा अशीं वचनें हीं अगदीं निरपवाद व त्रिकालाबाधित सत्य समजण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते आणि त्यांच्या प्राबल्यामुळें नवीन गोष्टींना व विचारांना प्रतिबंध होतो. किंबहुना विचार करण्याचें सर्व कार्य प्राचीनांनीं उत्तम प्रकारें उरकलेलें आहे, आपलें काम म्हणजे त्यांनीं घालून दिलेले विधि-निषेध (विधि म्हणजे करावयाच्या गोष्टी, निषेध म्हणजे न करावयाच्या गोष्टी) यथायोग्य प्रकारें पाळावयाचें, दुसरें कांहीं नाहीं, असा हट्ट धरणाऱ्यांना पुराणमतवादी किंवा सनातनी म्हणावयाचें व हट्टाला ज्यांनीं सोडून दिलेलें आहे त्यांना सुधारक म्हणावयाचें. पुराणमतवादी याला पूर्ण प्रतियोगी असा शब्द नवमतवादी हा होऊं शकतो व नवमतवादाचा खरा अर्थ सुधारक शब्दाच्या वर दिलेल्या अर्थाप्रमाणें आहे. तथापि जेव्हां कांहीं विशिष्ट विचार आणि तेवढेच विचार म्हणजे नवमतवाद असें म्हणण्याची प्रथा पडते (या प्रथेमुळें त्या शब्दाच्या वास्तविक अर्थाला बाध येतो) त्यावेळीं तो शब्द सोडून देऊन वरील अर्थ ध्वनित करण्यासाठीं सुधारक हा शब्द योजणें बरें असें म्हणावें लागतें. असो; तर बुद्धिवाद म्हणजे म्हणजे बुद्धीच्या म्हणजे विचारशक्तीच्या कसाला लावून प्रत्येक गोष्टीची इष्टानिष्टता पहाणें. याविरुद्ध जीं तत्त्वें वर सांगितलीं त्यांना अधिकारवाद असें म्हणतां येईल. अधिकृत म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी किंवा अधिकारी असें ज्यांना–देवांना किंवा माणसांना किंवा ग्रंथांना समजण्याची प्रथा आहे, परंपरा आहे, चाल आहे, त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी याच सत्य आहेत, त्यांचा विचार करावयाचा नाहीं असा जो आग्रह तो अधिकारवाद. अधिकारवाद हा बुद्धिवादाचा प्रबळ शत्रु आहे. तो नवीं नवीं नांवें घेऊन बुद्धिवादाला शह घालीत असतो.

कधीं कधीं तो आपल्याला बुद्धिवाद हें नांव घेण्याचें धाडस करतो. अशा तोतया बुद्धिवादाला आगरकरासारखा अस्सल बुद्धिवादी कधींही भीक घालीत नाहीं, आणि या तोतयेपणाचा धिक्कार यालाच वर तत्त्वनिष्ठा हें नांव दिलेलें आहे. ज्या तत्त्वांवर आगरकरांची निष्ठा होती तीं तत्त्वेंसुद्धां खरीं का खोटीं, इष्ट का अनिष्ट, सुष्ट का दुष्ट हें बुद्धीच्या म्हणजे विचाराच्या कसावर त्यांनीं पारखून पाहिलें होतें. विचाराचा कस लावण्याच्या अनेक पद्धति आहेत. त्यांत एखाद्या गोष्टीचें संपूर्ण ज्ञान मिळविणें, तिच्याबाबत सर्व पुरावा गोळा करणें, तिचा अथपासूनचा इतिहास पहाणें आणि मग त्या सर्वांचा सारासार विचार करून निर्णय ठरविणें हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. तो एकोणिसाव्या शतकांत ऐतिहासिक पद्धति म्हणून प्रसिद्धीस आला. त्या मार्गानें तत्त्वांची सिद्धि झाली म्हणजे तीं तत्त्वें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. अर्थात् त्या तत्त्वासंबंधीं कधीं कधीं नवी माहिती व नवा पुरावा उत्पन्न झाला तर तोही विचारांत घेणें हें बुद्धिवादाच्या नियमाला अनुसरून आवश्यक असतें. त्या नवीन गोष्टींचा योग्य विचार करून प्रस्थापित तत्त्वांत कांहीं फेरबदल करावा लागला तर तो करणें हें अर्थात् योग्य असतें. असा फरक करण्यास बुद्धिवादी नेहमीं तयार असतो. पण कधीं कधीं असा फरक करावा लागतो म्हणून जगांत निश्चित तत्त्व असें नाहींच असा हट्ट धरणें ही गोष्ट मात्र बुद्धिवाद्यांना मान्य होणार नाहीं. शिवाय एखादी परिस्थिति एखाद्या तत्त्वाला किंवा नियमाला अपवाद उत्पन्न करते. हा अपवाद केवळ त्या परिस्थितीवर अवलंबून असतो व त्यामुळें तो नियम सर्वस्वीं किंवा सदासर्वदा खोटा ठरला असें मानण्याची प्रवृत्ति ही बुद्धिवादाची नसून वितंडवादाची आहे. आगरकर हे वितंडवादी नव्हते. कित्येक धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी ते दूषणीय समजत होते; पण धर्मप्रवृत्ति ही गोष्ट मनुष्यजातींत फार दृढतर रुजलेली आहे हें ऐतिहासिक सत्य ते विसरले नव्हते आणि म्हणून त्या प्रवृत्तीविषयीं फार जपून बोललें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत आहे व तें बुद्धिवादाच्या तत्त्वांना धरून आहे.

बुद्धिवाद ही आगरकरांच्या विचारसरणींतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ज्या विशिष्ट तत्त्वांना अनुसरून प्रपंच चालला पाहिजे असें

आगरकरांचें स्पष्ट मत होतें त्यांपैकीं पहिलें तत्त्व म्हणजे स्थित्यंतरक्षमता हें होय. विश्व हें स्थितिपर नसून गतिपर आहे, प्रत्येक गोष्टींत बदल हा होत असतो व तो बदल आपणांस थांबवितां येणें शक्य नाहीं, तेव्हां तो बदल आपणांस ज्या प्रकारें हितकारक होईल त्या प्रकारें त्याला साहाय्य करणें, विश्वाच्या गतींत आपली गति मिळविणें, या तत्त्वाला गतितत्त्व हें नांव आहे व हें गतितत्त्व आगरकराच्या मतें अत्यंत महत्त्वाचें आहे. सनातनी लोकांना हें गतितत्त्व सामान्यपणें मान्य नसतें. एकदां गतितत्त्व पटलें, बदल झाल्याशिवाय राहणार नाहीं हें एकदां उमजलें, म्हणजे नवीन गोष्टींची व सुधारणांची भीति माणसाला वाटत नाहीं. अर्थात् गतीला साहाय्य करावयाचें तें जाणूनबुजून बुद्धिपरस्पर केलें पाहिजे ही आगरकरांची स्पष्ट शिकवण आहे. प्रवाहपतित सनातनी आणि प्रवाहपतित सुधारक यांना आगरकर एकाच माळेचे मणि समजतात. किंबहुना खरा सुधारक जो आहे तो प्रवाहपतित होऊंच शकत नाहीं. गतितत्त्वाचें स्पष्टीकरण करतांना सामाजिक व्यवहारांत स्थिर तत्त्व नाहींच असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. गलबताला जसें सुकाणूं असतें तसेंच समाजाच्या व्यवहारांत स्थैर्य असावें लागतें. पण कधीं कधीं स्थैर्याचें रूपांतर शिलावस्थेंत होऊन मुळीं गतिच अशक्य होते. त्यासाठीं गति हें महत्त्वाचें तत्त्व आहे हें विसरून चालत नाहीं. पण केवळ गति आणि तिला दिशा दाखविणारें दुसरें कांहीं नाहीं असें झाल्यास तेंच गलबत कोणत्या खडकावर आपटेल याचा नियम रहात नाहीं. अशा स्थितींत गतीचेही नियम व मर्यादा ठरवाव्या लागतात. स्थितीच्या व गतीच्या मर्यादा ओळखून हें गतितत्त्व आखावें लागतें. आणि आगरकरांच्या निबंधांत तें तशाच पद्धतीनें आंखलेलें आहे हें ते निबंध लक्षपूर्वक वाचणारांच्या सहज ध्यानांत येईल. पण प्रत्येक तत्त्व अमर्याद आहे, किंवा अमर्यादपणा हेंच अत्यंत महत्त्वाचें तत्त्व आहे असा हट्ट धरणाऱ्यांना हें बुद्धिवाद्यांचें गतितत्त्व पटण्यास कठीण जातें. "कोठें आदळलांत तरी हरकत नाहीं पण कुठें तरी धांवत चला" असला कारभार शास्त्रीय गतितत्त्वाला मान्य नाहीं. आगरकर हे शास्त्रीय गतितत्त्वाचे पुरस्कर्ते होते आणि कोणीही विचारी माणूस तसाच असणार हें उघड आहे.

गतितत्त्वांचा बुद्धिवादाप्रमाणेंच आगरकरांनीं धडाडीनें पुरस्कार केला व या दोन तत्त्वांना अनुसरून समाजरचनेंत व व्यवहारांत कोणत्या गोष्टींना प्रमुख स्थान दिलें पाहिजे याचा त्यांनीं पूर्ण ऊहापोह केलेला आहे. या गोष्टींत न्याय आणि दया यांचा प्रमुखत्वानें समावेश होतो. समता आणि संमति या गोष्टींचा उदयसुद्धां वरील दोहोंमधून होत असतो. कारण समता तरी न्याय व दया यांना अनुसरून असली पाहिजे आणि संमति देणाऱ्याची स्थिति स्वतंत्रपणें संमति देण्यासारखी असली पाहिजे. या सर्व तत्त्वांचा अंमल केवळ शाब्दिक होतां उपयोगी नाहीं तर तो खराखुरा झाला पाहिजे. पुष्कळ वेळां होतें काय कीं बाह्यतः याच तत्त्वांचा अंमल होत आहे असें दिसतें, पण वस्तुतः त्या तत्त्वांतील अंतस्थ सार चिरडून जात आहे असें आढळतें. उदाहरणार्थ, शहाण्या व मूर्ख अशा दोन माणसांतील करार घ्या. यांत दोन्हीही माणसें कायद्याप्रमाणें करार करण्यास लायक असतील, पण कायद्याप्रमाणें लायक असणें म्हणजे अमुक वयाचा मनुष्य असणें, तो प्रत्यक्ष वेडा नसणें इत्यादि. असें नसूनही तो मनुष्य लबाड नसेल, व्यवहारी नसेल व त्या करारांत त्याचें नुकसान होण्याचा पुष्कळसा संभव राहील. म्हणून अशा प्रसंगीं कधीं न्यायाचा, कधीं दयेचा, कधीं दोहोंचा अंमल करावा लागतो. व्यवहारांत कोणतीही गोष्ट केवळ एका तत्त्वाचा अतिरेक करून होत नाहीं तर तीं अनेक तत्त्वांचा मिळून परिणाम असते; व या अनेक तत्त्वांची योग्य प्रकारें सांगड घालणें हीं सर्व व्यवहारांतील, प्रपंचांतील किंबहुना परमार्थांतिल सुद्धां श्रेष्ठ शहाणपणाची खूण आहे. आगरकरांनीं सुचविलेल्या सुधारणा याप्रमाणें कित्येक महत्वाच्या तत्त्वांना अगदीं धरून होत्या म्हणून त्यांत एक प्रकारचें स्थैर्य, टिकाऊपणा आलेलीं आहेत. सास्वा सुनांचा छळ करीत तेव्हां सुनांची बाजू आपण घेतों. यांत तत्त्व कोणतें ? सुनांचीच बाजू घेणें हें तत्त्व नव्हें. कारण विशिष्ट परिस्थितींत सास्वांचा छळ सुनाही करतात. मग तुमचा पक्ष कोणता ? सासू कां सून ? याला उत्तर संतापाच्या किंवा उद्वेगाच्या मनांत दिलें कीं त्यांत पुष्कळ वेळां चूक होते. तें विचारपूर्वक दिलें पाहिजे आणि मग तें काय येईल ? तर कोणी कोणाचा छळ करूं नये हें तत्त्व याच्या मुळाशीं आहे आणि जर सासू सुनेचा नाहक छळ करीत असेल

तर आम्ही सुनेला त्यांतून सोडविणार व जर सून सासूला उगाच त्रास देत असेल तर सासूची बाजू आम्ही घेणार असें न्यायी व शहाणा माणूस म्हणेल.

व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार

आणखी एका महत्वाच्या तत्त्वाचा उल्लेख करणें आवश्यक आहे. तें तत्त्व म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य हें होय. प्रत्येक व्यक्तीला महत्व आहे व त्या महत्वाला नैसर्गिक कारणांखेरीज इतर कारणांनीं प्रतिबंध करणें हें अन्यायाचें होतें. बऱ्याचशा सामाजिक चाली पुष्कळ व्यक्तींना जाचक होतात याचें कारण समाजांतील प्रत्येक व्यक्तीला सारखें महत्त्व आहे ही गोष्ट समाजांतील बलिष्ठ माणसें लक्षांत घेत नाहींत. जातिभेद ही संस्था अशा प्रकारें व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणारी आहे. समाजाच्या कल्याणासाठीं व समाज योग्य प्रकारें चालावा म्हणून व्यक्तीच्या स्वातंत्र्याला कांहीं मर्यादा घालावी लागते हें खरें; तथापि ती मर्यादा अमर्याद होऊन जर व्यक्तीचें व्यक्तिमत्व नाहींसें करील तर त्यानें समाजाचें कल्याण होणार नाहीं, उलट समाजाला अधोगति प्राप्त होईल. व्यक्तीला जर स्वातंत्र्यबुद्धीच उरली नाहीं, व्यक्ति जर केवळ यंत्रासारखी झाली तर हळूहळू अशा व्यक्तींचा समाज रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाहीं. व्यक्तींवर समाजाच्यासाठीं कांहीं बंधनें घालणें जरूर असतें; पण तीं बंधनें अगदीं आवश्यक तेवढीं असावींत; त्यामुळें व्यक्तित्वाला बाध येऊं नये असें समाजरचनेचें व समाजव्यवहाराचें धोरण ठेवावें लागतें. तसें धोरण ठेवणें म्हणजेच व्यक्तित्वाला महत्त्व देणें होय आणि हें व्यक्ति-मत्त्वही बुद्धिवाद आणि गतितत्त्व यांच्याप्रमाणें आगरकरांच्या शिकवणींतील फार महत्त्वाचें अंग आहे. बालविवाह नसावेत. विधवापुनर्विवाहाला प्रतिबंध असूं नयेत, लोकांनीं जमविलेल्या किंवा लादलेल्या विवाहाच्या ऐवजीं स्वयंवर म्हणजे वधूवरांनीं एकमेकांना पसंत करून केलेला विवाह अस्तित्वांत यावा, स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच शिक्षण द्यावें व कोणत्याही धंद्यांत इच्छा असल्यास शिरण्याची मुभा असावी, जातीमुळें कोणालाही विद्याप्राप्तीला किंवा कोणत्याही उद्योगांत शिरण्याला अडथळा होऊं नये

वगैरे सुधारणा या व्यक्तिमत्वाच्या तत्त्वामुळें इष्ट व न्यायाच्या ठरतात हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. बलात्कार नसावा आणि संमति असावी असें म्हणणें म्हणजे सुद्धां व्यक्तिमत्वाला मान्यता देणें आहे.

अशा प्रकारें हीं सर्व सामान्य तत्त्वें ग्राह्य मानलीं म्हणजे स्थळकाळ-परत्वें निरानिराळ्या सुधारणा इष्ट ठरतात. हिंदुस्थानांत बालविवाह जारीनें सुरूं होता. त्यामुळें वधूवरांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होई; म्हणून प्रौढ विवाहाचा उपदेश आगरकरांनीं केला. आतां समजा, प्रौढ विवाहाचा जर कोणी असा अर्थ करील कीं वयाची पन्नाशी उलटेपर्यंत कोणी लग्नें करावयाचीच नाहींत तर त्याचाही परिणाम समाजावर तसाच व्यक्तीवर अत्यंत अनिष्ट होईल. कांहीं विशिष्ट वयांत स्त्रीपुरुषें एकत्र येणें हें हितावह असतें. त्या वयाच्या पूर्वी त्यांनीं एकत्र येणें जसें अनिष्ट असतें तसेंच त्या वयांत त्यांनीं एकत्र न येणें हेंही अनिष्ट असतें. तेव्हां कोठें कोठें फाजील प्रौढ विवाहाचा निषेध करावा लागतो. सध्यां अमेरिकेंत व युरोपांत तसा निषेध होत आहे; पण हा निषेध म्हणजे बालविवाहाचें मंडन मात्र नव्हे ही गोष्ट सरळ वृत्तीच्या व शहाण्या माणसास कळण्यासारखी आहे. आतां बालविवाह दुसरीं माणसें जमवितात, त्यावेळीं वधूवरांची संमति कोणी विचारीत नाहींत व ती देण्याची पात्रताही त्यांत आलेली नसते. फाजील प्रौढ विवाहांत तर वधूवरांना आपण काय करतों हें कळण्याची पात्रता असते व संमति देण्याची लायकी त्यांना असते आणि तिसरी मंडळी कांहीं अशा प्रकारचीं लग्नें जमवूं शकत नाहींत. तेव्हां न्यायाच्या दृष्टीनें बालविवाहांत जितका दोष आहे तितका फाजील प्रौढ विवाहांत नाहीं हें कबूल केलें पाहिजे; पण केवळ न्याय आहे म्हणून त्यांतील सर्व अनिष्टता नाहींशी होते असें मात्र नाहीं. असो; तर याप्रमाणें बुद्धिवाद, गतितत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, दया, समता, इत्यादि तत्त्वांना धरून सर्व सुधारणा झाल्या पाहिजेत. बाबावाक्यं प्रमाणम् हा सनातन्यांचा दोष जर सुधारकांच्या अंगीं आला तर सुधारकांचें सुधारकत्व नष्ट होईल. सुधारकाची बुद्धि कधीं मंदावता कामा नये. नव्या नव्या परिस्थितीला लक्षांत घेऊन उपरोक्त तत्त्वानुसार स्थळकाळ विशिष्ट सुधारणा सुचविण्याची ताकद व चपलता त्या बुद्धींत सारखी असली पाहिजे. विधवाकेशवपनावर आगरकरांनीं इतके कोरडे ओढले आहेत याचें

कारण अन्याय आणि बलात्कार हे त्यांना नको होते. आतां जर जाणत्या स्त्रिया आपले केस "बॉब" करूं लागल्या तर तसें करण्याची त्यांना मुखत्यारी आहे. पण "बॉब" करण्यास मुखत्यारी असणें म्हणजे बलात्कारानें केशपवन करणें मात्र न्यायाचें व इष्ट ठरत नाहीं.

व्यक्तीला योग्य व्यक्तिमत्त्व येण्यासाठीं प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळालें पाहिजे; नाहींतर शिक्षण न मिळालेल्या माणसांना अज्ञानांत काळ कंठावा लागतो. हें शिक्षण कांहीं किमान मर्यादेपर्यंत सर्वांना अवश्य मिळालें पाहिजे आणि ज्याअर्थीं समाजांत फार मोठी संख्या गरीब लोकांची आहे त्याअर्थीं त्या मर्यादेपर्यंतचें शिक्षण मोफतही मिळण्याची तरतूद झाली पाहिजे असें मत आगरकरांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक असावें, सक्तीचें असावें आणि मोफत असावें या सूत्राचा-उपदेश हिंदुस्थानांत आगरकरांनीं प्रथम केला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हें प्राथमिक शिक्षण स्त्री-पुरुषांना व सर्व जातींना भेदाभेद न करतां दिलें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत होतें. सर्व प्रकारचें शिक्षण, प्राथमिक, दुय्यम व उच्च, स्त्रियांना व पुरुषांना सारखें द्यावें व एकत्र द्यावें असेंही मत त्यांनीं प्रतिपादन केलेलें आहे. सारखेंच आणि एकत्र शिक्षण स्त्री-पुरुषांना द्यावें या मताला कित्येकांचा विरोध आहे व स्त्रियांसाठीं निराळीं हायस्कूलें, कॉलेजें व विद्यापीठें काढणें हें त्या विरोधाचें निदर्शक आहे. या विरोधाची छाननी करण्याचें हें स्थळ नव्हें. परंतु शिक्षणाच्या कामांत स्त्रियांचा "सवता सुभा" उभा करण्याला आगरकर अनुकूल नव्हते व समाज-हिताच्या व व्यक्तिकल्याणाच्या दृष्टीनें स्त्रियांना व पुरुषांना शिक्षण एकच व एकत्र दिलें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत होतें, हें या बाबतींत लक्षांत ठेविलें पाहिजे.

आगरकरांनीं सर्व प्रकारच्या सुधारणा सुचविल्या आणि समाजांत जेथें जेथें दूषण होतें तें नाहींसें व्हावें असा प्रयत्न केला. जुन्या गोष्टींतील उत्तम आहे तें राहील; त्याला धक्का लागणें शक्य नाहीं; पण या हिंदु-समाजरूपी जरठ वृक्षाला खच्ची करून (म्हणजे त्यांतील दूषणस्थळें नाहींशी करून) त्याला नवीन कल्पनांचें भरपूर पाणी घालावें म्हणजे तो वृक्ष पुनः फोफावेल, अशी त्यांची शिकवण आहे. या नवीन कल्पना

इंग्रजी शिक्षणामुळें आल्या, ही गोष्ट त्यांनीं प्रांजलपणें कबूल केली आहे. त्यांची सुधारणा म्हणजे इंग्रजी चालीचें अनुकरण नव्हतें. असलें अनुकरण म्हणजेहि आंधळेपणा आहे व तशा आंधळेपणाला आगरकर अत्यंत दोष देतात. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावी असें आगरकर सांगतात व साहेबांचे दोष अर्थात् आपण आचरणांत आणूं नयेत असें त्यांचें म्हणणें आहे. आणि म्हणूनच केवळ "खाण्यापिण्याच्या नाविन्यानें" स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्यांची सुधारणा त्यांना बिलकुल मान्य नव्हती. त्याच-प्रमाणें कसल्याही प्रकारचें ढोंग त्यांना खपत नव्हतें. आगरकर ढोंगाचे मोठे शत्रु होते. ढोंग, लपवाछपवी, लबाडी या गोष्टी त्यांना बिलकुल पसंत नव्हत्या. त्यांच्या जोरदार लेखणीच्या तडाख्यांनीं सर्व ढोंगी लोकांची दाणादाण उडाली आणि याही बाबतींत ते ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या मंडळींच्या पंक्तींत उत्तम शोभून बसतात. केवळ बहुजनसमाजाला खूष करण्यासाठीं किंवा स्वतःच्या क्षुल्लक किंवा मोठ्या स्वार्थासाठीं "मनस्येकं वचस्येकं कार्यमन्यत्" असें वागणें त्यांना मान्य नव्हतें आणि अशा प्रकारें वागणाऱ्यांना ते दुरात्मे समजत. त्यांना जसें जुन्या तऱ्हेचें ढोंग खपत नव्हतें तसेंच नव्या तऱ्हेचें ढोंगही खपत नव्हतें. सत्य–निर्भेळ सत्य–निर्भयपणें लोकांपुढें मांडणें हें महाव्रत त्यांनीं पत्करलेलें होतें. त्यांचें स्वतःचें वर्तन त्या व्रताला अगदीं अनुरूप होतें. साधी राहणी, अत्यंत स्वार्थत्याग, पूर्ण प्रसन्न आणि निर्मत्सरी वृत्ति, दुःखितांना साहाय्य, उन्मत्तांना तडाखे, अशा प्रकारें त्यांनीं आपली जीवितयात्रा चालविली.

श्रेष्ठ साहित्यिक व थोर पत्रकार

महाराष्ट्रांतील एक अत्यंत थोर पुरुष व मराठींतील एक उत्कृष्ट लेखक या दोन्ही नात्यांनीं आगरकरांचें स्थान अढळ आहे. त्यांची लेखन-रीति अंतःकरणापासून उत्पन्न झालेली आहे. त्यामुळें तींत वक्तृत्व हा जसा गुण आहे त्याचप्रमाणें कधीं कधीं अतिशय लांबलचक वाक्यरचना हा दोषही आढळतो. पण त्यांची भाषा ओजस्वी, तेजस्वी,व निरनिराळ्या रसांना प्रसंगानुरुप अनुकूल अशी आहे. इंग्रजी कल्पना सुंदर मराठी अन्वर्थक शब्दांत व्यक्त करण्याची हातोटी त्यांना फार उत्कृष्ट साधलेली

होती. ही हातोटी टिळकांनाही उत्कृष्ट साधलेली होती. संमतिवयाचा वाद उपस्थित होण्यापूर्वी टिळक–आगरकर ही जोडी एक मताची,एक विचाराची होती व परंपराप्रिय लोक त्या दोघांनाही सुधारक व नास्तिक समजत. पुढें या संमतिवयाच्या वादाला तीव्र स्वरूप आलें. आणि पुराणप्रिय लोकांचें पुढारीपण टिळकांनीं स्वीकारलें व सुधारकांचें नेतृत्व आगरकरांकडे आलें. न्यायमूर्ति रानडे, डॉ. भांडारकर वगैरे मंडळी त्या वेळीं जुन्या समाजाच्या दृष्टीनें सुधारक म्हणून प्रसिद्ध होती; पण त्यांच्या दृष्टीचा पाया बुद्धिवाद हा नव्हता, म्हणून त्यांना फार तर उदारमतवादी म्हणतां येतें; बुद्धिवादी सुधारक म्हणतां येत नाहीं. आगरकरांचा विशेष हा कीं त्यांनीं बुद्धीच्या पायावर आपली सुधारणेची इमारत रचली. त्यांचा दुसरा विशेष हा कीं बहुजनसमाजाला कळणाऱ्या भाषेंत त्यांनीं आपले लेख लिहिले व बहुजनसमाजांतून ते केव्हांही पृथक् झाले नाहींत. समाजांत राहून समाजाची सुधारणा करणें या तत्त्वावर त्यांचा अढळ विश्वास होता व आपलें म्हणणें खरें व कल्याण-कारक असल्यास आज ना उद्यां समाज आपलें ऐकेल असा त्यांना भरंवसा होता. त्यांची लेखनपद्धति विशेष आकर्षक होती. तिच्यांतील टवटवीतपणा अद्यापीही कायम आहे. मराठी वर्तमानपत्रांना उदयकाल येण्यास ज्यांचे श्रम कारणीभूत झाले त्यांत आगरकरांची प्रमुखत्वानें गणना टिळकांनीं त्यांच्या संबंधीं लिहिलेल्या मृत्युलेखांत केलेली आहे. आगरकरांना सर्व प्रकारच्या विषयांचीं वर्णनें लिहिण्याची हौस होती हें त्यांच्या विविधविषय-संग्रह या छोट्याशा निबंधसंग्रहावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

उपमा दृष्टांतादि अलंकारांचा यथोचित उपयोग करून विषय प्रतिपादन सुलभ करण्याची हातोटी आगरकरांना फार साधलेली होती. तसेंच समाजाच्या रचनेची व व्यवहाराची अगदीं बारीक सारीक माहिती सुद्धां त्यांनीं करून घेतली होती असें स्पष्ट दिसतें. दारिद्र्यांत दिवस काढतांना व विद्यार्जनासाठीं खडतर प्रयत्न करतांना ही माहिती त्यांना बरीचशी आपोआप मिळाली असावी, असें म्हणण्यास हरकत नाहीं. निरनिराळे रस ते फार खुलवितात व लेखनाच्या बाबतींत त्यांची व्हाल्टेअर या फ्रेंच ग्रंथकाराशीं कित्येकांनीं तुलना केलेली आहे ती अनुचित नाहीं.

अर्थात् व्हाल्टेअरची आयुर्मर्यादा आगरकरांच्या मानानें दुप्पट होती, त्याला मोठमोठ्या लोकांचा आश्रय मिळाला होता, आणि त्याची ग्रंथरचना विपुल होती. पण त्याच्या लेखनांतील बरेच महत्वाचे गुण आगरकरांच्या लेखनांत आहेत यांत शंका नाहीं. विनोद हा गुण आगरकरांच्या लेखनांत भरपूर आढळतो व हा विनोद कोठेंहि मत्सरयुक्त असा नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे. कुचकेपणाला कोणी कोणी खोचदार विनोद असें नांव देतात, पण कुचकेपणाला आगरकरांच्या वृत्तींतच जागा नव्हती ती त्यांच्या लेखांत तरी कुठून मिळणार ? आगरकरांनीं केवळ अज्ञानी किंवा प्रामाणिकपणें श्रद्धाळू असलेल्या लोकांवर केव्हांही प्रहार केलेला नाहीं. सज्ञान व ढोंगी लोकांवर त्यांचा कटाक्ष आहे, हे सुधारणानिंदकांची वर्गवारी पाडतांना त्यांनीं जें विवेचन केलें आहे त्यावरून लक्षांत येतें. अज्ञानी लोकांविषयीं त्यांच्या ठिकाणीं अनुकंपा होती व त्यांचें अज्ञान घालविण्याचा उद्योग त्यांनीं आयुष्यभर केला. शहाण्या व विचारी लोकांच्या मताला मान द्यावा व जर एखादी गोष्ट समाजाच्या कल्याणाची असेल तर तेथें ' बहुमत ' या शब्दाचा शाब्दिक अर्थ न घेतां तो विचारी लोकांचें मत असा घ्यावा असें त्यानीं सांगितलें आहें.

आगरकरांच्या तत्त्वप्रणालीचें स्वरूप माहीत असलें तर वाचकांना त्यांचे निबंध वाचणें थोडेसें अधिक सुलभ जाईल ही दृष्टि ठेवून या लेखांत जें थोडेसें विवेचन केलेलें आहे तें सर्व प्रकारच्या वाचकांस उपयोगाचें होईल अशी उमेद आहे.

मराठी वाङ्मयांत आगरकरांना महत्त्वाचें स्थान आहे; त्या दृष्टीनें त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन झालें पाहिजे. पण भाषेच्या बाह्य गुणांबरोबरच त्यांच्या लेखनांतील अंतरंग म्हणजे सर्वांगीण सुधारणेची शिकवण ही सर्वांच्या अंगांत भिनावी म्हणजे आपल्या देशाला उर्जित काळ येण्यास फारसा अवधि लागणार नाहीं येवढें म्हणून हा लेख येथें पुरा करतों.

ग्रंथालय व संशोधन केंद्र, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 20427 वि सिंधु
नोंदणी क्रमांक 1082 दि 31/12/02

आगरकर-दर्शन

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 1095

१ : : कवि, काव्य, काव्यरात्रि

अहोरात्र मोठमोठ्या राजकीय प्रकरणांनीं ज्यांचें मन व्यग्र केलें आहे, अवाढव्य व्यापारविस्ताराची व्यवस्था पाहतां पाहतां ज्यांना जेवणास सुद्धां पुरेशी फुरसत सांपडत नाहीं, शास्त्राभ्यासांत गढून गेल्यामुळें प्रपंचसुखांविषयीं ज्यांना वैराग्य उत्पन्न झालें आहे, अथवा प्रपंचाच्या काळजींत जे अगदीं चूर होऊन गेले आहेत–अशांपैकीं प्रत्येकास केव्हां केव्हां सवडींत सवड करून घटकाभर एकादें नाटक किंवा काव्य हातांत घ्यावें, असें कां वाटतें ? आपल्या आयुष्याची पूर्ण पन्नास वर्षें ज्यानें इंग्लंडच्या राजकीय घडामोडींत घालविलीं, त्या ग्लाड्स्टनाला अजूनही एकादे दिवशीं ' होमर ' वाचण्याची इच्छा कां होते ? लढाईच्या सामानाबरोबर सफॉक्लीज् वगैरेंचीं नाटकें आलेक्झांडर कां बाळगी ? तास दोन तास कथाश्रवण करण्यासाठीं शिवाजी आपला जीव वारंवार धोक्यांत कां घाली? ' उत्तररामचरिताच्या ' कर्त्याचें नांव संस्कृतज्ञ अद्यापि प्रेमानें कां स्मरतात ? किर्लोस्करकृत ' सौभद्राला ' झुंडीच्या झुंडी कां लोटतात ? 'नाटकें करावीं' असा अभिप्राय कै. विष्णुशास्त्र्यांनीं कां दिला ? पाश्चिमात्य पाठशालांत व इंग्रजांनीं या देशांत स्थापिलेल्या शाळांत प्राचीन व अर्वाचीन कवींचीं काव्यें विद्यार्थ्यांकडून वाचविण्याचा परिपाठ कां पडला आहे ?

वरील प्रश्नांचें समाधान होण्यासारखें उत्तर ज्यांस देतां येईल, त्यांस काव्यरसांचें हृद्गत समजलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणी असें म्हणतात कीं, काव्यांत जी पद्यरचना असते, ती कर्णमनोहर असते, म्हणून काव्यवाचनापासून मनुष्यास आनंद होतो. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, ' अमरा ' सारख्या ग्रंथांत पद्यरचना असतांही त्यास कोणी काव्य म्हणत नाहीं. तेव्हां पद्यरचनेंत काव्यात्मा

नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, काव्य हें मनुष्य-स्वभावाचें आणि सृष्टीचें हुबेहूब चित्र आहे, म्हणून त्याचें वाचन मनुष्यास आल्हाद देतें. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, वैद्यकादि ग्रंथांत वनस्पत्यादिकांच्या गुणांचीं व धर्मांचीं जीं हुबेहूब वर्णनें आहेत, त्यांस कोणी काव्य म्हणत नाहीं, त्याअर्थी मनुष्याच्या किंवा सृष्टीच्या यथार्थ वर्णनांत काव्यात्मा आहे असें म्हणतां येत नाहीं. शिवाय काव्य हें मनुष्याच्या स्वभावाचें यथार्थ वर्णन असेल, तर त्यांत पद्यरचना कधींच उपयोगाची नाहीं. कारण सुखदुःखादि कोणत्याही मनोविकारांचा कितीही अतिरेक झाला तरी, तत्संबंधीं उद्गार वृत्तबद्ध निघत नाहींत. आणि काव्यांत तर गद्यापेक्षां पद्यरचनाच विशेश आढळते. तेव्हां काव्य हें आहे तरी काय ? कवींना इतकें मोठेपण येण्याचें कारण काय ? चांगल्या काव्यांच्या वाचनानें आनंद कां होतो ? हे प्रश्न पुन्हां निरुत्तर राहिल्यासारखे दिसतात.

आमच्या मतें जो कोणी क्षणभर अंतर्दृष्टी करून या प्रश्नांचा शांतपणें विचार करील, त्याला त्याचें बरोबर उत्तर तेव्हांच देतां येईल. काव्यांत बहुशः पद्यरचना असते, तथापि कांहीं प्रकारच्या गद्यांतही काव्यगुण असतात. तसेंच 'काव्य' हें मनुष्याच्या स्वभावाचें आणि सृष्टीचें यथार्थ वर्णन आहे,-वगैरे 'काव्य' शब्दाच्या अर्थानिर्णायक प्रत्येक प्रयत्नांत थोडेंथोडें सत्य आहे. त्यांत समग्र सत्य नाहीं, म्हणून तें समाधान-कारक होत नाहींत. त्यांत्र कांहीं तरी न्यूनता आहे असें वाटतें; पण ती कोठें आहे हें समजत नाहीं. काव्यवाचनापासून आनंद होतो हें निर्विवाद आहे. तो ज्या कारणांनीं होतो, त्यांची मीमांसा मात्र संशयाकुल आहे.

काव्याचें खरें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं मनुष्याच्या मनोधर्मांचा थोडासा विचार करणें जरूर आहे. जागृतावस्थेंत मन चंचल असतां त्यांत जे व्यापार चालतात, त्यांचे 'संवेदना', 'इच्छा' व 'ज्ञान' असे तीन वर्ग करतां येतील. या तीन अनुभवांस 'मन' ही संज्ञा आहे. या तिहींपैकीं पहिल्याशीं काव्याचा विशेष संबंध आहे. संवेदना दोन प्रकारची आहे, प्रतिकूल व अनुकूल. प्रतिकूल संवेदनेस आपण दुःख म्हणतों, व अनुकूल संवेदनेस सुख म्हणतों. ज्यापासून प्रतिकूल संवेदना उत्पन्न होतात, तें आपणांस आवडत नाहीं. ज्याच्यापासून अनुकूल संवेदना होतात, तें

आपणांस प्रिय होतें. कारण दुःखाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष, या मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक वृत्ति आहेत. इतर सुखद वस्तूंप्रमाणें काव्यापासून आपणांस अनुकूल संवेदना होतात म्हणून तें आपणांस आवडतें. ज्या लेखरचंनेपासून वाचकांस ज्ञान करून देण्याचा हेतु असतो, तींत काव्य नसतें. जी रचना वाचकांच्या अंतःकरणांत अनुकूल संवेदना उत्पन्न करण्याकरितां केलेली असते, ती काव्य होय. वास्तविक पाहतां कोणतीही लेखरचना केवळ अनुकूल संवेदना उत्पन्न करण्यासाठीं, किंवा केवळ ज्ञान करून देण्यासाठीं केलेली असत नाहीं. ज्ञान करून देण्यासाठीं लिहिलेलीं पुस्तकें मनोरंजक करण्याचा प्रयत्न केलेला असतो; मनोरंजक पुस्तकांत जातां जातां थोडेसें ज्ञान देण्याचा प्रयत्न असतो. मृदुता किंवा रमणीयता हा काव्याचा प्रधान गुण; काठिण्य किंवा कर्कशता हा शास्त्रीय ग्रंथांचा प्रधान गुण. शास्त्रीय ग्रंथांत थोडी मृदुता आणल्यानें त्यांचें अध्ययन कष्टावह होत नाहीं. काव्यांत कोठें काठिण्य येऊं दिलेलें असतें, तें वाचकांस आनंदाबरोबर थोडें ज्ञानही करून देण्याच्या हेतूनें येऊं दिलेलें असतें.

पुढें जें सांगावयाचें आहे, त्यासंबंधानें गैरसमज होऊं नये म्हणून येथें इतकें स्पष्ट करणें जरूर आहे कीं 'काव्य' शब्दांत आम्ही नाटकादि सर्व सुखोत्पादक लेखांचा समावेश केला आहे, व 'कवि' शब्दांत असले लेख लिहिणाऱ्या नाटककारादि सर्व लोकांचा समावेश केला आहे. मनुष्यांच्या विचारांत,प्रत्यक्ष अनुभवांत किंवा लेखांत बाह्यसृष्टि किंवा अंतःसृष्टि याशिवाय दुसरा कोणता विषय असूं शकणें शक्य नाहीं. कारण, या दोन सृष्टि सांगितल्या म्हणजे कल्पनीय वस्तूंची परमावधि झाली. या दोन सृष्टींबाहेर आम्ही जाणार कोठें ? व विचार कशाचा करणार ? मनांतील अनंत व्यापार, यांपैकीं एक किंवा अनेक, हेच आमच्या सुखानुभवाचे आणि ज्ञानाचे विषय असले पाहिजेत. तसेंच, ज्याप्रमाणें ज्ञान म्हणजे अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णय, त्याप्रमाणें काव्यही अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णयच आहे. शास्त्रीय ग्रंथांतल्याप्रमाणें काव्यांतही वस्तूंचें हुबेहूबच वर्णन केलें पाहिजे. ज्याप्रमाणें शास्त्रीय ग्रंथाला, त्याप्रमाणेंच काव्यालाही याच गुणानें माहात्म्य, सारता, व महर्घता येते. ज्यांत सत्यनिरूपण नाहीं, तो शास्त्रीय ग्रंथ जसा कवडीच्या मोलाचा, त्याप्रमाणें ज्यांत सत्यनिरूपण

नाहीं, असा काव्यग्रंथही कवडीच्या मोलाचा. दोघांचाही सत्यकथनावर, यथार्थ वर्णनावर, किंवा हुबेहूब चित्र काढण्यावर सारा कटाक्ष आहे. भेद इतकाच आहे कीं, शास्त्रीय ग्रंथांतील विषय आणि त्यासंबंधानें सत्य सांगण्याची पद्धत, हीं काव्यांतील विषय आणि त्यासंबंधानें सत्यं सांगण्याची पद्धत, याहून निराळीं असतात.

मनुष्यांच्या दुःखाचा परिहार व सुखाची वृद्धि करण्याचें सामर्थ्य ज्ञानाच्या अंगीं आहे, म्हणूनच मनुष्यें त्याच्या पाठीमागें लागलीं आहेत. तसें नसतें तर त्याचा नाद त्यांना कधींच न लागता. ज्ञान हें मनुष्यांच्या सुखाचें प्रधान साधन आहे. तथापि तें झाल्याबरोबर त्यांपासून सर्वांस सुख होऊं लागलें असें नाहीं. सुखावह होण्यास त्यास अनुकूल संवेदनोत्पादक व्हावें लागतें. जोंपर्यंत त्याला हें नूतन स्वरूप आलें नाहीं तोपर्यंत तें काव्यविषय होऊं शकत नाहीं, कारण अनुकूल संवेदनोत्पादक असणें—हा काव्याचा प्रधान गुण आहे. आज ज्या कित्येक गोष्टींचें ज्ञान फक्त तत्त्ववेत्त्यांसच आनंद देत आहे, तें कालांतरानें सर्व जनांस आनंददायक होईल. परंतु तें तसें होऊं लागण्यापूर्वी बराच अवधि लोटला पाहिजे. तो लोटला कीं तें सुखोत्पादक होऊन कवीच्या मान्यांत सांपडणार! यांवरून काय सिद्ध झालें कीं, आज ज्या गोष्टी शास्त्रीय ग्रंथांत कोंडून राहिल्या आहेत त्या, व तेथून पुढें ज्यांचा शोध शास्त्रवेत्ते करतील त्या, अवश्य काळ गेला म्हणजे काव्यविषय होऊं शकतील. आजपर्यंत असेंच होत आलें आहे. आंग्लभौम राजकवि लॉर्ड टेनिसन यांचें "प्रिन्सेस" नामक काव्य, (ज्याचें डॉ० कीर्तिकर यांनीं मराठींत भाषान्तर करून तें "इंदिरा" या नांवानें प्रसिद्ध केलें आहे,) या नियमाचें उदाहरण आहे. हा नियम खरा असेल तर, ज्ञानप्रसार होऊं लागला म्हणजे कवित्वशक्तिस मांद्य येतें असा जो कित्येकांनीं साहसाचा अभिप्राय दिला आहे, तो खोटा ठरतो. इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथकार डॉक्टर जॉन्सन् यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, काव्य करण्याजोगे नामी नामी विषय जगांतील जुने कवि लाटून बसल्यामुळें, अर्वाचीन कवींस मनोरंजक काव्यें लिहिण्यासारखे विषयच राहिले नाहींत! शास्त्रप्रसार काव्यरचनेस घातक आहे, हें विलक्षण मत मेकॉलेनें कोठेंसें ठोकून दिलें आहे!

काव्यास अलीकडे जें थोडेंसें मांद्य आल्यासारखें दिसतें, त्याचें कारण, अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे, तर अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळें काव्यवस्तु करण्याजोगे जे नवीन विषय उत्पन्न झाले आहेत, त्यांचा अर्वाचीन कवि काव्यरचनेंत उपयोग न करतां प्राचीन कवींच्या काव्यविषयांवर फिरून फिरून लिहितात, व त्यांच्या भाषेचें अनुकरण करतात, हें आहे. ज्यांनीं असें केलेलें नाहीं त्यांचीं काव्यें वाचकांस प्रिय झालीं आहेत, व पुढें जे असें करणार नाहींत त्यांचींही काव्यें वाचकांस प्रिय होतील, याबद्दल आम्हांस मुळींच संशय नाहीं. शिवाय, प्रत्येक शतकांत महातत्त्ववेत्ता निघणें जसें संभवत नाहीं, त्याप्रमाणें महाकवि निघणें हेंही संभवत नाहीं. जसा इंग्लंडांत आजपर्यंत एकच शेक्सपियर् होऊन गेला, त्याप्रमाणें बेकनही एकच होऊन गेला ! हिंदुस्थानांतही अद्यापपावेतों भास्कराचार्यास किंवा कालिदासास प्रतिस्पर्धी भेटला नाहीं ! हाताचीं बोटेंच घालून महाकवींचीं संख्या मोजूं लागलों तर भरतखंडांत अनामिकेपुढें, व इतर देशांत तर करांगुली पुढें, जातां येणार नाहीं असें वाटतें !

वर जें सांगितलें आहे, त्यावरून शास्त्रीय ग्रंथांप्रमाणें काव्यांतही सत्यकथन असतें, हें वाचकांच्या ध्यानांत येईल, अशी आशा आहे. कवि जें सत्य सांगतो, तें शास्त्रीय सत्याप्रमाणें गूढ नसतें. शास्त्रीय सत्यांपैकीं कांहीं सत्यें इतकीं गूढ असतात कीं, तीं समजण्यास तपांच्या अध्ययनाची आवश्यकता असते. तसेंच शास्त्रांत कधीं कधीं विशेष कारणासाठीं अगदीं क्षुल्लक सत्यें सांगितलेलीं असतात. या दोन्हीही सत्यांचा काव्यांत उपयोग होत नाहीं. 'उष्णता, प्रकाश, व विद्युत् हीं गतीचीं निरनिराळीं रूपें होत', हें सत्य काव्यविषय होण्यास आणखी शेंकडों वर्षें लोटलीं पाहिजेत. तसेंच, ' बाभळीला कांटे असतात ', ' मासे समुद्रांत राहतात ', 'पावट्याची उसळ फार खाल्ल्यानें अपचन होऊन वायु सरतो '–असलीं सत्यें ही काव्याच्या कामाचीं नाहींत. काव्यांत जीं सत्यें गोंवावयाचीं, त्यांची योग्य निवड करण्यास कवीस पराकाष्ठेचे श्रम पडतात, जीं समजण्यास मुळींच श्रम पडत नाहींत, अशीं उपयोगी नाहींत; जीं समजण्यास फार श्रम पडतात, अशींही पण उपयोगी नाहींत. तीं या दोहोंच्या दरम्यान असून, अनुकूलसंवेदनोत्पादक असलीं पाहिजेत. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, काव्यांत वर्णिलेलीं

सत्यें नेहमीं अनुकूलसंवेदनोत्पादक असलीं पाहिजेत, हें मत खरें असेल, तर काव्यांत दु.खपर्यवसायी नाटकांचा किंवा अवर्षणादि अरिष्टांच्या वर्णनांचा समावेश कधींच करतां येणार नाहीं. कारण दुःखपर्यवसायी नाटकें पाहिल्यानें व अरिष्टांचीं वर्णनें वाचल्यानें मनास आनंद न होतां उलट दुःख होतें. कांहीं अंशीं ही शंका बरोबर आहे; पण थोड्या विचाराअंतीं तिचें निरसन होण्यासारखें आहे. दुष्काळांत अन्न न मिळाल्यामुळें होणाऱ्या यातनांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्या यातनांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, कामिजनास होणाऱ्या क्लेशांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या क्लेशांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, या आणि याप्रमाणें इतर सर्व गोष्टींपासून होणाऱ्या सुखदुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण—यांत फार अंतर आहे. प्रत्यक्षानुभवाची तीव्रता वाचनांत किंवा श्रवणांत कधींही येऊं शकणार नाहीं; आणि तसें होऊं लागलें तर प्रतिकूलसंवेदनोत्पादक काव्यें कोणी हातीं धरणार नाहीं. उतार वयांत नवानवसांनीं झालेलें अपत्य मरण पावलें असतां मातापितरांस जें दुःख होतें, तेंच दुःख जर त्याच्या वर्णनापासून किंवा अभिनयापासून होऊं लागलें, तर तें वर्णन कोण हातांत घेईल ? किंवा तो अभिनय पाहाण्यास कोण जाईल ? एकाद्या दुर्गम आणि निर्भय अशा उंच ठिकाणीं बसून खालीं चाललेली लढाई पाहण्यानें मनावर ज्या प्रकारचे विकार होण्याचा संभव आहे, त्या प्रकारचे विकार दुःखपर्यवसायी कथेच्या वाचनापासून होतात. सर्व मनुष्यांच्या मनोवृत्ति एकाच तऱ्हेच्या असल्यामुळें, एकास झालेलें दुःख किंवा सुख त्याच्या बाह्य चिन्हांवरून, वर्णनावरून किंवा अभिनयावरून दुसऱ्यास समजून येतें, हें खरें आहे. पण या समजून येण्यांत आणि प्रत्यक्षानुभवांत फार अंतर आहे. तरवारीसारख्या शस्त्राचें मर्मापर्यंत चरचर कांपीत जाणें, आणि फक्त अंगाला चाटणें, यांत जो फरक आहे तो प्रत्यक्ष सुखदुःखांत आणि त्यांच्या चित्रांत आहे. कवीची करामत हुबेहूब चित्र काढण्यांत आहे; मूळ उत्पन्न करण्यांत नाहीं. ते मूळ उत्पन्न करूं लागतील तर त्यांच्या दुःखोत्पादक कृतींकडे कोणी ढुंकूनही पहाणार नाहीं. असो; पण हा सगळा वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या सुखदुःखाविषयीं विचार झाला. दुःखपर्यवसायी काव्य लिहितांना खुद्द कवीच्या मनाची काय

स्थिति होते, हा प्रश्न अजून राहिलाच आहे. कोणत्याही प्रकारचें काव्य रचतांना किंवा त्यांतील विषयांचा विचार करतांना कवीस जे आयास होतात, ते प्रत्यक्ष आयासांहून बरेच क्षीण असतात. सुख दुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आणि सुखदुःखांवर पुनः पुनः विचार करून तीं आपणांसच होत आहेत असा भास करून घेण्याचा प्रयत्न,—यांत पुष्कळ अंतर आहे. धनलोभ्याचें धन एकाएकीं नाहींसें झालें असतां त्याला ज्या यातना होतात, त्या यातना प्रत्यक्ष कवि आपणास धनलोभी समजून व आपलें सारें वित्त एकाएकीं नष्ट झालें आहे असें समजून, द्रव्यनाशानें खऱ्या धनलोभ्याला होणाऱ्या दुःखाचें प्रतिबिंब आपल्या मनावर उठवून घेण्याकरितां त्या दुःखाचें एकसारखे चिंतन करतो, व त्यामुळें कांहीं वेळानें त्याच्या मनाची वृत्ति धनलोभ्याच्या वृत्तीसारखी होऊन धनलोभ्याला होणाऱ्या यातनांची बरीच छाया त्याच्या मनावरही पडूं लागते. अशा प्रकारें उत्पन्न केलेल्या दुःखाच्या छायेस अप्रत्यक्ष दुःख असें म्हणतां येईल. ज्याला ही छाया हवी तितकी दाट पाडून घेतां येत असेल, त्याच्या अंगीं कवित्वगुणांपैकीं श्रेष्ठ गुण आहे, असें म्हणतां येईल. विचारानें प्रत्यक्ष सुखदुःखाच्या तीव्रतेचें पूर्ण प्रतिबिंब आपल्यावर उठवून घेणें यालेंच नांव तादात्म्य, तंद्री किंवा एकतानता. ज्याला सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव होत आहे, त्याच्या मनाप्रमाणें कवीच्या मनाची स्थिति झाल्याशिवाय त्याच्या काव्यांत तो तो रस पूर्णपणें उतरणार नाहीं. रसाची परिपक्वता अगोदर कवीच्या मनांत झाली पाहिजे. ती तशी झाली तरच त्याला ती काव्यांत आणण्याचा प्रयत्न करतां येईल; कारण, जर आडांतच पाणी नसलें तर तें पोहऱ्यांत कोठून येणार ? कवीला ज्या विषयांशीं आपल्या मनाची तंद्री लावून घ्यावयाची असते, तो विषय अनुकूलसंवेदनोत्पादक असो, कीं प्रतिकूल-संवेदनोत्पादक असो, त्याला जे कष्ट पडतात, ते उभयपक्षीं सारखेच असतात. कवीचें मन फोटोग्राफ घेण्यासाठीं तयार केलेल्या भिंगाप्रमाणें असतें. ज्याप्रमाणें हवा तेवढा प्रकाश अनुकूल असला म्हणजे पाहिजे त्या पदार्थाचें हुबेहूब प्रतिबिंब त्या भिंगावर पाडतां येतें, त्याप्रमाणें ज्या कवीला आपली कल्पना हवी तितकी प्रज्वलित करतां येते, त्याला तिच्या स्फुर्तीनीं आपल्या मनावर पाहिजे त्या विषयाची मुळाबरहुकूम छाया पाडतां

येते. कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयांशीं तादात्म्य होणें—यांतच कवीचा आणि काव्यवाचकांचा आनंद आहे. बीजगणितांतील किंवा भूमितींतील एकाद्या कूट प्रश्नांत बुद्धि व्यग्र होऊन गेली असतां तींत जें चांचल्य उत्पन्न होतें तें तत्त्वशोधकास जसें अत्यंत आनंददायक असतें, त्याप्रमाणेंच सुखदुःखोत्पादक विषयांचें हुबेहूब आकलन करण्यासाठीं भरधांव सोडलेल्या कल्पनेच्या चांचल्यापासून कवींना व काव्यवाचकांना अत्यानंद होतो. असें जर नसतें, तर दुःखपर्यव्यवसायी काव्यें कवि मुळींच न लिहिते, व वाचक तीं मुळींच न वाचते. तेव्हां सिद्ध काय झालें कीं, काव्य दुःखपर्यवसायी असो कीं सुखपर्यवसायी असो, त्यांतील रसापासून उत्पन्न होणारा आनंद सारखाच असतो; आणि याच कारणामुळें कॉमेडी ऑफ एरर्स (भ्रांतिकृत चमत्कार) इतकींच अथेल्लो वाचण्याला, किंवा त्याचा प्रयोग पाहण्याला, आमचीं मनें उत्सुक असतात. तर मग दुःख-पर्यवसायी आणि सुखपर्यवसायी काव्यांच्या वाचनांत किंवा प्रयोगदर्शनांत मुळींच भेद नाहीं कीं काय, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. त्यास इतकेंच उत्तर आहे कीं, भेद आहे; मुळींच नाहीं असें नाहीं, पण तो फार थोडा आहे. काव्य-वाचनांत किंवा त्याचा प्रयोग पाहण्यांत एकमेकांपासून अगदीं भिन्न असे दोन मानसिक व्यापार चाललेले असतात. एक, कल्पनाशक्ति प्रज्वलित होऊन ती मनाचें काव्यवस्तूशीं तादात्म्य करण्यासाठीं झटत असते; दुसरा, इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या काव्यवस्तु आपापल्या स्वभावाप्रमाणें वाचकांच्या व प्रेक्षकांच्या अनुकूल व प्रतिकूल संवेदनांस अंशतः कारण होत असतात. यामुळें दुःखपर्यवसायी काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तीला थोडीशी खिन्नता उत्पन्न होते, आणि सुखपर्यवसायी काव्य वाचीत असतां वृत्तीला थोडासा आनंद होतो. अप्रबुद्ध लोकांना पहिल्या व्यापारापासून होणाऱ्या आनंदाची मुळींच कल्पना नसते. यामुळें दुःखपर्यवसायी नाटक पहाणें त्यांना आवडत नाहीं.

आतांपर्यंत जें सांगितलें आहे त्यावरून तत्त्वशोधकाप्रमाणें कवीचेंही, एका प्रकारच्या सत्यांचा निर्णय करणें आणि तीं सांगणें, हें काम आहे. हें काम बजावण्यासाठीं कवीस आपली कल्पना प्रज्वलित करून काव्यवस्तूंशीं

आपल्या मनाचें तादात्म्य करून घ्यावें लागतें. काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो, या तादात्म्यापासून होणारा आनंद सारखाच असतो. कवींच्या यथार्थ वर्णनांनीं काव्यवस्तूंशीं वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या मनाचें तादात्म्य झालें तर त्यांनाही कवींसारखाच आनंद होईल. काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो, तिच्या चिंतनांत व्यग्र झालेल्या कवींच्या किंवा वाचकांच्या कल्पनेस जें चांचल्य येतें तें आनंदमय आहे. काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तींत कधीं कधीं जी खिन्नता उत्पन्न होते ती, वृत्ति एकीकडे एकतानतानंदांत गढली असतां इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या, भयंकर काव्यवस्तु दुसरीकडून तींत प्रतिकूल संवेदना उत्पन्न करीत असतात, म्हणून होते. सारांश, काव्य दुःखपर्यवसायी असो किंवा सुखपर्यवसायी असो, तें रचण्यांत कवीला, आणि तें वाचण्यांत वाचकाला आनंदच आहे. या आनंदांत, काव्यवस्तूचें बाह्य स्वरूप रमणीय असल्यास थोडीशी भर पडते, व तें भयंकर असल्यास त्याला किंचित् छाट बसतो–इत्यादि गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येतील अशी आशा आहे.

काव्याच्या वाचनापासून राजापासून रंकास, तत्त्ववेत्त्यापासून अत्यंत अल्पशिक्षित मनुष्यास, सर्व स्थितींत आनंद होण्यास अनेक कारणें आहेत. एक तर कवीच्या वाणींतून जे बोल निघत असतात, त्यांच्या सत्यतेविषयीं प्रत्येक अंतःकरण साक्ष देत असतें. जीं सत्यें देशकालादिकांनीं मर्यादित, किंवा जीं सत्यें बहुश्रुतास मात्र समजणार, अशीं सत्यें कवि कधींच सांगत बसत नाहीं. ज्या मनुष्याची रानटी अवस्था सुटली आहे, ज्याला मानवी स्वभावाचें किंचित् ज्ञान प्राप्त झालें आहे, ज्याच्या मनावर बाह्य सृष्टीच्या सौन्दर्याचा परिणाम होऊं लागला आहे, असा मनुष्य कोणत्याही देशांत रहात असो, किंवा कोणत्याही शतकांत जन्मास आला असो, महाकवींच्या सत्यमय रसाळ उद्गारामृताचें सेवन करण्यास तो योग्य असतो. काव्यापासून आनंद होण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, साधारण मनुष्यास ज्या गोष्टी अव्यक्त असतात, त्या कवि त्यांस व्यक्त करून देतो. 'जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति' अशी आपल्या लोकांत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच कीं, प्रत्येक मनुष्याचा स्वभाव

निराळा असल्यामुळें सर्वांच्या स्वभावांचें ज्ञान होणें अशक्य आहे. तथापि ज्याअर्थी सर्व मनुष्यांत आपण 'मनुष्य' या एका वर्गाखालीं मोडतो, त्याअर्थी त्या सर्वांत साधारण असे कांहीं गुण असलेच पाहिजेत. या साधारण गुणांचें अति स्वल्प ज्ञान बहुतेकांस असतें; व तें असतें म्हणून काव्यवाचनापासून त्यांस आनंद होतो. कित्येक मनुष्यें पराकाष्ठेचे रागीट असतात, कित्येक शांत असतात, कित्येक मायाळू असतात, कित्येक लोभी असतात, कित्येक क्रूर असतात, कित्येक कामातुर असतात. तथापि राग, शांति, ममता, लोभ, क्रौर्य, व काम इत्यादि सर्व मनोवृत्तींची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते. विशिष्ट व्यक्तींत एखादा गुण फार असला म्हणून बाकीच्या गुणांविषयीं तो अगदीं अज्ञान असतो असें नाहीं. प्रत्येक मनुष्य सर्व मनुष्यतेचें सूक्ष्म प्रतिबिंब आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें नसतें तर एकाचे मनोविकार दुसऱ्याला न समजते. साधारण मनुष्यांत आणि कवींत भेद इतकाच आहे कीं, साधारण मनुष्यास ज्या प्रकृतिवैचित्र्याचें आणि विकारवैचित्र्याचें ज्ञान अगदीं मंद असतें, तें कवीस कल्पनासामर्थ्यानें स्वतःसच स्पष्ट करून घेतां येतें इतकेंच नाहीं, तर काव्यद्वारां तें दुसऱ्यासही स्पष्ट करून देतां येतें. कवि हा कामरूपधारी पटाईत बहुरूपी आहे! तो क्षणांत राजा बनून सिंहानसस्थ पुरुषांच्या अंतःकरणांतील विचार बोलूं लागतो; राजवेष घेऊन अर्धघटिका झाली नाहीं तों, तो वेष टाकून देऊन तो काळा पोषाख करतो, तोंडाला काजळ फासतो, वस्त्राखालीं पाजळलेलीं शस्त्रें लपवून घेतो, आणि मध्यरात्रीच्या निबिड काळोखांत जिकडे तिकडे सामसूम झालें असतां द्रव्यासाठीं कोणाचा तरी जीव घेण्याचा बेत करीत मारेकरी होऊन बाहेर पडतो! या स्थितींत पांचपन्नास पळें गेलीं न गेलीं तों ती टाकून देऊन अभिसारिका बनतो, व अभिसारिकेस योग्य असा पेहराव चढवून मेघांच्या गडगडाटांची, विजांच्या लखलखाटांची, किंवा तुफान वाऱ्याच्या सोसाट्याची पर्वा न करितां, पावसाच्या मुसळधारेंतून एका चेटासह विहारोद्यानांतील नेमलेल्या लतामंडपांत प्रियाची भेट घेण्यास जातो! आतां पर्वताच्या शिखरावर किंवा समुद्राच्या किनाऱ्यावर असला तर क्षणभरानें धनगराच्या परसापाशीं शेकत बसलेला किंवा न्यायासनारूढ होऊन न्याय करीत

असलेला दृष्टीस पडेल! वायूप्रमाणें तो सर्वगामी आहे; मनाप्रमाणें तो चंचल आहे, हवी ती वस्तु उत्पन्न करणारा तो वस्ताद जादुगार आहे; कल्पनाशंकूच्या जिवावर कालोदधींत पाहिजे त्या दिशेस सुकाणूं लावण्यास न डगमगणारा तो जरठ झालेला तांडेल आहे;विश्वबीजांप्रमाणें त्याचे उद्‌गार अनंत व नित्य आहेत. कोणती वस्तु कितीही दूर असो, किंवा कितीही सूक्ष्म असो,त्यानें तिच्यावर आपली दुर्बीण किंवा सूक्ष्मदर्शक यंत्र लाविलें कीं त्याला ती संन्निध आणि स्थूल होऊन हवतिशी पाहतां येते,व दुसऱ्यांना तिचें यथातथ्य आकलन होईल अशा तऱ्हेचें तिचें चित्र काढतां येतें.जर तुम्हांला पाताळांतील किंवा स्वर्गांतील वस्तुस्थिति पहावयाची इच्छा असेल तर मिल्टनचा किंवा कालिदासाचा हात घट्ट धरून ते नेतील तिकडे जाण्यास तयार व्हा! अनंत प्रकृतींच्या हृदयडोहांत बुड्या मारून त्यांच्या तळाशीं काय आहे हें जर तुम्हांला पहावयाचें असेल तर मोलिअर, शेक्सपिअर, गेटी, किंवा भवभूति अशा जगत्प्रसिद्ध पाणबुड्यांच्या कमरेला मिठी मारा! सारांश, अंतर्बाह्य सृष्टींत अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना उत्पन्न करणारी अशी कोणतीच चीज नाहीं कीं, जिच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान आनंद होईल अशा रीतीनें कवीस तुम्हांला करून देतां येणार नाहीं. समजातीयांस हें ज्ञान करून देणें हा कवींचा व्यवसाय होय. या व्यवसायांतच त्यांचा आनंद आहे. या व्यवसायामुळें त्यांचें अंतकरण अतिशय कोमल व दयार्द्र झालेलें असतें. या व्यवसायामुळें यांची अनुकंपा इतकी वाढते कीं, तिच्या व्याप्तीस सकल मनुष्यवर्ग किंवा जीवकोटीसुद्धां पुरेशी न होऊन ती अखेरीस अचेतनसृष्टि व्यापूं लागते; व हा व्यवसाय वाचकांस सुखावह व्हावा म्हणून पद्यरचना, प्रास, वृत्तें, अलंकार इत्यादि उपकरणांचा उपयोग कवि आपल्या काव्य-रचनेंत करतात.

[illegible] गंज ग्रंथालय, ता. जि. [illegible]
अनुक्र. 20861 वि. [illegible]
क्रमांक ...9082... नोंद दि: [illegible]

२ : : वाचन

गुरुमुख, वाचन, विचार, अवलोकन, वाद इत्यादि ज्ञानसंपादनाची अनेक द्वारें आहेत. त्यांपैकीं वाचन हें अत्यंत महत्त्वाचें आहे. 'गुरु' शब्दांत अर्थात् सर्व वडील माणसांचा समावेश केला पाहिजे. बाल्यावस्थेंत गृह आणि शाला हीं दोन ज्ञानसंपादनाचीं स्थानें होत. घरीं मातापितरांनीं व इतर वडील माणसांनीं शिक्षण द्यावयाचें; शाळेंत शिक्षकानें द्यावयाचें. विद्यार्थी जसाजसा मोठा होत जातो, तसतशी त्याला गुरुमुखाच्या साहाय्याची गरज कमी पडूं लागते. आणि खरोखरीच ज्यांना मुलांच्या कल्याणाची इच्छा असेल त्यांनीं त्यांना फार वेळ भरवून घेण्याची संवय लावूं नये. मनुष्यास मानसिक श्रमाचा जात्या कंटाळा आहे; कारण, मानसिक श्रम शारीरश्रमापेक्षां अवघड आहे. मनाला एकदां दुसऱ्यापासून मदत घेण्याची खोड लागली, म्हणजे त्याचें स्वावलंबन अगदीं सुटतें. व्यवहारांत घडोघडीं अडचणी येणार. प्रत्येक घटकेस सल्ला देण्यास भेटणारा गुरु कोठून मिळणार ? मनाची लोखंडासारखी स्थिति आहे. लोखंड वहिवाटींत नसलें म्हणजे त्याला तांबेरा येऊन तें कुचकामाचें होतें. पण जर त्याच्यावर नित्य घर्षण घडत असलें तर तें सतेज राहून फार दिवस टिकतें. ज्याच्या मनाला श्रम करण्याची संवय लागलेली नाहीं, त्याचें मन लोखंडाप्रमाणें गंजून जाऊन कोणत्याही कामास निरुपयोगी होतें. वस्तऱ्याला जसा दगड, तशा बुद्धीला अडचणी आहेत. अडचणींच्या दगडावर बुद्धि लाविल्यानें ती अत्यंत तीव्र होते. जेव्हा तेव्हां गुरुमुखाची अपेक्षा केल्यानें हें घर्षण घडत नाहीं, व बुद्धीला मांद्य येतें. सबब, विद्यार्थ्याच्या शिक्षणास गुरुमुखांतून अगदीं अपरिहार्य असेल तेवढेंच साहाय्य व्हावें. कित्येक श्रीमंत लोक आपल्या मुलांस शिकविण्यासाठीं खासगी शिक्षक ठेवीत असतात. शाळेंतले शिक्षक अगदींच नादान असले, किंवा मुलाकडून वर्गाच्या मागें राहिलेली कांहीं बाकी मिळवून द्यावयाची असली, किंवा त्याच्याकडून एखाद्या इयत्तेवरून उडी मारावयाची असली, तर असें करणें बरोबर आहे. तसें नसेल तर मात्र घरच्या शिक्षकापासून

मुलांचा अखेरीस तोटा होतो असा आमचा समज आहे;कारण मुलांची स्वतः विचार करण्याची संवय मोडते. ग्रीक लोक शिक्षकाच्या कामाची तुलना नेहमीं सुईणीच्या कामाशीं करीत. सॉक्रेटिसाचें असें म्हणणें असें कीं जसा कुशींत गर्भ तसे विचार साऱ्यांच्या डोक्यांत आहेतच. शिक्षकानें सुईणीप्रमाणें त्यांचा बहिरागम मात्र आपल्या चातुर्यानें सुखावह करावयाचा. जसे हस्तपादादि अवयव व नेत्रकर्णादि इंद्रियें अभ्यासानें सुदृढ व चंचल होतात, त्याप्रमाणें अभ्यासानें बुद्धिही सुदृढ व चंचल होते. बैलाचा खांदा, घोड्याची छाती, गाढवाची पाठ व एडक्याचें शिंग; हीं उपयोगानें किती मजबूत होतात, हें सर्वांच्या पाहण्यांत आहेच. पहिलवानांचीं छाताडें, पोटऱ्या व दंड, डांक घेऊन पळणारांचा दम व पाय, निशाण मारणारांचे हात व डोळे, मराठी कारकुनाची मांडी आणि पाठीचा कणा, गवयाचा कान, बजवय्याचीं बोटें, आणि बोलणाराची जीभ—याप्रमाणें ज्याला ज्या धंद्यांत जो अवयव किंवा इंद्रिय विशेष वापरावें लागतें, त्याचा तो अवयय किंवा तें इंद्रिय इतरांपेक्षां बळकट होतें. जशी शरीराची तशीच बुद्धीचीही गोष्ट आहे. अष्टावधान्यांचें स्मरण वाढलेलें असतें, कादंबरीकार व कवि होईल तितकी कल्पना वाढवितात, व तत्त्ववेत्त्यांस अनुमानप्रमाणांची विचक्षणा करण्याची संवय लागलेली असते. सारांश काय कीं, शरीराच्या अवयवांप्रमाणें मनाचे अवयवही अभ्यासानें आणिं उपयोगानें मजबूत आणि चंचल होतात. यासाठीं ज्या शिक्षणपद्धतीनें विद्यार्थ्यास ते वारंवार उपयोगांत आणावे लागतील अशी पद्धति योजणें फार हितावह आहे. विद्यार्थ्यांच्या एका अवस्थेंत गुरुमुखाचें सहाय्य अत्यंत आवश्यक आहे. पण त्याची आवश्यकता जितकी लवकर कमी होईल तितकें बरें.

गुरुमुखाशिवाय ज्ञानसंपादनाचीं चार साधनें आहेत. त्यांपैकीं विचार, अवलोकन आणि वाचन हीं ज्याचीं त्याच्या स्वाधीन असूं शकण्यासारखीं आहेत. चवथा एक वाद राहिला. तो दुसरा कोणी तरी तोडीचा मिळाल्याशिवाय नीट होत नाहीं.

श्रेष्ठाशीं संवाद करण्यापासून नवीन ज्ञान प्राप्त होतें. समाशीं करण्यापासून संशयानिवृत्ति होते व कनिष्ठाशीं करण्यापासून संपादिलेलें ज्ञान सुव्यवस्थित होतें. कुस्त्यांपासून मुलांच्या शरीरावर जो परिणाम होतो, तो

चांगल्या वादापासून बुद्धीवर होतो. कुस्तीप्रमाणें वादानें बुद्धीच्या सर्व अंगाचा आळस झडून त्यांस चलाखी येते. कुस्त्यांप्रमाणें वादापासून चांगलें परिणाम नेहमीं व्हावे, पण कुस्त्यांत चुरस एखादे वेळीं, व वादांत दुराग्रह बहुशः असल्यामुळें तसें घडत नाहीं. यासाठीं ज्या प्रसंगीं योग्य प्रतिस्पर्धी मिळेल त्या प्रसंगींच वादास उभें रहावें, संतापजनक दुराग्रहाचा वाद होईल तितका टाळावा.

अवलोकनांत सर्व प्रकारच्या इंद्रियानुभवांचा समावेश होतो. हे अनुभव मनुष्य बुद्धया घेतो किंवा त्यास ते सहज प्राप्त होतात. संसारांत पडलेल्या मनुष्यास निरानिराळ्या स्वभावांचे लोक भेटणें, पदार्थांचें सेवन करूं लागलें असतां त्यांचे धर्म समजून येणें, वगैरे सहज अनुभव होत. भूगर्भ, वनस्पति, वैद्यक, रसायन इत्यादि विषयांत येणाऱ्या पदार्थांचे धर्म जाणण्यासाठीं शास्त्रशोधक जे प्रयोग करितात, त्यांपासून त्यांना येणाऱ्या अनुभवांस बुद्धया घेतलेले अनुभव म्हणतां येईल. हे अनुभव अत्यंत शांतपणानें व काळजीनें घ्यावे लागतात.

इंद्रियद्वारां प्राप्त झालेल्या अनुभवांवरून कार्यकारणादिकांचा जो निश्चय त्यास विचार असें म्हणतात. भलत्याच कार्याचा भलत्याच कारणाशीं संबंध लावून देणें म्हणजे विचार करण्यांत चुकणें. विचारांत प्रमाद होऊं न देतां बिनचूक विचार करावा कसा हा विषय अत्यंत गूढ आहे. याचा मानसशास्त्रांतील न्यायसंज्ञक शाखेंत समावेश होतो.

आतांपर्यंत ज्ञानसंपादण्याच्या पांच साधनांपैकीं गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार या चोहोंचें स्वल्प दिग्दर्शन केलें. वास्तविक पहातां वाचनावरील निबंधांत त्यांचा इतका उल्लेख करायला नको होता. परंतु त्यांचा वाचनाशीं अत्यंत निकट संबंध असल्यामुळें, व प्रस्तुत पुस्तकांत विषयविभागांपेक्षां विषयज्ञान करून देण्यावर विशेष कटाक्ष असल्यामुळें विषयांतराबद्दल येणारा दोष पत्करून गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार या चार ज्ञानसाधनांविषयीं थोडेंसें लिहिलें. आतां निबंधाचा मुख्य विषय जें वाचन त्याकडे वळूं.

वाचनाचे दोन प्रकार आहेत. एक दुसऱ्यासाठीं व एक स्वतःसाठीं. आपण जें वाचतों तें आपलें आपण लिहिलेलें असेल किंवा दुसऱ्यांनीं

लिहिलेलें असेल. कोणतेंही पुस्तक किंवा लेख वाचण्यासाठीं हातांत घेण्यांत दोन हेतु असतात; माहिती किंवा करमणूक. पुस्तकें ज्या प्रकारचीं असतील त्या प्रकारचा परिणाम, तीं वाचणारांच्या मनावर होईल. वाईट पुस्तकें वाचण्यापेक्षां कांहीं न करणें बरें; कारण कांहीं न करण्यानें मनाला निदान कोणताही वाईट नाद तरी लागत नाहींत. ज्यांनीं वाचनाचे पवाडे गाइले आहेत, त्यांनीं ते चांगल्या वाचनाचे गाइले आहेत. या निबंधांतही वाचनाविषयीं जे दोन शब्द लिंहिले आहेत, ते चांगल्या वाचनाविषयीं लिहिले आहेत. पुस्तकें हीं एक प्रकारचे मित्र आहेत. कुमित्रांच्या संगतीप्रमाणें दूष्य पुस्तकांच्या वाचनापासून दुर्गुण जडतात. म्हणून कुमित्रांप्रमाणें दूष्य पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे.

बहुश्रुत सन्मित्राच्या सहवासापासून होणारे बहुतेक फायदे चांगल्या वाचनापासून होऊन, शिवाय त्या सहवासापासून न होणारे असेही अनेक फायदे होतात. ज्ञानाच्या ज्या चार साधनांविषयीं वर थोडासा उल्लेख केला आहे, तीं सर्वांस प्राप्य असतील किंवा नसतील. वाचन मात्र स्वल्प खर्चानें किंवा थोड्याशा अंगमेहनतीनें सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे. विद्वान् गुरु भेटेल किंवा न भेटेल; संवाद करण्या-सारखा मित्र प्राप्य असेल किंवा नसेल; स्वतंत्रपणें बिनचूक विचार करतां येण्यासारखें शिक्षण मिळालें असेल किंवा नसेल; सहज घेतां येणारे किंवा बुद्धया घ्यावे लागणारे अनुभव घेऊन पाहण्याच्या सोई असतील किंवा नसतील; पण वाचनाची मात्र तशी स्थिति नाहीं. मुद्रणकला भरभराटीस आल्यापासून हें ज्ञानसाधन अत्यंत सुगम झालें आहे; किंबहुना कांहीं स्थितींत ज्ञान करून घेण्यास दुसरें कोणतेंही साधन उपयोगीं पडतच नाहीं. कोणत्याही विद्वानाला कोणत्याही विषयावरील आपले विचार सर्व ठिकाणीं स्वतः हजर राहून स्वमुखानें सांगतां येणें अशक्य आहे. पण तेच त्यानें लिहून काढले व पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले, तर त्यांच्यापासून पाहिजे त्याला फायदा करून घेतां येणार आहे. विचारांना ग्रंथग्रथित करणें म्हणजे त्यांस जड स्वरूप देऊन अमरत्व आणण्यासारखें आहे. त्यांना जड स्वरूप आल्यानें ते आपल्या जनकापासून पाहिजे त्याच्या हातांत जाऊं शकतात. त्यांना अमरत्व आल्यानें मनुष्यांच्या प्रत्येक

पिढीस त्यांच्यापासून फायदे करून घेतां येतात. व्यासवाल्मिकादि महाकवि आपले विचार लिहून न ठेवते तर 'महाभारत' आणि 'रामायण' यांच्यापासून हिंदु लोकांना आज हजारों वर्षें जें ज्ञान व जी करमणूक होत आहे, ती कोठून होती ? या महापुराणांप्रमाणेंच एतद्देशीय इतर ग्रंथांची व परदेशीय ग्रंथांची गोष्ट आहे. पुस्तकद्वारां एका पाश्चिमात्य इंग्रजी भाषेंतील ज्ञानभांडार आम्हांस खुलें झाल्यामुळें आम्हांस केवढा लाभ होत आहे ! परकीय अंमलापासून होणाऱ्या अनंत यातनांचा या एका लाभापासून विसर पडून भावी स्वातंत्र्याची आणि सुखाची आशा आम्हांस उत्पन्न होत नाहीं काय ? अलीकडील पाश्चिमात्य भाषांत इंग्रजी भाषा व इंग्रजी लोक पाहिल्या वर्गांत असल्यामुळें त्यांनीं त्या भाषेंत भाषांतराच्या साहाय्यानें इतर सर्व सुधारलेल्या भाषांतील उत्कृष्ट उत्कृष्ट विचारांचा संग्रह केला आहे, व प्रतिदिवशीं करीत आहेत; व ह्या एका भाषेंतील ग्रंथ आम्हांस वाचनास मिळूं लागल्यामुळें युरोपांत फार प्राचीन कालापासून आजपर्यंत झालेल्या विद्वानांपैकीं ज्यांनीं आपले विचार लिहून ठेविले आहेत त्यांपैकीं निदान उत्तम उत्तमांचीं तरी इंग्रजी भाषांतरें आम्ही पैसा खर्च करण्यास तयार असलों तर आम्हांस वाचण्यास सांपडणार आहेत. सारांश काय कीं, महान् महान् तत्त्ववेत्ते, इतिहासकार, शास्त्रज्ञ, व कवि आपापले विचार पुस्तकरूपी नौकेंत घालून न ठेवते, तर ते कालमहार्णवांत कधींच बुडून जाते, व त्यांचा यत्किंचित्ही मागमूस आम्हांस न लागता ! पण त्यांनीं तसें केलें नाहीं, यामुळें विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथनौका पाहिजे त्याला हव्या त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यांतील मालास हात घालतां येतो !

गुरुमुखापासून होणारा फायदा विद्यार्थ्यांस फार झालें तर शाळेंत किंवा विद्यालयांत करून घेतां येतो. एकदां शाळा सुटली किंवा विद्यालयीन पदवी प्राप्त झाली म्हणजे गुरूला सोडून व्यवहारांत पडावें लागतें. व्यवहार पाठीमागें लागला म्हणजे ज्ञानसंपादनास पुस्तकाशिवाय दुसरें साधन रहात नाहीं. शिकलेल्या लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णवांना नोकरींत किंवा उद्योगांत पडल्यावर वाचनाची इच्छा मुळींच रहात नाहीं, असें आमच्या सभ्यांच्या स्थितीवरून दिसतें. शाळेंत किंवा विद्यालयांत जे मानसिक श्रम करावयाचे

ते नोकरी किंवा धंदा मिळण्यासाठीं. तो मिळाला म्हणजे अभ्यासाची सार्थकता झाली, व पुढें तो करण्याची गरज राहिली नाहीं, अशी पुष्कळांची समजूत असते. शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या भांडवलावर जन्मभर व्यापार करणारे असे अनेक लोक आहेत. यांना मानसिक श्रमाचा स्वाभाविकपणें फार कंटाळा असतो. धंद्यांत जाणाऱ्या वेळाशिवाय जर त्यांना थोडीबहूत फुरसत सांपडत असली तर ते ती सोंगट्या, गंजिफा किंवा बुद्धिबळें खेळण्यांत, पुनः पुनः तंबाखू चोळण्यांत किंवा विड्या फुंकण्यांत, वेडेवांकडे हेल ओढीत बसण्यांत किंवा एकाद्या वाद्यांवर उगीच गुणगुण करण्यांत घालवितात. कित्येकांची मजल याच्यापुढेंही जाते. कोणी गांजाचे शौकी बनतात, कोणी बाहेरख्याली निघतात; कोणाला बाटलीच्या अमलांत गुंग होऊन पडण्याचा व आपलें हंसें करून घेण्याचा नाद लागतो. असल्या दुर्व्यसनांनीं आपल्या अब्रूची, पैशाची, व शरीराची खराबी करून घेऊन शेवटीं अकालिक मृत्यूच्या जबड्यांत पडणारे व बायकांपोरांस उघडीं पाडणारे विचारशून्य पढतमूर्ख प्रत्येक देशांत असतात. दुर्दैवानें तशांची संख्या या देशांत वाढत चालली आहे, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय. या लोकांस असें कळत नाहीं कीं, व्यसनापासून होणाऱ्या यत्किंचित् सुखासाठीं त्यांना आपलें अतोनात नुकसान करून घ्यावें लागतें. ज्यांना सुदैवानें लहानपणापासून वाचनाची गोडी लागलेली असते, व जे प्रपंचांत पडले तरी फुरसत सांपडेल तेव्हां कांहीं तरी वाचीत असतात, अशांची स्थिति वरील व्यसनी लोकांच्या स्थितीहून फार निराळी असते. विषयी लोकांप्रमाणें यांनाही आपल्या विषयापासून सुखप्राप्ति होते. भेद इतकाच कीं, यांचें सुख दुर्व्यसनांच्या सुखाप्रमाणें अब्रूची, शरीराची, व पैशाची माती करणारें नसतें. चांगलीं चांगलीं पुस्तकें व वर्तमानपत्रें नित्य वाचीत असल्यानें ज्ञानाची एकसारखी वृद्धि होत असते, व त्याचा व्यवहारांत उपयोग होत असतो. मनुष्याला पोटासाठीं जो एक धंदा करावयाचा असतो त्याच्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान त्यानें संपादिलें असतां तें त्याला मुळींच उपयोगी पडणार नाहीं कीं काय ? जे कोणी असें समजत असतील ते मोठा प्रमाद करितात असें म्हणण्यास हरकत नाहीं. नित्याच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान संपादण्यांत कोणतेंही नुकसान नाहीं, पण तसें न करण्यांत मात्र फार नुकसान

आहे. प्रपंचांत प्रतिदिवशीं लहानमोठ्या शेंकडों अडचणी येतात. त्यांचा परिहार कसा करावा हें ठाऊक नसलें तर किती पंचाईत पडते ? कुटुंबांत आलें कुणाला पडसें कीं चालला वैद्याचे किंवा डॉक्टराचे घरीं ! पडली कांहीं भानगड कीं लागला वकीलाच्या घरीं खेटे घालायाला ! आलें कांहीं सार्वजनिक काम कीं गेला भांबावून ! ज्याला पूर्ववयांत थोडेंबहुत शिक्षण मिळालें आहे त्याची अशी दैन्यावस्था कां असावी ? जो कोणी उपयुक्त वाचनाची संवय नेहमीं सुरूं ठेवील त्याला लहानसान अडचणींतून बाहेर पडण्याबद्दल कोणत्याही प्रकारचा खर्च पडणार नाहीं इतकेंच नाहीं, तर अशा अडचणींतून पार कसें पडावें हें चांगलें माहीत असल्यामुळें त्याला त्यांची पर्वा वाटेनाशी होईल.

संसारांत वारंवार येणाऱ्या अडचणींतून पार पडण्यास वाचनापासून साहाय्य होतें, हा वाचनापासून होणारा अगदीं हलक्या प्रतीचा फायदा आहे. ज्यांना जिवंतपणीं आपणांस हे मागल्या पिढीचे असें म्हणवून घ्यावयाचें नसेल, त्यांनीं वाचनाची संवय नेहमीं जागृत ठेविली पाहिजे. जगांत प्रतिवर्षीं नवीन कल्पना, नवीन शोध, नवीन युक्त्या निघून जुन्या कल्पना, जुने शोध व जुन्या युक्त्या एकापाठीमागून एक मागें पडत आहेत. जे शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या ज्ञानासच चिकटून राहतात, व व्यवहारांत पडल्यावर वाचनाची संवय ठेवीत नाहींत, त्यांना आपल्या जुनेपणाबद्दल आपला उपहास करून घ्यावा लागतो. शिक्षक, वैद्य, कारागीर, नोकर, यांपैकीं ज्यांनीं वाचनाची संवय ठेविलेली नसते, त्यांना त्यांच्या धंद्यांत झालेल्या सुधारणा न कळल्यापासून होणारें नुकसान सोसावें लागतें. इतकेंच नाहीं, तर ज्या तरुण लोकांचा आणि त्यांचा समागम होतो, त्यांत त्यांची थट्टा होऊं लागते. ठळक ठळक गोष्टींची चालू तारखेपर्यंत काय हालहवाल आहे हें माहीत नसणें म्हणजे एकोणिसाव्या शतकांत जन्मास येऊन अठराव्या शतकांतल्या मनुष्याप्रमाणें वागणें होय !

कदाचित् पूर्वीच्या युगांत वाचनाची येवढी प्रौढी नव्हती असें मानिलें तरी चालेल, पण आतां मात्र वाचनाशिवाय चालावयाचें नाहीं. पूर्वी राज्यसत्ता राजांच्या किंवा त्यांच्या मंत्र्यांच्या हातांत असे. राज्यपद वंशपरंपरेनें प्राप्त होत असे. कायदे करणें, परराष्ट्रांशीं लढाई किंवा तह

करणें, कोणताही प्रचंड खर्च करणें वगैरे गोष्टींत पूर्वीचे अनियंत्रित राजे किंवा त्यांचे प्रधान लोकांचा सल्ला घेत नसत, व त्यांची इच्छा काय आहे हें जाणण्याची पर्वा करीत नसत. पण आतां तें मन्वंतर अगदीं बदलत चाललें. राजांची सत्ता कमी होऊन लोकांची सत्ता वाढत चालली. कायदे करण्याचें काम लोकांवर किंवा त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींवर पडूं लागलें; लढायांची व तहांची जबाबदारी लोकांवर पडूं लागली; व कोणताही प्रचंड खर्च करावा किंवा न करावा, याचा निकाल त्यांच्या तब्यतीवर अवलंबून राहूं लागला. अशा दिवसांत चहूंकडे वस्तुस्थिति कशी आहे हें त्यांना ठाऊक नसेल तर त्यांच्या हातून मोठमोठे प्रमाद होण्याचा संभव आहे. लोकांस राजसत्ता प्राप्त होण्यास ज्याप्रमाणें बऱ्याच अंशीं त्यांचें ज्ञान कारण झालें, त्याप्रमाणें त्यांच्याकडे ती राहण्यास व तिच्यापासून त्यांना आपला अधिकाधिक फायदा करून घेतां येण्यास त्यांच्यांतील ज्ञानप्रसारच साधन होणार आहे. शेंकडा नव्याण्णव लोक अल्प शिक्षण मिळालें न मिळालें तों धंद्यांत पडले, आणि कांहीं वाचीतनासे झाले, तर त्यांच्या हातून आपापल्या वांट्याची राज्यप्रकरणीं कामगिरी नीट कशी बजावली जाणार ? इंग्लंडांतील न्हावी, परीट, तेली, तांबट यांच्या टेबलांवर सुद्धां नित्याचीं एकदोन वर्तमानपत्रें व कपाटांत दहापांच पुस्तकें पडलेलीं असतात, म्हणून सांगतात. यावरून काय होतें कीं, तिकडील धंदेवाले सुद्धां राज्यप्रकरणीं चळवळी कशा चालल्या आहेत हें लक्ष लावून पहात असतात, व त्या संबंधानें आपआपसांत वाद करून त्यांवर आपलीं मतें ठरवून ठेवितात. त्यामुळें जेव्हां पार्लमेंटांत कांहीं वादग्रस्त प्रश्न निघतो आणि प्रधानांत व प्रतिनिधींत विरोध उत्पन्न होऊन त्याविषयीं लोकांचें मत काय हें पहाण्याचें ठरतें, तेव्हां त्यांना भांबावल्यासारखें न होतां शांतपणें आपला अभिप्राय देतां येतो. ज्या लोकांना राजकीय सत्ता आपल्या हातांत रहावी, व राजांच्या, श्रीमंतांच्या, किंवा लढवय्यांच्या हातांत न जाऊन त्यांना आपणांवर जुलूम करतां येऊं नये, असें वाटत असेल, त्यांनीं होईल तितका ज्ञानाचा संग्रह केला पाहिजे. हा संग्रह करण्याचें प्रधान साधन वाचन आहे.

केवळ व्यक्तीच्याच दृष्टीनें पाहिलें तर व्यवहार आणि राज्यप्रकरण यासंबंधानें मनुष्यास वाचनापासून जे लाभ होतात म्हणून वर सांगितलें,

त्याहीपेक्षां आणखी एक विशेष महत्वाचा लाभ त्याला त्यापासून करून घेतां येतो. संसारांत मनुष्यावर प्रसंगोपात्त मोठमोठीं अरिष्टें गुदरतात. कोणाचा एकुलता एक कर्ता मुलगा अकस्मात् मरण पावतो; कोणाची रूपवती, सुशील, व प्रेम करणारी बायको मरते; कोणाचे एकाएकी सारे पैसे बुडतात; कोणाला भयंकर अपघात होऊन आमरण व्यंगता येते; कोणाला एकादा महारोग जडतो. अशा प्रकारचें अरिष्ट कोसळलें, आणि मनाला त्यांचां विसर पडण्यास कांहीं नसलें, म्हणजे मनुष्याला पराकाष्ठेचें दुःख होऊन कधीं कधीं तो वेडा देखील होतो. अशा प्रसंगीं विपद्ग्रस्ताला जर वाचतां येत असलें, व चांगल्या पुस्तकांची अनुकूलता असली, तर दुःखाच्या पहिल्या उत्कट लाटेचा लय झाल्यावर त्याला तीं पुस्तकें वाचण्यापासून पुष्कळ समाधान करून घेतां येईल. अशा वेळीं विशेषतः धर्मपुस्तकें आधार देण्यास फारच उपयोगी पडतात. जड वस्तु नश्वर आहेत; आत्मा अविनाशी आहे; ज्यांचा मृत्युलोकांत एकाएकीं संबंध तुटला त्यांची भेट यापेक्षां चांगल्या जगांत पुनः होऊन चिरकाल तत्समागमसुख मिळेल; जन्मास आलेल्यांची मरण हें प्रकृतिच आहे; प्रत्येकाला आज नाहीं उद्यां हें मृण्मय शरीर ठेवायाचेंच आहे; ज्यांना या जगांत विनाकारण विपत्ति भोगावी लागते त्यांना परमेश्वर स्वर्गांत सुख देतो; सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, न्यायी, व दयाळू परमेश्वराच्या इच्छामात्रेंकरून सर्व गोष्टी घडत असतात; त्याच्या सत्तेपुढें कोणाचा इलाज नाहीं; तो ठेवील त्या स्थितींत संतोषानें राहिलें पाहिजे—या व अशा प्रकारच्या धर्मांतर्गत अनेक विचारांनीं मनास धैर्य येऊन दुःखास उतार पडतो, व थोड्या दिवसांत मनुष्य उल्हासानें पुनः नित्यकृत्यांस लागतो. तात्पर्य, ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकीला सीमा नाहीं. ज्याला आपला काळ सोडून भूतकाळांत किंवा भविष्यकाळांत प्रवेश करावयाचा असेल; ज्याला पृथ्वीवर आजपर्यंत कोणत्याही देशांत झालेले मोठमोठे साधु, तत्त्ववेत्ते, कवि, व नाटककार यांचा समागम करून ज्ञानामृताचें सेवन करावयाचें असेल; ज्याला निरानिराळ्या देशांत निरनिराळ्या काळांत कोणकोणत्या प्रकारचे लोक होते, ते कशा प्रकारचे पेहराव करीत, त्यांची राज्यपद्धति कोणत्या

प्रकारची असे, त्यांच्या धर्मकल्पना कशा होत्या, ते कोणते खेळ खेळत, ते न्याय कसा करीत, ते व्यापार कोणता व कसा चालवीत, त्यांच्यामध्यें धर्मक्रांति व राज्यक्रांति होण्यास काय कारणें झालीं, नंतर त्यांच्या स्थितींत कोणकोणते फेरफार झाले; ऐन संकटाचे प्रसंगीं मोठमोठे पुरुष कसे वागले कोणाच्या बुद्धिसामर्थ्यानें जगावर केवढे उपकार झाले; अनीति, भित्रेपणा, यादवी इत्यादि दोषांनीं कोणतीं राष्ट्रें लयास गेलीं; उद्योग, न्याय, धर्म-परायणता, व एकी इत्यादि गुणांनीं कोणतीं राष्ट्रें उदयास आलीं–इत्यादि गोष्टी समजून घ्यावयाच्या असतील त्याला त्या समजण्यास वाचनाखेरीज दुसरें साधन नाहीं. तसेंच, वाचकास वर्तमानाचा विसर पाडून, तो ज्या युगाचा किंवा देशाचा इतिहास वाचीत असेल त्या युगांत व त्या देशांतच आपण आहों कीं काय असा भास त्याच्या वृत्तीवर क्षणभर उत्पन्न करून त्याला अनंत आनंद व ज्ञान देण्याचें सामर्थ्य वाचनाशिवाय दुसऱ्या कशाच्या अंगीं आहे? नित्य नित्य मोठमोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचण्यांत आल्यानें मनास तत्कालीन समाधान व ज्ञान होतें, इतकेंच नाहीं, तर नकळत मनुष्याच्या स्वभावावर व वर्तनावरही तसल्या वाचनाचा परिणाम घडूं लागतो. ज्याप्रमाणें जगन्मान्य पुरुष वागले त्याप्रमाणें आपण वागावें, ते बोलले त्याप्रमाणें आपण बोलावें व ते ज्या प्रकारच्या विचारांत गुंग होऊन रहात, त्या प्रकारच्या विचारांत आपणही गुंग होऊन रहावें, असें वाटूं लागतें. मोठ्यांचें अनुकरण करण्याची इच्छा एकवार झाली, व दिवसें-दिवस ती दृढ होत चालली, म्हणजे वर्तनावर तिचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. एका लॅटिन कवीनें या ज्ञानसाधनाचा महिमा मोठ्या चातुर्यानें एका वाक्यांत वर्णिला आहे. तो म्हणतो कीं 'वाचन मनुष्याचें वर्तन सुधारतें, व त्याला रानटीपणांत राहूं देत नाहीं.''

वर वाचनाचे प्रकार सांगतांना मनुष्य कधीं स्वत:साठीं व कधीं दुसऱ्यासाठीं वाचतो, असें म्हटलें आहे. दुसऱ्यासाठीं स्वत: किंवा दुसऱ्यांनीं लिहिलेले लेख कसे वाचावे, या विषयाचें उद्घाटन या निबंधांत येऊं शकत नाहीं. तो विषय 'वक्तृत्व' या सदराखालीं येतो.

◆ ◆ ◆

३ : : महाकवि शेक्स्पीअर

शेक्स्पीअर मोठाच कवि खरा, कदाचित् त्याच्या तोडीचा दुसरा नाटककार नसेलही; पण येवढ्यावरून त्याची कृति अमानुष आहे, किंवा तींत दोषाचा लेश म्हणून कोठेंही नाहीं, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. शेक्स्पीअरचे कांहीं निस्सीम भक्त आहेत त्यांना त्याच्या नाटकांत दुष्यस्थळ म्हणून कांहीं दिसत नाहीं. त्याची पद्यरचना, त्याचें शब्दलालित्य, त्याचें कथानक आणि संविधानक, त्याचें स्वभाववर्णन हीं सारीं त्यांच्या मतें निर्दोष आहेत, इतकेंच नाहीं, केवळ अद्वितीय आहेत. आम्हांस असें वाटतें कीं शेक्स्पीअर हा कांहीं ईश्वरांश नव्हता; व इतर ग्रंथकारांप्रमाणें त्याच्या ग्रंथांतही पुष्कळ प्रमादस्थलें आहेत. चंद्राच्या भव्य तेजामुळें त्यांतील शशांक लोपून जातो, म्हणून त्यावर तो नाहीं हें म्हणणें जसें प्रशस्त होणार नाहीं, त्याप्रमाणेंच शेक्स्पीअरच्या गुणांपुढें दोष दिपून जातात, म्हणून ते त्यांत मुळींच नाहींत हें म्हणणेंही बरोबर होणार नाहीं. त्याच्या गुणानुरूप त्याची स्तुति आणि त्याच्या दोषानुरूप त्याची निंदा ही करण्यास निदान पराकाष्ठेचा खाष्ट व स्पष्टवक्ता म्हातारा जान्सन् तरी भ्यायला नाहीं. शेक्स्पीअरचीं नाटकें इतकीं सरस खरीं, व त्याला त्यांपासून बरीच द्रव्यप्राप्तीही झाली पण त्याचा अलीकडे जो येवढा लौकिक झाला आहे त्याला मुख्य कारण ग्यारिक. ग्यारिक म्हणून जान्सन्च्या वेळेस अतिप्रसिद्ध नट होऊन गेला. त्याच्या अनुकरणीय अभिनयामुळें शेक्स्पीअरचें बुद्धिवैचित्र्य लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, व शें-दीडशें वर्षें हा कोहिनूर आपल्या हेळसांडपणामुळें किंवा मूर्खपणामुळें उकिरड्यांत पडून राहिला होता असें त्यांस वाटलें. मग मागल्या उपेक्षेबद्दल जणों काय प्रायाश्चित घेण्यासाठींच त्यांनीं असला जबरदस्त स्तुतिपाठ करण्यास आरंभ केला कीं, तेव्हांपासून आतांपर्यंत त्याचा ओघ एकसारखा वाढत चालला आहे, व त्याच्या तीव्र धारेपुढें प्रतिकूल टीकाकारांचें कांहीं चालत नाहीं. आम्हां पौर्वात्यांस दूरत्वामुळें तिच्या सपाट्यांत सांपडण्याची फारशी भीति नाहीं, आणि म्हणून आमच्या हातून त्याच्या नाटकांचें विशेष निष्पक्षपाती गुणदोषविवेचन होण्याचा संभव आहे. अगोदर

शेक्सपीअर हा कोणी प्रासादिक किंवा दैवी पुरुष होता असें आम्हांस वाटत नाहीं. त्याचीं नाटकें त्याच्या पूर्वीच्या आणि त्याच्या मागाहून झालेल्या नाटककारांपेक्षां चांगलीं होण्यास जीं कारणें झालीं तीं त्या वेळचा इंग्लंडचा इतिहास वाचला असतां तेव्हांच ध्यानांत येणार आहेत. इंग्लंडांत 'आव्हन' नदीच्या कांठीं 'स्ट्राटफर्ड' म्हणून एक गांव आहे, त्या ठिकाणीं १५६४ त वुइलियम् शेक्सपीअर याचा जन्म झाला. त्याच्या लहानपणच्या सांगण्यासारख्या गोष्टी प्रसिद्ध नसल्यामुळें त्या येथें देतां येत नाहींत. इतकें मात्र खात्रीनें ठाऊक आहे कीं, त्याच्या गरीब आईबापांनीं त्याला त्या खेड्याच्या शाळेंत घालून त्याच्याकडून तेथें होण्यासारखीं दोन अक्षरें करविलीं होतीं. स्ट्राटफर्ड ज्या तालुक्यांत किंवा कौंटींत आहे, त्यांतच 'बरब्रेज' म्हणून कोणी त्या वेळचा वाखाणलेला नट होता, त्याच्याबरोबर विसावें वर्षीं शेक्सपीअर हा लंडनास गेला, आणि तेथें, 'ब्लाकफ्रायर' नांवाचें एक नाटकगृह होतें त्याच्या भागीदारांपैकीं बारावा भागीदार झाला. पुढें याच भागीदार मंडळीनें 'ग्लोब' नांवाचें नाटकगृह विकत घेतलें, व त्यांत ती उन्हाळ्यांत खेळ करीत असे. शेक्सपीअर हा स्वतः नटाचें काम करी, व आपल्या आणि दुसऱ्या नाटकारमंडळीस नाटकें लिहून देई. त्या वेळेस नाटककारमंडळ्या चांगल्या चांगल्या नाटककारांपासून त्यांचीं नाटकें विकत घेत, व रंगभूमीवर त्यांचे प्रयोग करून दाखवून त्यांवर पैसे कमावीत. शेक्सपीअर याला यामुळें दोन तऱ्हेनें पैसे मिळत. एक, तो स्वतःच नाटकांत सोंग घेई म्हणून, व दुसरी तो नाटकें लिही म्हणून. सगळा जन्म नाटकांत घालवावा असा शेक्सपीअरचा हेतु नव्हता; तर तरुणपणांत दहा पंधरा वर्षें हरहुन्नर करून चार पैसे कमवावे, व मग आपल्या गांवीं परत जाऊन तेथें जमीनजुमला विकत घ्यावा व घरदार करून वृद्धापकाळ सुखांत आणि प्रतिष्ठेंत घालवावा असा होता. व त्याप्रमाणें त्यानें केलें. थोड्या वर्षांत त्याला पुष्कळ पैसे मिळाले, व पूर्वीच्या संकेताप्रमाणें त्यानें त्या पैशांवर स्ट्राटफर्ड येथें जमिनी व घरें खरेदी केलीं आणि मरायच्या अगोदर तेथें तो स्वस्थपणें कांहीं वर्षें जाऊन राहिला. निःसंशयपणें शेक्सपीअरचीं अशीं पसतीस नाटकें आहेत; चौदा आनंदपर्यवसायी, अकरा शोकपर्यवसायी व दहा ऐतिहासिक. शेक्सपीअरच्या

आनंदपर्यवसायी नाटकांत शेवट गोड असतो येवढ्यावरून त्यांना तें नांव द्यावयाचें; बाकी त्यांपैकीं पुष्कळ नाटकांत करुणा उत्पन्न करणारे प्रवेश आहेत, व कित्येकांच्यीं संविधानकें तर अशीं आहेत कीं, त्यांवरून हीं नाटकें शोकपरिणामी असतील असें वाटतें. शेक्स्पीअर येवढा बुद्धिमान् खरा, व त्या एकट्यानें ३५ नाटकें लिहिलीं ही तारीफ करण्याजोगी गोष्ट खरी, पण या ३५ पैकीं चौतिसांच्या मूळ गोष्टी त्यानें दुसऱ्या पुस्तकांतून घेतल्या आहेत, हा एक मुद्दा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. त्यानें असें केलें म्हणून आम्ही त्याची कमी योग्यता समजतों असें नाहीं; कारण, दुसऱ्या पुस्तकांतून मूळ गोष्ट घेतली तरी तींत हवे तसे फेरफार करून ती चित्तवेधक करण्यास लहानसहान बुद्धि लागते असें नाहीं; तथापि पहिल्यापासूनच नवा पाया रचून त्यावर इमारत चढविणें, व दुसऱ्या कोणी घातलेल्या पायाची दागदुजी करून घेऊन त्यावर इमारत चढविणें, यांत थोडें अंतर आहे. असो. शेक्स्पीअरनें पसतीस नाटकें लिहिलीं व त्यांवर त्याला पुष्कळ द्रव्य संपादितां आलें, यावरून त्या वेळेस नाटकें लिहिण्यास अनुकूल अशी देशास्थिति आली होती, व लोकांस नाटकें वाचण्याची आणि त्यांचे प्रयोग पहाण्याची अभिरुचि लागली होती, या दोन गोष्टी सिद्ध होतात. कोणत्याहि देशांत मोठा मनुष्य जन्मास येतो तो एकाएकीं आकाशांतून पडतो असें नाहीं. तो आणि त्यासारखे दुसरे मोठे मनुष्य उत्पन्न होण्याचा त्या देशाला काळच आलेला असतो. इलिझाबेथच्या कारकीर्दीत शेक्स्पीअराशिवाय दुसरे अनेक मोठे लोक जन्मास आले. स्पेन्सर, राले, जानसन, बेकन, बरले व हूकर हीं समकालीन नांवें ध्यानांत ठेविलीं असतां शेक्स्पीअरच्या विलक्षण कल्पना-शक्तीविषयीं इतका अचंबा वाटणार नाहीं. नुसत्या बुद्धिसामर्थ्याचीच तुलना करावयाची असेल तर बेकनची बुद्धि शेक्स्पीअरपेक्षां कांकणभर अधिक येईल असें आम्हांस वाटतें. पण असल्या तुलनेंत पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, म्हणून ती दिशाच आम्ही अजीबात सोडून देतों. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, ज्या जमिनींत शेक्स्पीअर जन्मास आला, त्या जमिनींत त्या वेळेस त्यासारखे मोठे पुरुष निपजण्याजोगीं उत्पत्तितत्त्वें एकत्र झालीं होतीं. असें नसतें तर वर सांगितलेली विद्वन्मणि-

परंपरा उदयास आली नसती. पंधराव्या शतकांत सर्व युरोपभर जी धर्म-क्रांति झाली, तिच्या योगानें यूरोपांतील सर्व राष्ट्रांची स्थिति अगदीं बदलून गेली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांत धर्मक्रांति होऊन राज्यक्रांतिही झाली. इंग्लंडांतील इतिहासांत ज्यांना 'गुलाबाच्या लढाया' असें म्हणतात, त्यांत इंग्लंडांतील मोठमोठ्या घराण्यांचा फडशा होऊन पंधराव्या शतकाच्या अखेरीस अनियंत्रित राजघराणें स्थापित झालें. या घराण्यांतील बहुतेक राजे फार प्रबल होऊन गेले. प्रबल राजांच्या कारकीर्दींत बुद्धिमान् पुरुष उदयास येतात हें सर्वांस ठाऊक आहे. इलिझाबेथ इच्या आमदानींत इंग्लंडचा दरारा सर्व यूरोपांत ठाम बसून गेला होता. स्पेनच्या 'अजिंक्य' आरमाराचा फडशा उडवून दिल्यानें त्या वेळच्या इंग्लिश लोकांस केवढें स्फुरण आणि केवढी वीरश्री आली असेल, याची खरी कल्पना इतिहासज्ञांस मात्र करतां येणार आहे. यूरोपांत प्राटेस्टंट लोकांचा छळ झाल्याची बातमी लागली कीं त्यांचा कैवार घेऊन लढाई करण्यास इलिझाबेथ राणी सदा तयार असे, यामुळें यूरोपांतील क्याथलिक राष्ट्रें तिला चळचळां कांपत, व आपापल्या राज्यांतील प्राटेस्टंट प्रजेला न्यायानें आणि दयेनें वागवीत! मेरिच्या राज्यांत पोपचें फार प्रस्थ माजलें होतें; इलिझाबेथ सिंहासनारूढ होतांच तिनें पोपचा संबंध तोडून टाकला, व इंग्लंडच्या धर्मप्रकरणांत तो कधींहि हात घालणार नाहीं असा बंदोबस्त केला! स्कॉटलंडच्या राणीनें कांहीं गडबड केल्यावरून तिला सतरा-अठरा वर्षें कैदेंत ठेवून अखेरीस तिचा शिरच्छेद केला! पृथ्वीप्रदक्षिणा करण्या-साठीं शूर खलाशांच्या हातीं मोठमोठीं जहाजें देऊन त्यांना निरानिराळ्या दिशांस पाठविलें, व हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याकरितां पहिली ईस्ट इंडिया कंपनी स्थापिली. या आणि अशा अनेक गोष्टींवरून वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं, इंग्लंडच्या इतिहासाचा हा काळ पराकाष्ठेच्या चंचलतेचा असल्या-मुळें नाटककारास आपल्या नाटकांत गुंफिता येण्याजोग्या पुष्कळ गोष्टी त्याच्या डोळ्यांपुढें घडत असतील यांत संशय नाहीं व मोठमोठ्या गोष्टी नित्यशः कानावर येत असल्या किंवा डोळ्यापुढें घडत असल्या, म्हणजे त्यांचें मनोवेधक वर्णन हातून सहज होऊन जातें हें कोणीही कबूल करील. शेक्स्पीअरच्या पूर्वी इंग्लंडांत मोठे लोक झाले नाहींत यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण,

तसले लोक होण्यास जी स्थिति लागते ती स्थिति इंग्लंडला किंवा यूरोपांतील दुसऱ्या कोणत्याही देशाला आली नव्हती. युरोपखंडाच्या इतिहासांत ज्यांना 'मध्ययुगें' असें म्हणतात, त्या युगांत युरोपांतील सगळ्या समाजांची स्थिति अत्यंत शोच्य होती. अज्ञान, पापाचरण, धर्मभोळेपणा, धर्माधिकाऱ्यांची लूट, विषयसुखाविषयीं अत्यंत उदासीनता वगैरे गोष्टींमुळें सगळें युरोपखंड एका प्रकारच्या झोंपेंत घोरत पडलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वर्गाच्या दाराच्या किल्ल्या धर्माधिकाऱ्यांपाशीं; त्यांच्या मध्यस्थीखेरीज ईश्वरप्राप्ति किंवा मुक्ति नाहीं; पापांचें क्षालन होण्यासाठीं भटजीबोवांच्या हातावर दक्षणा सोडली म्हणजे पुरें आहे; प्रपंचांत मन घालणें म्हणजे मोक्षपदाचा अव्हेर करून नरकवास प्राप्त होण्याची तयारी करणें; विषयसुखाचा अभिलाष हा साऱ्या पापांचें आणि दुःखांचें मूळ; प्रखर शरीरदंडनाशिवाय आत्म्याची शुद्धि होणें नाहीं; आपली ऐहिक वसति क्षणभंगुर व यातनामय आहे व ऐहिक सुखापासून सुखाचा भास मात्र होतो; खरें सुख व खरी शांति स्वर्गांत; संसारसुखाचा तिटकारा करून गुरूपासनेंत किंवा ईश्वरभजनांत कालक्रमण करणें हा आयुष्य घालविण्याचा उत्तम मार्ग! मित्रत्व, बंधुत्व, पितापुत्रत्व वगैरे मिथ्या मायापाश होत; यांत सांपडलेला मनुष्य परलोकांस मुकतो, व त्याला दुर्गति प्राप्त होते; 'पदार्थशास्त्र' म्हणतात तें कांहीं नाहीं, सगळा किमयेचा आणि जादुगिरीचा खेळ आहे; सूर्यचंद्रांच्या गतीचा निर्णय कोणास करतां येणार नाहीं किंवा ताऱ्यांचें अंतर कोणाच्यानें निघणार नाहीं; हे विषय मनुष्याच्या बुद्धीच्या पलीकडे आहेत; सारांश, वैराग्यासारखी दुसरी चीज नाहीं अशी त्या वेळच्या लोकांची पक्की समजूत होती, व त्यामुळें त्यांच्या हातून कांहीं एक होत नसे. ल्यूथरकृत धर्मक्रांतीमुळें जें मन्वंतर झालें त्यांत या वेडेपणाच्या कल्पना अगदीं राहिल्या नाहींत. ईश्वरापाशीं वशीला लावण्यास मध्यस्थांची किंवा प्रतिनिधींची आवश्यकता नाहीं; संसारसुखाची इच्छा केल्यानें किंवा तें प्राप्त होण्याचा उद्योग केल्यानें परमेश्वराला राग येण्याचा संभव नाहीं; विषयवासना तृप्त करणें हें पाप नाहीं; शरीर आणि मन हीं मनुष्याच्या अस्तित्वाचीं दोन अवश्य अंगें होत, यांसाठीं या दोहोंपैकीं कोणाचीच उपेक्षा करणें हितावह नाहीं; आचार व विचार यांचीं पारडीं समतोल

असलीं पाहिजे; यांमधील कांटा कोणत्याही एकाकडे जरी विशेष कलला तरी त्यापासून मनुष्याचें नुकसान होतें; अनेकगुणात्मक बाह्यसृष्टि परमेश्वरानें मनुष्याच्या उपभोगासाठीं केली आहे, यासाठीं तिचा कंटाळा करणें म्हणजे त्याचा अपमान करणें होय; जड सृष्टीच्या किंवा मनःसृष्टीच्या अस्तित्वाचीं गूढ कारणें मनुष्याच्या आकलनशक्तीच्या बाहेर आहेत, यासाठीं त्यानें त्यांचा शोध लावण्याचें व्यर्थ श्रम करूं नयेत; परमेश्वराच्या अतर्क्य गुणांचा आणि करणीचा स्पष्ट बोध कोणत्याही जीवाला कधींच व्हावयाचा नाहीं, तथापि त्याच्या अगाध कर्तृत्वाचीं चिन्हें हरघडीस दृष्टिगोचर आहेत, एवढ्यावरच समाधान मानून त्याचें चिंतन करावें, त्याला शरण जावें, व त्यानें आपल्या सुखासाठीं जीं अनेक साधनें निर्माण करून ठेविलीं आहेत, त्यासाठीं कृतज्ञतापूर्वक त्याचें भजन करावें; क्रोध, अहंकार, ममता, विषयवासना इत्यादि मनोविकार विचाराधीन असले म्हणजे मनुष्याचें त्यांपासून कल्याणच होतें; शत्रुद्वेष, बंधुप्रीति, आप्तप्रेम, पितृवात्सल्य इत्यादि गुणांनीं इहलोकीं मनुष्याला सुखप्राप्ति होते; आपलें व दुसऱ्याचें ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण चिंतणें आणि करणें हाच मनुष्याचा सनातन धर्म; सद्विचार आणि नीति यांचें अवलंबन करून वर्तन ठेविलें असतां इहलोकींच परलोकींच्या सुखाचा अनुभव होऊं लागतो; दुर्लौकिकासारखें दुष्ट मरण नाहीं; सुलौकिकासारखें अमरत्व नाहीं; आत्मोन्नतीहून श्रेष्ठ असें मनुष्यास दुसरें कर्तव्यकर्म नाहीं;—या आणि अशा अनेक विचारांचा प्रसार झाल्यामुळें ज्या त्या राष्ट्रांत उद्योग, संपत्ति, विद्या, देशाभिमान हीं तत्काल उत्कर्षास पावलीं. मुख्यत्वेंकरून इंग्लंडांत असल्या विचारांच्या प्रसारामुळें लोकांचें फार हित झालें. एक वेळ बाह्य सुखांचें सरसत्व अनुभवास आल्यावर मग काय विचारतां? शेक्स्पीअरनें एक दिशा धरली तर बेकननें दुसरी, हूकरनें तिसरी, रालेनें चौथी, आणि बरलेनें पांचवी, याप्रमाणें चार चौघांनीं चोहोंकडून उचल केल्याबरोबर सुधारणेचें काम झपाट्यानें चालूं लागलें, व थोड्या वेळांत मनुष्याच्या ज्ञानवृक्षाच्या अनेक शाखा पुष्पांनीं आणि फुलांनीं ओथंबून गेल्या. एका ग्रंथकारानें तर असें लिहिलें आहे कीं रात्रीचा तिमिर निघून जाऊन पृथ्वीवर सूर्याचे कल्याणप्रद रश्मि येऊन पोहोंचले म्हणजे ती जशी रमणीय, प्रफुल्लित, आणि सुखी दिसते,

त्याप्रमाणें 'मध्ययुगांतील' अज्ञानतिमिर निरस्त झाल्याबरोबर अर्वाचीन विचारप्रकाशांत यूरोपांतील सर्व राष्ट्रें उद्योगी आणि आनंदी दिसूं लागलीं. हें सर्व येथें सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, शेक्स्पीअर हा जरी महाकवि खरा, तरी तो केवळ स्वर्गांतून मृत्युलोकावर उतरला, व त्यानें जे केलें आहे तें अमानुष आहे, असें मानावयाचें नाहीं. शेक्स्पीअरनें आपल्या विलक्षण बुद्धिसामर्थ्यानें व अचाट कल्पनाशक्तीनें मनुष्यमात्रावर जे उपकार करून ठेविले आहेत, त्याबद्दल त्याला कोणी हवा तितका करभार देवो, त्यासाठीं आमचें कांहीं एक म्हणणें नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, शेक्स्पीअरबरोबर नाट्यकलेची परमावधि होऊन गेली असें समजून आतां तिची अधिक उन्नति करण्याचें काम सोडतां कामा नये. "कालोऽह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी" अशी स्थिति असल्यामुळें शेक्स्पीअरच्या तोडीचेच काय, पण त्याहून श्रेष्ठ कवि उत्पन्न होण्याचा संभव आहे. यासाठीं ज्याच्या नशीबीं असेल त्यानें त्याच्या अलौकिक नाट्यरसाचें बुद्धि-विकासक आणि शांतिप्रद पान तर यथेच्छ करावेंच, पण जमल्यास त्याच्या गुणदोषांचें विवेचनही करावें; कारण, त्यापासून अनेक फायदे आहेत. मागल्या कवींचे दोष दृष्टोत्पत्तीस आल्यानें पुढल्या कवींना ते टाळणें सुलभ होतें हा तर गुणदोषविवेचनापासून होणारा एक फायदा आहेच; पण याहीपेक्षां विशेष महत्त्वाचा फायदा कोणता म्हणाल तर असल्या विवेचनानें कवीचें खरें हृद्गत सर्वांस कळूं लागतें. कवीचें हृद्गत यथास्थित कळून क्षणभर वाचकाचें आणि त्याचें तादात्म्य झाल्याखेरीज कवितेपासून होणारा अत्यानंद त्याच्या अंतःकरणास होणार नाहीं. नाटकाचा प्रयोग चांगला वठत असला तर तो पाहण्यानें नाटकाचें पुस्तक वाचण्यापेक्षां एक प्रकारें अधिक समाधान होतें खरें, पण एक प्रकारें मोठें नुकसानही होतें. नाटक वाचतांना विचार करण्यास फुरसत सांपडते, यामुळें अनेक पात्रांच्या भाषणांचा परस्परसंबंध लावतां येतो, व ज्या ठिकाणीं कवीनें विशेष बहार केली असेल त्या ठिकाणीं थोडा वेळ थबकून राहून त्याच कल्पनेवर पुनः पुन्हा विचार करून सुखानुभव द्विगुणित किंवा त्रिगुणित करतां येतो. प्रयोग पहाण्यास बसल्यावर अशा प्रकारचा सुखानुभव घेण्यास अवकाश कोठला ? एक पात्र डोळ्यांआड झालें नाहीं तोंच

दुसरें येऊन पुढें उभें राहतें, व मनावर एक प्रकारचे संस्कार स्पष्ट उमटताहेत नाहींत तों दुसरे येऊन ठेपतात. यामुळें एकच गर्दी होऊन जाऊन कोणत्याच रसाचा पूर्ण अनुभव होत नाहीं. शिवाय, एखादे वेळेस कवीची खाशी तंद्री लागली म्हणजे पहिल्यापासूनच तो अशा वेगानें भराऱ्या मारूं लागतो कीं, पुढें पुढें त्याचा वेग त्यालाच आवरेनासा होतो. मनाच्या अशा स्थितींत लिहिलेल्या नाटकाचा हवा तसा प्रयोग कोणत्याही नटाच्या हातून वठावयाचा नाहीं! 'उत्तररामचरित', 'किंग लीअर', 'हॅमलेट' या नाटकांत कवींनीं पहिल्या पहिल्या अंकांतच प्रधानरसाची पंचमापासून सुरुवात केल्यामुळें पुढें पुढें त्यांच्याबरोबर वर वर चढण्यास मन मात्र टिकतें! 'किंग लीअर' सारख्या नाटकांत 'लीअर' होणाऱ्या मनुष्याचा गळा पहिल्या दुसऱ्या अंकांतच फुटून गेल्यावर तो पुढें काय रडणार? व शेवटच्या तीन अंकांत कवीनें जी कमाल करून सोडिली आहे तिचें अनुकरण कसें करणार? ज्या नाटकांत कवींनीं पात्रांच्या मनोवृत्तींना पहिल्यापासूनच उच्छृंखल सोडून दिलें आहे, तीं नाटकें बाह्य रंगभूमीवर आणण्यासाठीं नव्हत, व तेथें तीं आणल्यानें त्यांचा विरस मात्र होतो. असल्या नाटकांचे प्रयोग मानसिक रंगभूमीवर व्हावयाचे. या रंगभूमीवर जीं पात्रें येतात जातात तीं कोणत्याही काळचीं, कोणत्याही देशाची, कोणत्याही पंथाची किंवा रीतरिवाजाचीं असलीं तरी त्यांपासून काडीयेवढा रसभंग न होतां त्यांच्याशीं तादात्म्य करून घेण्यास मनाला पुरेसा अवकाश सांपडतो, व अशा रीतीनें ते तदाकार होऊन गेल्यावर त्यास त्या अवर्णनीय सुखाचा अनुभव होत असतो त्याचें शब्दांनीं कोण वर्णन करूं शकणार आहे?

◆ ◆ ◆

४ : : भारतीय कलांचें पुराणत्व

अलीकडे आम्हांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तीमुळें आम्ही पूर्वीपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, असें परकीयांसच नव्हें तर आमचें आम्हांस देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात कीं, इंग्लंडचा प्रसिद्ध वृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वारेन हेस्टिंग्सविरुद्ध पार्लमेंटच्या सभेंत गर्जूं लागला तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्लमेंटच्या सामान्य सभासदांचीं अंतःकरणें रागानें व शोकानें विदारून गेलीं येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्या हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग्ससाहेबाचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यास असें वाटलें कीं, "मी मोठा कर्मचांडाळ दुरात्मा असलों पाहिजे !" बर्कच्या वाक्प्रभावामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीहि अलीकडे होऊं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, घाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याहि गोष्टींत आम्ही आपली युरोपिअन लोकांशीं, मुख्यत्वेंकरून इंग्लिश लोकांशीं तुलना करूं लागलों कीं, त्यांच्या आमच्यांत जमीन अस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें ! इंग्लिश लोकांत व आम्हांत खरोखरीच येवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिती झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नव्हती. अनेक गोष्टींत आम्ही आजमित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्ही त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण तेवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं ज्यांचा आम्हीं अभिमान मानावा, किंवा ज्यांच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हें प्रत्येक निःपक्षपाती हिंदूस कबूल केलें

पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. महंमदीय लढवय्यांप्रमाणें धर्मवेडानें युरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आम्ही उध्वस्त केले नाहींत, व राज्यलोभानें लाखो लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूर निष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गायन, वादन इत्यादि ललित कलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आजामित्तीस सुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून, त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दीडफूट लांबीच्या हाडामासांच्या हातांचें कांहीं एक चालेनासें झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें कितीही अचाट कामें केलीं तरी यंत्रें हातांनींच करावीं लागतात, व यंत्रानें जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागते. यंत्रांत नाना प्रकारच्या वेलबुट्ट्यांचें काम निघतें; पण जर हातानें वेलबुलट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्ट्यांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय ? ज्याप्रमाणें दुर्बिणीनें डोळसाच्या दर्शनशक्तिस साहाय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहीं एक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे; ज्यांचे हात थोटे आहेत त्यांना यंत्रापासून म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रासारखींच असतात; नवीन यंत्रें तयार करण्याची किंवा तीं बिघडलीं तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली असते; हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू आहे. चांगल्या कारागिरानें एखादा सुरेख नमुना घालून दिला म्हणजे त्याचें अनुकरण करणारेच शेंकडा नव्याण्णव लोक असावयाचे. विशाल कल्पकता ही नैसर्गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असते. बहुतेक जनता तेल्याच्या

घाण्याभोंवतीं डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते; आणि असें तिनें करणें हेंच फायदेशीर आहे. ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कास धरून चालावें हेंच नीट आहे. तात्पर्य अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपीअन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आम्हीं शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकला-प्राविण्याची आवश्यश्यता असते, ती हस्तकलाही आम्हीं सर्वांनीं युरोपीअन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आम्हांस मान्य नाहीं. तथापि आम्ही लौकर जागें झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी आमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून, तीं येथें आणून मांडिलीं आणि त्यांवर माल काढण्यास सुरुवात केली, म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्राचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच. पण त्यांबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत त्या ह्या. आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खात्री केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वी जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें, व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐष-आरामासाठीं करीत तींच कामें यंत्राच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल तेव्हांच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें असें म्हणतां येणार आहे.

येथील श्रीमान लोक, धनाढ्य शेटसावकार किंवा पैसेवाले जहागीरदार व संस्थानिक पूर्वीच्या कामासारखीं टोलेजंग कामें हिंदु कारागिरांकडून अलीकडे करवीत नाहींत, हें पाहून कित्येक पाश्चिमात्य लोक असें म्हणतात कीं, हिंदु लोकांत हस्तकौशल्याची अभिवृद्धि कधींच झाली नाहीं. नांवाजण्यासारख्या ज्या थोड्याबहुत इमारती किंवा कोरीव लेणीं दिसतात त्यांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, कांहीं कारणांमुळें हस्तकौशल्यांत आम्हांहून फार श्रेष्ठ अशा ग्रीक, रोमन, व मुसलमान लोकांचा आणि आमचा संबंध घडून आल्यामुळें आम्हांस तीं कामें करतां आलीं. त्यांचा आमचा संबंध न घडतां तर हिंदुस्थानच्या एका टोंकांपासून दुसऱ्या टोंकांपर्यंत पाहण्यासारखें किंवा वाखाणण्यासारखें कांहीं नसतें. आमच्या मतें हें म्हणणें फार चुकीचें आहे; व तें चुकीचें आहे, असें अनेक रीतींनीं सिद्ध करून देतां येणार आहे.

प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, शिल्पकलेची व इतर कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास कोणत्या गोष्टींची अनुकूलता असणें जरूर आहे; व त्या गोष्टी इताली, ग्रीस व तुर्कस्थान या देशांपेक्षां हिंदुस्थानांत पूर्वीपासून अधिक विपुलतेनें दृष्टीस पडत आहेत किंवा नाहींत ? जो कोणी थोड्या बारकाईनें या प्रश्नाचा विचार करील त्याच्या लक्षांत हें तेव्हांच येईल कीं, कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतां कामा नये; शिवाय अशीं कामें करण्यास लागणाऱ्या जड द्रव्यांचें वैपुल्य असलें पाहिजे. बर्फाच्छादित उत्तरध्रुवाकडील प्रदेशांत खुज्या लोकांत किंवा सैबेरिया प्रांतांतील थंडीनें नित्य कांकडत असणाऱ्या लोकांत हस्तकौशल्याची वृद्धि कशी व्हावी, हें आम्हांस समजत नाहीं. ज्यांना केवळ उदरपोषणासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत समुद्रोदरस्थ मत्स्यजातीशीं, अरण्यवासी भक्ष्य जनावरांशीं अथवा हवेंत संचार करणाऱ्या विहंगमांशीं झगडा करावा लागतो, व त्यांवर आपली उपजीविका चालवावी लागते, अशा लोकांस भव्य मंदिरें बांधण्यास, नाना प्रकारचे कपडे विणण्यास व ऐषआरामाचे इतर तऱ्हांचे पदार्थ उत्पन्न करण्यास फुरसत कोठून सांपडणार ? अशा लोकांनीं कॉड-सारख्या माशाच्या, रेनडिअरसारख्या जनावराच्या किंवा कोंबड्यांसारख्या

गृहपक्षाच्या चरबीवर, मांसावर व अंड्यांवर चरितार्थ चालवून संकटावह असें आयुष्यक्रमण करणें भाग आहे. शिवाय, ज्या ठिकाणीं सूर्य फारसा प्रकाशत नाहीं, मोठमोठ्या नद्या वाहात नाहींत, ठरीव ऋतूंत पाऊस पडत नाहीं व जमीन बहुधा उघडी असत नाहीं, अशा ठिकाणीं मृदु, कठीण लवचिक, किंवा दाणेदार अशा वनस्पतींची वाढ होऊन, इमारतींस लागणारें सुरेख लाकूड मिळावें कसें ? तसेंच जिकडे तिकडे सफाईदार व टिकाऊ दगडाच्या खाणी लागत नसल्या व लोखंडासारख्या अत्यंत उपयुक्त धातू सांपडत नसल्या तर दगंडी कामें व हत्यारें व्हावीं कशीं, हा मोठा प्रश्न आहे. इजिप्तसारख्या स्वाभाविक सुपीक देशाची लॅपलंडसारख्या ओसाड भूखंडाशीं तुलना करतां येत नाहीं. एकांत मनुष्याच्या उपजीविकेस लागणाऱ्या गोष्टी सहज उत्पन्न होतात; दुसऱ्यांत त्या प्राप्त होण्यासाठीं तेथील लोकांस साऱ्या दिवसभर खपावें लागतें. नैल नदीच्या उथळ व रुंद पात्रांत जो गाळ वाहत असतो तो तिच्या दोनही किनाऱ्यावरील प्रदेशांत कित्येक मैल आपोआप पसरला जाऊन त्यांस खत घातल्याप्रमाणें सुपीकपणा आणतो. अशा प्रकारच्या क्षेत्रांत पूर येऊन गेल्यावर एकदां कसें तरी थोडेंबहुत .बीं फेंकून द्यावें, आणि सातआठ महिने लोटल्यावर खंडोगणती धान्य घेवून यावें असा प्रकार चालतो. अशा देशांतील लोकांत मनुष्यसुधारणेचा आरंभ झाला, निरानिराळीं शास्त्रें अस्तित्वांत आलीं, व काळाच्या विघातक सामर्थ्यास न जुमानणाऱ्या व आकाशाचें चुंबन करूं पहाणाऱ्या पिरमिदी उठल्या, यांत कांहीं नवल काय ? ज्या कारणामुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें म्हणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम तेथें होऊं लागल्यास पुरें होती, व त्याप्रमाणें ती येथें झाली, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येणार आहे. प्रथम हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्ष द्या. येथें कशाची तरी वाण आहे काय ? उष्ण, शीत किंवा समशीतोष्ण कटिबंधांत पैदा होणारी प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रत्येक प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे ! नैल नदीच्या सुपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारीं धान्यें पाहिजे असतील तर सिंधूच्या व गंगेच्या दोन्ही

थडयांनीं त्यांची हवी तितकी विपुलता आहे. तांबडया व काळया जमिनीतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवी असतील तर दक्षिण हिंदुस्थानास वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घांटापर्यंत पसरलेल्या पूर्व-पाश्चिम कोंकणपट्ट्याकडे, व घांटावरील मोठमोठ्या नद्यांनीं चित्रविचित्र व सुपीक करून सोडलेल्या सुखावह भूमीकडे अवलोकन केलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंच डोंगरी प्रदेश, वड, पिंपळ, खदीर, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडें, मोर वगैरे हिंस्र आणि अहिंस्र प्राणी यथेच्छ संचार करितांना दृष्टीस पडतात. याहून सखल प्रदेशांत हत्ती, कृष्ण सारंग, तांबडी हरणें, रानडुकरें साळुंक्या, ससे व चकोरादि पक्षी स्वेच्छेनें विहार करीत असतात. हे दोन प्रकारचे प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाट मैदानांत येतों तेव्हां जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या धान्यांचीं शेतें, उंसांचे फड, भाताचीं खांचरें, व नाना प्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं आणि फुलांनीं भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस चरितार्थ चालविण्याची आरंभीं येवढी तरी पंचाईत पडली असेल काय ? व जर पडली नसेल तर ज्ञानवृद्धि आणि कलावृद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय ? पण हें सारें या पुण्य आर्यभूमीच्या बाह्य स्वरूपासंबंधानें झालें. पुढच्या लेखांत हिच्या अंतःस्थितीचा विचार करून मग आम्हांस येथील कलांच्या पुराणत्वाबद्दल जो अभिप्राय द्यावयाचा आहे, तो उघडपणें देऊं.

[२]

कोणत्याही देशांत कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास त्यांची बाह्य स्थिति कोणत्या प्रकारची असली पाहिजे हें प्रथम सांगून, मग या भारतखंडाची स्थिति पूर्वीपासून तशी आहे, हें मागल्या लेखांत सांगितलें. तेव्हां इजिप्त देशाप्रमाणें या देशांतही कलांचा अभ्युदय फार प्राचीन काळीं झाला असला पाहिजे, असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वीच बाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अंमलानें येथील कलांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या

अत्यंत संकुचित झाल्यामुळें, येथील कारागिरी सांप्रत कालीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हें निर्विवाद आहे. तथापि ज्यांचें अवलोकन वस्तूंच्या केवळ पृष्ठभागांसच धरून रहात नाहीं, तर त्याच्या खालीं व पलीकडे जातें, त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानांत उपलब्ध आहे, त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं, तर फार जुनी आहे. जुनेपणा ज्या दोन प्रमाणांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात त्यांपैकीं त्यांची सांप्रत स्थिति, या प्रमाणावर आक्षेप घेणारे असे पुष्कळ लोक आहेत. या लोकांत अनेक युरोपिअनांचा व बिलकुल शोध न करतां दुसरे म्हणतील त्यास ' हो ' म्हणणाऱ्या किंवा केवळ बाह्य स्थितीवरून सिद्धांत बोलणाऱ्या एतद्देशीयांचा समावेश केला पाहिजे. हिंदू लोकांची राजकीय व सामाजिक अनुकंप्य स्थिति पाहून कलाखात्यांतही ते पूर्वीपासून असेच असले पाहिजेत व आजमितीस या देशांत ती थोडीबहुत कारागिरी दृष्टीस पडते ती त्यांनीं अन्य लोकांपासून उचलली पाहिजे, असें अनुमान करून तिचें सूत हे हेकेखोर लोक ग्रीक किंवा मुसलमान लोकांकडे लावूं पाहतात ही त्यांची मोठी चूक आहे, हें पुढील विवरणावरून सहज लक्षांत येईल.

मनुस्मृति हा ग्रंथ कमीतकमी म्हटला तरी ख्रिस्ती शकाच्या अगोदर किंवा पाठीमागून जो दोनशें वर्षांचा काळ लोटला त्यांत लिहिला गेला असावा ही गोष्ट आतां सर्व शोधक विद्वान मान्य करतात याविषयीं आतां मतभेद राहिलेला नाहीं. मनुस्मृतींत ज्या कलांचीं व कारागिरांचीं अप्रत्यक्ष रीतीनें वर्णनें आलीं आहेत त्याच प्रकारच्या कला व कारागीर अद्यापि उपलब्ध आहेत. तेव्हां जर कोणी आम्हांस कलाशिक्षण दिलें असेल तर तें मनुस्मृति अस्तित्वांत येण्यापूर्वी दिलें असलें पाहिजे, असें मानणें भाग आहे. परंतु मनुस्मृतींत पूर्वीच्या स्मृतींचा व इतर ग्रंथांचा कला व कारागीर यांच्या-संबंधानें उल्लेख केला आहे. तेव्हां आणखी असें कबूल करणें भाग पडतें कीं, ज्या अर्थीं मनुस्मृतीच्या मित्तीपासून इतकीं शतकें लोटलीं असून व स्थित्यंतर करण्यास अत्यंत अनुकूल अशा अनेक गोष्टी घडल्या असून जर आमच्या कला व कारागीर त्या कालापासून आतांपर्यंत विशेष फेरफार न होतां एकाच स्थितींत दृष्टीस पडत आहेत, तर मनूच्या पाहण्यांत ज्या कला

व जे कारागीर आले तें तत्कालीन स्थितींत अनेक शतकें असले पाहिजेत व हें अनुमान योग्य असेल तर भारतीय कलांचें पुराणत्व तीन हजार वर्षांवर नेऊन बसवितां येतें ! मनुस्मृतींत आलेक्झांडरच्या किंवा शिकंदराच्या स्वारी-विषयीं बिलकुल उल्लेख नाहीं, तेव्हां ती स्वारी ती स्मृति झाल्यावर झाली असावी, असें म्हणणें कांहीं वावगें नाहीं; तसेंच मनुस्मृति ख्रिस्ताच्या अगोदर दोनशें वर्षें लिहिली गेली असावी असें म्हणा, किंवा त्यानंतर दोनशें वर्षांनीं लिहिली गेली असावी असें म्हणा, कसेंही म्हटलें तरी ती अस्तित्वांत येण्या-पूर्वी मुसलमानांचा पाय या पुण्यभूमीस लागला होता, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. तेव्हां आम्ही आमच्या कला मुसलमान किंवा ग्रीक लोकांपासून उचलल्या असाव्या, असें सूक्ष्म विचारांअंतीं कोणाच्यानेंही प्रपादवणार नाहीं. आतां मनुस्मृतींत तरी अप्रत्यक्ष रीतीनें काय काय सांपडतें तें पाहूं. अप्रत्यक्ष रीतीनें असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, अर्वाचीन एंजिनी-अरच्या ग्रंथासारखा मनुस्मृति कांहीं कलाग्रंथ नाहीं. तो धर्मग्रंथ आहे तथापि निरानिराळ्या अध्यायांत निरानिराळ्या वर्गांच्या कर्तव्यांचा व बंधनांचा विचार करीत असतां तत्कालीन कलांचा व कारागिरांचा उल्लेख करणें त्यास भाग पडलें आहे. तेव्हां अशा प्रकारच्या ग्रंथांत प्राकृत विषयाच्या संबंधानें जें कांहीं सांपडेल त्यांत यत्किंचितही व्याज असण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. मनूस त्यासंबंधाची जशी स्थिति दृष्टीस पडली तशीच त्यानें वर्णिली असावी, असें मानणें हें योग्य आहे. स्थलसंकोच नसतां तर सबंध श्लोकच्या श्लोक येथें उतरून घेतले असते. पण जागेच्या अडचणीमुळें तसें करतां येत नाहीं. फक्त अध्यायाचा व श्लोकसंख्येचा उल्लेख करण्यांत समाधान करून घ्यावें लागत आहे. (अध्याय ८ श्लोक २४८ व अध्याय ९ श्लोक २८०, २८५) यांत देवालयाविषयीं उल्लेख आहे. (४, ४६)—येथून पुढें अध्यायाचा आंकडा जाडा व श्लोकांचा बारका असें समजावें—यांत मोडक्या देवळांचा उल्लेख आहे; आणि (४, ३९, १३० व ८, ८७ व ९, २८५) यांत, मूर्तीचा उल्लेख आहे; (८, २४८, ९, ५८९) यांत तळीं, हौद, विहिरी व जिवंत टांकी यांचा आहे; (९, २८५) त पुलांचा आहे; (७, ७०, ७६ व १, १५२) त भुइकोट किल्ल्यांचा व डोंगरी किल्ल्यांचा आहे; (७, ७०, ७६, व ९, २७९)त राजवाड्यांचाआणि त्यांवर मोठमोठ्या कांठ्यां-

वर फडकणाऱ्या निशाणांचा आहे; (९, २८०) त कोठारांचा आणि हत्यारखान्यांचा आहे; (४, १६०) त धनुष्यबाणांचा आहे; (९, ९०) त सर्व प्रकारच्या मारक शस्त्रांचा आहे; (९, २८०) त रथांचा आहे; (४, २०२, २३२ व ८, २९१) त बसण्याच्या गाड्यांचा आहे; (८, २०९) त ओझ्याच्या गाड्यांचा किंवा खटाऱ्यांचा आहे; (८, २३१) त पांढऱ्या पोषाखांचा आहे; (१०, ८७, १२, ६६) त लोकर, कापूस व ताग यांच्या रंगीत वस्त्रांचा आहे; (५, १२० व ११, १५९) त रेशमी कपड्यांचा आहे; (४, ६६, १८८, २३१, व ९, ७०, २१९) त हरएक तऱ्हेच्या तंतुपटांचा आहे; (७, ९०) त नीळ आणि (१०, ८२) त लाख यांचा आहे; (४, ६६) त जोड्यांचा आहे; (२, २४६ व ७, ९६) त छत्र्यांचा आहे; (११, १६८, ७, २१८, ८, १०० २२३) त पोळीं, मोतीं, व इतर रत्नें यांचा आहे; (४, ३६) त कानांतील सोन्याच्या दागिन्यांचा व (२, १९४, ३, ५९) त बाकीच्या दागिन्यांचा आहे; (३, २०९, ४, २५०, १२, ६५) त निरानिराळ्या अत्तरांचा आहे; (४, २०२) त आसनांचा व (४, २५०) त मंचकाचा आहे; (३, २३४) त नेपाळच्या शय्यास्तरणांचा आहे; (४, २३९) त दिव्यांचा, (७, १३२) त दगडांच्या वस्तूंचा, व (७, १२१) त हस्ति-दंत आणि शिंगें यांचा आहे; (४, २३०, ५, ११२ व ११, ११८) त रुप्याच्या साध्या आणि कोंदणांच्या दागिन्यांचा आहे; (५, १११) त चमच्यांचा (२, ६५, ७, १३२, ८, ३१९) त पाण्याच्या भांड्यांचा, (४, ७४, ७, ५०) त फाशांचा, (४, २०२, २३२) त बिछान्यांचा व (४, १२०) त घोंगड्यांचा आहे. ही मनुस्मृतींत आढळणाऱ्या वस्तूंची अध्यायवार व श्लोकवार यादी झाली. याचप्रमाणें कारागिरांचीही यादी देऊं लागलों तर वाचकांस ती कंटाळवाणी होईल म्हणून इतकेंच सांगतों कीं, मनुस्मृतींत सुतार, बुरुड, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी वगैरेंचा उल्लेख केला आहे, व जरी या सर्वांस त्यानें खालच्या वर्णांत गोंविलें आहे, तरी त्यांच्या धंद्यांची उपयुक्तता ध्यानांत आणून असा अभिप्राय दिला आहे कीं, कारागीर कोणत्याही जातीचा असला तरी ज्या हातानें तो उपयुक्त वस्तू बनवितो तो हात कांहीं अपवित्र नाहीं. तसेंच

विवाहित स्त्रियांनीं कारागिरांशीं भाषण करणें निषिद्ध नाहीं. यावरून निवृत्ति मार्गाकडे ज्याचा विशेष ओढा त्या मनूलासुद्धां या कारागिरांचें महत्त्व आणि त्यापासून जीवित सुखावह करण्यास होणारें साहाय्य यांची किती उत्कृष्ट कल्पना होती, हें सिद्ध होतें. तसेंच मनूच्या आमदानींत नाणें चालत होतें असेंही स्पष्ट दिसतें. कारण या वैराग्यभक्तानें एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "तांबें, रुपें, आणि सोनें यांच्या ज्या विशिष्ट वजनांस नाणें अशी पारिभाषिक संज्ञा आहे, व ज्याच्या योगानें जगाचा व्यवहार सुकर होतो, तीं, नाणीं अगदीं निर्दोष आहेत, असें माझें मत आहे." याच रीतीनें त्यानें दुसऱ्या एका स्थलीं ऋण, करार, सारा, परमुलुखांतल्या मालावरील कर, समुद्रप्रयाण, परदेशाशीं व्यापार यांविषयीं उल्लेख करून, शेवटच्या दोन गोष्टी ब्राह्मणांस निखालस वर्ज्य आहेत, असें म्हटलें आहे ! यावरून काय उघड होते कीं, परदेशांशीं हिंदुस्थानचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत होता, व त्यामुळें जें दळणवळण सुरूं झालें होतें त्यामुळें ब्राह्मणधर्मास लागलेलीं उतरती कळा व बौद्धधर्माचा प्रसार यांच्या योगानें त्याचें चित्त उद्विग्न होऊन जाऊन, ब्राह्मणधर्माची पूर्वपदावर स्थापना करण्यासाठीं तो आपणाकडून होतील तेवढे निर्बंध घालीत होता. प्रस्तुत स्थलीं आम्हांस यासंबंधांत विशेष पडण्याची गरज नाहीं. तथापि मनुस्मृतीवरून येवढें सिद्ध करण्यास हरकत नाहीं कीं, मनूच्या कारकीर्दीत म्हणजे ख्रिस्ती शकाच्या अव्वल कारकीर्दीत किंवा त्याच्या पूर्वी पांचसातशें वर्षें म्हणजे आज सुमारें तीन हजार वर्षें हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशीं आहेत तसे आहेत; त्यांना ग्रीक लोकांनीं किंवा मुसलमान लोकांनीं विशेषसें दुखावलेंही नाहीं, व सुधारलेंहि नाहीं. थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतकें त्या कला आणि ते कारागीर तसेच तगून राहतील ! पण हें घडावें कसें ? इंग्रजांनीं आणलेल्या बाष्पशक्तीपुढें व राक्षसी यंत्रशक्तीपुढें आमच्या हातकारागिरांनीं टिकाव धरावा कसा ? आणि आमच्या कलांचें नांव चालावें कसें ? अथवा आमच्या कारागिरांचा उदरनिर्वाह व्हावा कसा ? याला एकच उपाय दिसतो तो हा कीं आमच्या हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशीं व यंत्रशक्तीशीं विवाह होऊन त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेली संतानें जिकडे तिकडे फडकूं लागली पाहिजेत !

[३]

मनुस्मृतीच्या सहाय्यानें आमच्या कलांचें पुराणत्व सिद्ध करण्यास अप्रत्यक्ष जातीचा किती पुरावा मिळतो, याचें दिग्दर्शन मागल्या लेखांत केलें आहे. आमचीं महापुराणेंही यासंबंधानें बरींच उपयोगीं पडण्यासारखी आहेत. मनुस्मृती आणि रामायण व महाभारत हे अगदीं निराळ्या प्रकारचे ग्रंथ आहेत. तथापि त्यामध्यें कालदूरता विशेष नसल्यामुळें कलादि मुख्य विषयबाह्य गोष्टींचें जे उल्लेख त्यांत आढळतात, ते परस्परांशीं सदृश असून एकमेकांचें समर्थन करणारे आहेत. आमच्या शोचनीय स्थितीमुळें, या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून जसा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतीचे कांहीं लोक ती पोथीपुढील तांदुळासाठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं; सप्ताहाच्या फायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात ! अलीकडील तरुण लोक ती परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात ! इतिहास-दृष्टीनें त्यांच्याकडे अवलोकन करून ज्यानें त्यांच्या वाचनास आरंभ केला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान् सांपडणार नाहीं. एखादा बुद्धिवान् व कल्पक विद्वान् या दोन ग्रंथांचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर भारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाबतींत विश्वसनीय, मनोरंजक व बोधावह असें चित्र त्यास काढतां येणार आहे ! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास लागणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आम्हांस मिळत नसल्यामुळें यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्यापि कोणींही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत करण्यास कोणी झटेल, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्लिश लोकांनीं असलीं कामें हातीं धरल्यास, त्यांस खुद्द सरकारकडून व सरकारी अधि-काऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें पुष्कळ मदत होते. इतिहासदृष्टीनें या ग्रंथांकडे पाहून त्यांच्या मदतीनें येथील जुनी स्थिंती कशी असावी, राज्य पद्धति कोणत्या प्रकारची असावी, राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य संबंध कसे होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति असे; राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखूष असत; कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें, कशावर व केव्हां घेत; सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात

असे; स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशांचा माल स्वदेशांत येऊं न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापाराचीं मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विशेष पिकत; अथवा कोणता जिन्नस कोणत्या ठिकाणीं विशेष सुबक होत असे आणि त्याला काय किंमत पडे; लोकशिक्षणाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रियांस, नोकरांस व इतर परोपजीवि लोकांस कोणते हक्क असत, व त्यांचा सांभाळ कोणत्या रीतीनें होत असे वगैरे गोष्टींविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची खात्री आहे. पण इतका शोधक व सुखवस्तु वाचक येथें कोठून पैदा होणार ? व झाला तरी तो आम्हांस लाभणार कसा ? फट्दिशीं तो एखादे ठिकाणीं रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकिलीचें ' प्रॅक्टिस ' करूं लागावयाचा, अथवा एखाद्या नेटिव्ह संस्थनिकांच्या पदरीं चार-दोनशें रुपयांवर पडून रहायचा ! सध्यां आमच्या संबंधानें हें बिकट काम युरोपियन लोक करीत आहे, व तें आमच्या हातून नीट होऊं लागेतोंपर्यंत, युरोपियन लोकांच्या शोधांवर, व कांहीं अंशीं त्यांच्या कल्पनांवर, आम्हांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत निबंधही सर जॉर्ज बर्डवूड यांनीं हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें जें मंडन केलें आहे त्याच्या अनुरोधानें लिहिले जात आहेत. ज्यांना सर जॉर्ज यांचा इंग्रजींत लिहिलेला अस्सल लेख पहावयाचा असेल त्यांनीं बॉम्बे गॅझेट पत्राचा १३ जून १८९० चा अंक पहावा. असो.

रामायण आणि भारत हीं इतिहासाचीं पुस्तकें नाहींत हें जरी खरें आहे तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील त्याला त्यांपासून तत्कालीन व त्या पूर्वीच्या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीविषयीं बरीच माहिती मिळणार आहे. प्रस्तुत विषयाच्या समर्थनासाठीं सर जॉर्ज यांनीं रामायणांतून एकच उदाहरण घेतलें आहे. पण तेवढ्यावरूनसुद्धां पौराणिक कालांत आमच्या कलांची व कारागिरीची स्थिति कशी होती, हें सहज समजण्यासारखें आहे. रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणिसाव्या अध्यायांत अयोध्येतील लोक भरतासह जो रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ काढलेली भरताची स्वारी मोठ्या थाटानें व व्यवस्थेनें निघाली होती. हींत प्रत्येक धंद्याचे लोक असून, धंद्याच्या महत्त्वाच्या अनुरोधानें

त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्यांचे पुढारी किंवा नायक नेमिले होते. या प्रसंगीं हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें. जवाहिऱ्यांच्या पाठीमागून कासार चालले होते, व कासारांच्या मागून हस्तीदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी, लोकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कांपणारे, काच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदू लोकांस माहीत नव्हते असें कोण म्हणूं शकेल ? हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे ख्रिस्तीशकाच्या पूर्वीचीं पांचशें आणि त्यानंतरचीं पांचशें वर्षें यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असें हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात. तसेंच रामायणांत धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी झाला तरी आज करील. फार तर काय पण एखादा सेन्सस रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें, तर धंद्याच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं. तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे येथें चालत होते तेच अद्यापिही चालत आहेत व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभवही नव्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या साथीसारखे, वावटळीसारखे किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले ! हिंदुस्थानांत त्यांनीं कायमचें ठाणें कधींहीं दिलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. ' म्हणण्यासारखा ' असें बुद्धया लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली असें जरी उपलब्ध इतिहासारून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें असें मानण्यास हरकत नाहीं. पण

पण या दळणवळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनीं ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट हिंदू व ग्रीक या उभयतांनींहि आपापल्या कारागिरींचीं मूल-तत्त्वें आपल्याहून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावी, असें मानण्यास बराच आधार आहे. तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलही बराच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्यासंबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत नाहीं, तर त्यांच्या पाठीमागून ज्यांनीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसलमानांचें लागतों, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस नाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारही नव्हता. मुसलमान लोक आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे; पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अंमलानें आमच्या अंतर्बाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांत सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुणारणेचा मागमूसही न राहतां आपणहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केले, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपली कायमचीं राज्यें स्थापिलीं त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतां पत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथें आपली गादी स्थापिली व अनेक वर्षें त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बीमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं

नियम काढिला आहे तोच आम्हांसही लागू होतो. याच गोष्टीचा दुसरा प्रयत्न असा आहे कीं, दाक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधींच झाला नाहीं, व पाश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पाश्चिम हिंदुस्थानांतील कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अंमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरीस म्लेंच्छस्पर्श कधींही झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून म्हणणें भाग पडतें. उलट, अहमदाबाद, हैद्राबाद, (दाक्षिण) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धां आमची कारागिरी मशिदीपर्यंत व जनानखान्यापर्यंत जाऊन भिडली आहे असें दिसून येईल !

◆ ◆ ◆

५ : : विष्णु कृष्ण चिपळोणकर

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥

—श्री रामदास

गेल्या शुक्रवारीं सकाळीं ७।८ वाजण्याच्या सुमारास डोलकर आळींत एकच गर्दी झाली. शाळांतील लहान मोठीं मुलें, व त्याप्रमाणेंच गांवांतील तरुण आणि वृद्ध लोक यांचीं तोंडें म्लान होऊन त्यांवर विपरीत कळा आली. इतक्यांत चिपळोणकरांच्या वाड्यांतून स्त्रियांचा दीर्घ रुदन-स्वर बाहेर आला ! त्याबरोबर घात झाला अशी खात्री होऊन सर्वजण तोंडाला पदर लावून रडूं लागले. यावेळीं शाळेंतील मुलांनीं रडून जो कल्लोळ केला तो सांगतां पुरवत नाहीं. विष्णुशास्त्री एकाद्या रोगानें ४।६ महिने खितपत पडले होते असें नाहीं. १५ दिवसांपूर्वी कँपमध्यें फोटोग्राफ

घेण्यासाठीं टेबलावर उभे राहिले असतां एकाएकीं पित्तप्रकोप होऊन जी चक्कर आली त्यासरशीं ते घाडकन् जमिनीवर बेशुद्ध पडले. कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर त्यांस घरीं आणिलें. नंतर थोडासा ज्वर भरला. पण तो अशा थराला जाईल असें कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नाहीं. त्या ज्वरामुळें त्यांस क्षीणता आली होती हें खरें, पण तो अशा तीव्र वेगानें उलटून, बोलतां बोलतां पुण्यांतील मोहरा रातोरात घेऊन जाईल असें कोणासही वाटलें नाहीं. परंतु दैवाची परम विचित्र गती ! ! शास्त्रीबोवांस कलिंगडें खाऊन थंड पाणी पिण्याची बुद्धी झाली; त्यासरशी कुपथ्य झाल्याचें निमित्त होऊन तात्काळ सन्निपात झाला तो त्यांना घेऊनच गेला. शास्त्रीबोवांच्या अकालिक मृत्यूनें " केसरीचा " एक पाय लंगडा झाला यांत कांहींच नाहीं; आज महाराष्ट्रवाणीचा पती परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली व महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमाविलें अशी आमची समजूत आहे. " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् " ॥ अशी कविकुलगुरूक्ती आहे ती आम्हास अक्षरशः मान्य आहे. परंतु हा अबाधित सृष्टीनियम शास्त्रीबोवा वयातीत झाल्यानंतर त्यांना लागू पडता म्हणजे आम्हांस इतका खेद करण्यास जागा उरती ना. परंतु ज्याप्रमाणें एकादा प्रचंड वृक्ष फळास येतो आहे नाहीं तों विद्युत्पात होऊन तो जमीनदोस्त व्हावा, त्याप्रमाणें आतां आतां कोठें शास्त्रीबोवांच्या बुद्धीचीं परिपक्वफलें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं तों त्यांस करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग ! ! गेल्या वर्षींच आम्ही एकत्र होऊन एकदिलानें प्रस्तुत उद्योग आरंभिला तेव्हांची वीरश्री कोणीकडे, आणि केसरीराजाच्या नैसर्गिक उद्धत वृत्तीला अननुरूप अशी सांप्रतची खिन्नावस्था कोणीकडे ? असो, धैर्य धरून आला दिवस कसातरी घालविलाच पाहिजे. गतवर्षी बाळाजी बापूजी साने व चिंतामण सखाराम चिटणीस यांची मृत्यूवार्ता कळविण्याचें दुःखाचें काम केलें; आज आम्हांपैकींच एकाच्या संबंधानें मृत्यूलेख लिहिण्याचें आमच्या कपाळीं आलें आहे, त्या कामासाठीं शोक क्षणभर एकीकडे ठेवून धैर्याचें अवलंबन करतों.

विष्णुशास्त्री हे प्रसिद्ध कृष्णशास्त्री यांचे चिरंजीव. यांचा जन्म १८५० त झाला. यांना लहानपणापासून वाचण्याचा जबरदस्त नाद असे.

ज्याप्रमाणें डॉ. जॉनसन् बापाच्या दुकानावर बसून फावल्यावेळीं अनेक विषयावरील व्हालमेच्या व्हालमें फडशा करी, त्याप्रमाणें 'दक्षिणा प्रैज कामिटी' किंवा 'नेटिव प्रेसचे रिपोर्टर' या नात्यानें कृष्णशास्त्र्यांकडे जीं पुस्तकें येत तीं हे भावी शास्त्री वाचून टाकीत. या रीतीनें मॅट्रिक्युलेशन होण्यापूर्वीच विष्णुपन्तांच्या नजरेखालून अनेक ग्रंथ जाऊन मराठी भाषेवर त्यांचें प्रेम जडलें व तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. १८६५ त पाहिली परीक्षा होऊन ते कॉलेजांत गेले. त्यांना गणिताचा मोठा कंटाळा असे. मेकाले-प्रमाणें आपला सारा वेळ ऐतिहासिक ग्रंथ वाचण्यांत घालवीत. १८७२ त ते बी. ए. ची परिक्षा पास झाले. १८७३ त कांहीं महिने बाबा गोखले यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम केल्यानंतर येथील सरकारी हायस्कुलांत नव्वदाची जागा मिळाली व पुढें नव्वदाचे शंभर झाले. निबंधमालेचा पाहिला अंक १८७४ त बाहेर आला. निबंधमाला जो जो मोठी होऊं लागली तो तो शास्त्रीबोवांचीं मतें बाहेर पडून स्वातंत्र्यशत्रु आणि स्तुतिप्रिय अशा अधिकाऱ्यांशीं त्यांचें तेढे पडूं लागले. आपल्या कर्तव्यांत निरंतर तत्पर असल्यामुळें शास्त्रीबोवा कधीं कोणाची पर्वा ठेवीत नसत. याचा परिणाम असा झाला कीं, जात्या परप्रतिष्ठा–असहिष्णु असे आमचे डायरेक्टर चाटफील्डसाहेब यांच्या तापट प्रकृतीवर कित्येक निंदकांनीं तैलवृष्टि केल्यामुळें तिनें जो पेट घेतला त्यासरशीं त्यांनीं शास्त्रीबोवांची 'परशुरामक्षेत्रीं' गठडी वळली. कोंकणवास विष्णुशास्त्रांना पराकाष्ठेचा दुःसह होऊन राजसेवा शृंखलांतून आपला पाय काढून घेण्याविषयीं त्यांचा निश्चय झाला. १८७८ त कृष्णशास्त्री वारले. १८७९ च्या एप्रिलांत विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेतानें आपलें चंबुगवाळें आटोपून पुण्यास आले. चार पांच महिने काय करावें, कोणता धंदा काढावा अशा विचारांत गेले. या सुमारास डेक्कन कॉलेजांतील दोन तीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करतां स्वतंत्रपणें लोकोपयोगी एखादें काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गांवांत शास्त्रीबोवा येऊन बसले आहेत असें कळल्याबरोबर सदरहू मंडळी त्यांस जाऊन भेटली व उभयतांचे विचारें एक शाळा काढण्याचा विचार झाला. त्याप्रमाणें १८८० च्या जानेवारी महिन्यांत न्यू इंग्लिश स्कूल या नांवानें मोरोबा दादा

फडणीस यांच्या वाड्यांत शाळा घातली. ती आतां कोणत्या स्थितींत आहे हें सांगायला पाहिजे असें नाहीं. शाळेस पुरें वर्ष झालें न झालें तों तिला आणखी एक दोन गृहस्थ येऊन मिळाले. पांच सहा मंडळी एका हेतूनें व एका मतानें वागत असल्यामुळें शाळेचें काम आटोपून आणखीहि कांहीं करतां येईल असें वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठी अशीं दोन वर्तमानपत्रें काढण्याचा विचार झाला आणि त्याप्रमाणें ८१ च्या जानेवारींत मराठा व केसरी हे बाहेर आले. या दोघांनीं मिळून एका वर्षांत महाराष्ट्र देशांत केवढी चळवळ करून सोडली आहे याचा वाचकांनींच विचार करावा. याखेरीज शास्त्रीबोवांचे खाजगी धंदे जोरानें चालले होते. निबंधमाला, किताबखाना, चित्रशाळा वगैरे गोष्टी नेटानें चालल्याच होत्या. येणेंप्रमाणें शास्त्रीबोवा ज्या उद्योगांत व्यग्र असत त्यांची थोडीशी हकीगत झाली. शास्त्रीबोवांचे बहुतेक विचार त्यांच्या मालेंतून आणि केसरींतून प्रसिद्ध आहेत, तेव्हां त्यासंबंधानें विशेष लिहावयाचें आहे असें नाहीं. पण ज्या गोष्टी अतिशय भिडस्त स्वभावामुळें शास्त्रीबोवा जिवलग मित्रांबाहेर कधींही काढीत नसत त्यासंबंधानें येथें दोन शब्द लिहिण्याचा हेतू आहे.

आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रीबोवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत. लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. लोकांत विद्याप्रसार होऊन त्यांना राजकारणांतील तत्त्वें कळावी व तदनुसार त्यांनीं वर्तन ठेवून ह्या हतभाग्य भरतखंडास त्यांनीं एकदां तरी सुदिन आणावा ही त्यांची बळकट इच्छा असे. परकीय लोक राज्य करीत असल्यामुळें आमचे लोक सत्वहीन होत जाऊन अप्पलपोटे, भेकड, हांजीहांजीखोर, मट्ठ, निर्लज्ज, अभिमानशून्य असे झालेले पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. परकीय या नात्यानें इंग्रजांचा त्यांना अत्यंत कंटाळा असे, पण त्यांची करामत, दृढता, कौशल्य आणि उद्योग ही पाहून त्यांस त्यांचें पराकाष्ठेचें आश्चर्य वाटत असे. हिंदू लोकांचा, हिंदू-

धर्माचा, हिंदू रिवाजांचा, सारांश, ज्याला ज्याला म्हणून हिंदू हें विशेषण लाविता येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे. सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें जें प्रेम असें तें कांहीं पुसूंच नये. एकसारखीं सात वर्षें तिची उपासना करून त्यांनीं तिला अगदीं भारून टाकल्यासारखें केलें होतें. ज्याप्रमाणें प्रख्यात् फ्रेंच ग्रंथकर्ता व्होल्टेर यानें एकदा कोरडा उचलाला म्हणजे स्टॉकहोम व रोम आणि पीतर्सबर्ग व लिस्बन यांच्या दरम्यान चटसारी मंडळी चळचळ कांपत असे, त्याप्रमाणें शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली कीं, रावसाहेब, रावबहाद्दुरे, रेवरंडे, सरस्वती यांची पांचावर धारण बसे. आपल्यामार्गें आपलें नांव चालविण्यास त्यांनीं एक सप्तसंवत्सरा निबंधमाला कन्येखेरीज दुसरें कांहीं ठेवलें नाहीं. त्यांच्या त्या गद्यकृतीला "स्फुरत्कलालाप विलास कोमला" हें बाण कवीचें वर्णन हुबेहुब लागतें. कोणी एकदां शास्त्रीबोवांना असा प्रश्न केला होता कीं, असें कडक लेख लिहिण्यास तुम्ही कसें धजतां? त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं, अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्ही देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली. एखाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे. पुनर्विवाह, बालविवाह, स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, धर्म-संस्थापना, जातिभेद या संबंधानें त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत परंतु ते वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते. फार कशाला, गेल्या केसरींतील "देशोन्नती" या सदराखालचा निबंध जो कोणी लक्ष लावून वाचील त्याला शास्त्रीबोवांचे जातीभेदासंबंधानें काय विचार होते हे सहज लक्षांत येईल. इतकें खरें आहे कीं ते या विषयाच्या संबंधानें फारसें कधीं लिहीत नसत, पण लिहूं लागल्यास वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींही भीत नसत. सारांश, हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं सुखी होण्याचें कोणतेंही साधन असल्यास त्याला ते अडथळा घेणारे नव्हते. अस्तु. बरें प्रकरण चालूं असतां त्यांचा एकाएकी अंत झाला हें पाहून कोणी अधमांनीं अशी कंडी उठविली कीं, कारभाऱ्याला भिऊन जाऊन त्यांनीं आत्महत्या केली;

असले नीच नरपुंगव कोण असतील ते असोत. शास्त्रीबोवांना तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याविषयीं अशी धमक होती कीं, प्रसंग पडल्यास तुरुंगांतल्या तुरुंगांत " असल्या शें-पन्नास राजशत्रूंना सर्व महाराष्ट्राकडून मी ' छीः, थू ' करून सोडीन. "

येथवर शास्त्रीबोवांची ठळक ठळक राजकीय, सामाजिक मतें सांगण्यांत आलीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या संबंधानें त्यांची अशी खात्री झाली होती कीं, येथें व्यापारबुद्धी झाल्याविना आमच्या देशाचें डोकें वर निघणार नाहीं. याच उद्देशानें त्यांनीं सरकारी दास्याची रुपेरी बेडी तोडून घेऊन पुणें येथें स्वतंत्रपणानें वास्तव्य करण्याचा विचार केला व एकीकडे अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथरचना यांत आपला कालक्रम करण्याचा निश्चय करून दुसरीकडे आपल्या नजरेखालीं छापखाना, चित्रशाळा, किताबखाना वगैरे कारखाने काढले. लौकरच कांहीं खटपट करून कागदाचें एक यंत्रही आणाविण्याचा त्यांचा विचार होता. हे धंदे त्यांनीं द्रव्यसंपादनेच्छेनें काढिले असें नाहीं; कारण द्रव्यसंबंधानें शास्त्रीबोवा जितके निरपेक्ष होते तितका दुसरा पुरुष सांपडणें कठीण. त्यांचा हेतु असा असे कीं, देशांत कारखाने निघून लोकांस काम मिळावें व त्यांस भाकरीची वाण पडूं नये. शास्त्रीबोवांनीं वर जे कारखाने काढिले त्यांत तरी त्यांचा एवढाच हेतु होता. त्यापासून स्वतःचा फायदा करून घेण्याची इच्छा त्यांनीं कधीं धरली नाहीं. त्यांचें असें म्हणणें असें कीं, बुद्धिवान आणि चतुर लोकांनीं मोठमोठे धंदे अंगावर चालू करावे आणि मग ते साधारण लोकांच्या हातांत देऊन आपण त्यापासून अलग राहावें. आम्हास तर असें वाटतें कीं शास्त्रीबोवांसारखा हिंमतवान, प्रशांत, गंभीर, आणि निरपेक्ष मनुष्य अत्यंत विरळा असेल. कोणी हितचिंतक मित्र विनोदानें आमच्या गट्टीस ग्राज्वेट पंचायतन, ग्राज्वेट पांडव असें म्हणत. निष्ठुर मृत्यूनें आम्हांपैकीं आमचा भ्राता धर्मराज आज यमसदनास पाठविला, व आमच्या बंधाचा ग्रंथीमणी हिरावला ही गोष्ट खरी, तथापि आमची अशी उमेद आहे कीं, आम्ही एकवार मनाचा निश्चय करून देशोन्नतीसाठीं झटण्याचा केलेला संकल्प होतां होईल तों ढळूं देणार नाहीं. प्रथम लोकांना

आम्हांविषयीं अशी भीति होती कीं, द्रव्यसंबंधानें आमच्यांत आपापसांत कलागती लागून आमची जूट फुटेल. पुढें बवें प्रकरण येऊन घडकलें तेव्हां तर कित्येकांना असें वाटलें कीं, या ग्रॅज्यूएटांची फटफजीती होते ! आणि आतां तर आम्हांपैकीं एकानें परलोकास प्रयाण केलें; तेव्हां आम्हां-विषयीं लोकांचें मनांत ना ना तऱ्हेचे तरंग येऊं लागले आहेत यांत नवल नाहीं. पण सर्वांनीं एक गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रडतरावाची मनोवृत्ति धारण करून आरंभिला नाहीं. हें काम आम्ही आपल्या आप-खुषीनें आणि आपसमजुतीनें आमचे आम्ही आपलें अंगावर घेतलें, तें तडीला लावणेसाठीं आमच्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं. देवाच्या किंवा दैवाच्या इच्छेपुढें इलाज नाहीं. अशा रीतिनें मनाची खोटी समजूत घालून अशा लोकाहिताच्या कामांत प्रतिपक्षाची क्षमा मागण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं. अधिकार, धन, वजन यापुढें टिकाव धरणें दुस्तर आंहे हें आम्ही कबूल करतों. परंतु सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणारांना कोणत्याही प्रकारची धास्ती बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि असें असूनही प्रसंग येऊन बेतलाच तर तो साहण्यास आम्ही कचरूं अशी कोणीही शंका घेऊं नये. आमचें धैर्य आणि कार्यनिष्ठा ही कसास लागण्याची संधी आली आहे असें आम्ही समजतों. शास्त्रीबोवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्ही सर्वांनीं आरंभिलेले उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील. " निबंधमाला " मात्र पुढें चालविण्याचा आमचा विचार नाहीं, कारण शास्त्रीबोवांनींच ८४ व्या अंकांत तिची समाप्ती करून तिच्याजागीं " ग्रंथमाला " प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. तो अंक कारणांसह लोकांपुढें लौकरच येईल. देशोन्नती, देशकल्याण वगैरे गोष्टी थोडीबहूत अंगास झीज लावून घेतल्या खेरीज फुकाच्या पोकळ गप्पा मारून होत नाहींत हें आम्ही पक्कें समजत आहों. ती लावून घेण्यास आम्ही तयार आहों. प्रयत्न करणें आमचें काम आहे, यश येणें न येणें बाह्योपाधींवर अवलंबून आहे. त्याचा आम्ही विचार करीत नाहीं. येवढें

सांगून व त्या महात्म्याला परलोकीं सर्वोत्कृष्ट शांती आणि कल्याण चिंतून हा लेख आटोपतों.



६ : : केरो लक्ष्मण छत्रे

रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले,ही दुःखप्रद वार्ता लोकांत प्रथम प्रसिद्ध करण्याचें दुर्घट काम आम्हांवर येऊन पडलें नाहीं हें कांहीं अंशीं आमचें भाग्यच होय असें आम्हीं समजतों.कारण ज्या आमचा या महात्म्याशीं शिष्यत्वाचा एक वर्षाचा निकट संबंध होता व त्यामुळें ज्या आम्हांस या अलौकिक पुरुषाची खरी योग्यता ठाऊक झाली होती त्या आम्हांस दुःखभरांत आमच्या अत्यंत प्रिय व पूज्य गुरूंविषयीं मृत्यूलेख लिहवताना. केरोपंतानीं देह टाकल्यास आज सात दिवस झाले तरी त्यांच्या संबंधानें आम्हांस पाहिल्या दिवसांप्रमाणें वाईट वाटत आहे; व त्यामुळें या थोर पुरुषाविषयीं आमच्या मनांत जें लिहावयाचें आहें, किंवा जें लिहावयाला पाहिजे आहे तें कागदांवर नीटनेटकें पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि पत्र-कर्त्याच्या नात्यानें सर्व दुःख क्षणभर गिळून टाकून या प्रसंगीं दोन शब्द लिहिणें हें कर्तव्यकर्म होय, असें समजून या आमच्या परलोकवासी प्रिय गुरूविषयीं चार ओळी लिहितों.

अलिबाग तालुक्यांत नागांव येथें सन १८२४ त केरोपंतांचा जन्म झाला. त्यांचे वडिल ते लहान असतांनाच वारल्यामुळें त्यांचें संगोपन करून त्यांना शाळेंत घालण्याचें काम त्यांच्या चुलत्याच्या अंगावर पडलें. गणित विद्येंत केरोपंताचा जो एवढा लौकिक झाला त्याचीं पूर्वाचिन्हें ते एल्फिस्टन कॉलेजांत विद्यार्थी असतांनाच स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. पूर्वी या देशांत इंग्लंडाहून जे प्रोफेसर येत ते आतांच्या प्रोफेसरांहून अगदीं निराळ्या तऱ्हेचे असतं. त्यांच्या तोडीचा नाहीं म्हणण्यास या इलाख्यांत काय तो एकच

प्रोफेसर आहे. प्रिन्सिपाल वर्ड्सवर्थ यांच्याप्रमाणें विद्याव्यासंगांत सतत गढून असणारे व आपल्याप्रमाणें आपल्या शिष्यांचीं मनें विद्योपार्जनाकडे लावण्यासाठीं अंतःकरणपूर्वक रात्रंदिवस झटणारे त्या काळचे प्रोफेसर असत. अशा प्रकारच्या आरलेबार नांवाच्या एका प्रोफेसरापाशीं केरोपंतांनीं गणितशास्त्राच्या मूलतत्त्वांचा अभ्यास केला. त्यांची बुद्धि जात्या पराकाष्ठेची तीव्र असल्यामुळें व तिचा विकास होण्यास आरलेबारसारख्या गुरूचें साहाय्य मिळाल्यामुळें थोड्या दिवसांत शुद्ध व मिश्र गणितांत केरोपंतांस चांगली प्रवीणता आली. व ज्योतिषादि पदार्थविज्ञानाच्या अवघड शाखांत पुढें त्यांनीं जी असाधारण कीर्ति संपादिली, तिचा आरलेबारच्या हाताखालीं बळकट पाया घातला गेला. या खंबीर पायावर टोलेजंग इमारत चढवितां येण्याजोगी केरोपंतांची नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्यामुळें व तिला अनुकूल अशा बाह्य गोष्टींचें साह्य होत गेल्यामुळें हा अमोलिक हिरा अज्ञातस्थानीं पडून वाया गेला नाहीं, हें आम्हां महाराष्ट्रीयांचें महत्भाग्य होय. कारण जगाची प्रस्तुत स्थिति इतकी शोचनीय आहे कीं, ऐहिक सुखांत परमश्रेष्ठ अशा स्वातंत्र्यसुखाचा ज्या देशास प्रत्यहीं अनुभव घडत आहे, ज्या ठिकाणीं विद्योपार्जन, यंत्रकला व व्यापार यांस उत्तम प्रकारचा राजाश्रय व लोकाश्रय मिळत आहे व ज्या ठिकाणीं मानवी सुखवृद्धीचें आदिकारण जो शास्त्रप्रसार त्यांस हरएक प्रकारचें उत्तेजन मिळत आहे, अशा देशांतहि पिढ्यांच्यापिढ्या लोटल्या तरी केरोपंतांसारखा मोहरा पैदा होत नाहीं ! असें असतां या हतभाग्य देशांत हा दैदीप्यमान् विद्वन्मणि उदयास आला हें आमचें केवढें नशीब ! तेजोनिधिं भगवान् सूर्यनारायण आपल्या तेजानें मंडलांतील दूरदूरच्या तेजोहीन ग्रहांस प्रकाशित करतो, त्याप्रमाणें केरोपंतासारख्या अद्वितीय मुकुटमणीच्या तेजानें अनेक लोकांच्या अज्ञानतिमिराचें निर्मूलन होऊन ते स्वतः प्रकाशित होतात इतकेंच नाहीं तर, परप्रकाश प्रकाशित शुक्रचंद्राप्रमाणें आपणांहून भिन्न अशा लोकांच्या अज्ञानतिमिराचा विध्वंस करूं लागतात. मानवी सुधारणा केवळ अशा प्रकारच्या तेजःपरंपरेवर सर्वथा अवलंबून आहे, आणि म्हणूनच केरोपंतांसारखा जगाचा मार्गदर्शक दीप मालवला म्हणजे लोकास आपला अगदीं जवळचा संबंधी गेल्यासारखे होऊन अनावर दुःख होतें.

केरोपंतानीं कुलाबा येथील वेधशाळेंत नोकरी धरल्यापासून त्यांची उत्तरोत्तर बढती कशी होत गेली व त्यांनीं कोणकोणत्या जागीं काम केल्यावर त्यांना डेक्कन कॉलेजांत प्रोफेसर नेमिलें हें येथें सांगत बसण्याची गरज राहिली नाहीं. कारण गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या 'ज्ञान-प्रकाशा'दि येथील वर्तमानपत्रांच्या लेखांत या संबंधाची कच्ची हकीगत पूर्णत्वानें दिली आहे, व या ठिकाणीं ती फिरून देणें निरुपयोगी व कंटाळवाणें होणार आहे. आमच्या मतें केरोपंतांच्या ठायीं सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखे व अनुकरण करण्यासारखे दोन गुण होते. ते कोणते म्हणाल तर अनुपमेय विद्याव्यासंग व स्वभावसौजन्य हे होत. कदाचित् दुसरा गुण पहिल्याचा परिणामही असेल. तें कसेही असो; आम्हास केरोपंताविषयीं जी पूज्य बुद्धी उत्पन्न झाली, तिचें कारण त्यांच्या अंगचे हे दोन गुण होते व आम्हांस खात्रीनें असें वाटतें कीं त्यांच्या पाठीमागें त्यांचें नांव अनेक वर्षें राहण्यास हेच गुण कारण होतील. मानासिक श्रमापेक्षां शारीरश्रम लक्षपटीनें सोपे असल्यामुळें, व विद्यानंदापेक्षां विषयोपभोगाकडे शेंकडा नव्याण्णव लोकांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें केवळ निरपेक्ष बुद्धीनें सारा जन्म विद्याव्यासंगांत घालविणारा व विद्यानंदांत पूर्ण साधन मानून विषयसुखांत लुब्ध न होणारा ऋषी कोटी दोन कोटी मनुष्यांत एकदांच निपजतो. केरोपंताप्रमाणें ज्यांना विद्येचें वेड लागलेलें असतें त्यांचा इंद्रिय-सुखाचा मोह तुटलेला असतो, इतकेंच नाहीं, तर त्यांना लौकिकाचीही पर्वा नसते. ते जे परिश्रम करीत असतात त्याबद्दल लोकांनीं आपणांस मान द्यावा, किंवा त्यापासून आपणांस द्रव्यप्राप्ती व्हावी ही गोष्ट त्यांच्या मनांत कधींच वागत नाहीं. प्लेटो, अरिस्टॉटल, आर्किमिडीज, केपलर, गॅलिलिओ, कोपर्निकस, न्यूटन, टिंडाल, जूल, पाणिनी कणाद, भास्कराचार्य यांसारख्या जगद्धितकर्त्या विद्याव्यसनी पुरुषांस आपापल्या विषयांत गर्क होऊन राहणें, व आपल्या शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुखवृद्धीचा अभिलाष धरणें, याहून कांहींही इष्ट नसतें. असे पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात त्यांत गुंग होऊन गेले म्हणजे त्यांस कशाचेंही भान राहत नाहीं. या गोष्टीची प्रचीति केरोपंतांच्या आचरणांत आम्हांस अनेक वेळां आली होती. एकदां एक कठीण उदाहरण त्यांच्या

मनांत पांच दिवस घोळत होतें. त्या पांच दिवसांत त्यांना अन्नाची चव समजली नाहीं किंवा स्वस्थपणें त्यांचा डोळा लागला नाहीं. रात्रंदिवस डोळ्यांपुढें ब्राकेट्स् ! साहवे दिवशीं सकाळीं एकाएकीं उदाहरण सुटल्या-बरोबर त्यांना जो अवर्णनीय आनंद झाला त्याची हकीगत सांगतांना सुद्धां त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येत व त्यांचा कंठ गहिंवरानें दाटून जाई. सूर्यावरील ठिपके आणि पाऊस यांच्यांत कांहीं कार्यकारणाचा संबंध असेल असें वाटल्यावरून तो सिद्ध करण्यासाठीं मी ३।४ वर्षें एकसारखा खटपट करून होतों, व तींत जरी मला हवें तसें यश आलें नाहीं तरी ती चालली असतां मला जें गणित करावें लागलें तें दुसऱ्या विषयांच्या संबंधानें फार उपयोगी पडलें असें ते आम्हांस वारंवार सांगत. नानांचीं अखेरचीं वर्षें एक मोठा विलक्षण शोध करण्याकडे लागली होतीं. त्यांच्या मनांत असें सिद्ध करावयाचें होतें कीं आमच्या या भूगोलावर जी जमीन आहे ती दुसरा एकादा ग्रह या भूगोलाच्या आकर्षणांत सांपडून याच्यावर ती तो जोरानें आपटल्यामुळें झालेल्या त्याच्या छकलापासून झाली असावी. नाना आणखी कांहीं दिवस वांचते, व त्यांच्यानें ही कल्पना पूर्णपणें सिद्ध होती तर त्यांची कीर्ति सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत अजरामर होती यांत बिलकूल संशय नाहीं. पण आमच्या कमनशिबामुळें तो मान या देशास मिळण्याची आशा आतां राहिली नाहीं कारण ज्या क्षणीं सर्वज्ञ निर्घृण कालानें पाश लावून त्यांचें प्राणहरण केलें त्याच क्षणीं असें गूढ प्रमेय सिद्ध करण्यास लागणारी सामुग्रीही आमच्यांतून समग्र काढून नेली असें आम्हास वाटतें. त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची शोधकता, त्यांचा अनुभव, हातीं धरलेल्या विषयाचा पिच्छा पुरविण्याविषयीं त्यांची दक्षता, त्यांची विद्वत्ता व त्यांची वेधशाळा या सर्वांचा त्यांच्याबरोबरच अंत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ! शिव ! शिव ! खऱ्या विद्वानांची या देशांत केवढी दुर्मिळता ही ! केरोपंतांनीं आरंभिलेले शोध पुढें चालविण्यासारखा चालू पिढींत एक मनुष्यसुद्धा आमच्या डोळ्यांपुढें दिसत नाहीं. जिकडे पहावे तिकडे पोकळ विद्येला, मिथ्या देशाभिमानाला व लज्जास्पद अधिकारवर्गाला पूर आल्यासारखा दिसतो. अधिकारमदानें बेफाम होऊन नाना प्रकारें लोकांस पीडा देणारे, किंवा स्वोन्नतीसाठीं

ठाणे सार्वजनिक वाचनालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक २०२५१ दि. १९/६/५५
केरो लक्ष्मण छत्रे ..... वि.
क्रमांक २०२२ ..... नोंद दि. २०/६/५५

मनाप्रमाणें श्रेष्ठ युरोपियन आधिकाऱ्यांचे हातपाय चाटणारे आमच्यांतील मोटमोठ्या हुद्यावरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हपापलेले विद्वान्, पोटाला मिळविण्यांत, व दोन पैसे मिळाल्यास कॉलेजचे विद्येसाठीं कर्जपाणी फेडून बाकीची माया बँकेत टाकण्यांत किंवा बायको बाहेर पडली म्हणजे ती अक्कडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग ! राहतां राहिलीं कांहीं म्हातारीं खोडें; त्यांना तुमच्या विद्यावृद्धीची आणि देशोन्नतीची कल्पनासुद्धां नाहीं ! ही आमच्या लोकांची प्रस्तुतची स्थिती ! केरोपंतासारखा दुसरा विद्याव्यसनी पुरुष होण्यास निदान शेंपन्नास वर्षें तरी लोटलीं पाहिजेत यांत बिलकुल संशय नाहीं.

केरोपंत सर्वकाळ विद्याव्यसनांत गढून गेले असल्यामुळें, व त्यांचें बहुतेक आयुष्य आकाशस्थ ताऱ्यांच्या समागमांत गेल्यामुळें ऐहिक सुखांचा जणूं काय त्यांना पूर्ण विसरच पडला आहे कीं काय असें दिसें. खरेंच आहे; योग्याच्या समाधी-सुखाप्रमाणें अत्यंत मधुर विद्यासुखाचा ज्याला नित्यशः अनुभव त्याला विषयसुखाचा नाद कोठून असणार ? व विषयसुखावरून ज्याचें मन उडालें आहे त्याची वृत्ती क्रोध, मद, मत्सर, अहंकार इत्यादि दूषित मनोविकारांनीं कलुषित कोठून होणार ? वयाच्या मानानें केरोपंत जुन्या पिढींत गणले जात पण जुन्या पिढींतील लोकांचीं धर्मसंबंधीं किंवा समाजसंबंधीं दुराग्रहाचीं मतें त्यांना कधींही शिवलीं नाहींत. पदार्थविज्ञानशास्त्रांत जो पट्टीचा विद्वान झाला, व जड सृष्टिच्या गूढ तत्त्वांपासून मानासिद्ध सृष्टीच्या अत्यंत गहन तत्त्वांपर्यंत खेळणाऱ्या कार्य-कारणाचें व सामर्थ्यांचें ज्याला आकलन झालें आहे त्याची धर्मविषयक व समाजविषयक मतें विशिष्ट देशाचाराच्या किंवा रीतरिवाजांच्या पाशांत जखडून राहात नाहींत, हें सार्वत्रिक अनुभवावरून आतां पूर्णपणें सिद्ध झालें आहे. केरोपंतांच्या विचारांत, स्वभावांत, आणि वाग-णुकींत असें एक चमत्कारिक स्वरूप दृष्टीस पडें कीं त्यामुळें ते जुन्यास व नव्यास, लहानांस व थोरांस, श्रीमंतास व गरीबांस, समाजधर्मानुयायांस व वैदिक धर्मानुयायांस एकसारखे प्रिय होत. त्यांचा पोशाख, त्यांचें राहणें, त्यांचें बोलणें, सारांश त्यांचें हरएक करणें अगदीं साधेपणाचें असें.

ज्यांच्या अंगीं खरी विद्वत्ता नाहीं किंवा मोठेपणा नाहीं त्यांना असें वाटत असतें कीं आपल्याहून खालच्या प्रतीच्या लोकांत आपण मिसळलों तर त्यांच्या संसर्गानें आपली योग्यता कमी होईल, व या भीतीनें तें त्यांच्यापासून नेहमीं दूर राहातात, व 'आपण मोठें आहों', असें आपल्याशीं मानून आपलें समाधान करून घेत असतात. केरोपंतांचें वर्तन अगदीं निराळ्या तऱ्हेचें असें. आपलें जें ज्ञान आहें तें ज्ञानोदधींतील एका अंबुकणाइतकेंसुद्धां नाहीं अशी त्यांची समजूत असल्यामुळें साक्रेतिसा-प्रमाणें त्यांच्या वृत्तींत पराकाष्ठेची लीनता असे. चार वर्षांच्या मुलापासून एम्. ए., च्या विद्यार्थ्यांपर्यंत कोणी कसलीही शंका काढली तरी ते तिचे समाधान करण्यास नेहमीं तत्पर असत. विद्यार्थ्यांस धमक्कावणी दाखवून अथवा अळंटळं करून वेळ मारून नेणें हें काम ज्ञानाची वृथा घमंडी बाळगणाऱ्या गांवठी पंतोजीबोवांचें व युनिव्हर्सिटीचा छाप मिळाल्या-बरोबर पुस्तकास सोडचिठी देऊन एस्पिट व सौंगट्या यांस उदार आश्रय देणाऱ्या ग्रांज्युएटांचें! केरोपंतांच्या शिकविण्यांत लटपट म्हणून कधीं असायची नाहीं. अगोदर गणित किंवा पदार्थ—विज्ञान यांत अर्थशास्त्रां-प्रमाणें किंवा नीतिशास्त्राप्रमाणें कांकणभरसुद्धां लटपट खपण्याची सवड नसते. तशांत नानांसारखा अनुभविक, कुशाग्रबुद्धि व बहुश्रुत शिक्षक भेटल्यावर शिकणाऱ्यांच्या पोटांत गुदगुल्या होत यांत नवल नाहीं. सर्व विद्यार्थ्यांवर पोटच्या मुलाप्रमाणें त्यांची ममता असे व ते वर्गांत बसले म्हणजे त्यांना आपण आपल्या मुलांबाळांत बसलों आहों असें वाटे. सत्य भाषण व सत्य आचरण हें त्यांना फार प्रिय असें. गरिबगुरिबांस मदत करण्याविषयीं त्यांना मागें सारणारा अलिकडील विद्वानांत तर आम्हांस कोणी दिसत नाहीं. अनाथ विद्यार्थी त्यांच्या घरून पराङ्मुख कधींच गेला नाहीं. क्षमा त्यांच्या अंगीं अलिकडील मंडळींत सहसा न सांपडणारा गुण पूर्णपणें वास करीत होता. स्वार्थासाठीं लोकांपुढें तोंड वेंगाडण्याचा त्यांना मोठा तिरस्कार असे. कांहीं विशेष कारणाशिवाय त्यांच्या मनाची आनंद-वृत्ती कधींही ढळत नसे. वाचकहो, या महात्म्याचें खरें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करणें दुरापास्त आहे. नाना पेन्शन घेऊन कॉलेजांतून बाहेर पडले, त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहींवर

न सावरल्यामुळें ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें, त्या आम्हांस व त्या दिवशीं कॉलेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस, गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव झाला. व भांडारकर, आक्सनाम, चाटंफील्ड, पील वगैरे प्रेक्षक प्रोफेसर मंडळीस त्याचें स्पष्ट स्वरूप दिसून आलें.

असले अद्वितीय मनुष्यरत्न गेल्या बुधवारीं पुण्यांतून नाहींसें झालें. त्यामुळें सारें पुणें शोकानें हळहळलें यांत नवल तें कोणतें ? हें दुःखकारक वर्तमान जों जों अधिकाधिक पसरत जाईल तों तों महाराष्ट्रदेशाच्या प्रत्येक भागांतून दुःखोद्गार बाहेर पडतील. पुण्याच्या लोकांनीं दुकानें बंद केलीं, शाळांना सुट्या दिल्या, न्यायाच्या कचेऱ्या बंद केल्या, व या अप्रतीम पुरुषाच्या सदा हसतमुखाचें शेवटचें अवलोकन करण्यासाठीं नागरिकांचे थवेच्या थवे स्मशानापर्यंत गेले यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं झालें नाहीं. अध्ययन व अध्यापन हा ज्यांचा व्यासंग, परोपकार हा ज्यांचा व्यवसाय, व मानवजातीचें सुखवर्धन यांतच ज्यांचें समाधान व जीवित–साफल्य अशा थोर पुरुषांविषयीं लोकांना कृतज्ञता उत्पन्न होणें हें अगदीं साहजिक आहे. केरोपंतासारखी कष्टरहित जीवितयात्रा फार थोड्यांना घडते. संतति, संपत्ति, सद्विद्या, सद्गुण व सत्कीर्ती यांच्या प्राप्तीपासून होणारें समाधान सतत उपभोगून शरीरधर्माप्रमाणें साठीच्या सुमारास शक्ति क्षीण होऊं लागल्याबरोबर देहावसान होऊन या कष्टमय जगांतून बाहेर पडणें थोड्यांच्याच कपाळीं असतें. नाना आणखी कांहीं दिवस जगते तर त्यांना शरीरयातना मात्र सोसाव्या लागत्या. कारण अलीकडे त्यांचीं सर्व बाह्येंद्रियें क्षीण होऊन गेलीं होतीं. डोळ्यानें दिसेनासें व कानानें ऐकवेनासें झालें होतें. दांत पडल्यास फार वर्षें झाल्यामुळें वर्णोच्चार स्पष्ट होत नसे, इतकेंच नाहीं तर खाल्लेलें अन्नही नीट पचेनासें झाल्यामुळें फार त्रास होई. पायांस मोठमोठ्या भेगा पडल्या असल्यामुळें ते जमिनीवर टेकण्याची मुष्कील पडे. अशा स्थितींत जिवंत राहण्यापेक्षां मरणें हेंच बरें. ते गेले यांतच त्यांचें सोन्यापेक्षां पिवळें झालें. ते विचारी असल्यामुळें त्यांना मरणाची भीति बिलकूल वाटत नसे. ते मरण्यास पूर्णपणें सिद्ध झाले असल्यामुळें मरतांना त्यांच्या अंतःकरणाची अणूमात्र देखील चलबिचल झाली नाहीं. ज्या जगांत अनेक वर्षें घालविलीं,

व शेंकडों मायापाश जोडले, त्याचा शेवटचा निरोप घेतांना इतकी शांत व समाधानवृत्ति फार थोड्यांच्या ठायीं दिसून येते. नानांचें शरीर पंचत्वाप्रत पावल्यानें ते तर सुखीच झाले, पण त्यांच्या देहावसानाबरोबर आम्हां महाराष्ट्रीयांत जें चांगलें म्हणून आहे त्या सर्वांचा लोप झाला व पुण्याचें वैभव आणि महाराष्ट्रदेशाचा अभिमान धुळीस मिळाला असें आम्हांस वाटतें. असो; परमेश्वरापाशीं आमची येवढीच प्रार्थना आहे कीं, केरोपंतांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून त्यांच्याप्रमाणें वर्तन करणारे अनेक लोक या भरतभूमींत निपजोत; परोपकार, सद्गुण आणि विद्या-व्यासंग यांत केरोपंतांसही मागें हटवून या महाराष्ट्रभूमीस जगांतील सुधारलेल्या इतर राष्ट्रांच्या बरोबरीस आणोत; आणि सत्कृत्यें करून मनुष्यजातीला सुखी करून ब्रह्मांडनिर्मात्री जी चिच्छक्ती ती संतुष्ट राखोत.

◆ ◆ ◆

७ : : डोंगरीच्या तुरुंगांत

आपआपसांत हळूहळू गोष्टी सांगण्याखेरीज, किंवा अकरा वाजल्या-वर बरार्कीत कोंडून घेतल्यावर तेथें फिरण्याखेरीज दुसरी कांहींही कर्मणूक नसे. टिळकांचा आणि माझा नाना तऱ्हेच्या विषयांवर वाद करण्यांत पुष्कळ वेळ जाई. कित्येकदां तर आम्हीं रात्रींच्या रात्री बोलत घालविल्याचें मला आठवतें. मी 'एम्. ए.' करितां व टिळक 'एल्एल्. बी.' करितां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां सरकारी नौकरी न पत्करितां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों, चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला कँपमध्यें भेटायाला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसे येऊन ठेपलों;

शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कॉलेजाला परत येतांना थंडीनें कितीतरी कुडकुडलों; वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें; असल्या फंदांत न पडणारे कोण कोण मनुष्य त्यांस घेरतां आले; आपले मूळचे हेतु कोणते; व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्री-बोवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगांस केवढा धक्का बसला; आम्हीं आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत, व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशास्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्यांचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे;देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ती काढावी; शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती, आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल; व आपल्या शाळेचें व छापखान्याचें किती नुकसान होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणास कोण कोण मित्र उपयोगी पडले; व पुढें कोणा कोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहतां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी ठेविली पाहिजे; फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या; वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ येवढ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई " हळू बोला, हळू बोला " असा इषारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई. याशिवाय मुंबईतील किंवा पुण्यांतील मित्र भेटले आणि त्यांनीं कांहीं हकीकत कळविली, म्हणजे तिची वाटाघाट करण्यानेंही थोडीबहुत कर्मणूक होई. मधून मधून डांबीस कैद्यांना फटके देतांना ते पाहण्यासाठीं सर्वांना एकत्र बोलावीत. त्या वेळेस ते फटके पाहूनही थोडीबहुत सखेद कर्मणूक होई !

* * *

तुरुंगांत येणारे सर्वच कैदी चोरी, खून, खोटे कागद, विश्वासघात यांसारखे वाईट गुन्हे करून आलेले असतात असें नाहीं. एकादे वेळेस निरपराधी मनुष्याला शुष्क कारणावरून किंवा गुन्ह्याच्या संशयावरून तुरुंगांत जावें लागतें. वास्तविक पाहिलें तर शेंकडा तीस कैदी मात्र खरोखर गुन्हेगार सांपडतील, बाकीच्या दोन तृतीयांशांत विलक्षण प्रकारचीं भेसळ असते. कित्येकांना बाहेर पोटाला मिळत नाहीं म्हणून ते कोणाची कांहींतरी कुरापत काढून शिविगाळ किंवा मारामारी करितात, आणि तुरुंगांत येऊन पडतात. कांहीं जण अज्ञानामुळें किंवा मूर्खपणामुळें कायद्याच्या तावडींत सांपडतात, व नसत्या अपराधाबद्दल त्यांच्यावर टकोरीं झोडण्याचा प्रसंग येतो. कित्येक दुसऱ्याच्या नादीं लागून फसून येतात. कित्येक शुद्ध वेडे असतात व शहाणे सरकारी अधिकारी नीट चौकशी न करितां त्यांना उचल कीं दे तुरुंगांत टाकून असें करितात. तुरुंग म्हणजे लोकांस असें वाटतें कीं एकत्र केलेल्या दुष्ट लोकांचें वसतिस्थान होय. त्याच्या भिंताडावरून आलेला वारा लागला तरी अपाय होण्याची भीति असते, पण ही भीति अगदीं निराधार आहे. लोकांनीं तुरुंगांचा विनाकारण येवढा बागुलबोवा करून ठेविला आहे. शिवाय लोक समजतात त्याप्रमाणें त्यांत मनुष्यजातीचा अत्यंत निंद्य भाग असतो असें मानिलें सरी त्याचा तिरस्कार करणें आपणांस योग्य नाहीं. लोक अपराध करीतात यार्चे कारण त्यांना शिक्षण मिळत नाहीं हें होय. श्रीमंत व सुशिक्षित घराण्यांतील लोकांकडून फारसा गुन्हा होत नाहीं, हें निरनिराळ्या देशांतल्या तुरुंगांच्या रिपोर्टांवरून सिद्ध होतें. कोणत्याही देशांतील एकंदर तुरुंगांची आणि त्यांतील लोकांची संख्या कमी होत जाणें हें त्या देशाच्या वाढत्या सुधारणेचें चिन्ह होय. लोकांनीं सुशिक्षित व सदाचरणी होऊन स्वतःचीं व सार्वजनिक कामें नेकीनें आणि संसारवृक्षाच्या स्वादु फलांचा उपभोग घ्यावा, हाच ऐहिक सुधारणेचा मुख्य उद्देश होय. उच्च कुलांत जन्मास येणें हें कोणाच्या स्वाधीन नाहीं. अभिजनत्व ही बाह्योपाधीवर अवलंबून राहणारी सामाजिक गोष्ट होय. ती ज्यास परिश्रमाशिवाय प्राप्त झाली त्यांना फुशारकी मारण्याचें कांहीं कारण नाहीं. मनुष्यतेला कलंक आणणारे अपराध ज्या देशांत घडून येत असतात त्या देशांतील सुधारणा कितीही प्रबल झाली असली तरी तींत कांहीं

हांशील नाहीं. सबब सर्व सदय, देशाभिमानी, सुशिक्षित, आणि श्रीमंत लोकांनीं अपराधी मनुष्यतेचा कंटाळा न करितां ती सद्गुणी करण्यासाठीं रात्रंदिवस झटलें पाहिजे. एकत्र असलेल्या घराण्यांत निघालेला दुर्गुणी मनुष्य ज्याप्रमाणें त्याच्या अस्वस्थतेला आणि बेअब्रूला कारण होतो,त्याप्रमाणें कोणत्याही देशांतील दुराचारी लोक त्या देशाच्या सार्वजनिक विपत्तीला आणि दुर्लौकिकाला कारण होतात. असो. आम्ही तुरुंगांत असतां तेथें कैद्यांचे जे तऱ्हेवाईक मासले आमच्या दृष्टीस पडले ते पाहून आम्हांला कित्येकदां पराकाष्ठेचें वाईट वाटे. एक वाणी आला होता. त्यानें आल्या दिवसापासून शिरापुरीचा आणि विड्यांचा नाद धरिला होता. त्याला हवी ती शिक्षा करून पाहिली पण त्यानें आपला नाद म्हणून सोडिला नाहीं. शेवटीं तो इतका खंगला कीं त्याला इस्पितळांत घाडणें भाग पडलें. दुसरा एक मुसलमान होता. त्याला हवी ती शिक्षा केली तरी बोलावयाचा नाहीं. दुसऱ्या एकाला काम करितां करितां घुरें येत असे; तें आलें म्हणजे त्याची जी स्थिति होई ती पाहून आम्हांला रडें कोसळें. कोणी एक पांच सात तुरुंगांचें पाणी पिऊन आलेला कैदी होता. त्यानें शुष्क कारणावरून आपल्या टकोऱ्यानें शिपायाचा कपाळमोक्ष केला,व त्या अपराधाबद्दल त्यास पंचवीस फटके दिले तरी त्याच्या डोळ्यांतून टिपूस देखील निघालें नाहीं ! दुसऱ्या एका गब्रूला फटके द्यावयाच्या लांकडापासून खुलें केलें न केलें तों तो असें म्हणाला कीं "मागें...कशाला मारतां, पुढें...हवें तितकें मारा !"

डेकोस्टा या नांवाच्या बिनमजूरी कैद्याची आणि आमची कांहीं दिवस गांठ पडली होती. तुरुंगांत आल्यापासून पाहिल्या पंधरवड्यांत त्यानें कोणाशीं चकार शब्द देखील काढिला नाहीं. रजिष्टर होतांना त्यानें एक दोन गुद्दे खाले तेव्हां कारकुनास आपलें नांव सांगितलें. पाहिल्या पंधरा दिवसांत आम्हीं हवी तितकी खटपट केली पण त्यानें म्हणून कांहीं आपल्या तोंडाचें कुलूप काढिलें नाहीं. सगळे लोक यार्चे माथें फिरून तो पिसा झाला आहे असें समजत. आम्हीं फारच जिकीरी केली तर तो एखादें इंग्रजी वाक्य बोले. संध्याकाळीं कैद्यांस निजण्याच्या खोलींत कोंडिलें म्हणजे त्यांना यथास्थितपणें नागवें करून त्यांची झडती

घ्यावी, व त्यांना निजावयास द्यावयाचीं चिरगुटें झाडून द्यावीं अशी चाल आहे. डेकोस्टाची झडती घेतांना त्यालाहि इतरांप्रमाणें नागवें होऊन उठाबशा काढाव्या लागत. पुढें असें होऊं लागलें कीं, झडती घेणाऱ्या शिपायांत एक आनंदी स्वभावाचा हवलदार होता. त्याचें नांव काढिलें कीं आमच्या मुखस्तंभ डेकोस्टाला हसूं येई व कांहीं दिवसांनीं उठबशांची कल्पना त्याच्या मनांत आली कीं तो जोरानें हंसत सुटे, व कधीं कधीं त्याची ती हंसण्याची लहर दोन तासपर्यंत टिके. पुढें पुढें तो फारच मोठ्यानें हंसू लागला, व एके दिवशीं सकाळीं राजश्रींची एकाएकीं कळी उमलली. पहिल्या प्रथम तो टिळकांशीं बोलूं लागला व त्याच्या बोलण्यांत कोणत्याही प्रकारचा विसंगतपणा दिसला नाहीं. मी एल्. एम्. ॲण्ड एस्. ची परीक्षा दिली आहे. माझी मॅट्रीक्युलेशन परीक्षा ७२ त झाली. माझी स्वतःची डिस्पेनसरी (दवाखाना) नाहीं, रोग्यांना पाहण्यास जाण्यासाठीं मी आपलें घर कधींच सोडीत नाहीं, जो मजकडे येईल त्यापासून मी १ रु. फी घेऊन औषध मात्र लिहून देतों; मी जात्या भिडस्त आणि लाजाळू आहे. आम्हां पोर्तुगीज लोकांत एकानें दुसऱ्याची ओळख पाडून दिल्याखेरीज कोणी कोणाशीं बोलणें सुरू करीत नाहीं. मी अमकें वाचिलें आहे, तमकें केलें आहे, पुढें मागें मी यंव करणार, मी त्यंव करणार. याप्रमाणें त्यानें सुमारें दीड तास अस्खलित भाषण केलें; त्याच्या बोलण्यावरून निदान तो बराच बहुश्रुत असावा असें दिसलें. इतका प्रकार झाल्यावर आम्हांस स्वाभाविकपणें त्याच्याबद्दल वाईट वाटूं लागलें, व तो मौनव्रतस्थ असतां त्याला आम्हीं जें जें टाकून बोललों होतों, व जी जी थट्टा केली होती, त्याबद्दल त्याची क्षमा मागितली ! वरील सगळें बोलणें टिळकांशीं झालें; नंतर त्यांस मी जाऊन मिळालों. आम्हां दोघांशींही डेकोस्टा साहेब बराच वेळ नीट बोलले; पुढें एकाएकीं त्यास काय वाटलें कोण जाणें; त्यानें मला असा प्रश्न केला कीं, तुमच्याजवळ कोण बसला आहे हें तुम्हांला ठाऊक आहे ? व माझ्याकडून उत्तर येण्याची वाट न पहातां मी प्रिन्स ऑफ् वेल्स आहे, जान डेकोस्टा हें खोटें नांव घेऊन तुरुंगांच्या आंतील स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठीं मी येथें आलों आहें; अशा प्रकारचीं निरनिराळीं नांवें घेऊन लोकांची

विपत्ति पाहण्याकरितां मी अनेक ठिकाणीं फिरतों...(मला उद्देशून) तुमचा तोंडवळा मला चीनच्या बादशहाच्या तोंडवळ्यासारखा दिसतो; इतकेंच नाहीं; मी जसा प्रिन्स ऑफ वेल्स, तसे तुम्हीही चीनचे बादशहाच असाल; कुणाला ठाऊक, तुम्ही कदाचित् अमेरिकेचे प्रेसिडेंट असाल, माझी आई व्हीनस (शुक्र) होती; ती समुद्रांतून नग्न निघून आकाशांत जाऊन बसली ! याप्रमाणें बोलतां बोलतां आमच्या खुळ्या तत्त्ववेत्त्याची स्वारी जेव्हां बरळूं लागली तेव्हां आम्हीं चपापलों, व आम्हांस अशी शंका आली कीं हे पंडित बहुतकरून एकविषयभ्रान्त (Monomaniac) असावेत ! दोन तीन दिवसांत आमची शंका पूर्णपणें विरस्त झाली. अनौरस मुलाला सरकारनें ठरवून दिलेली पोटगी न देण्याबद्दल डेकोस्टाला एक महिन्याची साधी सजा दिली होती. नांवांत काय तें सगळें सामर्थ्य आहे, कोणत्याही व्यक्तीचें नांव घेतलें कीं आपण ती व्यक्ति बनलों, व तिची सर्व सत्ता आपणांस प्राप्त झाली, अशा प्रकारचा बुद्धिभ्रंश याच्या मेंदूत खिळून गेला होता. तो धर्म, नीति, वैद्यक वगैरे कठीण विषयांवर बराच वेळ पर्यंत न अडतां बिनचूक इंग्रजी बोले, व मध्येंच लहर आली कीं, मी मुरारजी गोकुळदास होणार, मी गोकुळदास तेजपाळ, किंवा मंगळदास नथुभाई होणार, मी राथचाइल्ड किंवा लॉर्ड नेपीअर आफ् मागडाला याचें नांव घेणार, असा बरळूं लागे. एकदां त्यानें आम्हांस असें सांगितलें कीं मॅजिस्ट्रेटापुढें मी एक शब्द देखील बोललों नाहीं ! तो सुटला त्या दिवशीं त्यानें मोठ्या प्रेमानें व आदबीनें बोलल्या चालल्याबद्दल आमची क्षमा मागितली, व सगळ्यांशीं शेकह्यांड करून निघून गेला ! दुसरा एक निःशक्त वेडसर लंगडा भामटा फाणस चोरल्याबद्दल आला होता. त्याची महत्त्वाकांक्षा काय होती कीं, साधल्यास पोलिस सुप्रिंटेंड गाडींत बसला असतां घोड्यांसकट त्याची गाडी लांबवावयाची ! या गृहस्थाची सुरत, याचें बोलणें, याचें दुडकी पळणें, व याच्या पराक्रमांचा इतिहास ऐकून आमचें हसतां हसतां पोट दुखूं लागें.

* * *

आतां वाचकांचा निरोप घेण्यापूर्वी हें कोल्हापूर प्रकरण उभें राहिल्यापासून त्याचा निकाल होईतोंपर्यंत ज्या ज्या देशबंधूंनीं व मित्रांनीं सहाय्य केलें त्यांचे आभार मानणें येवढें मात्र राहिलें आहे. वर्तमानपत्रें काढून पुरें एक वर्ष झालें न झालें तों आम्हांवर एक दोन बिकट प्रसंग येऊन गेले, व त्यांतून आम्हीं निभावलों हें केवळ अनेक ममताळू मित्रांच्या मदतीमुळें झालें हें आम्हीं प्रांजलपणें कबूल करतों. पोलिस कोर्टांत फिर्याद लागल्याबरोबर मराठा-केसरीचे दिवस भरले असें कित्येकांस वाटूं लागलें; पुढें शास्त्रीबोवांचा अकालीं मृत्यु झाला; मग त· कांहीं पुसूंच नका. त्या ऐन दुःखाच्या आणि आर्णाबाणीच्या प्रसंगीं जिकडे तिकडे सर्वजण असें म्हणूं लागले कीं आतां हीं मंडळी रसातळास गेली, म्हणून समजा ! असो आम्ही असें समजतों कीं येवढ्या थोडया काळांत आम्हांवर जीं दोन तीन संकटें येऊन गेलीं, व ज्यांतून आम्ही फुटाफूट झाल्याशिवाय जसेच्या तसे बाहेर पडलों, त्यांवरून आमच्या देशबंधूंची येवढी तरी खात्री होईल कीं देशसेवेचे दंभ चार पैसे मिळविण्यांत गुंतलेले हे लोक नाहींत, तर यापेक्षां थोडेसें कठीण काम अंगावर घेऊन तें निश्चयानें तडीस नेण्याचा यांचा निर्धार झालेला आहे. या प्रकरणांत आमच्या माना अडकल्या गेल्यामुळें अनेक मित्रमंडळीस जे दीर्घ श्रम झाले, त्यांबद्दल पूर्ण उतराई आमच्यानें कधींही होववणार नाहीं. आमचा सगळा भरंवसा आमच्या मुंबईच्या व पुण्याच्या विद्यालयीन मित्रांवर होतां हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. यांची मदत नसती तर लोकांनीं भाकित केल्याप्रमाणें मराठा केसरी कधींच निजधामास गेले असते. जणूं काय दोन्ही कॉलेजांनीं आमच्या बरोबर शेवटपर्यंत काळजी वाहण्यास आणि कारागृहांत सुद्धां आमचा समाचार घेण्यास हे दोन दक्ष प्रतिनिधीच नेमून दिले आहेत कीं काय आमचा समाचार घेण्यास दोन मित्रांच्या सप्रेम वर्तनावरून वाटे ! या खेरीज कोणाला पैशासाठीं, कोणाला सल्लामसलती-साठीं, कोणाला दुसऱ्या कांहीं गोष्टींसाठीं, असें आम्हीं अनेकांस अनेक तऱ्हांनीं शिणाविलें; याबद्दल आम्हांस फार वाईट वाटत आहे. एकदां आम्हांस असें वाटतें कीं आमच्या हातून बरीच देशसेवा झाल्यावर आमच्या लोकांस त्रास देण्याचे प्रसंग येते तर बरें होतें. शिक्षा होऊन आम्ही तुरुंगांत

गेल्यावरही आमचें बरें होण्याविषयीं आमच्या हितचिंतकांनीं उपाय करणें सोडिलें नाहीं. वर्डस्वर्थ, मंडलिक प्रभृति मंडळींच्या अर्जाला एकीकडे झुगारून देऊन सरकारनें आम्हांला दहा पांच दिवसांची सूट दिली नाहीं यामुळें आमचें मोठेंसें नुकसान झालें असें नाहीं; पण अशा प्रसंगीं दया आणि सौजन्य दाखवून कोल्हापूर प्रकरणाच्या, व त्यांच्या मनांतील कुत्सित संशय काढून टाकण्याचा जो अमोलिक प्रसंग आला होता तो सरकारनें विनाकारण घालविला! असो, झालें तें झालें; गत गोष्टींबद्दल खेद करण्यांत हंशील नाहीं. इत उत्तर आमची येवढीच उमेद आहे कीं, सकल महाराष्ट्रीयांनीं आम्हांवर जी प्रीति दाखविली आणि आम्हांस जो सन्मान दिला त्या प्रीतीला आणि त्या सन्मानाला आम्ही वास्तविक पात्र आहों असें केव्हां तरी आम्हांस दाखवितां आलें म्हणजे आम्ही कृतकृत्य झालों. हें महत् कृत्य आमच्या हातून निर्विघ्नपणें शेवटास टाकण्यासाठीं वेळोवेळीं आमचे प्रमाद दाखवोत, व सदुपदेश करोत; तसेंच आम्हीं आरंभिलेल्या उद्योगांत तर कांहीं प्रशंसनीय भाग असला तर त्याचा चोंहोंकडे विस्तार होऊन या महाराष्ट्र भूमीच्या उदरीं—

स्नेहं दयांच सौख्यंच यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकांना मुञ्चतो नास्ति मे व्यथा

असें मानणारे पुत्र निपजोत!

◆ ◆ ◆

८ : : सुधारक काढण्याचा हेतु

पर्वत, नद्या, सरोवरें, झाडें, पाणी, रानें, समुद्रकिनारे, हवा, खाणी, फुलें व जनावरें ज्यांत स्पष्टपणें दाखविलीं आहेत असा एक व ज्यांत पारधी व पारधीचीं हत्यारें, शेतकरी व शेतकीचीं अवजारें, बाजार व त्यांतील कोट्यवधि कृत्रिम जिन्नस, न्यायसभा व त्यांत येणारे शेंकडों लोक, राजसभा

व त्यांत बसणारे-उठणारे सचीव, मंत्री वगैरे प्रमुख पुरुष, भव्य मंदिरें व उत्तुंग देवालयें, बागा व शेतें, झोंपड्या व गोठे, अनेक पदवीचे व अनेक धंदे करणारे पुरुष व स्त्रिया आणि त्यांचीं अर्भकें, हीं ज्यांत व्यवस्थित रीतीनें काढिलीं आहेत असा एक, मिळून प्रत्येक खंडांतील ठळक देशाचे दोन दोन चित्रपट तयार करवून ते पुढें ठेवले, आणि त्याकडे निःपक्षपात-बुद्धीनें कांहीं वेळ पहात बसलें, तर विचारी पुरुषाच्या मनावर काय परिणाम होतील बरें ? प्रथम सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन केलें तर त्यावरून असें दिसून येईल कीं, विस्तृतता, बहुविधता, मनोरमता, अद्‌भुतता, उपयुक्तता व विपुलता यांपैकीं कोणत्याही गुणांत या भरत-खंडाचा त्रिकोणाकृति पट ग्रीस, इटली, ऐर्लंड, युनायटेड स्टेट्स, ऑस्ट्रेलिया यांपैकीं पाहिजे त्या रमणीय देशाच्या चित्रपटापाशीं तुलना करण्याच्या हेतूनें मांडला तर असें म्हणावें लागेल कीं, आमच्या वांट्यास सर्वोत्तम न म्हटला तरी उत्तमांपैकीं एक देश आला आहे. सह्य, विंध्य व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनीं ज्याची तटबंदी झाली आहे; सिंधु, भागीरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि नदांनीं व नद्यांनीं ज्यांतील क्षेत्रें सिंचण्याचें व उताऱ्यांचीं व व्यापाराचीं गलबतें व आगबोटी वहाण्याचें काम पत्करलें आहे; हिंदीमहासागरानें ज्याला रशना होऊन शेंकडों बंदरें करून दिलीं आहेत; गुजराथ, माळवा, बंगाल, वऱ्हाड, खानदेश इत्यादि सुपीक प्रांतांनीं ज्यास हवें इतकें अन्नवस्त्र पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे; ज्याच्या उदरांत कोठें ना कोठें तरी हवा तो खनिज पदार्थ पाहिजे तितका सांपडण्यास पंचाईत पडत नाहीं; ज्याच्या रानांत पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या वनस्पति वाढत आहेत, व सर्व प्रकारचे पशुपक्षी संचार करीत आहेत; ज्यांत कोठें उष्ण कटिबंधांतली, कोठें शीत कटिबंधांतली व कोठें समशीतोष्ण कटिबंधांतली हवा खेळत आहे; सारांश, ज्यांतील कित्येक अत्यंत रमणीय प्रदेशांस 'अमरभूमि,' 'नंदनवन,' 'इंद्रभुवन' 'जगदुद्यान' अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत; असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तींत कोणत्याही देशास हार जाईल, किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याही देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं.

याप्रमाणें सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन करून पूर्ण समाधान पावल्यावर, दुसऱ्या पटाकडे वळल्याबरोबर चित्तवृत्तींत केवढा बदल होतो पहा ! या दुसऱ्या ऐतिहासिक चित्रपटाच्या केवळ लांबीचाच विचार केला, तर कदाचित् आमच्या पटाची लांबी सर्वांत अधिक भरण्याचा संभव आहे. वैदिक कालापासून आजतारखेपर्यंत आम्हांस जितकीं शतकें मोजतां येणार आहेत, तितकीं बहुशः दुसऱ्या कोणत्याही देशास मोजतां येणार नाहींत. या विस्तीर्ण कालावधींत अनेक राष्ट्रांची उंत्पत्ति, अभिवृद्धि व लय होऊन तीं प्रस्तुत नामशेष मात्र राहिलीं आहेत; कांहींचा मुळींच मागमूस नाहींसा झाला आहे; व कांहींचा ऱ्हास झाला तरी त्यांनीं संपादिलेल्या विद्यांचीं व कलांचीं रूपांतरें कोठकोठें अद्यापि दृष्टीस पडत असल्यामुळें, तीं त्यांच्या गतवैभवाची साक्ष देत आहेत. ज्याप्रमाणें कांहीं वनस्पति व कीटक परिणतावस्थाप्राप्त झाली असतां, आपलें तेज नूतनोत्पन्न अंकुरांत ठेवून आपण पंचत्वाप्रत पावतात, त्याप्रमाणें अमेरिकेंतील व आशियांतील आणि विशेषतः युरोपांतील पुष्कळ राष्ट्रांची स्थिति झाली. ग्रीक विद्या आणि कला रोमन लोकांच्या हातीं पडून ग्रीक देशाचा अंत झाला. रोमन लोकांची सुधारणा अर्वाचीन युरोपीय राष्ट्रांकडे येऊन रोमन लोक नष्ट झाले. आशिया व अमेरिका यांतील जुन्या राष्ट्रांचीहि कांहीं अंशीं अशीच स्थिति झाली, व त्यांच्या सुधारणेच्या कांहीं खुणा अद्यापि कोठकोठें दृष्टीस पडतात. चीन व हिंदुस्थान हे दोन देश मात्र खूप जुने असून काळाच्या जबड्यांतून वांचले आहेत, व कदाचित् आणखीही अनेक शतकें वांचण्याचा संभव आहे. पण अशा प्रकारच्या वांचण्यांत विशेष पुरुषार्थ आहे कीं काय हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. अशा प्रकारचें केवळ वांचणें म्हणजे बऱ्याचं अंशीं योगानिद्रेंत प्राण घरून राहिलेल्या योग्याच्या जगण्यासारखें होय. हिंदुस्थानच्या अस्तित्वाशीं तोलून पहातां, जुन्या ग्रीक व रोमन लोकांचें अस्तित्व कांहींच नाहीं असें म्हणतां येईल. पण तेवढ्या स्वल्प काळांत त्यांनीं केवढाले पराक्रम केले व केवढी अमर कीर्ति संपाादिली ! भाषापरीज्ञानप्रवीणांनीं अलीकडे असा सिद्धांत केला आहे कीं, हिंदुलोक, ग्रीक लोक, रोमन लोक व जर्मन शाखेपासून निघालेले अर्वाचीन युरोपांतील इंग्लीश, डच वगैरे लोक एकाच पूर्वजांपासून झालेले असावे. या

सर्वांस ते आर्यकुलोद्भव राष्ट्रें म्हणतात. हें खरें असेल तर काय सिद्ध होतें कीं एकाच झाडाचें बी चार प्रकारच्या जमिनींत पडून त्यापासून चार प्रकारच्या वृक्षांचा उद्भव व्हावा, व प्रत्येकाला निराळ्या तऱ्हेची वाढ लागून त्याचा शेवटही निराळ्या तऱ्हेचा व्हावा,त्याप्रमाणें एकाच आर्य कुलापासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व खरे, पण स्थानांतराप्रमाणें आम्हां सर्वांचा इतिहास निराळ्या प्रकारचा झाला ! आर्य लोकांची युरोपांत जी शाखा गेली, तीपासून ग्रीस देशांत एक उत्तम राष्ट्र उद्भवलें. त्याचीच एक मुळी इताली देशांत जाऊन तीपासून जो नवीन अंकुर उत्पन्न झाला त्यानें मातृवृक्षास नाहींसें करून आपला विस्तार बराच दूरवर नेला. पुढें त्यालाही वार्धक्यावस्था येऊन त्याचा ऱ्हास होण्याच्या सुमारास त्यापासून बरींच नवीन रोपें अस्तित्वांत आलीं. तीं हीं अर्वाचीन युरोपांतील राष्ट्रें होत.

इकडे हिंदुस्थानांत आर्यलोकांची जी शाखा आली, तिचा निराळ्याच तऱ्हेचा इतिहास झाला. तिकडे जुन्या वृक्षानें नव्या अंकुरांत आपलें गुण ठेवून आपण नाहींसें व्हावें, पुन्हां त्या नवीन अंकुरानें तसेंच करावें व प्रत्येक नवीन राष्ट्रोद्भव पहिल्यापेक्षां बहुतेक गुणांत वरिष्ठ व्हावा, असा प्रकार झाला. इकडे अशा प्रकारची राष्ट्रोद्भवपरंपरा अस्तित्वांत आली नाहीं. मूळ आर्यशाखा येथें येऊन तिच्यापासून जें झाड येथें लागलें, तेंच आजामित्तीपर्यंत अस्तित्वांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रीक, रोमन, सिथियन, तार्तर, मोगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यामुळें त्याला बराच त्रास झाला. कधीं त्याच्या कांहीं फांद्या मोडून पडल्या; कधीं तें मुळापासून उपटून पडत आहे कीं काय असें वाटलें; पण कर्मधर्मसंयोगानें युरोपांतील ग्रीक व रोमन शाखांवर आणि इकडील इराणी शाखेवर जो प्रसंग गुदरला, तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाहीं ! यामुळें हें जरठ झाड कसें तरी अजून उभें आहे ! पण त्यांत कांहीं त्राण उरलेलें नाहीं ! तें आंतून अगदीं शुष्क होत आलें आहे, व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें ! असें केलें तरच

त्याचें पूर्वस्वरूप पूर्ण नष्ट न होतां, त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वांत येईल; पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुत कालीं चोंहोंकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्याखालीं तें अगदीं जेर होऊन अखेरीस जमिनीवर उलथून पडेल.

हिंदुस्थानचा पूर्व इतिहास व सांप्रत स्थिति 'सुधारका'च्या वाचकांच्या लक्षांत थोडक्यांत यावी, यासाठीं वर ज्या रूपकाचें सहाय्य घेतलें आहे, त्यापासून लेखकाचा भाव त्यांच्या मनांत उतरला असेल अशी त्याची आशा आहे. त्याचें स्पष्ट म्हणणें असें आहे कीं, हिंदू लोक रानटी अवस्थेतून निघाल्यावर कांहीं शतकेंपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांहीं शास्त्रें, वेदांत, न्याय, गणितादि कांहीं विद्या, व काव्य, गीत, नर्तन, वादनादि कांहीं कला, यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली, व तेव्हांपासून इंग्रजी होईपर्यंत ते कसें तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले ! यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटांहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीति–सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठिण झालेल्या लांकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे. आजमित्तीस या शिक्षणाच्या टांकीचे आघात फारच थोड्यांवर घडत आहेत. पण दिवसेंदिवस ते अधिकाधिकांवर घडूं लागतील असा अजमास दिसत आहे. ज्यांना या टांकीपासून बराच संस्कार झाला आहे, ते समुदायापासून अगदीं विभक्त झाल्यासारखे होऊन, उभयतांत सांप्रतकालीं एका प्रकारचें वैषम्य उत्पन्न झालें आहे. या वैषम्यास विशेष कारण कोण होत आहेत हें येथें सांगण्याची गरज नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत

आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राजकर्त्यांकडून येत आहेत, म्हणून त्या आम्हीं स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे, असें जें आम्ही म्हणतों तें अशासाठीं कीं, त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनीं त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे, व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनः पुनः दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे.कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाविषयीं जें लोकमत असेल, तें पुढें आणणें हेंच काय तें पत्रकर्त्याचें कर्तव्य असें जें मानीत असतील, ते तसें खुशाल मानोत. लोकमत अमुक टप्प्यापर्यंत येऊन पोंचलें आहे, सबब कोणत्याही व्यक्तीनें किंवा सरकारनें त्यापुढें जाऊं नये, असें म्हणणें म्हणजे झाली आहे तेवढी सुधारणा बस्स आहे, पुढें जाण्याची गरज नाहीं, असेंच म्हणण्यासारखें होय. व्यक्तीनें किंवा सरकारानें साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें किंवा कायदे करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें, व्यक्तीस लोकांची पर्वा न करितां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें व सरकारास लोकमतांविरुद्ध कायदे करावे लागतात. बारकाईचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां अनेकदां बहुमतांविरुद्ध अधिकृत लोकांचें म्हणजे सरकाराचें वर्तन होत असतें. तथापि सामान्यतः सरकाराचें वर्तन लोकमतास धरून असेल तितकें बरें. पण जे लोक हा सिद्धांत कबूल करतात ते, लोकमत दिवसें-

दिवस सुधारत चालले आहे, असें समजतात. तेव्हां आतां असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी ? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा ? लोकाग्रणींनीं हें काम पत्करलें नाहीं तर ते कोणी पतकरावयाचें ? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्याची चालू स्थितीसुद्धां कायम न राहतां उलट त्यांस उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणतिरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें, व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढें आणण्याचें, अनाभिमत काम करण्यास वयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्या सुद्धां अंगीं नसेल त्या समाजांनीं वर डोकें काढण्याची आशा कधींहि करूं नये.

हे विचार बरोबर असतील तर त्यांवरून हें दिसून येईल कीं, जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील, त्यांनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्याजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हां एखाद्या खड्ड्यांत नेऊन घालतील हें सांगवत नाहीं. प्रस्तुत स्थितींत अशा लोकाग्रणींचें वर्तन आमच्या देशास फारच विघातक होणार आहे. ज्यांना समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयाचीं कारणें ठाऊक नाहींत; कदाचित् पितृतर्पणापुढें ज्यांचें ज्ञान गेलेलें नाहीं; विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाहीं; वरिष्ठाची प्रशंसा आणि कनिष्ठाशीं गर्वोक्ति यांहून अन्य प्रकारचें भाषण ज्यांस फारसें माहीत नाहीं; अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनीं अहर्निश परिश्रम करून पदार्थधर्मांचें केवढें ज्ञान संपादिलें आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढिलीं आहेत, व राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत हें ज्यांना ऐकून सुद्धां ठाऊक नाहीं, अशा गृहस्थांनीं

आम्ही हिंदु लोक नेहमीं परतंत्रच असलों पाहिजे; कांहीं केलें तरी अधिक राज्याधिकार उपभोगण्याची पात्रता आमच्या आंगीं यावयाची नाहीं; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्हीं कधीं स्वप्नांत सुद्धां आणूं नये; स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद्, कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसंतोषानें शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें-या व या तऱ्हेच्या दुसऱ्या उठाठेवींत आम्हीं पडणें हें शुद्ध मूर्खपण होय, [असें म्हणावें यांत नवल नाहीं.] अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रु म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. तसेंच जेवढीं जुनी शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक, अशी ज्यांची समजूत; जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयीं कल्पना; पंचामृतानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाहीं, असे ज्यांचे धर्मविचार; आहे ही सामाजिक स्थिति अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेंही अवकाश नाहीं; सध्यां येथें स्त्रियांचे पुरुषांशीं, मुलांचे आईबापांशीं, जे संबंध चालत आहेत तेच उत्तम आहेत व अनंत काल तेच चालले पाहिजेत; ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी, स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे; विवाहाशिवाय स्त्रीस गति नाहीं, व गृहाशिवाय तिला विश्व नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण; अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजाविषयक कल्पना, असे लोकाग्रणी काय कामाचे ? अशांच्या उपदेशानें व उदाहरणानें आम्हांस चांगलें वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असणाऱ्या सुखाचा लाभ आम्हांस कशानें होणार ? निदान ' सुधारका 'स तरी असले लोकाग्रणी व त्यांचें वर्तन मान्य नाहीं. ज्या तत्त्वाचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्हीं आनंदानें तयार झालें पाहिजे. तीं तत्त्वें हा ' सुधारक ' महाराष्ट्र-लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीनें अंमल चालत आहे, त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा

करीत नाहीं; कारण ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधि अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनीं आपल्या अडाणी समजुती प्रमाणें चांगलें म्हटलें कीं वाईट म्हटलें; अज्ञान व धर्मभोळ्या लोकांच्या आचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून, त्यापासून निघेल तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला किंवा छीः—थूः करण्याचा प्रयत्न केला; शेंकडों अविचारी व हेकड लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला—सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकुल समजलेलें नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं, अशांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या तरी, जो खरा विचारी आहे, ज्याला लोक-कल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें वरच्यासारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें हेंच त्यास उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे.

◆ ◆ ◆

९ : : तरुण सुशिक्षितांस विज्ञापना

तरुण सुशिक्षित देशबांधवहो, हा 'सुधारक' अत्यंत प्रेमपूर्वक जी विज्ञापना तुम्हांपुढें करीत आहे तिकडे लक्ष द्याल आणि तिची सार्थकता करण्याविषयीं प्रयत्न कराल अशी आशा आहे.

असें म्हणतात कीं, ज्या देशांतील लोकांनीं राष्ट्रीय स्वातंत्र्य स्थापिलें आहे; ज्या देशांतील लोकांनीं राजांचा जुलूम नाहींसा करून प्रजासत्ताक

राज्यपद्धति स्थापिल्या आहेत; ज्या देशांतील लोक, सामाजिक व धार्मिक गोष्टींची सुधारणा करण्यासाठीं सरकारवर अवलंबून न राहतां, ती आपली आपण करूं लागले आहेत; आणि ज्या देशांतील लोकांस सर्व प्रकारच्या प्रक्रांतीस लागणाऱ्या साधनांची अनुकूलता साध्य झाली आहे; त्या देशांतील युनिव्हर्सिट्यांतले शिक्षक आणि शिष्य पूर्वसंप्रदायप्रिय असतात. कोणतीही जुनी पद्धत टाकणें, नवीचा अंगिकार करणें वगैरे गोष्टी त्यांस आवडेनाशा होतात. सारांश जे चालत आलें आहे तेंच बरें आहे, त्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्यानें नवीन लचांडें उद्भवण्याचा संभव आहे, आणि त्यांचा परिहार कसा करावा हें ठाऊक नसल्यामुळें त्यापासून हित न होतां उलट नुकसान होण्याची भीति आहे; सबब जें चालू आहे त्याचेंच संरक्षण करावें आणि त्यापासून होईल तितकें सुख उपभोगावें, असें त्यांस वाटत असतें; आणि कांहीं अंशीं असें होणें फार स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें जलोदधीचा अत्यंत क्षोभ करणारा प्रचंड प्रभंजन कांहीं वेळ मोठ्या जोरानें वाहिल्यावर, आणि समुद्रावर व जमिनीवर त्यानें अनेक उत्पात करून सोडल्यावर, जणूं काय विगलितवीर्य होत्साता शांत होतो, आणि वातावरणांत पराकाष्ठेची निश्चलता उत्पन्न होऊन सर्व सचेतन व अचेतन वस्तु जागच्याजागीं निश्चेष्ट झाल्यासारखी भासूं लागतात; त्याप्रमाणें ज्या देशांत मोठमोठ्या राज्यक्रांत्या झाल्या आहेत, ज्यांतील लोकांनीं राज्यस्वातंत्र्यासाठीं व विचारस्वातंत्र्यासाटीं अनेक तुंबळ युद्धें केलीं आहेत; जो देश अनेक वर्षांनीं शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागला आहे व ज्यांतील लोकांस विशेष गुरुत्वाचा कोणताहि अन्याय दूर करणें राहिलें नाहीं; – अशा देशांतील लोकांस थोडीशी स्तिमितता यावी–विशेषतः राज्यक्रांति म्हणजे काय, ती घडवून आणण्यास केवढे प्रयास पडतात, ती होऊं लागली म्हणजे प्रजेस किती हाल सोसावे लागतात, वगैरे गोष्टी ज्यांस नीटपणें समजतात अशा त्या देशांतील सुशिक्षित लोकांस तरी ती यावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां इंग्लंडसारख्या देशांतील युनिव्हार्सिट्यांच्या प्रोफेसरांनीं व कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं ग्लाडस्टनसारख्या मंत्रिगणशिरोमणीस विरुद्ध होऊन हार्टिंग्टन्-सारख्या संकुचितदर्शनाच्या व मर्यादित औदार्याच्या लोकाग्रणीचें प्रोत्साहन करावें; आणि तदनुषंगानें वागण्याविषयीं तत्परता दाखवावी, यांत

कांहीं आश्चर्य नाहीं. पण ज्या देशांतील लोकांस राजकीय, सामाजिक व धार्मिक असमता, अज्ञान आणि अन्याय यांपासून पराकाष्ठेचा त्रास होत आहे, किंवा परवशता प्राप्त झाली आहे; ज्या देशांतील सामान्य लोकांस गूढ अज्ञानानें व्यापिलें आहे; ज्या देशांतील लोकांस विपत्तीपासून होणाऱ्या यातना सोसाव्या लागत आहेत, पण त्यांच्या परिहारार्थ काय करावें हें समजत नाहीं, सारांश ज्या देशांत राजकीय समता नाहीं, विद्या नाहीं, वित्त नाहीं, शारीरिक व मानसिक सामर्थ्य म्हणण्यासारखें नाहीं, अशा देशांतील युनिव्हर्सिट्यांत आणि कॉलेजांत इतर ठिकाणांपेक्षां थोडीशी अधिक चळवळ नसेल तर त्या देशाची अखेर गति काय होईल, हें सांगतां येणें फार कठीण आहे. विचार करणें सुखदुःखाचा अनुभव घेणें व क्रिया करणें या तीन गोष्टींपैकीं पहिलींत, दुसरींत, किंवा तिसरींत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला असतो. मोठमोठ्या ग्रंथांचीं पारायणें करावीं, रात्रीच्या रात्री चिंतनांत घालवाव्या, विचार व्यवस्थित झालो कीं तो पुस्तकद्वारानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें लोकांपुढें आणावा, अशा रीतीनें कित्येक लोक आपलीं आयुष्यें कंठीत असतात. अशांस बाह्य सुखांचा फार उपभोग सांपडत नाहीं, व बाह्य क्रिया करतां येत नाहीं. वाचनापासून होणारा जो आनंद तोच यांचें स्थाईक व आवडतें सुख. आणि विचार करण्यास व लिहिण्यास लागणारीं जी शारीरिक हालचाच तीच यांची बाह्य क्रिया. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यास मानसिक सुखापेक्षां शरीरसुखाची चाड विशेष असते. वारुळांत जशी एक खुशालचेंडू राणी मुंगी असते म्हणून सांगतात, तीसारखे हे सुखपरायण लोक होत. सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो, व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे; पण ज्या सुखोपभोगामुळें निरंतर तो घेतां येण्याची शक्यता नाहींशी होते; बुद्धीस मांद्य येतें; गात्रें निःशक्त होतात; उत्साह नाहींसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां, उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो. अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें ? पण असे लोक कोणत्याही देशांत थोडेथोडके नसतात. ज्या ठिकाणीं अविद्या आणि वित्त यांचा संयोग दृष्टीस पडतो, त्या ठिकाणीं व्यसनासक्ति

दृष्टीस पडत नाहीं असें सहसा होत नाहीं. सुदैवानें ज्यांना सुखोपभोग करून घेतां येत असेल त्यांनीं सुखाची निवड करतांना तीं आपणांस व इतरांस शेवटपर्यंत हितावह होतील किंवा नाहीं, येवढें पहात जावें म्हणजे झालें. या सुखपरायण वर्गाशिवाय लोकांचा आणखी एक तिसरा वर्ग असतो. या वर्गांतील लोकांची क्रियाप्रवृत्ति फार जबरदस्त असते; व एका दृष्टीनें यांस समाजाचे आधारस्तंभ म्हणतां येईल. यांनीं काबाडकष्ट करून आवश्यकतेचे आणि चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे, आणि त्यांचा उपभोग वरील वर्गांतील किंवा मधल्या वर्गांतिल लोकांना द्यावा, असें आजपर्यंत बऱ्याच अंशीं होत आलें आहे व पुढेंहि अल्प काळांत या स्थितींत विशेष फेरबदल करतां येईल असें वाटत नाहीं. तथापि निरपेक्ष बुद्धीनें व आस्थापूर्वक परिश्रम केले असतां ही असमता थोड्या वर्षांत बरीच दूर करतां येण्यासारखी आहे. ज्या देशांत ही असमता वाढत जाऊं लागली असेल, त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला आहे, असें समजावें. जेव्हां या असमतेची परमावधि होते, तेव्हां घनघोर राज्यक्रांति होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात, किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात. निरंतर कष्ट साहण्यास खालच्या प्रतीचे प्राणीसुद्धां तयार असत नाहींत तर मनुष्य कसा असेल ? कष्ट साहणें म्हणजे जीविततत्त्व क्षीण करून घेणें होय; आणि तसें करून घेण्यास बहुतेक मनुष्यें तयार होतील तर हळू हळू सारी मनुष्यजात नाहींशी होईल ! परंतु मनुष्यें अस्तित्वांत आलीं आहेत व दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत आहे यावरूनच त्यांच्या नाशास अनुकूल अशा कारणांपेक्षां त्यांच्या अस्तित्वास व वृद्धीस अनुकूल अशीं कारणें या पृथ्वींतील परमाणुसंघांत निगूढ आहेत असें सिद्ध होतें. तेव्हां काय दिसून येतें कीं विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जें सांप्रतकालीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात ते कायमचे नव्हत. हळू हळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावी लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येऊं लागेल. येवढें खरें आहे कीं, कांहीं झालें तरी सर्वांच्या बुद्धि सारख्या तीव्र होतील व पाहिजे त्या कामांत पाहिजे त्याला

पडतां येऊन तें उत्तम रीतीनें वठविता येईल, असें पूर्णपणें होण्याचा संभव फार थोडा आहे. तथापि प्रस्तुत कालीं निरानिराळ्या वर्गांतील लोकांत व स्त्रीपुरुषांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडत आहे तें पुष्कळच संकुचित करतां येणार आहे; आणि ज्या देशांत तें तसें करण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालत राहील तेच देश अखेरीस तगतील. बाकीचे, सर्वत्र जो जीवनार्थ कलह मोठ्या निकरानें चालला आहे त्यांत भांडता भांडता नाहींसे होतील. यासाठीं ज्यांना हें अस्तित्वतत्त्व स्पष्टपणें कळून आलें असेल व ज्यांच्या मनांत कर्तव्यबुद्धि व परोपकारबुद्धि पूर्णपणें जागृत झाली असेल त्यांनीं, आपापल्या देशाचा जीवनार्थ कलहांत टिकाव लागण्यासाठीं, रात्रंदिवस निरपेक्ष बुद्धीनें झटलें पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून जे स्तब्ध राहतील त्यांच्या माथ्यावर देशास विपद्दशा आणिल्याची, आणि त्याचा नाश अपरिहार्य केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे म्हणून सुशिक्षित देशबांधवहो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल व तुमची आज जी स्थिति आहे तीहून तुमच्या मुलांची व नातवंडांची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल, तर ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगांप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय. या कामीं तुमच्याकडून हलगरज झाल्यास या देशाला लौकरच जे दिवस येणार आहेत त्यांचा नुसता विचार डोळ्यांपुढें आला तरी भय वाटल्यावाचून रहात नाहीं! इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड स्टेट्स् वगैरे देशांतल्या सर्व वर्गांतील लोकांमधले व स्त्रीपुरुषांमधले संबध कसे आहेत, हें नित्य नजेरपुढें येत असूनही जर तुम्ही आपले डोळे मिटाल, व बालविवाहासारखे अनेक व्याधि तुम्हांस अत्यंत पीडित असून, त्यांच्या प्रतिकार्य कांहींच न कराल, तर तुमच्या संततीस तुमच्या मूर्खपणाबद्दल, आळसाबद्दल व आपलपोटेपणाबद्दल फारच त्रास सोसावा लागेल. तसें होऊं न देणें हें तुमचें कर्तव्य आहे, व तें अल्पायासानें कसें करतां येईल, हें सांगावें येवढाच या लेखाचा उद्देश आहे.

आज जीं सुधारलेलीं राष्ट्रें आहेत, त्यांपैकीं प्रत्येकांत विचार करणारे उपभोग घेणारे व श्रम करणारे असे तीन ठळक वर्ग दृष्टीस पडत असून ते उत्पन्न करणारीं कारणें दिवसेंदिवस क्षीण होत आहेत, आणि जसजशीं तीं अधिकाधिक क्षीण होत जातील तसतशी समाजस्थ असमता नाहींशी होऊन विचार, उपभोग आणि शरीरश्रम ह्या गोष्टी सर्वांस सम प्रमाणानें कराव्या लागतील आणि तसें झालें, म्हणजे समाजास खरी बळकटी आणि स्थिरता आली व उन्नतावस्था प्राप्त झाली असें म्हणतां येईल, असें सांगितलें आहे; तसेंच ही असमता दूर करण्याच्या खटपटीचा विशेष बोजा पाहिल्या वर्गांतील लोकांवर पडतो हेंही सांगितलें आहे.

इंग्रजी शिक्षण मिळालेले बहुतेक सुशिक्षित लोक सामाजिक प्रश्नांविषयीं विचार करूं लागले आहेत, व उत्तरोत्तर त्यांच्या विचारांचा परिणाम त्यांच्या आचरणावर होऊं लागेल यांत संशय नाहीं. पण अशा रीतीनें जें वर्तनांतर होतें तें स्थाईक होण्याचा संभव असत नाहीं इतकेंच नाहीं, तर कोणतीही गोष्ट चांगली आहे तेव्हां ती करणें जरूर आहे, असें वाटून ती करूं लागणें यांत जें मनास शिक्षण मिळतें,तें अप्रत्यक्ष रीतीनें घडून येणाऱ्या वर्तनांतरापासून कधींच प्राप्त होत नाहीं. आसमंतांतील वस्तुस्थितीच्या आधीन होऊन ती नेईल तिकडे जाणें यांत कोणताही पुरुषार्थ नाहीं. ज्या ठिकाणीं स्त्रीचा वाराही येण्याचा संभव नाहीं, अशा ठिकाणीं ब्रह्मचर्य आचरल्या-बद्दल फुशारकी मारण्यांत काय हांशील आहे ? आपणावर अमुक प्रकारचें संकट येणार आहे असें कळून त्याच्या परिहारार्थ जाणूनबुजून उपाय योजणें यांतच मनुष्याचें मनुष्यपण आहे. लोकसंख्या वाढत जाऊन अन्नाची पंचाईत पडूं लागली म्हणजे विवाहकाल सहजच लांबत जाईल, आपण होऊन तो लांबविण्याची गरज नाहीं; व्यापारधंदा, सरकारी नोकऱ्या, आगगाडीचा प्रवास इत्यादि कारणांनीं जातिबंध आपल्या आपण शिथिल होऊं लागले आहेत, तेव्हां ते वाईट आहेत असें म्हणून एकमेकांस दुखविण्याची गरज नाहीं; सामान्य शिक्षणाचा व विशेषतः शास्त्रज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशा धर्मसंबंधीं वेडेपणाच्या समजुती लयास जातील, सबब त्यांवरच्च टीका करण्याची गरज नाहीं; कोणतीही सुधारणा करण्याविषयीं लोकांच्या मनांत दृढ इच्छा उद्भवल्याशिवाय, केवळ कायद्याच्या जुलमानें

सुधारणा होऊं शकत नाहीं; व ती इच्छा उद्भवली असतां कायदा करण्याची आवश्यकता रहात नाहीं, 'कारण मग ती लोकांचे लोकच करतात; पराधीनास बलहीनता येते, व बलहीनांच्या कपाळीं पराधीनता ब्रह्मदेवानें लिहिली आहे, सबब हिंदुस्थानच्या लोकांनीं राष्ट्रोन्नती करण्याचा प्रयत्न करणें शुद्ध वेडेपण होय;—अशा रीतीनें सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयीं विचार करणाऱ्या लोकांस विचारी म्हणावें किंवा नाहीं, याचा संशय आहे. हे असल्या विचारांनीं मनुष्यांत आणि इतर प्राण्यांत कांहीं अंतर नाहीं असें दाखवूं पहातात ! मागल्या पिढ्यांस आलेल्या संकटाची माहिती आणि त्यांच्या परिहारार्थ त्यांनीं योजिलेल्या उपायांचें ज्ञान, त्यांच्या सहाय्यानें म्हणजे पूर्व पिढ्यांच्या अनुभवानें भावी विपत्ति टाळण्याचा प्रयत्न मनुष्य करणार नाहीं,व वस्तुस्थितीचा गुलाम होऊन ती वागवील तसेंच वागेल तर प्राणिवर्गांत त्यास प्राप्त झालेलें श्रेष्ठत्व त्याचेकडे कसें राहील, आणि सध्यां जीं सुखें उपभोगण्यास सांपडत आहेत तेवढ्यांचा तरी त्यास कायम उपभोग कसा लाभेल,हें सांगतां येत नाहीं.तात्पर्य, अगदीं शुष्क गोष्ट असली तरी तिच्यासाठीं बुद्धिपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. जे लोक असें करीत नाहींत ते हळू हळू दैववादी बनून निरुद्योगी व निरुत्साह होत्साते क्षीण होत जातात व शेवटीं समूळ नष्ट होतात. तस्मात्, सुशिक्षित बांधवहो, तुम्हांस अशी प्रार्थना आहे कीं, वर जें म्हटलें आहे तें तुम्हांस मान्य असेल तर तुम्हीं कालावर व वस्तुस्थितीवर अवलंबणें पुरें करून, ज्या सुधारणा तुम्हांस अत्यंत आवश्यक अशा वाटत आहेत त्या करण्याविषयीं बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यास लागलें पाहिजे. या आवश्यक सुधारणांपैकीं कांहीं अशा आहेत कीं, त्या वृद्ध लोकांच्या हातून होण्याचा संभव नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं पुष्कळांस त्यांची संमतीही मिळण्याची आशा नाहीं. उदाहरणार्थ, पुनर्विवाह व ऋतूत्तर कन्याप्रदान. तसेंच, कित्येक तरुण सुशिक्षितांस या दोन गोष्टी व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी कितीही चांगल्या वाटूं लागल्या असल्या, व त्यांची आवश्यकता भासूं लागली असली, तरी त्या करण्यास प्रवृत्त होण्यास त्यांची छाती होणार नाहीं. केवळ सगळेच असे असतील असें आमचें म्हणणें नाहीं. एखाद्याचें धैर्य, निश्चय व कार्यनिष्ठा असामान्य असल्यास तो लोकमताची किंवा अगदीं जवळच्या आप्तांचीही पर्वा न करतां, आपल्या मनास जी

गोष्ट प्रशस्त वाटली ती करण्यास प्रवृत्त होईल. पण असे लोक फार विरळ असतात. अशांची संख्या वाढेल तितकी वाढणें इष्ट आहे, आणि तिच्या कमीअधिक वाढीवर समाजाची सुधारणा शीघ्र होणें किंवा न होणें हें अवलंबून आहे. तथापि सध्यांचें जग सामान्य विचाराच्या, सामान्य धैर्याच्या व सामान्य समजुतीच्या लोकांचें झालेलें आहे. वृद्धतरुणांच्या आचार-विचारांत कालमानानें व शिक्षणभेदानें थोडाबहुत फरक होतो, पण त्यामुळें त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें असें नाहीं, व असें होणें इष्टही नाहीं; कारण असें होऊं लागेल तर कोणत्याही घरीं कोणासही सुखाचा लवलेश मिळेनासा होऊन साऱ्या समाजांत अहोरात्र चलबिचल माजून राहील, कोणाचा धाक कोणावर चालणार नाहीं व सगळ्याच प्रकारच्या सुधारणांस प्रचंड व्यत्यय येईल. सुधारणा करण्याची इच्छा जशी तरुणांस असते तशी वृद्धांस असत नाहीं. समाजाच्या असलेल्या स्थितीचें संरक्षण करण्याविषयीं वृद्ध लोक अत्यंत उत्कंठ असतात. त्यांचें पाऊल पुढें पडावें, अशी तरुणांत आकांक्षा असते. हे समाजनौकेचे भरताड होत; तरुण शिडें होत ! पहिल्या-शिवाय समाजांत स्थिरता रहाणार नाहीं; दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाहीं ! तेव्हां ज्यांच्या मनांत समाजाचें कल्याण व्हावें असें असेल, ते या दोहोंचें फारकत व्हावें असें कधींही चिंतणार नाहींत. दोहोंचाही उपयोग आहे; व दोघांनाही आपापला कार्यभाग उरकण्याची मोकळीक पाहिजे. प्रत्येक गोष्टींत बाबानें बेट्याला आपलें वळण गिरविण्यास लावणें हें जसें वाईट, तसें आपली प्रत्येक गोष्ट बाबा ऐकून घेत नाहींत म्हणून बेट्याला त्याचा विषाद येणें हेंही वाईट. दोघांच्या संमतीनें जेवढें चालेल तेवढें हवेंच आहे. पण ज्या गोष्टींत दोघांचें ऐक्य होण्याचा संभव नसेल त्या ज्याच्या त्यास आपल्या मनप्रमाणें करावयास सांपडल्या तरच घरांत व बाहेर शांतता आणि समाधान राहण्याचा संभव आहे. आज ज्यांचें अर्धें अधिक वय होऊन गेलें आहे; वागण्याची पूर्व पद्धत ज्यांच्या अंगीं खिळून जाऊन स्वभावतुल्य झाली आहे; अनेक वर्षांच्या विश्वासामुळें व तदनुसार आचरणामुळें ज्यांच्या धर्मविषयक व नीतिविषयक कल्पना वज्रलेप झाल्या आहेत; जुनाट झालेल्या झाडाप्रमाणें ज्यांचीं मनें किंवा शरीरें वळण्याची आशा उरलीं नाहीं; अशांनीं आम्ही ज्या गोष्टी पुढें सांगणार आहों,

त्यांत पडावें, अशी आमची इच्छा नाहीं व तुम्ही त्यांत पडा, असें आम्ही त्यांस म्हणणारही नाहीं. जे आज अपत्यवंत आहेत, ते आपल्या अपत्यांची व्यवस्था कशीही लावोत; त्याबद्दल आम्ही कुरकुर करणार नाहीं. पण ज्यांच्यावर अद्यापि संसाराचा भार पडलेला नाहीं; ज्यांच्याकडे पितृत्वाचा अधिकार अद्यापि आलेला नाहीं; नवीन ज्ञान संपादण्याचें व विचार कायम करण्याचें ज्यांचें वय अद्यापि गेलें नाहीं; ज्यांच्या ईर्षेला पराभव ठाऊक नाहीं; ज्यांची हिंमत कशानेंही खचलेली नाहीं; जगाच्या दुःखमय अनुभवामुळें ज्यांच्या अंतःकरणांत अनौदार्य, संशय, परदुःखपराङ्मुखता आणि परहितौदासीन्य यांचा प्रादुर्भाव झाला नाहीं—अशा विद्यालयीन व इतरस्थ तरुण सुशिक्षितांनीं आम्ही जी कल्पना सुचवीत आहों तिचा विचार करून ती अमलांत आणण्याविषयीं मंडळी स्थापावी, अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

आम्हांमधील बालविवाहाची चाल इतर सर्व वाईट चालींपेक्षां आम्हांस विशेष विघातक होत आहे, हें अलीकडे सर्व समंजस लोकांस कबूल झालें असून, ती बंद व्हावी अशी इच्छा बरीच पसरली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण ती बंद करण्याचा उपाय मात्र आमच्याकडून झाला नाहीं; व जोंपर्यंत तो करण्याचें काम अनपत्यवान् तरुण सुशिक्षित लोक आपल्या अंगावर घेणार नाहींत तोंपर्यंत त्याची योजना मनापासून कोणीही करणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. ही गोष्ट तरुणांनीं मनावर घेतली असतां आजपासून पंचवीस वर्षांच्या आंत हा रोग येथें कधीं होता किंवा नव्हता, अशा रीतीनें त्याची त्यांस वाट लावितां येईल ! तेव्हां असा हा रामबाण उपाय असावा तरी काय हें जाणण्याची वाचकांस मोठी उत्कंठा झाली असेल यांत संशय नाहीं; पण स्थलसंकोचामुळें ती आज पुरवितां येत नाहीं हें पाहून फार दिलगिरी वाटते; तथापि, ज्यांनीं इतके दिवस दम काढला त्यांना आणखी आठ दिवस तो काढतां येईल, असें समजून फार खेद न करतां सध्यां रजा घेतों !

तरुण सुशिक्षितांनीं जो विषय आपल्या हातीं घ्यावा म्हणून आज आम्ही प्रत्यक्षपणें सुचविणार आहों, त्याची यापूर्वी जितकी प्रस्तावना करावयाला पाहिजे होती तितकी केली आहे. आज आम्हांस ज्या सुधारणा

करणें अवश्य आहे त्यांपैकीं बहुतेक जुन्या पिढीच्या लोकांकडून होण्यासारख्या कां नाहींत यार्चे दिग्दर्शन मागें केलें आहे, तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या घटकेस हिंदुस्थानांत नव्या व जुन्या कल्पनांचा ज्या प्रकारचा झगडा सुरू आहे अशा प्रकारचा झगडा येथें पूर्वी कधींही झाला नसेल. आजपर्यंत हिंदुस्थानावर ज्यांनीं स्वाऱ्या केल्या, किंवा येथें आपलीं राज्यें स्थापिलीं त्यांच्या आणि आम्हां एतद्देशीय हिंदूंच्या राजकीय आणि सामाजिक विचारांत विशेष अंतर नसल्यामुळें हिंदूंनीं आपल्या जिंकणारांपासून अवश्य शिकलें पाहिजे असें विशेष कांहीं नव्हतें. किंबहुना हिंदु लोकांपाशींच आपल्या परकी राज्यकर्त्यांस शिकविण्यासारख्या कांहीं गोष्टी होत्या. यामुळें आजपर्यंत ज्यांनीं हिंदुस्थानास जिंकून त्यांत आपली सत्ता स्थापिली त्यांनीं हिंदूंचा शारीरिक किंवा बाह्य पराभव केला इतकेंच म्हटलें पाहिजे, पण इंग्रजांनीं आम्हांवर जें राज्य स्थापिलें आहे त्याची अगदी निराळी गोष्ट आहे. या राज्यामुळें आमच्या स्थितींत पराकाष्ठेचा बदल होत आहे. प्रथम प्रथम या स्थित्यंतराचें स्वरूप आमच्या लक्षांत बरोबर आलें नाहीं. पण अलीकडे पांचपंचवीस वर्षांत पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून जेवढे म्हणून त्याच्या पाशांत सांपडले आहेत त्यांची स्थिति विलक्षण होऊन गेली आहे; व उत्तरोत्तर या शिक्षणाचा परिणाम बहुतेकांवर होणार हें स्पष्ट दिसत आहे. पुष्कळांचें असें म्हणणें आहे कीं, पाश्चिमात्य शिक्षण फार थोड्यांस प्राप्त झालें असल्यामुळें त्यानें हिंदुलोकांच्या स्थितींत विशेष फेरफार झाला आहे, असें म्हणतां येणार नाहीं. पण आमच्या मतें असें समजणारांची चूक आहे. केवळ शाळांच्या द्वारें पाश्चिमात्य विचारांचा प्रसार होऊन त्यामुळें आमचें जें स्थित्यंतर होत आहे तेवढ्याचाच विचार केला तर तें विशेष विस्तृत नाहीं, हें कबूल करावें लागेल. पण शाळांशिवाय ज्या दुसऱ्या अनेक द्वारांनीं हिंदू समाजांतील प्रत्येक वर्गांतल्या लोकांवर परिणाम घडत आहेत त्यांचा नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं, ज्याच्या आचारांत व विचारांत पाश्चिमात्य कल्पनांनीं थोडाबहुत तरी फेरफार झाला नाहीं, असा एक वर्गही नाहीं. शाळाखात्याशिवाय इतर खात्यांचा संबंध प्रत्येक दिवशीं प्रत्येक वर्गांतील वयांत आलेल्या मनुष्यांशीं येऊन पोंचत आहे, व तदनुषंगानें त्यास आपल्या वागणुकींत प्रतिदिवशीं कमी अधिक फेरफार करावा

लागत आहे. मोजणीखातें, जमीनजमाबंदीखातें, न्यायखातें, पब्लिक वर्क्स-खातें,वैद्यकखातें,लष्करी खातें,स्यानिटरी खातें,अबकारी खातें इत्यादिकांनीं आमच्या इकडील शेतकऱ्यांवर, कारागिरावर, व्यापाऱ्यांवर, सावकारांवर, वाण्याउदम्यांवर, व सामान्य मजुरांवर, केवढे परिणाम घडत आहेत. या खात्यांशीं लोकांचा जो व्यवहार होतो तो सरकारानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें व्हावा लागतो. त्यामुळें त्या नियमांचें वळण त्यांस न कळत लागत चाललें आहे; व तें नकळत लागत आहे म्हणून मुळींच लागत नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. याशिवाय तारायंत्र, आगगाडी, पोष्टखातें, सेव्हिंग्ज बँक्स, पोस्टल बँक्स वगैरे ज्या गोष्टी सरकारानें किंवा खासगी मंडळ्यांनीं व्यापाराच्या सोईसाठीं व इतर सोईसाठीं स्थापिल्या आहेत, त्यांचा लोकांच्या धर्मविचारांवर, नीतिविचारांवर, व नित्याचरणावर केवढा परिणाम होत आहे याचा जो लक्षपूर्वक विचार करील त्याला, आणखी शंपन्नास वर्षें असाच क्रम चालला तर हिंदुस्थानच्या पहिल्या स्थितीचा मागमूस नाहींसा होण्याइतकें त्याचें स्थित्यंतर होणार आहे, असें कबूल करावें लागेल. तात्पर्य काय कीं, जिकडे पहावें तिकडे पाश्चिमात्य कल्पनांनीं व आचारांनीं आम्हांस वेढल्यासारखें झालें आहे व त्यांच्या पेंचांतून आम्हांस निसटून जातां येईल, असें वाटत नाहीं ! पण निसटून जाण्याचा तरी प्रयत्न करण्याची काय गरज आहे ? ज्या युरोपीय कल्पनांचा प्रघात इकडे पडत आहे त्यांपैकीं जेवढ्या अहितकारक असतील तेवढ्या वर्ज करून बाकीच्यांचा अंगीकार करण्यास काय हरकत आहे ? दुसऱ्या विषयाविषयीं लिहीत असतां असें दाखविलें आहे कीं, युरोपांत आज जी सुधारणा दृष्टीस पडत आहे ती मागील अनेक सुधारणांचें सार आहे व ज्या राष्ट्रांस जीवनार्थ कलहांत टिकावयाचें असेल त्यांना त्या सुधारणेचा स्वीकार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें खरें असेल तर ती सुधारणा आपल्या घरीं चालून आली असून आपण तिचा निषेध करणें म्हणजे आपल्या हातानें जाणूनबुजून आपलें नुकसान करून घेण्यासारखें होय. निदान आमची तरी अशी समजूत आहे कीं, इंग्रजांच्या राज्यामुळें ज्या गोष्टी येथें प्रस्थापित झाल्या आहेत व होऊं पहात आहेत त्यांपैकीं बहुतेक स्वीकारणीय व अनुकरणीय आहेत. सबब त्यांचा येथें जो आपोआप प्रसार होत आहे त्यास विरुद्ध जाणें हें तर इष्ट

नाहींच पण ज्यांना त्यांचें चांगुलपण समजण्यासारखें शिक्षण मिळालें आहे त्यांनीं बुद्धिपुरस्सर त्यांचा स्वकिार व प्रसार केला पाहिजे. असें केलें तरच त्या लवकर मूळ धरतील; आणि त्यांच्या फलांचा लाभ थोड्या वर्षांत आम्हांस होऊं लागून जीवनार्थ कलहांत हार न जाण्याची आशा आम्हांस करतां येऊं लागेल. हें बुद्धिपुरस्सर सुधारणा करण्याचें काम तरुण सुशिक्षितांशिवाय इतरांच्यानें होण्यासारखें नाहीं, म्हणून इतका वेळ त्यांची विनवणी चालविली आहे.

तरुण सुशिक्षित मित्रहो, 'शरीर धड तर मन धड' (A sound mind in sound body) अशी जी इंग्रजी भाषेंत सुप्रसिद्ध म्हण आहे ती तुम्हां सर्वांच्या ऐकण्यांत आलीच असेल. ज्याप्रमाणें जोरदार वृक्ष निपजण्यास, मूळ अंकुर जोरदार पाहिजे, त्याप्रमाणें देशांत सुदृढ स्त्रीपुरुषें निपजण्यास, सुदृढ मुलें होण्यांस, वैद्यशास्त्रांत जो खऱ्या विवाहाचा काल सांगितला त्याचें कोणाकडूनहि उल्लंघन होता कामा नये. या कालाचें उल्लंघन आम्हाकडून अनेक वर्षें होत असल्यामुळें आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, श्रम करण्यास नादान, उत्साहशून्य, व भेकड अशी होत आहे. आमच्या शरीरसामर्थ्याचा लोप होत असल्यामुळें आमचें मानसिक सामर्थ्यहि नाहींसें होत आहे, याशिवाय बालविवाहापासून आम्हांवर जीं इतर अरिष्टें गुदरत आहेत त्यांचा येथें अगदीं अल्प उल्लेख करण्यासही जागा नाहीं. बालविवाह बंद झाल्यास आज प्रत्येक घरीं ज्या एकदोन हतभाग्य बालविधवा दृष्टीस पडतात त्या दृष्टीस पडेनाशा होतील; पुरुषांच्या अंगीं अधिक पौरुष दृष्टीस पडूं लागेल, तरुणांस अधिक उद्योग करण्याची हिंमत येईल, व घाडसाचीं कामें अंगावर घेण्याची छाती होऊं लागेल; ज्याला त्याला आपापल्या मनाप्रमाणें आपली बायको पसंत करण्याची सवड मिळूं लागल्यामुळें स्त्रीपुरुषांच्या सुखाची वृद्धि होऊन संसारयात्रा रमणीय होईल; विवाहापूर्वी मुलींस ज्ञान संपादण्यास अधिक फुरसत मिळाल्यामुळें पुढें त्यांच्याकडून अपत्यसंवर्धनाचें व प्रपंच चालविण्याचें काम चांगल्या रीतीनें होऊं लागेल; पण हें सर्व होण्यास बालविवाहाची चाल बंद झाली पाहिजे, व ती बंद होणें किंवा न होणें हें सर्वथैव तुमच्याकडे आहे.

या कामासाठीं सर्व सुशिक्षित तरुणांनीं **महाराष्ट्रबालविवाहनिषेधक** नांवाची मंडळी स्थापावी, अशी आमची सूचना आहे. आज जे अशा मंडळीचे सभासद होण्यास तयार असतील त्यांनीं एकत्र जमून "आम्ही आपले, आपल्या मुलींचे, आपल्या मुलांचे व ज्या मुलींचें व मुलांचें पालकत्व आमच्याकडे येईल त्यांचे अल्पवयांत विवाह करणार नाहीं" अशा शपथा घ्याव्या. जर अशा मंडळींस खरोखरीच कांहीं सुधारणा व्हावी अशी उत्कट इच्छा असेल तर मुलीचें लग्न बारा वर्षें झाल्यावर व मुलाचें लग्न अठरा वर्षें झाल्यावर करावयाचें, असा निर्बंध कायद्यानें करून घेतला पाहिजे. जो अशा मंडळींचा सभासद झाला त्यानें तीत नवीन तरुण लोक आणण्याचा होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. असा क्रम कांहीं वर्षें चालला तर **बालविवाहनिषेधक** मंडळींच्या सभासदांची संख्या दोन हजारांवर सहज जाईल व इतकी मंडळी अशा सामान्य उद्देशानें एका कामांत निगडीत झाली म्हणजे तिला दुसऱ्या सुधारणाही झपाट्यानें करतां येतील. प्रत्येक सभासदानें वर्षाची रुपया, दीड रुपया वर्गणी देण्यास तयार झालें पाहिजे. या वर्गणीपासून जो फंड उभारला जाईल त्याच्या मदतीनें अनेक आवश्यक व उपयुक्त गोष्टी करतां येतील. अलीकडे पांचचार ठिकाणीं अशा प्रकारच्या मंडळ्या स्थापित झाल्या आहेत, व अशा प्रकारची मंडळी स्थापावयाची झाली म्हणजे काय काय करावें लागतें, अशाविषयीं राजे सर टी. माधवरावासारख्यांनीं पुष्कळ शोध करून टिप्पणें प्रसिद्ध केलीं आहेत; तेव्हां अशा मंडळ्यांचे नियम वगैरे कसे असावे, याविषयीं येथें विशेष लिहिण्याची गरज नाहीं. अगोदर अशी मंडळी स्थापण्याविषयीं व कायदेशीर बंधनें करून घेण्याविषयीं कांहींचा निर्धार झाला पाहिजे. तो एकदां झाला म्हणजे पुढचा मार्ग सोपा आहे. आम्हांस अशी आशा आहे कीं, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं हें काम आपल्या हातीं घेतल्यास त्यांस ताबडतोब यश येणार आहे. ज्यांच्या अंगीं विचारशक्ति आणि उत्साह यांचा संगम झालेला असतो, त्यांना कोणतीही सुधारणा करण्यास अवघड जात नाहीं. सबब येथील डेक्कन कॉलेजांतील, फर्ग्यूसन-कॉलेजांतील, व सायन्स कॉलेजांतील, व त्याप्रमाणेंच मुंबई येथील एल्फीन्स्टन, फ्रीचर्च वगैरे सर्व कॉलेजांतील सुशिक्षित, सुजाण, सुविचारी व प्रौढ

विद्यार्थ्यांस आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या स्वहितकर व राष्ट्र-हितकर कार्यांत पुढारीपण घ्यावें. पुढील देशस्थिति सर्वांशीं त्यांच्या हातीं आहे. वरील विद्यालयांत सध्यां असणाऱ्या विद्यार्थ्यांनीं या कामास आरंभ केल्यास, त्यांच्या पाठीमागून त्यांच्या जागीं येणारे विद्यार्थी त्यांचें अनुकरण करतील. येवढेंच नाहीं, तर कॉलेजांतील विद्यार्थी अशा कामांत पडल्यास त्याचा परिणाम शाळांतील प्रौढ मुलांवरही होऊं लागेल व या रितीनें धाग्याशीं धागा लागून जाऊन अल्प काळांत सुंदर सुधारणापट तयार होईल, आणि ज्यांना तो वापरण्यास सांपडेल त्यांची अनेक प्रकारची आपदा नाहींशी होईल इतकेंच नाहीं, तर त्यांस अननुभूतपूर्व अशा अनेक संसारसुखांचा उपभोग मिळूं लागेल.

येथपर्यंत 'सुधारका'नें आपलें काम केलें आहे, व वर निर्दिष्ट केल्यासारखी बालविवाहनिषेधक मंडळी अस्तित्वांत आल्यास तिचा पहिला सभासद होण्यास, सर्वानुमतें योग्य वाटतील तीं बंधनें करून घेण्यास, आणि अशा मंडळीचा प्रसार होऊन तिनें आरंभिलेल्या कामास यश येण्यासाठीं आपणांकडून होईल तेवढी मदत करण्यास तो पूर्ण राजी आहे, हें तो या लेखाच्या द्वारें प्रसिद्धपणें सांगत आहे. आतां ज्यांची तो इतका वेळ विनवणी करीत आहे ते आपलें कर्तव्य बजावण्यास कितपत तयार होतात, हें मात्र पहावयाचें राहिलें आहे !

◆ ◆ ◆

१० : : आमचें अजून ग्रहण सुटलें नाहीं !

गेल्या शुक्रवारच्या ग्रहणासारखी पर्वणी आली म्हणजे आमच्या समाजांत जी चलबिचल होऊन जाते, विशेषतः वरिष्ठ वर्गातील अशिक्षित पुरुषांची व स्त्रियांची जी घांदल उडून गेलेली असते, ती पाहून आमच्या बुद्धीचें ग्रहण अद्यापि सुटलें नाहीं, असें कोणत्याही विचारी पुरुषास वाटणार

आहे. अशा प्रसंगीं अगदीं अज्ञ लोकांचें वर्तन जसें व्हावें तसें आमचें वर्तन होत असतें. ज्या रानटी लोकांस सूर्य एका दिशेनें येऊन दुसऱ्या दिशेनें निघून जातो कसा; चंद्राच्या बिंबास क्षय व वृद्धि कशानें होते; एकाएकीं सूर्याच्या व चंद्राच्या भोंवतीं खळीं पडतात कशीं; उदक-कणवाही अभ्रांनीं आकाश व्यापृत झालें असतां, किंवा ईषत् वर्षाव होऊं लागला असतां, आकाशांतील ज्या प्रदेशांत सूर्य असेल त्याच्या उलट प्रदेशांत नाना तऱ्हेच्या रंगांची विशाल धनुराकृति कशी पडते; शुक्रासारखे कांहीं ग्रह कांहीं महिने क्षितिजापासून वर येत असल्यासारखे दिसत असून पुनः खालीं कसे उतरूं लागतात, व कांहीं दिवसांनीं मुळींच दिसेनासे का होतात; आकाशस्थ कांहीं तारे परस्परांमधील अंतर कधींच बदलीत नाहींत, व कांहीं आज या तारकासमूहापाशीं, उद्यां त्या तारकासमूहापाशीं, अशीं एकसारखीं स्थानांतरें करीत असतात, याचें कारण काय; सूर्य-प्रकाशांत उभें राहिलें असतां पडणारी छाया साऱ्या वर्षभर सारखी कां पडत नाहीं; तेजोमय शिखा किंवा पुच्छ असलेले असाधारण प्रचंड तारे एकाएकीं कोठून येतात, व थोडे दिवस दिसत राहून, मग नाहींसे कसे होतात, आणि इतर ताऱ्यांप्रमाणें फिरून लौकर कां दिसत नाहींत; एखाद्याच्या गळ्यांतील मौक्तिकहार तुटून पडावा, त्याप्रमाणें नभो-मंडलांतील तारकहार त्रुटित होऊन, त्यांतील भव्य मणि अनेक दिशांस विदारल्यासारखे कशामुळें दिसतात; भलत्याच ठिकाणीं एखादे वेळीं उपलवृष्टि कशी होते; मोठमोठीं वादळें कशीं सुटतात; डोक्यावरील अफाट पोकळींत पाणी जमतें कसें, आणि पर्जन्यधारा येतात कोठून; चंद्र व सूर्य नित्याप्रमाणें शांतपणें आकाशपंथ आक्रमीत असतां, एकाएकीं त्यांच्या तेजाचा अपहार करून मनुष्यलोकांस कधीं गाढ तिमिरांत, व कधीं अर्धवट संध्येंत, चाचपण्यास कोण लावतो--वगैरे प्रश्नांचीं समाधान-कारक उत्तरें देतां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांनीं आश्चर्यजनक दृग्विषयां-विषयीं हवे तसे तर्क लढवून, त्यासंबंधानें आपल्या शोधक मनाची हवी तशी समजूत घालून घ्यावी, आणि त्या समजुतीच्या अनुरोधानें आचरण करावें, हे त्यांच्यासंबंधानें अगदीं स्वाभाविक आहे, व त्याबद्दल त्यांस अणुमात्र दोष लावतां येणार नाहीं; कारण तसें केल्याखेरीज त्यांस गत्यंतरच नाहीं.

पण ज्या लोकांस या विषयांचें खरें ज्ञान झालें आहे, त्यांनींही त्यांच्याप्रमाणेंच वर्तन करणें म्हणजे अमूढ असून मूढाप्रमाणें आचरण करणें होत नाहीं काय ? कोणी असें म्हणतील कीं, ज्योतिःशास्त्राचें ज्ञान अद्यापि जितकें पसरावें तितकें पसरलें नाहीं, त्यामुळें सध्यांचा वेडेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो. या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, कोणत्याही विषयाच्या संबंधानें कितीही ज्ञान वाढलें, व लोकांत त्याचा कितीही प्रसार झाला, तरी जुन्या पद्धति सोडून देऊन तदनुसार नव्या पद्धतीनें वागण्याचें धैर्य आल्याशिवाय ज्ञानाच्या वृद्धीपासून किंवा त्याच्या प्रसारापासून म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं. ग्रहणें कशीं होतात, चंद्रसूर्यांस खळीं कशीं पडतात वगैरे गोष्टी युरोपांतील सर्व लोकांस समजल्या आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. पण जेवढ्यांस त्या पक्क्या कळून आल्या त्यांनीं पूर्वापार चालत आलेल्या रूढीस न जुमानतां, अगोदर आपलें वर्तन बदलून नंतर दुसऱ्यांचें वर्तन बदलण्याचा प्रयत्न केला, यामुळें तिकडील लोकांच्या बुद्धीस ज्या राहूनें ग्रासलें होतें त्याच्या जबड्यांतून त्यांचा लौकर मोक्ष झाला. आमच्या इकडील पंडितांची तशी गोष्ट नाहीं. त्यांना लोकापवादाचें भय फार असल्यामुळें, ते आपल्या पांडित्यप्रदर्शनापलीकडे सहसा जात नाहींत. हा आमच्या राष्ट्रीय प्रकृतींत नैसर्गिक दोष आहे, व यामुळें आमचें अतिशय नुकसान होत आहे. कोणत्याही विषयाच्या संबंधानें जोंपर्यंत आपली पक्की खातरी झाली नाहीं तोंपर्यंत सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें आचरण करणें दूष्य होणार नाहीं; कारण विनाकारण रूढ पद्धति सोडण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. सर्व जुन्या राष्ट्रांत ज्योतिषशास्त्राविषयीं नानातऱ्हेचे ग्रह पसरलेले होते, व त्यांच्या अनुरोधानें त्यांचें वर्तन होत होतें. लढाईला जावयाचें झालें, विवाह करावयाचा झाला, कोणत्याही मोठ्या कामास बाहेर पडावयाचें झालें कीं, प्रथम त्या त्या गोष्टीस ग्रहांची अनुकूलता कशी काय आहे, हें जोश्याकडून पहावयाचें आणि त्यानें तें अनुकूल आहेत, अशी खात्री दिल्यास मग तिला आरंभ करावयाचा, असा प्रकार आशिया व युरोपखंडांतील सर्व जुन्या लोकांत रूढ होता. मनुष्याचें मन जात्या शोधक असल्यामुळें, ज्या ठिकाणीं त्याची मति खुंटते त्या ठिकाणीं तें पाहिजे तसल्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तयार होतें. पृथ्वीवर

घडून येणाऱ्या मोठमोठ्या चमत्कारांची मीमांसा आतांप्रमाणें त्या वेळेस करतां येणें शक्य नसल्यामुळें आकाशांत भ्रमण करणाऱ्या तेजोनिधीकडून तें होत असावें, अशी कल्पना त्यावेळेस होणें फार साहजिक होतें. तसेंच अनेक वर्षें लक्षपूर्वक आकाशाचें अवलोकन केल्यावर तारे आणि ग्रह यांतील भेद लक्षांत यावा; ग्रह मागें पुढें होतात ते आम्हांस सुख किंवा दुःख देण्यासाठीं होत असावेत; श्वेत व रमणीय शुक्र सुखप्रद व बलवर्धक असावा; रक्तवर्ण मंगळास रुधिराची प्रीति असावी; मंद व निस्तेज शनीचा स्वभाव दुष्ट असून मनुष्यांना पीडा देण्यांत त्यास मोठा आनंद होत असावा—अशा कल्पना येऊं लागून अखेरीस मनुष्यांच्या मुख्य मुख्य वृत्तींचा आरोप, निरनिराळ्या ग्रहांवर, त्यांच्या त्यांच्या स्वरूपाच्या अनुरोधानें, व कवींच्या आणि जोश्यांच्या तर्काप्रमाणें, करण्यांत आला यांत कांहीं नवल नाहीं, व सामान्य लोकांनीं तत्कालीन श्रेष्ठ व सूज्ञ लोकांच्या पदपंक्तींचें अनुसरण केलें यांतही कांहीं वावगें झालें नाहीं. पण अमुक गोष्ट अमुक रीतीनें घडत नाहीं, अमुक रीतीनें घडते, असें ज्यास पक्कें समजून आलें आहे, तो जर लोकांचा गैरसमज दूर करण्याचें धैर्य न करील, तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार होऊन सुधारणा व सुखवृद्धि कशी व्हावी ? आपल्या इकडील तत्त्ववेत्त्यांत आणि शास्त्रज्ञांत एक मोठा दोष दिसून येतो तो हा कीं, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणें आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाहीं. " पुराणांतलीं वांगीं पुराणांत " अशा पद्धतीनें आमच्यांतील विद्वान् म्हणविणाऱ्यांचें वर्तन बहुधा होत असल्यामुळें दुर्मति, दुराग्रह आणि दुष्ट चाली यांचें ठाणें या देशांत कायम झाल्यासारखें झालें आहे. बाकी ज्या देशांत भास्कराचार्यासारखे ज्योतिषी होऊन गेले, त्या देशांत अजूनपर्यंत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण आलें असतां कांहीं वेळ थंड पाण्यांत निष्कारण बुड्या मारण्याची, उपवास करण्याची, भलभलत्या वस्तूंचीं दानें करण्याची, मूर्खपणाच्या मंत्राचा जप व सिद्धि करण्याच्या फंदांत पडण्याची, पापडलोणच्यांवर व दहींदुधावर तुळशीपत्रें घालण्याची, आणि जणूं काय आपणांस सुतक्यानेंच स्पर्श केला आहे कीं काय असें समजून स्त्रीपुरुषांनीं धोत्रापात्रांसकट डोक्यावरून पाणी घेण्याची चाल अजूनपर्यंत दृष्टीस पडावी काय ? पण आमच्या भास्काराचार्यासच हा प्रकार अप्रशस्त म्हणण्याची छाती

कोठें होती ? भास्कराचार्यांचें भास्काराचार्यत्व फक्त वेधशाळेंत ! आचार्य तिच्याबाहेर पडले कीं, " यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयम् " या उपदेशाचे अनुयायी ! ग्लालीलिओ-कोपरनिकसादि युरोपीय ज्योतिर्विदांनीं अशा प्रकारचेंच आचरण केलें असतें तर युरोपांत ज्ञानरवीचा प्रकाश फांकून अज्ञानतिमिराचा विध्वंस झाला असता काय, व आज त्या खंडास जो सुदिन प्राप्त झाला आहे तो होता काय ? तसें इकडे व्हावें अशी इच्छा असेल, तर लोकापवादाचें भय टाकून अपाल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें, व तदनुसार वागण्याचें धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊं लागलें, तरच अज्ञानराहूनें ग्रासलेल्या या आमच्या हतभाग्य देशाचें ग्रहण लौकर सुटणार आहे !

◆ ◆ ◆

११ : : सामाजिक सुधारणा आणि कायदा

सुधारणेचा शब्दांतःपुराच्या बाहेर संचार होऊं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या नानाविध धर्मकल्पनांशीं तुमुल संग्राम करण्यास ज्यांस स्फुरण यावें, त्याच्या भोंवताली उभारलेल्या प्रचंड लोकमतटांस ढांसळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनीं सरबत्ती द्यावी, व त्यांस गराडा घालणाऱ्या रूढिखंदकावर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनीं प्रवृत्त व्हावें अशा विचारसंपन्न लोकांनीं दुराग्रहाच्या भरी भरून व शुष्क बाबतींत दुही माजवून आपल्या मुख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

'नवखंड पृथ्वी व दहावें खंड काशी' यापुढें ज्यांच्या भूगोलविषयक कल्पनांची धांव जात नाहीं, वेदाचा अर्थ कालत्रयी होणें नाहीं अशी दृढ समजूत असूनही त्यांतच मनुष्यास आवश्यक अशा सर्व ज्ञानाचा गड्डा आहे असा ज्यांचा पक्का ग्रह झाला आहे व प्राचीन ऋषिप्रणीत आचारांहून सुखकर असे आचार असूं शकतील अशा नुसत्या कल्पनेचाहि विटाळ न होऊं

देण्याविषयीं जे अत्यंत दक्ष आहेत, तात्पर्य 'पुराणमित्येव हि साधु सर्वं' या महामंत्राच्या प्रभावापुढें पदोपदीं येणाऱ्या असंख्य नडी ज्यास साह्य झाल्या आहेत अशा लोकांनीं नुसतें कायद्याचें नांव ऐकिलें नाहीं तोच वेडावून जाऊन माधवबागेंतील सत्तेचाळीसेतरांवर ताण करून सोडावी हें अगदीं साहाजिक आहे. परंतु ही सीमा ओलांडून पुढें गेलेल्या ज्ञानविशिष्ट म्हणविणाऱ्या लोकांनीं कायद्याच्या विरुद्ध इतकें काहूर कां माजवावें याचा मात्र आम्हांस उमज पडत नाहीं. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांच्या मध्यें अपरिहार्य एकनाड असल्यामुळें त्यांचें जुग कधींही जमावयाचें नाहीं असें जें कित्येक सामुद्रिकांनीं गणित केलें आहे त्यांत आमच्या मतें कांहीं चूक झाली आहे, व ती दाखविण्याचा प्रयत्न केला असतां तिकडे शांतपणानें नजर फेंकण्याची जर ते तसदी घेतील तर हा वाद मिटून उभय पक्षांत समेट होणें केवळ दुरपास्त आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सामाजिक सुधारणेंत कायद्याची मदत घेणें अनर्थावह आहे असें प्रतिपादणाऱ्या मंडळींच्या आजपर्यंतच्या वाटाघाटींत आम्हांस जितका दुराग्रहाचा भाग दिसून येतो तितका योग्यायोग्य विचार दिसून येत नाहीं असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. सकृत्दर्शनी ज्यांत कांहीं अर्थ आहे असें भासतें असें काय तें एकच कारण पुढें आलें आहे. बाकी सर्व शब्दजाल, हट्टवाद व पुराणप्रियतेच्या संस्काराची अवशिष्ट झांक यांचेच अकांडतांडव आहे व तें कारण हेंच कीं आमचें सरकार परकें, त्यांचा धर्म वेगळा, त्यांचे रीतिरिवाज भिन्न, तेव्हां अशा सरकारास आपल्या समाजव्यवस्थेंत हात घालूं देणें अत्यंत भयावह आहे; याचे परिणाम फारच अनिष्टकारक झाल्यावांचून राहणार नाहींत; व याबद्दल मागाहून पस्ताव्यांत मात्र पडावें लागेल. आतां हा कोटि-क्रम करणाऱ्यांस आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, सामाजिक गोष्टींत आज-पर्यंत सरकारनें जें औदासिन्य पत्करलें आहे त्याचें कारण तसें करण्यास आम्हीं त्यास परवानगी देत नाहीं इतकेंच आहे काय ? मुसलमान लोकांनीं एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन आम्हांपैकीं कित्येकास बाटविलें त्या वेळीं तसें करण्याविषयीं आम्ही त्यांस परवाना दिला होता काय ? किंवा आमच्या समाजव्यवस्थेंत ढवळाढवळ करण्यास सरकारनें मनांत आणलें तर तें आज असमर्थ आहे असें तरी मानतां येईल काय ? तात्पर्य,

सरकार सामाजिक बाबतींत उदासीन असण्याचें कारण तसें करण्यास आम्ही त्यास संधि देत नाहीं इतकेंच काय तें, बाकी आम्ही त्यास आमच्या घरगुती गोष्टींत हात घालण्यास केव्हां विनंति करूं म्हणून तें अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात आहे व एकदां का त्यास आपणांकडून जराशी फूस मिळाली कीं कायद्यामागून कायदे करून आमच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा भंडवडा करून आम्हांस ते त्राहि करून सोडतील, वगैरे विचारांत जर कांहीं तथ्य असेल तर मग "आपण कोंबडी झांकली कीं उजाडावयाचें राहिलेंच" असें मानणाऱ्या म्हातारीच्या समजुतींतही तथ्य नाहीं असें कोण म्हणेल ?

दुसरें, सती जाण्याची चाल जी सरकारनें बंद केली त्यापासून आमच्या धर्मांतही प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार डगमगणारें नाहीं असें सिद्ध झालें नाहीं काय ? किंवा जो पुनर्विवाह हिंदुधर्मशास्त्रानें बेकायदेशीर ठरविला होता तोच कायदेशीर ठरविण्याविषयीं कित्येकांनीं आपण होऊन विनंति केल्यावरून तो कायदेशीर ठरविण्यास आज ३४ वर्षें झालीं असून त्या वेळीं मिळालेल्या फुशीचा त्यांनीं अद्याप पावेतों फायदा घेतला नाहीं हें कसें ? इंग्लंड देशांत बारा वर्षांच्या आंत पुरुषाचें लग्न झाल्यास तें बेकायदेशीर आहे. परंतु येथें पाळण्यास बाशिंगें बांधणेंहि कायदेशीर असून १० वर्षांच्या आंतील स्त्रियेशीं प्रत्यक्ष नवऱ्यानें संभोग केला असतां त्याजवर जबरी संभोगाचा आरोप शाबीत होतो असें कलम पीनल कोडांत कोठून आलें ? तात्पर्य सामाजिक गोष्टींत आर्धीच सरकारनें हात घातला आहे; असें असतां आणखी अमुक एक गोष्टींत असा असा कायदा करा अशी सरकारास विनंति केल्यानें त्यास आमच्या सामाजिक गोष्टींत आयतीच ढवळाढवळ करण्यास फूस सांपडेल अशा समजुतीवर कायद्याचा निषेध करीत बसणें म्हणजे वास्तविक पाहतां आम्हांस पुढें जावयाचें नाहीं हेंच जगास जाहीर करणें होय.

आतां आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा आवश्यक वाटतात त्या सर्व कायद्याच्या मदतीनें सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं किंवा त्यांपैकीं कांहीं कायद्यानें सुसाध्य असल्या तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्ही इच्छीत नाहीं.

परंतु यार्चे कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हे; किंवा सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें गैरशिस्त आहे अशा सामान्य सिद्धांताचा आम्ही अंगिकार करतों असेंही नव्हे. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें, तथापि त्यानें तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबन्धन या दोहोंसही मर्यादा आहेत. या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यांपासून एकंदर समाजाचेंच नुकसान होणारें आहे. व्यभिचार हा एक पुण्यमार्ग आहे असें कोणत्याही धर्माचा मनुष्य प्रतिपादणार नाहीं. परंतु एवढ्यावरूनच व्यभिचार करणाऱ्यांस कायद्यानें शिक्षा टरवावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढें आला असतां सर्व विचारी लोक एकदम हो म्हणण्यास तयार होणार नाहींत. त्या व्यभिचारापासून समाजाचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे कीं काय ? या प्रश्नाचा प्रथम विचार केला पाहिजे. तसेंच दारू पिणें हें जरी वाईट आहे तथापि ती पिणाऱ्या व्यक्तीपासून समाजास त्रास पोहोंचल्यावांचून त्याच्यावर कायदा लागू करणें न्याय्य होणार नाहीं. तात्पर्य एखादी गोष्ट आपणास कितीहि चांगली वाटली तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणांस अधिकार नाहीं. आपण पाहिजे तर त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा परंतु यापुढें मात्र आपणांस जातां येणार नाहीं. वरील विचारांवरून हेंही ध्यानांत येण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या आचाराविचारापासून समाजाचें नुकसान नसता तो आचारविचार बदलण्याची समाजास सक्ती करतां येत नाहीं त्याचप्रमाणें आधीच जर समाजानें सक्ती केली असेल तर ती नाहींशी करणें हेंहि समाजाचें कर्तव्य होय व तें बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधी जें सरकार त्यानें पुढें झालें पाहिजे. पातिव्रत्यसंरक्षणार्थ स्त्रियांनीं आपणांस पतिचितेवर जिवंत जाळून घ्यावें हें अत्यंत मूर्खपणाचें, अविचाराचें व साहसाचें कृत्य होय असें समजून लोकांची वाट न पहातां सरकारनें एकदम या कामीं कायदा करून ती क्रूर चाल बंद केली. एखाद्या स्त्रीचा पति निवर्तला असतां तिनें दुसरा पति करूं नये अशी जी पातिव्रत्यसंरक्षणार्थ दुसरी सक्ती समाजानें केली आहे तीही व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध

आहे हें सरकार जाणून होतें. परंतु सतीच्या चालीइतकी ती अमानुष नसल्यामुळें त्यांनीं कांहीं दिवस वाट पाहिली व योग्य काल आला असें दिसतांच तीहि सक्ती दूर करून पुनर्विवाह कायदेशीर मानला जाईल, म्हणून ठराव केला. आतां पातिव्रत्यसंरक्षणार्थ समाजानें केलेली तिसरी सक्ती म्हटली म्हणजे केशवपन होय. या केशवपनाच्या प्रघाताचें मंडन करणाऱ्या लोकांनीं त्यापासून किती जरी फायदे दाखविलें व त्यास किती जरी संमत असला तथापि ज्या स्त्रीचें वपन होणार तिची इच्छा नसतां व ती एकसारखा हंबरडा फोडून आपणांस या ममताळू वैऱ्यांच्या तावडींतून कोणी सोडवील काय म्हणून गयावया होऊन चोंहीकडे दृष्टि फेंकीत असतां तिला जुलमानें न्हाव्यापुढें बसविणें किती निंद्य आहे व अशा रीतीनें तिचें स्वातंत्र्य हिरावणें म्हणजे केवढा घोर जुलूम आहे हें सिद्ध करीत बसण्याची आमच्या मतें मुळींच आवश्यकता नाहीं. ज्यांच्यावर हा घोर प्रसंग गुदरतो त्या परावलंबी अबलांची ही विटंबना कितपत मानवते हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या समवयस्क मैत्रिणींवांचून दुसऱ्यांस सहसा सांगतां येण्यासारखें नाहीं ! तथापि त्याची अटकळ कल्पनेनें अगदींच बांधतां येणार नाहीं असें नाहीं. ज्यानें आपणांस जन्म दिला, आपणास लहानाचे मोठे केलें, व आपल्याकरितां अनंत कष्ट साहिलें त्या बापाच्या नांवानें मिशा काढण्याचा प्रसंग दुर्दैवानें आला असतां केवळ चटावर काम उरकून घेण्यास पुरुष कसे तत्पर असतात; १५—२० दिवसांनीं मुंडण केल्याचा मागमूसही राहण्याचा संभव नसून तें टाळण्यास काय काय उपाय योजतात व मुंडण केल्यावांचून गत्यंतर नाहीं असा प्रसंग आला असतां, आपल्या बापाविषयीं आपली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकरितां ज्यांनीं आपलें मुंडितमुख मोठ्या गर्वानें लोकांस दाखवीत फिरावें तेच लोक अंधारकोठडींत कशी दडी देतात हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यास स्त्रियांच्या मनाची स्थिति कशी होत असेल याची कल्पना करणें कठीण नाहीं ! लहानपणापासून ज्यांची जोपासना केली, ज्यांस न्हाऊं माखूं घालून वाढविलें, ज्यांस नाना भूषणांनीं शृंगारिले असे केश क्षणार्धांत नाहींसें होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास पात्र होणार व पंधरावीस दिवसांनीं पूर्वस्थिति येण्याची तर अशा नाहींच, परंतु उलटें ज्यांचें मुखावलोकनही करावयास नको अशा त्या परक्या

नापिकापुढें दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार हे विचार मनांत येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी नुसती कल्पनाही करतां येत नाहीं. आपल्या अत्यंत जवळच्या आतांच्या किंवा आपल्या स्वतःच्या प्रिय कन्येच्या अशा हालअपेष्टा पाहण्याचें ज्या हतभाग्यांच्या कपाळीं आलें असेल त्यांचीं अंतःकरणें दुःखोद्वेगानें विव्हल झाल्यावांचून कदापि राहिलीं नसतील.

तात्पर्य, दुसरें लग्न करण्याची इच्छा असूनही तसें करण्यास कायद्याची आडकाटी असणें यांत जितका अन्याय आहे त्याहूनही या विद्रूप करण्याच्या घोर चालींत अधिक अन्याय व प्रत्यक्ष जुलुमाचा प्रकार आहे हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे व तो अन्याय नाहींसा करण्यास कित्येकांनीं अर्ज करून कायदा करून घेतला असतां, त्याहून अधिक अन्यायाचा व जुलुमाचा प्रकार बंद करण्याकरितां 'अमुक वयाच्या आंत मुळींच वपन करूं नये व त्यापुढेंहि तें स्त्रीच्या मर्जीविरुद्ध होऊं नये,' असा कायदा मागणें हें केवळ परंपरेस धरूनच आहे; यांत नवीन असें कांहीं एक नाहीं.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं परंतु काळ सोकावतो' या न्यायावरच कायद्याचा प्रतिषेध करीत बसणें केवळ वेडगळपणाचें आहे, कारण सरकारनें सामाजिक गोष्टींत आधींच हात घातला आहे; तसेंच ज्या कांहीं सामाजिक गोष्टींत सरकारनें कायदे केले आहेत, व ज्या दुसऱ्या गोष्टींत कायदा असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे, त्यामध्येंही त्या त्या गोष्टी सामाजिक या सदराखालीं मोडतात किंवा नाहीं हा वाद अप्रासंगिक होय; व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या योग्य मर्यादा आहेत त्यांचा अतिक्रम होतो कीं काय, एवढ्याच धोरणानें कायदा असावा कीं नाहीं हें ठराविलें पाहिजे, व सरकारनें जो सती जाण्यास प्रतिबंध केला, किंवा विधवेचें बेकायदेशीर मानलें जाणारें लग्न कायदेशीर ठराविलें तेंही वरील तत्त्वास अनुसरून केलें व विधवावपनाची चाल बंद करण्यास कायद्याची मदत असावी म्हणून जें कित्येकांचें मत आहे तेंही वरील तत्त्वावरच अवलंबून आहे, वगैरे विचार वरील लेखांत दाखविले. या लेखांत बालविवाहाची चाल बंद करण्यास कायद्याचें साह्य घ्यावें असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, याविषयीं दोन शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत घातक आहे याविषयीं आतां बहुधा मतभेद राहिला नाहीं. तसेंच या दुष्ट चालीच्या तावडींतून आपण सुटलों असें म्हणतां येण्यास, मुलगी निदान १५-१६ वर्षांची होईपर्यंत व मुलगा २०-२२ वर्षांचा होईपर्यंत त्या उभयतांचाही 'नीतिशास्त्रां'त प्रवेश होऊं नये, हेंही पुष्कळांस संमत आहे. परंतु हें घडवून आणण्यास कोणते उपाय योजावेत याबद्दलच काय तो वाद राहिला आहे. एका पक्षाचें म्हणणें असें पडतें कीं, ही गोष्ट लोकांनींच आपल्या शिरावर घेतली पाहिजे; दुसऱ्या पक्षाच्या मतें केवळ लोकांवरच ही जबाबदारी सोंपविण्यापेक्षां, सरकार व लोक या उभयतांच्या साह्यानें हें काम शेवटास नेण्याचा प्रयत्न करणें, नुसतें इष्ट आहे, इतकेंच नाहीं, तर तसें केल्यावांचून या बाबतींत आमचें पाऊल खात्रीनें पुढें जाण्याची फारशी आशा नाहीं. आतां सती जाण्याची चाल बंद करण्यास किंवा विधवाविवाह कायदेशीर ठरविण्यास जीं कारणें होतीं, किंवा विधवावपन बंद करण्यास जीं कारणें आहेत, तींच या बालविवाहाच्या चाली-सही पूर्णपणें लागूं होतात, असें मात्र म्हणतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या योग्य मर्यादांचा जसा प्रत्यक्ष अतिक्रम वरील गोष्टींत होतो, तसा बालविवाहाच्या चालींत उघडपणें भासत नाहीं. या बाल-विवाहाच्या चालीमुळें लक्षावधी मुलांचा १२ दिवसांच्या आंतच मोक्ष होत असला, १६-१७ वर्षांतच मुलें बाप बनल्यामुळें त्यांची तारुण्यां-तील हिम्मत व महत्त्वाकांक्षा सर्व जागच्या जागीं जिरून जात असली, किंवा ७-८ वर्षांपासूनच आईबापांच्या ममतेस पारखी होऊन, सासरच्या माणसांच्या धाकानें मुलीचें सर्व व्यक्तित्व नाहींसें होऊन संसाराचा गाडा हांकण्यास ती सर्वतोपरी लंगडी होत असली, तथापि त्यांत काय झालें ? त्यांत घोर अनर्थ तो कोठें घडला ? व तो बंद करण्यास कायदा कशास पाहिजे ? असा एक पक्ष करतां येण्यासारखा आहे हें आम्ही जाणून आहों. आतां "कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली ॥ पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली ॥" अशी स्थिति होऊन जाऊन ज्यांस मृत्युपाशानें घेरल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत, अशा '९ वर्षांच्या थेरड्यास 'नवरा मुलगा' सजवून एखाद्या ७-८ वर्षांच्या अल्लड लेंकरास बाहुल्यावरच 'रंडकी' करण्यांत ज्यास अनीतीचा यत्किंचित्हि भाग

दिसत नाहीं, व तिचा मात्र पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम्' 'अब्रह्मण्यम्' म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार,अशा लोकांस, आईबापांनीं व सासुसासऱ्यांनीं, केवळ आपल्या हौसेखातर सजीव बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावण्याचा खेळ खेळल्यापासून, 'तुमचा खेळ होतो परंतु, आमचा जीव जातो' असें म्हणण्यास कशी जागा सांपडते हें कळूं नये हें अगदीं असावें तसेंच आहे. तसेंच एकाद्या चोरट्या सुनेस ओळ लावण्याकरितां तापल्या पळीनें डागणें, किंवा तिला उलटी टांगून तिच्या पाठीचीं सालडीं काढणें हें जसें सासूचें कर्तव्यच आहे त्याप्रमाणें पुढें मागें वाईट पाऊल पडेल एवढ्या संशयाच्या आरोपावरून एखाद्या बालविधवेची न्हाव्याकडून घिंड काढविणें हें केवळ यथान्याय आहे अशीच ज्यांची समजूत अशा लोकांनीं बालविवाहाच्या कायद्याच्या आड यावें यांतही कांहीं विलक्षण नाहीं; व 'ही राष्ट्रीय सभा नुसत्या ब्राह्मणांचीच आहे व यापासून ब्राह्मण लोक आपलाच फायदा करून घेत आहेत' असे आजागळासारखे प्रलाप करणारे लोक वेडे आहेत म्हणून जसें सरकारनें ते जमेस घरण्यासारखे नाहींत तसेंच वरील लोकांचीही सल्लामसलत घेण्याचें सरकारास कारण नाहीं. परंतु राजकीय गोष्टींत मत देण्यास ज्यांस अधिकार आहे अशा सुशिक्षित लोकांत या बाबतींत केवळ एकमत जरी झालें नाहीं तरी कायदा असावा असें बहुमत झाल्यावांचून मात्र कायदा करणें योग्य होणार नाहीं हें उघड आहे.

आतां ज्या गोष्टींत प्रत्यक्ष अन्याय किंवा जुलूम होत नसेल असे समाजांतील दोष कायद्यानें काढूं पाहणें योग्य नाहीं असें आम्ही पूर्वी दर्शाविलें असून या चालीच्या निरसनार्थ कायद्याची मदत घ्यावी असें कां म्हणतों, हें प्रथम सांगितलें पाहिजे. बापानें मुलास, पंतोजीनें शिष्यास किंवा भाडेकऱ्यानें आपल्या तट्टास, ममतेनें, मन वळवून, चुचकारून मार्गास लावावें हा प्रथम पक्ष, परंतु तशानें सर्वच प्रसंगीं कार्यभाग होतो असें नाहीं. कधीं मुलास बागुलबोवाचें भय दाखवावें लागतें, कधीं शिष्यास घोडी-वर चढविणें भाग पडतें; व तट्टास बाभळीच्या फोंकावांचून दुसरा उपाय अपुरा पडतो. तीच गोष्ट प्रस्तुत प्रसंगींही लागूं आहे. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, त्याचा व समाजाच्या हिताचा फार निकट संबंध आहे, तेव्हां एकदां

कशीं तरी पोरांचीं हाडें भाजून काढलीं कीं, घोडें न्हालें, गंगेंत असें समजून काळ वेळ वगैरे कांहीं न पाहतां, जीं आईबापें आपल्या मुलांमुलींस चतुर्भुज करण्याविषयीं अगदीं हावरीं झालेलीं असतात, त्यांनीं आपलें कर्तव्य जाणून स्वसंतोषानें हा 'पोरखेळ' सोडावा हा तर राजमार्ग. परंतु आईबापांच्या अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें तीं तसें करण्यास तयार नसतील, तर त्यांस कायद्याच्या बागुलबोवानें भिवविणें अर्थात् अवश्य होतें. आतां नुसत्या आईबापांच्या धाकानें किंवा शिक्षकाच्या दबकावणीनें मुलांची सर्व सुधारणा होणार नाहीं. मुलानेंहि कांहीं उमजलें पाहिजे हेंही खरें. परंतु चवदाव्या रत्नाच्या भीतीनें एकदां त्यास वळण लागलें म्हणजे हळूंहळूं त्या वळणाच्या गोडीनेंच त्याची सुधारणा होत जाते. तसेंच बालविवाहाची चाल मोडून योग्य कालीं विवाह होऊं लागण्यास केवळ कायदा बस्स आहे असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. कायद्यानें फारच थोडा टप्पा साधणार आहे, पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर पाहिजे, त्यावांचून तो आवरणार नाहीं हें उघड आहे. कायदा फार झालें तर मुलीच्या बाबतींत १०—१२वर्षांपर्यंत मजल मारील किंवा मुलाच्या बाबतींत १६—१७ वर्षांपर्यंत विवाहमर्यादा नेईल. परंतु एवढ्यानेंच आपणांस समाधान मानून बसतां येत नाहीं, आपणांस त्याच्या पुष्कळ पुढें गेलें पाहिजे. कायद्याच्या योगानें इतकेंच होईल कीं, १०-१२ व १६—१७ ही मर्यादा तरी कायमची झाल्यासारखी होईल. आजामितीस ज्या लोकांस या दुष्ट चालीचे परिणाम माहीत नाहींत तेच याच्या पूर्वी लग्नें करतात असें नाहीं; ज्या लोकांस आपली चूक पूर्णपणें दिसत असते अशाही लोकांस मुलगी ७—८ वर्षांची झाली नाहीं तोंच व मुलांस १२ वें वर्ष लागलें नाहीं तोंच त्यांच्या लग्नाच्या फिकीरींत पडावें लागतें. कारण, जातिभेदामुळें वधूवरांची निवड करण्यास फारच आकुंचित प्रदेश असल्यामुळें, व त्यांतल्या त्यांत नवीन शास्त्रार्थ मध्यें घुसून ब्राह्मणांतल्या ब्राह्मणांतच देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, असे वर्ग उत्पन्न झाल्यामुळें आपण आपली मुलगी किंवा मुलगा वाढविला असतां त्यास पुढें योग्य स्थळ कसें मिळेल ही काळजी आईबापांपुढें दत्तासारखी उभी राहून त्यांचे सर्व सुधारणेचे विचार जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्याचे हात बांधून टाकून तो कांहीं उद्योग करीत नाहीं म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचें नाहीं. तसेंच

सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर करतां येण्यासारख्या असूनही त्या दूर न करतां " क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे " असा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करीत बसणें, व जी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं, तीच दुसऱ्यांनीं न केल्याबद्दल त्यांचा उपहास करीत बसणें केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा केवळ स्वतःपुरताच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्यानें स्वतःस झीज लावून घेऊन धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहिताशीं प्रत्यक्ष संबंध पोहोंचतो अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरितां, आपले व आपणावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें हें सर्वथा योग्यच आहे असें खात्रीनें म्हणतां येण्यासारखें नाहीं. तात्पर्य, बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे तथापि इतरांचाही तसा आहे किंवा नाहीं याविषयीं साशंक असल्यामुळें व आपल्या मुलाबाळांचें हिताहित पाहणें विशेष महत्वाचें कर्तव्य असल्यामुळें, त्या विचारांचा आचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येते ती ह्या कायद्यानें दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०–१२ वर्षांच्या आंत होणार नाहींत. किंवा सर्वच मुलांची १६–१७ वर्षांपूर्वी होणार नाहींत अशी कायद्यानें हमी घेतली असतां सर्वांचीच काळजी दूर होईल व आपलें एक तरी पाऊल पुढें पडलें असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय १०–१२ वर्षांच्या कांहीं मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांची धर्मसमजूत आडवी येते असेंही म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, अशा बाबतींत सामान्य दृष्टीनें पाहतां कायद्याची मदत घेणें जरी सर्वांशीं ग्राह्य नाहीं तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिति ही मनांत आणतां हें आमचें निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोंकावांचून सहसा हलणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

आपल्या सुशिक्षित मंडळींस खरोखर आपली सुधारणा व्हावी ही गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मतें त्यांनीं या कायद्याच्या आड येण्याचें कारण नाहीं. बाकी सुधारणाच नको असेल तर मग खुशाल ' थंडे सुधारक ' व ' उतावळे सुधारक ' वगैरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसावे.

आम्ही जसा कायदा असावा असें सुचविलें आहे त्यांत वावगें असें कांहीं-एक नाहीं, त्याच्या योगानें समाजाच्या धर्मसमजुतीस धक्का पोहोंचण्याचें भय नाहीं. त्याच्या योगें पुष्कळांस इष्ट असणारी सुधारणा अनायासानें होणारी आहे व तीही फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आहे, 'तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाही हजर आहेत हें पाहून मला फार आनंद होतो' असे मि. ब्राडलॉचे उद्गार ऐकून टाळ्यांचा गजर करून सोडणारे हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील तर या कायद्यानें विवाहमर्यादा कायमची १०—१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी ज्यास जसें इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे, अशा विचारानें ते या कायद्याच्या आड येणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. १०—१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्यानें पुष्कळ बालवधूंचें कुंकूं पुसलें जाणार नाहीं; अशा मुग्ध वयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्यामुळें, त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यांसही संधि राहणार नाहीं, व आईबापांच्या बेचाळीस कुळांचा उद्धार होण्याचें थांबून त्या लेकरांचाही पुष्कळ जाच अनायासें दूर होईल. पेनाच्या एका तडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपही या कायद्यावर आणतां येण्यासारखा नाहीं. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेंच तयार झालें पाहिजे ही गोष्ट हा कायदा विसरला नाहीं. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असतां बेचाळीस कुळ्या नरकांत जाणार ही वेडगळपणाची समजूत दूर करणें म्हणजे एकादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखें आहे व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे, तें मात्र कायद्यानें होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गति देण्याचें काम मात्र कायद्यानें होणारें आहे. आगगाडी चालूं लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण असला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगानें जर्जर झाला असतां नुसत्या मात्रेच्या वेढ्यानें त्यास म्हणजे पूर्ण उतार पडून तो धडाकट्टा होतो असें नाहीं तर त्याच्या योगानें केवळ प्राण मात्र बचावतो. तशीच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंधही नाहीं. ज्या सरकारच्या न्यायप्रियतेवर आमचा इतका विश्वास आहे

कीं, आम्ही सर्वस्वीं गुलाम बनलों आहों तथापि त्याच्याच मदतीनें आम्ही स्वतंत्र ज्ञानप्रद होऊं असा आमचा पूर्ण भरंवसा आहे; ज्यांच्या केवळ भूतदयेनें असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी भिन्नवर्णी व हजारों कोसांच्या अंतरांवर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठीं अविश्रांत श्रम करणारे मि. ह्युम, मि. ब्राडलॉ ह्यांच्यासारखे शेंकडों उदार महात्मे ज्या लोकांत निपजतात, त्या लोकांनीं नियंत्रित अशा हिंदुस्थान सरकारापाशीं आम्हीं कायदा मागितला असतां काय परिणाम ओढवतील कोण जाणे म्हणून बळेंच आपण म्याल्यासारखें दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिवाविण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंड्या सुधारकांपासून ईश्वर आम्हांस वांचवो ! आम्हांस त्यांची प्राणघातक माया नको ! ज्यांच्याकरितां एकादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेनें प्रत्यक्ष जुलूम होत असूनहि ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व अशा लोकांसच जर योग्य रीतीनें ' थंडे सुधारक ' म्हणतां येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करितां अंशतः प्रतिबंध करण्यास साधनीभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस ' उतावळ्या सुधारकां'त ओढून, तुला न मला घाल कुत्र्याला, असा प्रकार सुशिक्षित म्हणाविणाऱ्या लोकांनीं कां करावा हें आम्हांस समजत नाहीं !

मराठी वाङ्मय परिषद
वा. सं. ७०९५

१२ : : सामाजिक घडामोड

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावायचे असले तर किती त्रास पडतो हें सर्वांस माहित आहेच पण हेच दगड चुन्यांत पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि त्यांतहि पहिली इमारत बांधल्यापासून बरींच वर्षें लोटलीं असली, व चुन्याचा आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हें कोणास

सांगावयाला पाहिजे असें नाहीं. तात्पर्य, कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यांपासून एक पिंड केला असतां तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणें हें अतिशय कष्टाचें काम आहे हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे.

सामाजिक घडामोडीचाही असाच प्रकार आहे. प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभीं हें शरीर समजातीय द्रव्याचें झालेलें असून, पुढें तें जसजसें वाढत जातें तसतसें त्यांत विषम जातीत्व उत्पन्न होतें; व ज्या मानानें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें त्या मानानें त्यांत अधिकाधिक दार्ढ्य उत्पन्न होऊन बाह्य संस्कारांत तें अधिकाधिक प्रतिबंध करूं लागतें. कोवळे वेळू, लहान झाडांच्या खांद्या किंवा तरुण मुलांचे अवयव यांत किती लवचिकपणा असतो बरें ? वाढ खुंटून प्रत्येक अवयवांत काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चांगली कसरत शिकतां येत नाहीं, ही प्रत्येकाच्या पाहण्यांतली गोष्ट आहे. सामाजिक शरीरांतही परिणतीमुळें अशाच तऱ्हेचें काठिण्य उद्भूत् होतें. कोणताही समाज एकदां वाढीस लागला, आणि श्रमविभागामुळें त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झालें, व त्यांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करूं लागले म्हणजे त्यांचें रूपांतर करूं पाहणाऱ्या गोष्टींस त्यांकडून मोठा प्रतिबंध होऊं लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार यांसंबंधानें ज्या रीति एकदां रूढ होऊन जातात त्यांत फिरून बदल करणें अत्यंत दुरापास्त होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या चालींत विचारदृष्ट्या कितीहि विसंगतता दिसली तरी त्या सोडणें किती जिवावर येतें, हें बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालींचा विचार करतां तेव्हांच लक्षांत येणार आहे. समाजांतील शेंकडा नव्याण्णव लोकांची स्थिती अंधपरंपरेप्रमाणें असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानेंसुद्धां आपणावर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल, असा धाक त्यांस क्षणोक्षणीं वाटत असतो.

याचसंबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशी:— ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें पृथक्-पणानें करून एकमेकांस साहाय्य करतात, त्याप्रमाणें सामाजिक शरीरांतील निरनिराळे भागही आपापलीं कार्यें स्वतंत्रपणें करून इतरांस मदत करीत

असतात. पण पुढें असाही प्रकार घडून येतो कीं, समाजाच्या एका स्थितींत ज्या वर्गाची आवश्यकता असते तो वर्ग समाजाचें स्थित्यंतर झाल्यामुळें अगदीं निरुपयोगी झाला तरी, सहसा नाहींसा होत नाहीं. उदाहरणार्थ, बडोद्यासारख्या संस्थानांतील बारगीर घ्या. यांचें आतां कांहीं एक प्रयोजन नाहीं; पूर्वी यांच्याकडून जी कामगिरी होत असे तिची आतां गरज राहिली नाहीं. तथापि त्यांचा चरितार्थ चालविणें संस्थानास भाग पडत आहे. या बारगिरांप्रमाणेंच आमच्या बहुतेक संस्थानिकांची, जहागीरदारांची, त्यांच्या सैन्यांची, निरनिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची, धर्माधिकाऱ्यांची व त्यांच्या मठांची, कित्येक धंदेवाल्यांची, आणि अनेक आचारांची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें वार्धक्यामुळें श्रम करण्यास अयोग्य ठरलेल्या लोकांस नोकरीवरून दूर करून त्यांचे जागीं नवीन लोकांची योजना केली तरी पेन्शनदार करून ठेवावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचें स्थित्यंतर होऊन त्यांतील कोणताही वर्ग निरुपयोगी ठरला तरी त्याचा बोजा बरींच वर्षें समाजास वहावा लागतो. कारण ज्याप्रमाणें कोणत्याही व्यक्तीस आपण होऊन पंचत्वास मिळणें आवडत नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या कोणत्याही अवयवास तें आवडत नाहीं. व्यक्तीप्रमाणेंच समाजाचे अवयवही आपापलें अस्तित्व दीर्घतम करण्याविषयीं झटत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरून समाजाचें रूपांतर होण्यास किती प्रत्यवाय असतात हें वाचकांच्या लक्षांत बरेंच आलें असेल. तथापि ज्यांच्या मनांत ही गोष्ट अजूनही बरोबर उतरली नसेल त्यांच्या समजुतीसाठीं आणखी एकदोन गोष्टी सांगतों. समाजांतील लोकांचे नियामक आणि नियंते किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात, हें मागें सांगितलेंच आहे. या भागांपैकीं नियामक भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत भाग क्षीण होत गेला पाहिजे हें उघड आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारनें चालविलेलीं खातीं वाढत जातात त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल चालविणें वगैरे गोष्टींत त्या

सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखे असतात. खात्याखात्यांचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तीं पट्दिशीं एक होतात, आणि प्रजेशीं उद्भवलेल्या तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस साहाय्य करतात. शिवाय, निरनिराळीं खातीं परस्परांत कितीही विरुद्ध असली तरी प्रत्येक खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांचे वरच्या अधिकाऱ्यांशीं व मुख्य सरकाराशीं जे संबंध असतात ते सारे एकसारखेच असतात,व त्या सरकारचा आणि त्याबरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंही प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत एक प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, आणि " समानशीलव्यसनेषु सख्यं " या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं ते पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंत:करणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वीचा कितीहि सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो त्याचें हें गुह्य आहे. स्वसंरक्षणपरायणता व स्वाहितसाधनरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळांवर अवलबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांतसुद्धां येत नाहीं!

अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होतें ! मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं, लहानपणापासून जी स्थिति कितीही वाईट असली तरी तीच बरी वाटत असते. ज्यांना जन्मापासून स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्याचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जे जन्मापासून पारतंत्र्यांत वाढलेले असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें. आज मित्तीस आपणांपैकीं शिकलेले अनेक लोक स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास तयार आहेत, पण त्याचा उपभोग घेण्यास आमच्या स्त्रीवर्गाची कोठे तयारी आहे ? आम्ही तें त्यांना जबरीनें देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना त्यापासून सुख न होतां, उलट त्रास होतो. जे

हौशी लोक आपल्या बायका नाटक पाहावयास किंवा हवा खाण्यास बरोबर घेऊन जातात त्यांच्या डोळ्यांपुढें वरील विधानांचें यथार्थत्व आल्याशिवाय राहणार नाहीं! अशा प्रसंगीं स्त्रियांचा कावरेबावरेपणा, डोळे वर करून पाहण्याची व स्पष्टपणें बोलण्याची भीति, पुरुषांच्या मागोमाग चालण्यास वाटणारी शंका वगैरे गोष्टींमुळें त्यांची जी विलक्षण वृत्ति होते तीवरून अशा रीतीनें समाजांत येण्यापेक्षां घरांतल्या घरांतच रहाणें बरें असें त्यांस वाटत असावें असें स्पष्टपणें दिसत असतें. यावरून कोणी असें समजूं नये कीं, जी गोष्ट आमच्या स्त्रियांनीं पूर्वी कधींच न केल्यास आज त्यांना ती अवघड वाटत आहे, ती आपण त्यांच्याकडून कधींच करवूं नये, तसें करणें हें आपण प्रो. जिन्सिवाल्यांसारख्यावरच सोंपविलें पाहिजे! तथापि ज्या गोष्टींविषयीं आपण अपरिचित असतों ती प्रथम करूं लागतांना किती संकटावह होते, हें दाखविण्यासाठीं मात्र वरचें उदाहरण दिलें आहे; त्याहून येथें दुसरा हेतु नाहीं. तात्पर्य, जन्मादारभ्य ज्या गोष्टींची आपणांस संवय लागलेली असते, त्या गोष्टी इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या व त्यापासून अखेरीस आपलें केवढेंही नुकसान होण्याचा संभव असला, तरी त्या आपणांस बऱ्या वाटतात आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाहीं. दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्ही पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलों असल्यामुळें 'राजा कालस्य कारणम्' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हांस खोड! लोकशिक्षण असो; व्यापारवृद्धि असो; यांत्रिक शोध असो; मादक द्रव्यसेवननिषेध असो; सामान्य नीति प्रसार असो-काय पाहिजे तें असो, अगदीं शुष्क गोष्टीपासून मोठ्या महत्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय, व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचे हातून कांहीं एक होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा असें कोणी म्हटलें कीं केवढा अनर्थ करून सोडावयाचा कीं जशी कांहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे! म्हणजे काय कीं बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार

होत आहे त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमानें कवटाळावयाचें— अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे ! पण कांहीं अंशी ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांचीं अनेक शतकें गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्याचा बाऊ वाटावयाचा आणि पारतंत्र्यच सुखावह वाटायचें ! आम्हां अर्धवट सुधारलेल्या लोकांची तर कथा काय ? पण फ्रान्स व जर्मनी अशा सुधारलेल्या देशांतील तत्त्ववेत्त्यांसही न कळत अशा प्रकारची भूल पडते, हें आश्चर्य नव्हे काय ? सामाजिक नियंत्रण बलात्कारतत्त्वावर न होतां संमति-तत्वावर होऊं लागेल तेव्हांच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे, हें सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता ऑगस्ट कौंट बसला असून वाहतां वाहतां भलतीकडे जाऊं लागला ! संमतितत्त्वावर फ्रेंच समाजाची स्थापना करण्याकरतां त्यानें जी राज्यपद्धत वर्णिली आहे ती फ्रान्स देशांत आजपर्यंत रूढ असलेल्या राज्यपद्धतीहून अधिक सक्तीची आहे ! जर्मनींतील अलीकडल्या सामाजिक तत्त्ववेत्त्यांची विचारपद्धति अशाच प्रकारची आहे. यांनीं लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें ज्या राज्यपद्धतीचें विवरण केलें आहे त्या खरोखरीच अंमलांत आल्यास, व्यक्तिस्वातंत्र्य कोठें दृष्टीस पडेल किंवा नाहीं, याचीच शंका आहे ! तात्पर्य, हाडामांसास खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरें वाटतात असें नाहीं, तर त्यांतील दोष विचारी विद्वानांस देखील सहसा दिसत नाहींत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्यांच्यानेंही सहन होत नाहीं. त्यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलुमाचा असतो त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशीं कारण होतें. जों जों सरकारी अधिकारी अधिकाधिक सक्ती करितात तों तों प्रजेच्या अंगीं अधिकाधिक सहनशीलता येत जाते, व जों जों ही वाढत जाते तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलूम करण्यास सवड होतें. अशा रीतीनें एका बाजूनें औद्धत्य आणि दुसऱ्या बाजूनें नम्रता; एका बाजूनें चैन व दुसऱ्या बाजूनें कष्ट; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न हीं दोनही संयुष्टांत येऊं लागतात. हळूं हळूं साऱ्यांसच कमीअधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटते; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास ती कमी होऊं लागून अखेरीस

समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते ! तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवायची कीं, समाजाची उन्नति होण्यास एक प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामा नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या अंगीं एक प्रकारचें दार्ढ्य येऊं लागतें. व जों जों तीं व्यवस्था वाढत जाईल तों तों दार्ढ्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समाजांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानानें हा लवचिकपणा नाहींसा होत जातो त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो. म्हणून ज्यांच्या हातीं राज्यसूत्रें असतील त्यांनीं वरील विचार रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून, सरकारी अंमल अगदीं बेतापुरता चालवावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशांतील लोक चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हातपाय हालविण्यास अगदीं असमर्थ झाले असतील अशांस गाळांतून बाहेर पडून दोन पावलें टाकतां येण्यापुरती मदत सरकारनें अवश्य केली पाहिजे; पण त्यापुढें त्यांना आपल्या पायांनीं चालू न देणें म्हणजे त्यांस निरंतर पंगू करून ठेवून त्यांचें आणि त्याबरोबर आपलेंही नुकसान करून घेणें होय, हें अंमलदारांनीं कधींहि विसरतां कामा नये.

◆ ◆ ◆

१३ : : बंधनें कोण व कोणतीं घालणार ?

ज्यांना बसल्या जागेवरून हालावयाचें नाहीं, व 'जुनें तेवढें चांगलें,' असें वरकरणीं म्हणत बसून, जुन्या लोकांकडून गाजी म्हणवून घ्यावयाचें आहे, त्यांच्या अनेक लपंडावांपैकीं हा एक लपंडाव आहे कीं, कोणतीहि गोष्ट करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर न घेतां, ज्या गोष्टी कराव्या असें दुसरे लोक म्हणत असतील, त्यांतील दोष मात्र काढीत बसावयाचें. पण त्या करणें योग्य नसेल तर त्यांच्याऐवजीं दुसऱ्या कोणत्या कराव्या, हें स्पष्टपणें सांगण्याची छाती कधींहि करावयाची नाहीं ! कोठून करतील बापडे !

ज्यांच्या विचारांचा व आचारांचा धक्का काडीमोड झाला आहे, त्यांना अमुक प्रकारचें वर्तन चांगलें असें उघडपणें कोठून म्हणतां येणार ? भलतेंच करणें उचित आहे, असें म्हणावें तर मोठमोठ्या पदव्या मिळविल्या असून व विद्वानांत नांवाचा उच्चार होत असून, अज्ञान व अप्रबुद्ध मनुष्याप्रमाणें कांहीं तरी बडबडल्याचा दोष पदरीं येणार, व विचारानें प्रशस्त वाटलेल्या गोष्टीचा निषेध केल्याबद्दल काळजाला रात्रंदिवस टोंचणी लागणार ! बरें तसें न करावें, आणि मनास शुद्ध वाटत असेल तें उघडपणें बोलून दाखवावें, तर लोकांची इतराजी होऊन, लोकप्रशंसारूप चैतन्यहेतु आणि चैतन्याधार लयास जाणार ! अशा रीतीनें दोहों बाजूंनीं दोन प्रकारच्या इंगळ्या ज्यांस आपल्या तीव्र नांग्या मारीत आहेत, त्यांनीं सैरावैरा करूं लागून भलभलतेंच बडबडत सुटावें, बुद्धिमत्तेची व शहाणपणाची वृथा घर्मेंड मारीत बसून अमक्याची प्रोफेसरी जाईल अशा भीतीनें अमका अमक्याचा स्तुतिपाठ करीत आहे, असें म्हणावें आणि आपली प्रोफेसरी गेल्यामुळें, केवळ चरितार्थासाठीं घातलेलें ब्यारिस्टरीचें नवीन दुकान भरभराटीनें नीट चालावें म्हणून किंवा अविचारानें अथवा दुराग्रहानें जीं मतें एकदां चांगलीं म्हटलीं व प्रसिद्धपणें ज्यांचा एकवार अंगीकार केला त्यांच्या उलट मतांतील चांगलेंपण कबूल केलें तर वर्गणीदार कमी होऊन शिवाय मूर्खपणाहि पदरीं येणार–तें टळावें म्हणून द्रव्यार्जनासाठीं हवा तो धंदा करणाऱ्या समाजांतील अतिकनिष्ठ व्यक्तीप्रमाणें, दारावरून जें गिऱ्हाईक जाईल त्याला हाका मारमारून तो खूष होईल असा प्रलाप त्याच्यापुढें करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. असलें वर्तन फायद्याचा हिशोब चोख रीतीनें करतां येणाऱ्या गणित्यालाच साधण्या-सारखें आहे, व त्याच्या या शास्त्रांतील पांडित्याला जर कायद्याची थोडीशी फोडणी दिलेली असेल तर त्याला त्या वर्तनाची कुरूपता सामान्य लोक चकतील अशा रीतीनें छपवितां येणार आहे, हें आम्ही कबूल करतों ! ज्यानें तर्कशास्त्राची फक्त दहापांच पानें वाचलीं आहेत त्याला ही मयासुराची कला साधावयाची नाहीं, व ती साधण्याची तो पर्वाहि करीत नाहीं ! लोक कांहीहि म्हणोत, असला मनुष्य मिशा बोडून घेवून कर्मठ ब्राह्मणाच्या कळपांत शिरण्याची महत्वाकांक्षा न धरतां आपल्या मनास

शुद्ध वाटेल तें बोलतो, आणि " वटवाघुळाप्रमाणें माझी अवस्था झाली आहे " असे लाजिरवाणें शब्द स्वमुखांतून काढण्याचा शोचनीय प्रसंग स्वतःवर न यावा म्हणून समाजास न सोडतां आपल्या आचारविचारांत जितकी संगत ठेवतां येईल तितकी ठेवण्याचा प्रयत्न करतो. असो; आमच्याकडे असलेल्या कर्जाची आज ही अंशतः फेड केली आहे, येवढें येथें सांगतों, आणि असली तऱ्हेवाईक प्रस्तावना पुरी करून मुख्य विषयांकडे वळतो.

समाजाची सुस्थिति असावी, आणि त्यास हळूहळू उन्नतावस्था येत जावी, यासाठीं प्रत्येक अवस्थेंत त्याला कांहीं बंधनें असणें अवश्य आहेत, व त्याच्या घटकांनीं त्यांचा प्रतिपाल केला पाहिजे, हें सामान्य विधान ज्याप्रमाणें आम्हीं कबूल करतों, त्याप्रमाणें अनेक कारणांनीं प्रत्येक समाजाच्या स्थितींत एकसारखा फेरफार होत असतो म्हणून त्याच्या बंधनांतहि फेरफार होत गेला पाहिजे हें विधान पुराणप्रिय आमच्या प्रतिपक्ष्यांनीं कबूल केलें पाहिजे. कलह न होतां ज्या समाजांत सुधारणा होत असते त्या समाजाचे अज्ञ घटक न कळत किंवा जाणूनबुजून निरुपयोगीं झालेलीं जुनीं बंधनें टाकीत जातात, आणि नवीं लावून येतात. कालमान झपाट्यानें बदलत चाललें आहे, असें पाहून जुन्या लोकांनीं नव्या लोकांसाठीं आपली पुराणप्रियता किंचित् ढिली केली पाहिजे व नव्या लोकांनीं जुन्या लोकांसाठीं आपली नवाप्रियताहि थोडीशी कमी केली पाहिजे. तसें न होईल तर नव्या जुन्यांचें रण माजल्याशिवाय राहणार नाहीं. असल्या रणांत उभय पक्षांतील लोकांनीं शब्दप्रहारांपलिकडे जाऊं नये, असें साभान्य इसम म्हणतात; पण ज्यांना आपणाकडे जगांतील दरोबस्त अकलेचा मक्ता आहे असें वाटत असतें, ते 'अशा समरांत केशाकेशी व दंडादंडी होण्यास कांहीं हरकत नाहीं,' येवढें प्रतिपादूनच राहतांत असें नाहीं, तर पडद्याआड उभें राहून, अशा पुण्य कृत्यास आपल्या हातून होण्यासारखी मदत करतात ! असले इसम समाजाचे अत्यंत निर्घृण हितशत्रू होत, व अशांचें मायावीपण उघडें पाडणें म्हणजे समाजाचें कल्याण करणें होय ! सध्यां आपल्या समाजांत जो कलह चालला आहे तो वर सांगितलेल्या सामोपचाराच्या मार्गानें मिटविण्याचा प्रयत्न न करतां,

अधिकाधिक पेटत जाण्यासाठीं जे आपली अक्कल व विद्वता खर्च करीत आहेत त्यांना मनुष्य म्हणावें, कां राक्षस म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. पूर्वीचें कडकडीत ब्राह्मणपण आतां राहण्याची आशा नाहीं, हें पक्कें समजलें असून, आपल्या आचरणानें व भाषणानें " तुम्ही करतां तें ठीक आहे; तुमचें बोलणें वाजवी आहे; गरज पडल्यास मी तुमच्यांत मिळून तुमची तरफदारी करण्यास तयार आहे " असे जुन्या लोकांस भासवून त्यांचेकडून अशक्य, असंभवनीय व सर्वांस अहितकर अशा चळवळीची उठावणी करणाऱ्या मनुष्यानें ' मी समाजाचा खरा अग्रणी आणि मतप्रदर्शक प्रतिनिधी ' म्हणून राजरोस मिरवावें, याहून विशेष हास्यास्पद असें कांहीं असेल काय? स्वातंत्र्याची विनाकारण ऐट मिरविणाऱ्या, पण वास्तविक पाहतां लौकिकाशेनें अज्ञजनसमूहाचे दासानुदास होऊन गेलेल्या कांहीं दांभिकांची भर न मिळती, तर सध्यां बहिष्काराची शुष्क चर्चा चालली आहे ती मुळींच चालली नसती. पण यांनीं जर अशा रीतीनें मूढ लोकांस गोंजारलें नाहीं व विचारलें नाहीं तर यांच्या नांवाचा नगारा कसा वाजणार व प्रशस्त किंवा अप्रशस्त साधनांनीं यांना आपल्या प्रतिपक्ष्यांचा सूड कसा घेतां येणार! समाजाच्या कल्याणाची जर यांना खरी कळकळ असती, तर बहिष्कारवाल्यांनीं ज्या अत्यंत असंभवनीय अटींवर साह्य घेण्यासाठीं घरच्या भाकरी खाऊन, जोडे फाडण्याचा धंदा आरंभिला आहे त्यांत त्यांस पडूं दिलें नसतें, किंवा मानभावी लोक म्हणतात त्याप्रमाणें या बहिष्कारवाल्यांशीं त्यांचें कांहींच संगनमत नसतें तर सांप्रत कालीं अमुक बंधनांचा त्याग केलाच पाहिजे, अमुक ठेविलीं पाहिजेत, व अमुक नवीन करून घेतलीं पाहिजेत, असें त्यांनीं उघडपणें सांगितलें असतें. समंजस लोकांनीं आपणांस अगदींच मूर्खांत काढूं नये, म्हणून जातांजातां असें म्हणावयाचें कीं ब्राह्मणांनीं पुनर्विवाहाशीं संबंधित असलेल्या गृहस्थांशीं अन्नोदकव्यवहार करण्यास, पाहिजे त्या हिंदूच्या हातचें पाणी घेण्यास, उष्णातिशयाचा सोडावॉटरनें उपशम करण्यास, फार लांबच्या प्रवासांत दारुण क्षुत्पीडा दूर करण्यास्तव बिस्कुटाशन करण्यास, किंवा एखादे प्रसंगीं केवळ मजालसेखातर खिस्त्यानें तयार केलेल्या व परोपकारी आंग्ल स्त्रियांनीं प्रेमपुरःसर सुंदर कांचपात्रांत घालून पुढें केलेल्या कांग्रा व्हॉलींतील फ्यामिली मिक्श्चराचे

उन्हन उन्हन चार घोट घेण्यास कांहीं हरकत नाहीं ! पण ही हकीगत समजल्यावर, गवयगति ब्राह्मण जर असें म्हणूं लागले कीं, " कांहो, आम्हीं तुम्हांस आमचे अग्रणी समजतों. निदान तुम्हीं आजपर्यंतच्या आपल्या भाषणांनीं व बाह्य कृत्यांनीं आम्हांस असें भासविलें आहे. तेव्हां तुमच्याविरुद्ध जी किंवदंती उठली आहे तींत कांहीं तथ्य आहे काय ? " तर या जंबूकवृत्ति ' न हिंदुर्न यवना' स असें उत्तर द्यावें लागतें कीं, " माझ्या हातून नकळत तुम्ही म्हणतां ती चूक झाली खरी; पण तीबद्दल तुम्ही सांगाल तें प्रायश्चित्त घेऊन मी तुमचा अग्रणी राहाण्यास तयार आहे ! " जर हें आमचें लिहिणें या पंथाच्या लोकांविरुद्ध शुद्ध बालंट असेल, तर ते आमच्या तीरावर किंवा तटांत आहेत. उलट तीरावर किंवा तटांत नाहींत, हें त्यांचें त्यांसच कबूल केलें पाहिजे ! पण सांप्रतकालीं पखवाजाच्या दोनहि तोंडांसारख्या त्यांना दोहोंकडूनहि ज्या चापट्या मिळत आहेत त्याचें कारण त्यांचें वर्तन व विचार नवीन पंथांचे असून, केवळ तोंडच्या पोकळ थापांनीं ते जुन्या पंथांतील लोकांचें अग्रणित्व आपल्या हस्तगत करून घेण्याच्या, व त्यापासून होणारे आधिभौतिक व आध्यात्मिक फायदे साधण्याच्या खुळ्या नादास लागले आहेत ! त्रिशंकूची पुण्याई मोठी असल्यामुळें तो कसा तरी अंतराळीं लोंबत राहिला; पण हे बिचारे अत्यंत पुण्यहीन असल्यामुळें दोन तटांच्या किंवा तीरांच्या दरम्यान होत असलेल्या खळखळाटांत गडप होतील कीं काय, अशी भीति वाटते ! देव करो, आणि हे या किंवा त्या तटास कसे तरी लागोत असें आम्ही मनापासून चिंतितों.

आतां कोणी असें विचारतील कीं, ' या दोन तटांच्या दरम्यान् लहानसा सेतु किंवा पूल बांधतां येणार नाहीं काय ? ' यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वर निर्दिष्ट केलेल्या समाजाग्रणींसारखे समाजाग्रणी सुदैवानें पुढें न येतील तर थोड्या वर्षांत या पुलाचे मच्छ पाण्याच्या पृष्ठभागावर दिसूं लागून त्यांवर कमानी टाकण्याची आणि त्यांवरून जाण्यायेण्यास सुलभ असा रस्ता करण्याची संधि येण्याचा संभव आहे; कारण तसें करण्याचीं बरींच साधनें चोहोंकडून जुळूं लागलीं आहेत. पण या कौटिल्यपूर्ण इतोभ्रष्टस्ततोभ्रष्टांच्या अनिश्चल व परवंचक भाषणांनीं

आणि कृत्यांनीं उभयपक्षांचा समय होण्याचीं चिन्हें कमीकमीच होत जाणार ! अशा लोकांच्या आधारावर जुने लोक जर भलभलते आग्रह धरून बसतील तर त्यांस ज्या धर्मग्लानीचें एवढें भय पडलें आहे ती त्यांस म्हणतां म्हणतां ग्रासून टाकील, असें वाटतें. आणि एका प्रकारें असेंच व्हावें, असें आमच्या मनांत कधीं कधीं येतें; कारण यांच्या धर्मग्लानीच्या बऱ्याच भागास आम्ही धर्मग्लानि न समजतां धर्मोत्कर्ष समजतों ! मूर्तिपूजा अजीबात नाहींशी होणें, यज्ञयागांचें थोतांड क्रमाक्रमानें शिथिल होत जाणें, वर्णसंकर होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याशीं अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न लावण्याची सदर परवानगी असणें, पाहिजे त्यानें पाहिजे त्या शास्त्रांचा किंवा धर्मग्रंथांचा अभ्यास करणें, स्त्रीपुरुषांनीं हव्या त्या वयापर्यंत किंवा मुळींच अविवाहित राहणें, स्त्रियांस हवी ती विद्या संपादूं देणें किंवा हवा तो धंदा करूं देणें, ज्याचें त्यानें आपल्या तब्यती-प्रमाणें लग्न करणें, अशौचादि कोणत्याहि प्रकारच्या कारणानें कोणासहि कुरूपता न येणें, और्ध्वदैहिकादि गलिच्छ व अमंगल संस्कार बंद पडणें– वगैरे गोष्टी प्रचारांत आल्यास कोणत्याहि प्रकारची धर्मग्लानि होणार आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. अशा प्रकारच्या आचारांनीं हिताहून अहितच अधिक होत आहे, असा आमचा समज आहे. तथापि यांपैकीं कित्येक आचारांवर अनेकांचा खरा विश्वास असेल, याविषयीं आम्हांस शंका नाहीं. त्यांचा त्यांवरील विश्वास उडण्यास त्यांना अर्वाचीन पद्धतीचें शिक्षणच मिळालें पाहिजे. तें मिळून त्यांचीं मनें सुसंस्कृत होईपर्यंत, सर्वसामान्य अशीं कांहीं बंधनें करून घेण्यास आम्ही राजी आहों. पण आज तीं ठराविणार कोण व त्यांचा अंमल करणार कोण, हें मात्र समजत नाहीं !

◆ ◆ ◆

१४ : : धर्म-कल्पना आली कोठून ?

मनुष्याच्या ज्या अनेक मनोवृत्ति आहेत त्यांपैकींच त्याची धर्मकल्पना ही एक आहे. ज्याप्रमाणें इतर वृत्ति किंवा त्यांचीं बीजें त्याच्या प्रकृतीशीं खिळलेलीं आहेत त्याप्रमाणेंच धर्मकल्पनाहि त्याचे मनांत फार प्राचीन काळपासून वास करीत आहे; किंबहुना ज्या वेळेस मनुष्याची उत्पत्ति झाली त्याच वेळेस तिचें बीं त्याच्या मेंदूंत लावलें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मनुष्याच्या इतर वृत्तींप्रमाणें त्याच्या या वृत्तींतहि फेरफार व सुधारणा होत चालली आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आमच्या ज्या ज्या धर्मकल्पना होत्या त्यांत आणि आमच्या सांप्रतच्या धर्मकल्पनांत जमिन-अस्मानाचें अंतर पडलें आहे, व कालांतरानें आणखीहि पडणार आहे. तात्पर्य, हा सारा प्रकार मनुष्याच्या इतर मनोवृत्तींप्रमाणेंच घडून आला आहे. तथापि येवढ्यावरून त्याच्या इतर वृत्ति आणि त्याची ही वृत्ति एकाच सपाटीवर ठेवतां येत नाहीं. वृत्तीवृत्तींत पुष्कळ भेद आहे. कांहीं वृत्ति अत्यंत क्षीण आहेत व कांहीं अतोनात प्रबल आहेत. कांहींचा परिणाम फक्त क्षणिक असतो; व कांहींचा आयुष्यभर टिकतो. मनुष्याच्या धर्मकल्पनेचा या दुसऱ्या प्रकारच्या मनोवृत्तींत समावेश होतो. एका दृष्टीनें हिच्याइतकी प्रबल दुसरी मनोवृत्ति नाहीं असें म्हटलें तरी चालेल. हिच्या योगानें मनुष्य जसा सद्गुणी तसा दुर्गुणीहि होतो. मनुष्यामनुष्यांत सख्य उत्पन्न करण्यास जशी ही कारण होते, तशीच त्याचें वैमनस्यासहि कारण होते. हिच्या योगानें आजपर्यंत जगाचें हित झालें आहे तितकेंच अहितहि झालें आहे असें दाखवितां येईल. कुटुंबांत आणि समाजांत एकी राखण्याचें हिच्या अंगीं जितकें सामर्थ्य आहे तितकें त्यांत दुही माजविण्याचेंहि आहे. मनुष्यांना प्रशस्त सत्कर्में करण्यास हिनें जितके प्रवृत्त केलें आहे, तितकेंच साहसाचीं दुष्ट कृत्यें करण्यासहि प्रवृत्त केलें आहे. सारांश, हिचें स्वरूप जितकें मनोहारी तितकेंच बीभत्सहि आहे. हिचा प्रभाव जितका कल्याणप्रद तितकाच अहितकारक आहे; आणि हिनें जितकें पुण्याला तितकेंच पापालाहि उत्तेजन

दिलें आहे ! अशा या विलक्षण धर्मकल्पनेची उत्पत्ति मनुष्याचे मनांत प्रथम कशी झाली; पुढें तींत कोणते फेरफार कसकसे होत गेले; सांप्रत काळीं कोणत्या समाजांत तिची कशी स्थिति आहे, व अखेरीस तिला कोणत्या प्रकारचें स्वरूप प्राप्त होणार आहे याची चर्चा करणें हें जितकें मनोरंजक तितकेंच बोधकारकहि आहे. ज्या प्रौढ लोकांच्या मनांत विशिष्ट धर्मकल्पना कायम होऊन गेल्या आहेत, व ज्यांचें वर्तन तदनुरोधानें होत आहे, त्यांच्या मनावर असल्या चर्चेंचा विशेष परिणाम होण्याचा संभव नाहीं हें खरें आहे. पण आमचे असले निबंध तसल्या लोकांकरितां लिहिलेलेच नसतात. ज्या तरुण वाचकांच्या धर्मकल्पना दृढ झाल्या नसतील; ज्यांच्या बुद्धींत साधकबाधक प्रमाणांचा प्रवेश होऊन त्यांचा विचार होणें शक्य असेल; व विचाराअंतीं जें बरें दिसेल त्याप्रमाणें आम्हीं आपल्या वर्तनांत थोडाबहुत तरी फेरफार करूं अशी ज्यांना उमेद असेल, त्यांच्याकरितांच हे लेख आहेत. असले लेख एकदां लिहून टाकले म्हणजे आपलें कर्तव्य आटपलें असें कदाचित् मोठमोठ्या तत्त्वशोधकांस म्हणतां येईल; कारण ते रात्रंदिवस नवीन तत्त्वांच्या शोधांत व्यग्र झालेले असतात. पण इतरांनीं केलेल्या शोधांचें ज्ञान करून घेऊन त्यांचा लोकांत प्रसार करणें हें ज्या आमच्यासारख्यांचें नम्र कर्तव्य आहे त्यांनीं नवीन नवीन वाचकांच्या फायद्याकरितां असले लेख फिरून फिरून लिहिले पाहिजेत; त्यास कंटाळतां कामा नये. आमच्या धंद्यांत आणि शिक्षकाच्या धंद्यांत विशेष फरक नाहीं. नवीन पिढीच्या तरुण लोकांत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचारांचा प्रसार करणें व प्रत्येक वर्षी नवीन विद्यार्थ्यांस विवक्षित विषयांची माहिती देणें यांत पुष्कळ साम्य आहे. भेद इतकाच कीं, शिक्षक आपलें काम तोंडानें करतो; व आमच्यासारख्याला तें टाकानें करावें लागतें, पण एक वेळ सांगितलेले विचार पुनः पुनः सांगणें हें दोघांनाहि सुटत नाहीं. बोलणारा किंवा लिहिणारा एकच असला तरी शिकणारे किंवा वाचणारे वेळोवेळीं बदलत असल्यामुळें प्रत्येक नव्या शिष्यसमुदायापुढें किंवा वाचकसमुदायापुढें ठरीव पाठांची व विचारांची पुनरुक्ति करणें भाग पडतें; व तसें करातांना दुसऱ्यास आपले विचार कळविण्याचें आद्य साधन जी भाषा तिचीहि थोडीबहुत पुनरुक्ति होते. पण त्याला इलाज नाहीं. धर्म-

कल्पनेच्या उत्पत्तीविषयीं आम्हीं आज प्रथमच लिहितों आहों असें नाहीं; आजपर्यंत अनेक वेळां लिहिलें आहे. तथापि या विषयावर शेवटला लेख लिहून गेल्यास बरेच दिवल लोटले असल्यामुळें वाचकांस कदाचित् त्याचें विस्मरण होऊं लागलें असेल, आणि तें होऊं न देणें हें तर आमच्या अवतारांचें प्रधान कारण आहे; तेव्हां आमच्या वाचकवृंदांत या विषयाविषयीं फिरून जागरूकता उत्पन्न करण्यासाठीं त्यास आज फिरून हातीं घेण्याचें जें आम्हीं मनांत आणिलें आहे त्याबद्दल कोणाचीहि माफी मागण्याची गरज नाहीं ! धर्मकल्पना पिशाच्चकल्पेनपासून उत्पन्न झाली आहे, व ज्याला आपण देव म्हणतों तो पिशाच्चाचें एका प्रकारचें रूपांतर आहे अशी सर्वांची पक्की खातरी होईतोंपर्यंत असले लेख लिहावे तितके थोडेच आहेत. असो.

"मनुष्य हा सूक्ष्म विश्व आहे" अशी जुन्या ग्रीक लोकांत म्हण होती. हिचें यथार्थत्व कदाचित् सहज लक्षांत येण्यासारखें नसेल, पण " हें भरतखंड लहानशी पृथ्वी आहे " असें म्हटल्यास तें कोणास कळणार नाहीं असें वाटत नाहीं. सजीव व निर्जीव वस्तूंच्या अनेक भेदांमुळें आमच्या पृथ्वीस जें वैचित्र्य आलें आहे, त्याचें सारें प्रतिबिंब आमच्या हिंदुस्थानांत पडलें आहे. जो पदार्थ पृथ्वीवर दुसऱ्या ठिकाणीं पैदा होतो, पण हिंदुस्थानांत पैदा होत नाहीं असा पदार्थच नाहीं. अमुक हवा अमक्या ठिकाणींच आहे, आणि ती दुसऱ्या ठिकाणीं दृष्टीस पडावयाचीच नाहीं असें कोणासही म्हणतां येणार नाहीं; कारण आमच्या या विलक्षण देशांत पाण्यास थिजविणाऱ्या हवामानापासून त्याला आधण आणणाऱ्या हवामानापर्यंत सर्व प्रतींचीं हवामानें दृष्टीस पडतात. सर्व प्रकारचे खनिज पदार्थ, सर्व प्रकारच्या वनस्पती, सर्व प्रकारचे कीटक, पक्षी, श्वापदें आणि जनावरें व सर्व प्रकारचीं माणसें येथें सांपडतात ! अशाच प्रकारची बहुविधता आमच्या आचारविचारांतहि दृष्टीस पडते. या अनेकप्रकारक आचारविचारांच्या फक्त एका शाखेचा आम्हांस तूर्त विशेष विस्तारपूर्वक विचार करावयाचा आहे. ती शाखा धर्मशाखा होय. प्रस्तुत निबंधावलींत या शाखेच्या संबंधानें जो विचार करावयाचा आहे तो केवळ तत्त्वदृष्ट्या करावयाचा आहे. कोणत्याही चालू चळवळीवर किंवा

कोणत्याही आधुनिक व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमुदायाच्या वर्तनावर टीका करण्याच्या इराद्यानें हा विषय हातीं घेतलेला नाहीं. केवळ तत्त्वनिर्णय करण्याच्या हेतुनें धर्मसंबंधीं आचारविचारांची मीमांसा करावयास बसलें असतां जे सिद्धान्त अत्यंत निरुत्तर असें वाटतात ते वाचकांस समजावून सांगावे आणि असल्या विषयांचा अशा रीतीनें विचार करण्याची प्रवृत्ति त्यांच्या मनांत थोडीबहुत उत्पन्न करावी याशिवाय या लेखांचा दुसरा उद्देश नाहीं. तेव्हां एखादे प्रसंगीं एखाद्या आचाराविषयीं लिहितांना थोडा विशेष प्रसंग झाला तर तो त्या आचाराची विडंबना करण्याकरितां नव्हे तर त्यांचें खरें स्वरूप वाचकांच्या मनावर हुबेहूब उठविण्यासाठीं होय, असें समजण्याची सर्वांनीं मेहेरबानी केली पाहिजे. मागें एकदां पिशाचयोनीप्रत पावलेल्या पितरांच्या दिनचर्येविषयीं लिहिलेला आमचा लेख वाचून कित्येक सभ्य गृहस्थ आमच्यावर खप्पा झाले असें आमच्या नजरेस आल्यावरून वरील प्रार्थना आगाऊ करून ठेविली आहे. असो.

येथील धर्मसंबंधीं आचारविचारांत सर्व प्रकारचें वैचित्र्य व बहुविधत्व आहे असें जें वर म्हटलें आहे तें सिद्ध करण्यास खंडोगणती पुरावा आणीत बसलें पाहिजे असें नाहीं. भिल्ल, कोळी, कैकाडी, वडार वगैरे रानटी किंवा अर्धवट रानटी लोक आणि स्थाईक समाजांतील अगदीं खालच्या प्रतीचे लोक कसल्या देवाची कशा प्रकारें पूजाअर्चा करतात हें ज्याला ठाऊक नाहीं असा कोण सुशिक्षित हिंदु आहे ? मोठ्याशा गोट्याला तेल व शेंदूर फासून त्याला देव मानणाऱ्या आणि त्याच्या नैवेद्याकरितां त्याच्या-पुढें नानातऱ्हेचीं जनावरें बळी देणाऱ्या प्राथमिक व संस्कारविहीन मनुष्या-पासून निर्गुण निराकार परमेश्वरापर्यंत जाऊन ठेपलेल्या, अथवा तेवढ्यानेंहि समाधान न होऊन जीवात्मा व परमात्मा यांचें 'अहमेव ब्रह्म' या सिद्धांतानें ऐक्य करूं पाहणाऱ्या कुशाग्र बुद्धीच्या वेदांत्यापर्यंत नाना तऱ्हेच्या पंथांची नाना प्रकारांनीं उपासना करणारीं, व नाना प्रकारच्या विचारांस स्वीकारणीय मानून त्यावर श्रद्धा ठेवणारीं आणि त्यांत गर्क होऊन राहणारीं माणसें या देशांत बहुधा प्रत्येक ठिकाणीं दृष्टीस पडतात. अशा प्रकारचें विचारांतर व आचारांतर कसकसें होत जातें, आणि अखेरीस तें कोणत्या थराला जाणार आहे, याचें विवेचन हर्बर्ट स्पेन्सर यानें एका

लहानशा पुस्तकांत फार उत्तम रीतीनें केलें आहे. पुढील लेखांत प्रधानत्वें-करून या पुस्तकाचाच आधार घेतला असल्यामुळें त्याच्या बरेवाईटपणाची जबाबदारी त्या तत्त्ववेत्त्याकडे आहे; आमच्याकडे बिलकुल नाहीं, असें आम्ही साफ सांगतों !

देवाची कल्पना प्रथम पिशाचकल्पनेपासून निघाली असावी असें स्पेन्सरसाहेबानें अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. तीं वेळो-वेळीं देण्यांत येतीलच. पण आरंभाला आपण आपल्या घरचेंच एक उदाहरण घेऊं. ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रयीपैकीं नंबर तीनचा देव सर्वांत उग्र आहे असें आपण मानतों; कारण प्राणिमात्रांस उत्पन्न करणें हें ब्रह्मयाचें काम; त्यांचें पालन करणें हें विष्णूचें काम, आणि त्यांचा संहार करणें हें महेशाचें किंवा महादेवाचें काम असा आपण त्यांस श्रमविभाग करून दिला आहे. तेव्हां जी वस्तु निर्माण झाली तिचा नाश करणें हें ज्याचें कर्तव्य तो अर्थात् उग्रस्वरूप देव असलाच पाहिजे. याचे भक्त याचें निरनिराळ्या तऱ्हेनें वर्णन करितात. कोणी याला बैलावर बसवून पशुपति म्हणतो; कोणी याचें अर्धांग स्त्री आहे असें मानतो. (अर्धांगीच्यां कल्पनेचा उद्भव बहुधा येथूनच झाला असावा.) कित्येकांच्या समजुतीप्रमाणें शिवाच्या कपाळावर तिसरा डोळा असल्यामुळें ते त्याला **भाललोचन** म्हणतात. त्यानें एकदां तीव्र विष प्राशन केल्यामुळें त्याच्या अंगाचा जो दाह झाला तो शमविण्याकरितां त्यानें डोक्यावर गंगा घेतली, गळ्यांत साप घातले, व जटा आणि कपाळ यांच्यामध्यें चंद्राची नेमणूक केली, अशी कथा आहे. **नीलकंठ, गिरिजारमण, भालचन्द्र** वगैरे नांवें त्याला वरील कृत्यांसाठींच बहुधा देण्यांत आलीं असावीं. प्राणिमात्रांचें हनन करणें हें याचें नियुक्त कर्तव्य असतां, निःसीम भक्त याला 'सब दुनिया पालनवाला बैलवाला' असें म्हणतात, व इतर देवांच्या भक्तांशीं प्रतिस्पर्धा करण्या-करितां याच्या वार्षिक उत्सवांत इतर देवांच्या मुखवट्यांसारखा एक मुखवटा याच्याहि पिंडावर बसवून देऊन, मनुष्यरूपधारी दुसऱ्या देवाप्रमाणें यावरहि मनुष्याचा पेहराव व अलंकार चढवितात. अनार्यांप्रमाणें भोळ्या सांबाच्या नित्यरूपाची चिकित्सा करून त्याला बीभत्स किंवा तद्विरुद्ध ठरविण्याची आमची इच्छा नाहीं. तथापि याच्या वर्णनांत जो एक सामान्य

भाग आढळून येतो, जो याच्या सर्व भक्तांस मान्य आहे, आणि ज्याचा प्रस्तुत विषयाशीं निकट संबंध आहे तो आमच्यानें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हा देव प्राणिमात्राचा हंता असल्यामुळें स्मशानभूमि हें याचें निवासस्थान होऊन गेलें आहे. इतकेंच नाहीं तर चितेंतील अग्नीशीं शेकत बसणें,जळलेल्या प्रेताची राख अंगाला लावणें, हाडांच्या माळा गळ्यांत घालणें, डोक्यांच्या कवट्यांचा भांड्यांप्रमाणें उपयोग करणें—इत्यादि गोष्टी याला अत्यंत प्रिय झाल्या आहेत. पार्वतीशाला नमन करतांना **नरमुंड-मालधर** असें विशेषण आम्ही मोठ्या भक्तीनें देतों ! तसेंच वेताळ वगैरे प्रमुख पिशाचांस बरोबर घेऊन डमरू इत्यादि वाद्यांच्या तालावर जेव्हां याचा नाच होऊं लागतो तेव्हां ह्याचें शरीर हत्तीच्या किंवा दुसऱ्या एखाद्या जनावराच्या ओल्या कातड्यानें आच्छादिलेलें असतें आणि म्हणूनच याला कृत्तिवासा असें म्हणतात. त्याप्रमाणेंच, कोणी मेला आणि त्याची समाध बांधून तीवर देऊळ बांधावयाचें असें ठरलें, तर त्यांत शिवाची स्थापना करतात हें सर्वांस ठाऊक आहेच. यावरून काय दिसतें कीं, हलाहल, वासुकी, चंद्र, पार्वती, नंदी इत्यादिकांचा या देवाशीं जो संबंध लावून दिला आहे याचा खुलासा जरी सहज करतां आला नाहीं तरी याच्या वर्णनाचा जो सर्वसाधारण व सर्वसामान्य दुसरा भाग आहे त्यावरून या देवाची कल्पना पिशाचकल्पनेवरून साधली आहे, किंबहुना **महादेव** हा एक **महापिशाचच** आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तात्पर्य जों जों विचार करावा तों तों आमच्या तीन मोठ्या देवांपैकीं निदान एकाचें तरी जनन पिशाचकल्पनेपासून झालें असावें, अशी खात्री झाल्यावांचून राहत नाहीं.

वर दिगंबर भोलानाथाच्या स्वरूपाचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून आमच्या—निदान या—देवाचा तरी पिशाच्याशीं निकट संबंध आहे हें वाचकांच्या लक्षांत आलें असेल. पण आतां असा प्रश्न आहे कीं, ही पिशाच्याची कल्पना तरी लोकांच्या मनांत प्रथम कशी आली ? जो मनुष्य मेला आणि ज्याचें प्रेत जाळलें, पुरलें, किंवा गिधाडांनीं खाल्लें त्याचें त्याच्या मागें कांहींएक राहत नाहीं, असा अलीकडील सुधारलेल्या लोकांचा अनुभव व विश्वास असतां पूर्वीच्या लोकांनाच, मेलेलीं माणसें सर्वथैव

नाहींशीं होत नाहींत, तर ज्याला आपण मरण म्हणतों तें आल्यानें मनुष्याच्या आत्म्याचा आणि त्याच्या शरीराचा वियोग होतो येवढेंच काय तें; शरीराचें कांहीं झालें तरी त्यांत वास करणारा आत्मा नाश पावत नाहीं; तें त्याला न राहण्यासारखें झालें म्हणजे तो तें टाकून देतो आणि कांहीं दिवस अशरीरी राहून दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो—अशी कल्पना आहे. भगवद्गीतेंत असें म्हटलें आहे:—

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

ज्याप्रमाणें मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून देऊन नवीं घेतों त्याप्रमाणें आत्मा एक शरीर टाकल्यावर दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो. जे लोक एकच आत्मा एका शरीरांतून निघून दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो असें मानतात त्यांना तो आत्मा कांहीं वेळ शरीरावांचून कोठेंतरी अस्तित्वांत असतो असें कबूल करणें भाग आहे; कारण एका शरीरासकट तो दुसऱ्या शरीरांत शिरतो असें म्हणावें तर शरीरें शरीरांत शिरतांना दृष्टीस पडलीं पाहिजेत. पण तसा प्रकार आपण कोठेंच पाहत नाहींत. शिवाय एक शरीर दुसऱ्या शरीरांत शिरूं शकेल असें मानिलें तरी लहान शरीर मोठ्या शरीरांत शिरूं शकेल असें मानतां येत नाहीं. चिल्टाचा आत्मा आपल्या पिंजऱ्यासकट एखाद्या डुकराच्या शरीरांत शिरेल कदाचित् ! पण हत्तीच्या आत्म्यानें आपल्या प्रचंड देहासकट पोराकिड्याच्या शरीरांत प्रवेश कसा करावा ? पण तसें होणें अशक्य असेल तर मोठ्या शरीरांत राहणाऱ्या आत्म्यांना लहान शरीरांत केव्हांहि प्रवेश करावा लागत नाहीं, असें मानलें पाहिजे; परंतु तसेंहि मानतां येत नाहीं. कारण आत्म्यास जी देहावस्था प्राप्त होते ती त्याच्या कर्मानुरोधानें होते. एखाद्या हत्तीनें मेल्यावर पोराकिड्याच्या जन्मास जावें असें वर्तन त्याच्याकडून झालें असेल तर त्याला तसेंच करणें भाग आहे. पण हत्तीचें शरीर तर पोरकिड्याच्या शरीरांत शिरूं शकत नाहीं. तेव्हां शरीरांतर करतांना आत्म्यास कांहीं वेळ अशरीरी बनावें लागत असेल असें कबूल करणें भाग आहे. तेव्हां पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्याची किंवा

पिशाचयोनीचें अस्तित्व मानणाऱ्यांचीं, प्राण्याचे आत्मे नेहमींच्या शरीराचा त्याग केल्यानंतरहि कसल्याहि शरीराच्या आधारावांचून कांहीं वेळ राहूं शकतात, अशी खात्री झाली असली पाहिजे. आत्मा हा कोणत्याहि इंद्रियास गोचर न होणारा असा अत्यंत सूक्ष्म परमाणु आहे असें या लोकांचें खरें मत असेल आणि सूक्ष्मत्वास ते अशरीरत्व समजत असतील तर त्यांचें बोलणें थोडेंबहुत ऐकून घेतां येणार आहे; पण अशरीरत्व म्हणजे शरीराचा अत्यंत अभाव असें म्हणण्याचा त्यांचा आग्रह असेल तर मात्र ते कांहींतरी बडबड करतात असें म्हणावें लागेल. अशरीरी वस्तु म्हणजे काय? आम्हीं शरीरी मर्त्यांनीं तिची कल्पना कशी करावयाची? आत्म्याशिवाय एखादी अशरीरी वस्तु आमच्या पाहण्यांत आली आहे काय? इंद्रियाला किंवा मनाला गोचर अशा वस्तूचें अस्तित्व मानण्यास कोणीहि हरकत घेणार नाहीं. इंद्रियें हीं मनाचीं द्वारें आहेत. मनांत आढळून येणारी प्रत्येक वस्तु कोणत्या तरी इंद्रियाच्या वाटेनें प्रथम त्यांत गेलेली असते. किंबहुना इंद्रियविकारावांचून आम्हांस मनाचें अस्तित्व देखील समजणार नाहीं. यावर कोणी असें उत्तर देतील कीं, पिशाच किंवा अशरीरी मृतात्मा या वस्तु अस्तित्वांत नसतील तर त्या आपल्या मनांत कोठून आल्या? याचें उत्तर असें आहे कीं, वस्तु दोन प्रकारच्या आहेत; एक ज्यांचें प्रतिबिंब इंद्रियद्वारां मनावर पडतें त्या, दुसऱ्या अशा रीतीनें मनावर ज्याचें प्रतिबिंब पडलें आहे त्यापासून तर्काच्या साह्यानें मनुष्याचें मन ज्या नवीन वस्तु निर्माण करतें त्या. मनानें अशा रीतीनें उत्पन्न केलेल्या वस्तुसमुदायास कधीं कधीं कल्पनासृष्टिहि म्हणतात. कैलास, स्वर्ग, वैकुंठ, पाताल, यम, यमपुरी, यमयातना वगैरे काल्पनिक वस्तु ज्या अर्थानें अस्तित्वांत आहेत असें म्हणतां येईल त्या अर्थानेंच अशा रीतीनें आत्म्याचें अस्तित्व पाहिजे तर मानितां येईल. मानसिक सृष्टींत बाह्य सृष्टीचीं हुबेहूब प्रतिबिंबें आणि त्यापासून कल्पनेनें उत्पन्न केलेलें विश्व यांचा अंतर्भाव होतो. म्हणून मानसिक सृष्टींत जी जी वस्तु दृष्टीस पडते ती ती बाह्यसृष्टींतील वस्तूप्रमाणें अस्तित्वांत आहे असें म्हणतां येणार नाहीं. ती कल्पनेनें उत्पन्न केलेली असल्यामुळें फक्त मनांत आहे; खऱ्या बाह्य विश्वांत नाहीं. अशरीरी आत्म्याच्या कल्पनेंत आणखी एक गोष्ट आहे ती ही कीं, इतर काल्पनिक

वस्तूप्रमाणें याचें आम्हांस ठळक काल्पनिक चित्र देखील काढितां येत नाहीं. " अनंत " शब्दाच्या अर्थांत वास्तविकपणें जितकी दुर्बोधता आहे, तितकीच " आत्मा " या शब्दांत आहे; निर्गुण निराकार परमेश्वर, अशरीरी मृतात्मा, आणि पिशाच्च यांच्या रूपांत खरोखर कांहीं भेद नाहीं. अशा प्रकारच्या परमेश्वर, आम्हीं केलेली स्तुति ऐकून आम्हांवर प्रसन्न होतो आणि आम्हांस संकटांतून सोडविण्यास किंवा सुख देण्यास प्रवृत्त होतो असें म्हणणें जितकें गृहणीय आहे तितकेंच वेळचेवेळीं श्राद्धें केल्यानें मृतात्मे संतुष्ट होऊन आमचे साहाय्यकर्ते होतात आणि पिशाचगण गायत्रीचा जप आणि यज्ञोपवीत यांच्या धाकांत रात्रंदिवस असतो असें म्हणणेंहि गृहणीय होणार आहे !

पिशाचांचें अस्तित्व जर इतकें शंकास्पद असेल तर प्रत्येक राष्ट्रांत पूर्वकालापासून सर्व प्रकारच्या मनुष्यांच्या मनांत त्याची कल्पना कशी आली, व ती अजून जात कां नाहीं, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. याचें एक उत्तर असें आहे कीं, मनुष्य केवळ सत्याचाच भोक्ता नाहीं. अमुक गोष्ट चुकीची किंवा खोटी आहे असें सिद्ध करून दाखविल्याबरोबर ती सोडून देण्यासारखी त्याची प्रकृति असती तर ज्या सुधारणांकरितां आपण इतके तडफडत आहों त्या कधींच झाल्या असत्या व आज जे लोक सुधारक म्हणून मोडत आहेत त्यांनीं करण्यासारखें कांहींच राहिलें नसतें ! पण मनुष्याची प्रकृति तशी नाहीं. शेंकडा नव्याण्णव माणसें ज्याप्रमाणें आचारांत त्याप्रमाणें विचारांतहि हाताला हात लावणारीं असतात. शारीरिक श्रमापेक्षां मानसिक श्रम करण्याचा मनुष्याला जात्याच विशेष कंटाळा आहे. मळलेल्या वाटेनें जाणें येणें ज्याप्रमाणें शरीराला त्याप्रमाणें मनालाहि फार सुखावह असतें. तेव्हां ती वाट सोडून देणें त्याला सहसा बरें वाटत नाहीं. तशांत नवा मार्ग आपणांस भलतीकडे घेऊन जाणारा आहे असा त्याचा बोभाटा झाला असेल तर त्याकडे लाखांतला एक इसम सुद्धां ढुंकून पाहणार नाहीं. पिशाच्याविषयीं आमच्या विलक्षण कल्पना कायम असण्याचें हें पहिलें कारण होय. त्याचें दुसरें कारण असें आहे कीं, त्या नाहींतशा न होऊं देण्यांतच पुष्कळांचा फायदा असल्यामुळें ते आपल्या लेखांनीं, भाषणांनीं, आणि कृत्यांनीं त्या कायम करण्याचा होईल तेवढा प्रयत्न करीत असतात !

हें सर्व या विलक्षण पिशाचकल्पनांनीं आम्हांस अद्यापि कां सोडलें नाहीं याबद्दल झालें. आम्हां मनुष्यांत ही अशरीरी आत्म्याची किंवा पिशाचयोनीची कल्पना प्रथम कशी येते या प्रश्नाकडे आतां वळूं.

लहान मुलें कधीं कधीं झोपेंत एकाएकीं जागीं होतात आणि मोठ्यानें रडूं लागतात, हें पुष्कळांनीं पाहिलें असेल. या रडण्याचें कारण त्यांना विचारलें तर तीं त्यांकडे लक्ष न देतां अधिकच रडत सुटतात. पुढें थोपटा-थोपट करून पोटाशीं धरून मोठ्या प्रयासानें त्यांचें रडणें बंद केलें म्हणजे तीं शुद्धीवर आल्यासारखीं होतात. अशा रीतीनें सावध केलेल्या मुलास बोलतां येत असेल व नजरेपुढें होऊन गेलेली गोष्ट सांगतां येत असेल, तर तो असें म्हणेल कीं, अमका अमका मला मारूं लागला, अथवा अमक्या-अमक्यानें मला बाऊ दाखविला, किंवा फलाणा माझी अमुक वस्तु घेऊन जाऊं लागला म्हणून मी रडलों. थोर माणसें व लहान मुलें झोंपेंत जें बरळत असतात त्यावरून, व झोंपेंतून दचकून उठतांना त्यांच्या तोंडांतून जे शब्द मोठ्या जोरानें एकाएकीं निघतात त्यांवरून त्यांना कसल्या प्रकारचीं स्वप्नें पडत असावीं, हें सहज समजण्यासारखें असतें. पुष्कळ वेळां हीं स्वप्नें इतक्या व्यवस्थित रीतीनें व स्पष्टपणानें पडतात कीं, चांगल्या सुजाण व प्रौढ मनुष्यास देखील जागें झाल्यावर आपण स्वप्नांत होतों अशी खात्री होण्यास बराच वेळ लागतो! अंथरूण चाचपावे, डोळे चोळावे, हातपाय हलवावे आणि कसला तरी थोडाबहुत उजेड असल्यास इकडे तिकडे बराच वेळ न्याहाळून पाहावें, तेव्हां कोठें आपण निजलेल्या ठिकाणींच आहों, आपल्या सभोंवतालच्या वस्तु जागच्या जागीं आहेत, आणि आपण कोठें गेलों नाहीं व आपणांकडे कोणीं आला नाहीं अशी खात्री होते! कधीं कधीं स्वप्नांतच हें स्वप्न आहे असें स्पष्टपणें वाटत असतें; पण तें सुखावह असल्यास तसेंच पुढें चालावें अशी इच्छा होते आणि आपण त्याला चालू ठेवण्याचा प्रयत्न करतों; पण कांहीं कारणामुळें त्याचा भंग झाला तर आपणांस क्षणभर फार वाईट वाटतें, याचा अनुभव पुष्कळांना असलाच पाहिजे. तात्पर्य, पुढील अनुभवावरून स्वप्नांतील भास जरी मिथ्या आहेत असें दिसून आलें, तरी जोंपर्यंत आपण स्वप्नांत गर्क होऊन गेलेलों असतों तोंपर्यंत ते प्रत्यक्ष

अनुभवाप्रमाणें खरे वाटतात यांत संशय नाहीं. तेव्हां या भासाचें खरें कारण समजेपर्यंत मनुष्यांनीं त्यांच्या उत्पत्तीविषयीं नाना प्रकारचें तर्क केले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जागृतावस्थेंतील इंद्रियानुभवांत आणि स्वप्नावस्थेंतील भासांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, पाहिल्या स्थितींत इंद्रियांचे आणि अवयवांचे व्यापार चालू असतात; पण दुसरींत ते बंद असतात. स्वप्नांत डोळे मिटले असून दिसतें; चालल्यावांचून अन्य स्थलीं जातां येतें; तोंडांत कांहीं घातल्यावांचून खाल्ल्यासारखें वाटतें; –सारांश, इंद्रियांचें व शरीराचें सर्व व्यापार बंद असतां स्वप्नांतील भास होतात, हे निर्विवाद आहे. पण ज्याला ते होतात तो एकच आहे. जागृतावस्थेंतला मी तोच स्वप्नावस्थेंतला मी. एक मी दुसऱ्या मीला पक्कें ओळखीत असतों ! खरा मी कोणता–हा कीं, तो—अशी भ्रांति कधींच पडत नाहीं. दोन्हीहि एकच मी आहेत अशी खात्री असते. तथापि ज्या अर्थी त्या दोघांचे अनुभव अगदीं भिन्न अशा दोन स्थितींत येत असतात, त्या अर्थी एकाच मीचीं हीं दोन पृथक् स्वरूपें असावीं, असा प्रथमारंभीं मनुष्यांचा स्वाभाविकपणें तर्क होतो; आणि तो होण्यास अनुभवभेदाचें सबळ कारण असल्यामुळें या द्विप्रकारक दोन मींच्या अस्तित्वावरील विश्वास पुष्कळ काळपर्यंत कमी न होतां अधिकच होत जातो. ज्या लोकांत अशा प्रकारच्या दोन मींची कल्पना दृष्टीस पडत नाहीं, त्या लोकांत मरणोत्तर मनुष्याचा आत्मा कायम राहतो अशी कल्पनाहि असत नाहीं. पण असे लोक फार थोडे आहेत. बहुतेक लोक प्रत्येक मनुष्याला दोन प्रकारचे मी, आत्मे, किंवा स्वस्वरूपें आहेत, असें मानतात. हस्तपादादि अवयव हलेनातसे झाले असतां व दृष्ट्यादि इंद्रियांचे व्यापार बंद पडले असतां आम्हांस सुख-दुःखाचा भास होतो हें कसें ? अर्थात् अवयवांच्या व इंद्रियांच्या अनुषंगावांचून सुखदुःखानुभव घेतां येण्यासारखी आमच्या आत्म्याची किंवा आमच्या मीची दुसरी एखादी स्थिति असली पाहिजे असें अनुमान होणें अगदीं स्वाभाविक आहे, आणि हें मनांत एकदां पक्कें बसून गेलें म्हणजे इंद्रियांच्या व अवयवांच्या मदतीवांचून आपणांला सुखदुःखानुभव कसा घेतां येईल याबद्दल शंकाच येत नाहीं. इंद्रियांचे व अवयवांचे व्यापार बंद असतां मला सुखदुःखानुभव व इतर विकार होतात यांत

संशय नाहीं; व ज्या अर्थीं ते त्यावांचून होतात, त्या अर्थीं ते त्यांवांचून होण्याचें सामर्थ्य माझ्यांत असलें पाहिजे हें उघडच झालें. तेव्हां **शरीरविकृत** म्हणजे शरीरांत असतां ज्याच्यावर विकार घडतात असा आणि **अशरीरविकृत** म्हणजे शरीरांत जखडला नसतां ज्याचेवर विकार होतात असा एकच **माझेपणांत** भेद असला पाहिजे, आणि म्हणून या दोहोंपैकीं एखादा नाहींसा झाला तर त्याचेबरोबर दुसरा नाहींसा झालाच पाहिजे असें कदापि म्हणतां येणार नाहीं. एखादे वेळीं दोघांचाहि बरोबरच लय होईल, नाहींच असें म्हणत नाहीं; पण तसें अनेक वेळां घडत नाहीं. गाढ झोंप लागली असतां आमचे आत्मे शरीरबंधन क्षणभर एकीकडे झुगारून देऊन पाहिजे त्या काळांत किंवा पाहिजे त्या ठिकाणीं प्रवेश करतात, आणि जागृतावस्थेंत अत्यंत अलभ्य अशा वस्तूंचाहि स्वप्नावस्थेंत यथेच्छ उपभोग घेतात; हा तर प्रत्येकाचा अनुभव आहे. आणि बऱ्याच अंशीं त्यावर आमच्या अशरीरविकृत आत्म्याची किंवा मीची कल्पना बसविली आहे. एकदां स्वतःसंबंधानेंहि द्विप्रकारक मीची कल्पना कायम झाली; [आणि नित्याच्या द्विविधात्मक अनुभवामुळें ती तेव्हांच होते.] म्हणजे दुसऱ्यालाहि असे दोन मी असतील असें वाटणें स्वाभाविक आहे, आणि दुसऱ्यांनीं तसें असल्याबद्दल खात्री दिली म्हणजे हा ग्रह अल्प काळांत पक्का होऊन जातो व पुढें त्यास अशा प्रकारच्या गोष्टींचा आधार मिळत गेल्यास तो थोडक्या वर्षांत ठाम होऊन बसतो. झूलू लोकांचा असा समज आहे कीं, जे मेलेले पुरुष स्वप्नांत येतात ते सापाच्या किंवा छायेच्या रूपानें येत नाहींत; तर जिवंतपणीं त्यांचीं जीं शरीरें असतात त्यांनिशींच ते येतात, आणि आपल्या जातींतील मनुष्यांशीं बोलतात. मात्र जागें झाल्यावर स्वप्न पडणारांस असें वाटतें कीं, अमका-तमका अद्यापि जिवंत असून केवळ त्याची छाया मजकडे आली होती. वस्तुतः तो स्वप्नांत मूळच्या शरीरानें येतो. पाण्यांत पडलेल्या प्रतिबिंबास अंदमान बेटांतील लोक मनुष्याचा एक आत्माच मानितात. स्वप्नांत मनुष्याचा आत्मा नाकपुड्यांतून बाहेर पडून पाहिजे तिकडे वावरतो आणि हव्या त्या क्रिया करतो, असाहि या लोकांचा समज आहे. स्वप्नासारखेच दुसरे कांहीं प्रसंग आहेत; त्यांनींहि याच कल्पनेचें पुष्टीकरण होतें.

कोणत्याहि कारणामुळें एखाद्या मनुष्यास एखादे वेळीं बेशुद्धि आली तर ती त्याला त्याचा आत्मा कोठें तरी भडकत असल्यामुळें येते, अशीहि पुष्कळ लोकांची समजूत आहे. मनुष्याला झोंप लागली असतां किंवा कोणत्याहि कारणानें त्याच्या वृत्तीचा लय लागला असतां त्याचा आत्मा शरीरांतून बाहेर पडून मोकळा होतो, आणि देहबद्ध असतां ज्या गोष्टी त्याला सांगतां किंवा पाहतां येत नाहींत त्या तो सांगू व पाहूं शकतो, असाहि पुष्कळांचा विश्वास आहे. ही तादात्म्यदशा कृत्रिम असली तरी तींत देखील तसाच प्रकार घडतो. अमेरिकेंत एका जातीचे रानटी लोक आहेत, ते असली लयावस्था उत्पन्न करण्यासाठीं कडक तमाखूचा काढा करून घेतात. आपल्या लोकांत कांहीं प्रकृतीच्या मनुष्यांस धोतरा चारल्यानें किंवा ऊद घातल्यानें अतींद्रियज्ञान प्राप्त होऊन भूतभाविष्य बिनचूक सांगतां येतें, असा मूर्खपणाचा समज आहे. देवऋषी, पंचाक्षरी वगैरे लबाड लोकांचा धंदा यथास्थित चालण्यास व नरसोबाची वाडी, औदुंबर वगैरे क्षेत्रांचें माहात्म्य इतकें वाढण्यास हाच मूर्खपणाचा समज कारण झाला आहे. मेंदूचे विकार अनेक तऱ्हेचे आहेत, व त्यांपैकीं कांहीं कांहीं जातीच्या तापाप्रमाणें थोड्या दिवसांनीं आपोआप नाहींसें होतात, हें ज्यांना ठाऊक नाहीं आणि पूर्वापार चालत आलेल्या कल्पनांचा आणि विचारांचा मेंदूच्या विकृत स्थितींत मनावर केवढा परिणाम होतो याची ज्यांना अटकळ नाहीं, त्यांनीं चारदोन अनुकूल उदाहरणांवरून दत्ताच्या किंवा दुसऱ्या एखाद्या देवाच्या अथवा मांत्रिकाच्या सामर्थ्याचे पवाडे गावें यांत आश्चर्य तें कोणतें? कोणत्याही काठिण गोष्टीची सामान्य मनुष्यांस खरी मीमांसा करतां येईनाशी झाली म्हणजे तो तिबद्दल पाहिजे तो ग्रह करून घेण्यास तयार होतो. सुधारलेल्या लोकांस प्रतिध्वनी कशानें होतो हें पक्कें ठाऊक झालें आहे. पण रानटी लोकांस तो एक पिशाच आहे असें वाटतें ! मनुष्याच्या सावलीला आत्मा समजणारेहि कांहीं लोक आहेत. फेंपरें, अपस्मार, वेडा मधुरा व सान्निपात वगैरे रोगांत वायूचे जे झटके येतात त्यांतहि रोग्यांच्या आत्म्यांस असामान्य उन्नतावस्था प्राप्त होऊन भूतभाविष्य सांगण्याचें सामर्थ्य येतें असा पुष्कळ अडाणी लोकांचा समज आहे. अशा स्थितींत जर मनुष्याचा आत्मा कांहीं वेळ

नाहींसा होऊन पुनः परत येतां तर झोंपेशीं व इतर प्रकारच्या बेशुद्धीशीं साम्य पावणारी जी मृतावस्था ती ज्याला प्राप्त झाली आहे त्याचा आत्माहि शरीर सोडून कोठे तरी भटकत कशावरून नसेल व शरीर जपून ठेवलें तर त्यांत तो फिरून कशावरून प्रवेश करणार नाहीं असा रानटी लोकांच्या मनांत सहज प्रश्न उत्पन्न होतो आणि ते झोपेप्रमाणेंच मरणालाहि मोठी झोंप समजून तीविषयीं तसलेच तर्क करतात. लघुनिद्रा आणि महानिद्रा यांतील भेद समजण्यास बरेंच शहाणपण लागतें. मेलेल्या मनुष्याचें प्रेत जाळून त्याची राख दहा दिशाला फेकून टाकली तरी देखील त्याचा आत्मा येथेंच कोठें तरी किंवा अन्य ठिकाणीं निदान कांहीं वेळ जीव धरून असतो अशी ज्यांची समजूत असेल (आणि या देशांत अशा समजुतीचे पुष्कळ लोक आहेत) त्यांनीं आपण मनुष्याच्या प्रथमावस्थेंत किंवा वन्यावस्थेंत आहों असें बेलाशक समजावें !

◆ ◆ ◆

१५ : : मूळ पाया चांगला पाहिजे !

सधाजसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं ठरविता येणार नाहीं. ते सर्व मनुष्यांच्या वेगळाल्या व्यवहारांचे व्यंजक होत व त्या सर्वांचीं एकसमया-वच्छेदेंकरून सुधारणा होत जाणें, म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनीं वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली, असें म्हणतां येईल, हें आम्हीं वेळोवेळीं दाखविलेंच आहे. परंतु तें सर्वांस संमत नाहीं, असें भोंवतालच्या स्थितीवरून दिसतें. कित्येकांस वाटतें कीं, राजकीय सुधारणा सोपी आहे, सामाजिक सुधारणेविषयीं जशीं रणें पडतात, तशी या राजकीय सुधारणेची गोष्ट नाहीं. त्याविषयीं सर्व लोकांचें एकमत आहे. याकरितां सामाजिक सुधारणेविषयीं व्यर्थ खटपट करून, लोकांच्या शिव्याशापास पात्र होण्यापेक्षां, व आपसांत

कलह माजवीत बसण्यापेक्षां, सर्वांनीं एकदिलानें राजकीय सुधारणेच्या मार्गें लागावें, हा उत्तम पक्ष होय. वरील उपदेश योग्य आहे, अशी आमची खात्री असूनही, लोकसमुदायास न रुचणाऱ्या गोष्टी आम्ही आग्रहानें पुढें आणीत असतों, तर त्यांत आमचाच दोष झाला असता. परंतु वरील उपदेश करणारांनीं नुसती वर वर नजर दिली आहे; त्यांनीं शांतपणानें खोल विचार केला असतां, त्यांचें मत खचित आमच्याप्रमाणें झाल्यावांचून राहणार नाहीं, व तें होईपर्यंत, ज्या राजकीय सुधारणेपासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे, ती राजकीय सुधारणाही होणें शक्य नाहीं, हें आम्ही दाखविणार आहों.

राजकीय सुधारणा आम्हांस पाहिजे, असें आम्ही कां म्हणतों ? तर त्यापासून नफा होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. सामाजिक सुधारणा आम्हांस कां नको ? त्यापासून आमचें नुकसान होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. तात्पर्य कोणती गोष्ट इष्ट आहे, व कोणती गोष्ट इष्ट नाहीं, हें आपण केवळ नफ्यातोट्याच्या तारतम्यावरूनच ठरवितों व येथेंच चूक होते. हें आमचें म्हणणें सकृत्दर्शनीं चमत्कारिकसें भासेल, व तें तसें भासावें यांतही नवल नाहीं. कारण कीं आजपर्यंतचे जगाचे सर्व व्यवहार नफातोट्यावर दृष्टि देऊनच झाले आहेत, हल्लींही होत आहेत, व पुढेंही होत राहतील, याविषयीं आम्हांसही शंका नाहीं. मग असें असून, येथेंच चूक होते, असें आम्ही कसें म्हणतों, अशी पृच्छा सहज होणारी आहे, व त्याचें उत्तर देण्याच्या ऐवजीं आम्हीही वाचकांस कांहीं उलट प्रश्न करतों, व त्याचें जें उत्तर तेंच वरील प्रश्नांचें उत्तर होय. धर्म या सदराखालीं ज्या शेंकडों बऱ्यावाईट गोष्टी आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक कायद्याच्या दृष्टीनेंच आपण करतों. अमुक झाल्यास अमुक करीन, तमुक झाल्यास तमुक करीन अशा अटीवरच शेंकडा नव्याण्णव लोकांचे शेंकडा नव्याण्णव धर्माचार होत असतात हें आपणां सर्वांस माहीत आहेच. बायकांचें वपन कां करावें ? तर त्यांच्या कबरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वीच कन्येचा विवाह कां केला पाहिजे ? तर आपल्या ४२ कुळ्या नरकांत जाऊं नयेत म्हणून. सती कां जावें ? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य, कांहीं

ना कांहीं फायदा होईल अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून, तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करीत नाहीं. परंतु असें असूनही निष्काम भक्तीचा माहिमा अधिक कां वर्णिला जावा ? या प्रश्नाचें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास आमच्याही म्हणण्याचा अर्थ समजेल. अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर तें माझें कर्तव्य आहे म्हणून, व अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर त्यापासून मला फायदा होतो म्हणून. या दोन गोष्टींत फारच मोठा भेद आहे. आपलें कर्तव्य समजून एखादी गोष्ट करणारा मनुष्य जसा नेटानें व निश्चयानें ती करतो, तसा फायद्यावरच नजर देणारा मनुष्य करूं शकणार नाहीं.

वरील गोष्टी आतां आपण लोकांस प्रिय असणाऱ्या राजकीय सुधारणेसच लावून पाहूं. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत असे राष्ट्रीय सभेचे चालकही म्हणतात, व इतर सर्व लोकही म्हणतात. परंतु या दोघांची दृष्टि अगदीं वेगळी आहे. ज्या कायद्यांचा अम्मल अमुक एक लोकसमुदायावर होत असेल, ते कायदे करणें हा केवळ त्याच लोकसमुदायाचा हक्क आहे; ते करण्याचा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं, हें प्रमेय पुढें ठेवून वर्तन करणें, व ज्याचे त्यानें कायदे केल्यास त्यापासून अधिक सुख होतें हा सिद्धान्त पुढें ठेवून वागणें यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामचंद्रापेक्षांही अधिक न्यायी, अधिक प्रजाहितैषी असा राजा असून, त्यानें केलेल्या कायद्यापासून, प्रजेस कितीहि सुख होत असलें तथापि ते करण्याचा त्यास अधिकार पोंचत नाहीं, या तत्त्वावर नजर देऊन फायद्याकडे दृष्टि न देतां आले गेलेले हक्क योग्य उपायांनीं मिळाविण्याकरितां जे लोक, हें आपलें कर्तव्य समजून निश्चयानें यत्न करीत आहेत, ते सामाजिक सुधारणा नको व राजकीय सुधारणा पाहिजे, असा आग्रहही धरीत नाहींत.

इंग्रज गुन्हेगाराचा न्याय इंग्रज न्यायाधीशानेंच करावा, व नेटिव्ह गुन्हेगाराचा न्याय तेवढा वाटेल त्या न्यायाधीशानें करावा; असा पक्षपात कां? गुन्हेगाराचा न्याय तोडणें हें कांहीं त्याच्या रंगावर अवलंबून नाहीं. काळ्या रंगाच्या मनुष्यानें एखादा गुन्हा केल्यास त्याचा न्याय करण्याची ज्यास योग्यता आहे, तोच न्यायाधीश, तोच गुन्हा करणाराचा रंग गोरा असला

कीं, त्याचा न्याय करण्यास अपात्र कसा होतो ? हे प्रश्न सर्वांस सुचणें अवघड नाहीं. परंतु त्याचा योग्य निकाल होण्यास नुसतें त्या प्रश्नाचें शाब्दिक ज्ञान उपयोगी नाहीं. प्रश्न करणारांचें अंतःकरण व ओठ यांच्यांत विसंगतता असेल तर त्यानें कितीही आक्रोश केला तथापि व्यर्थ होय. परंतु त्या दोहोंमध्यें संगति असेल तर विशेष आक्रोश करण्याची जरूर पडत नाहीं. अंतःकरण व ओठ यांच्यांत तारायंत्र सुरूं असेल, तर हळूं उच्चारलेल्या शब्दांसही विलक्षण जोर येतो व त्यापुढें सर्वांस मान डोलवावी लागते. खऱ्या साध्वीच्या इर्षत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामांधांची गाळण उडून जाते. आपण स्वतः अन्यायाचें वर्तन करणारास दुसऱ्याच्या अन्यायाबद्दल बोलण्याचा अधिकार पोंचत नाहीं, तर उलट त्याची जीभ कचरूं लागते, त्याचा शब्द तोंडांतल्या तोंडांत घोटाळू लागतो, व असें झालें म्हणजे सिंहाचें कातडें पांघरणाऱ्या गर्दभाच्या बाहेर डोकावूं पाहणाऱ्या लंबकर्णावरून त्याची परिक्षा होते, व त्यांस दुसरे भीत नाहींत इतकेंच नाहीं, तर स्वतःची फजिती उडण्याची मात्र उलट पाळी येते.

महाराची सावली पडली असतांही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून " आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झालें ? रंगावर कांहीं मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाहीं," वगैरे गोष्टी प्रतिपादूं लागले तथापि त्यांच्या शब्दांस जोर येण्याचा संभव नाहीं, व त्याचा परिणामही होणें नाहीं. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनीं ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, " ब्राह्मणोस्यमुखमासीत् " हें पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यास महारास मोकळीक दिली पाहिजे. पुरुषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे, त्याप्रमाणें विधवांसही दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळ्यास फांस बसतो, तर पुरुषांच्या शेंडीचाहि मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये ? व एकास जर कोणी संन्यासी करीत नाहीं तर दुसरीला मात्र न्हाव्यापुढें कां बसवावी ? पुरुषाला बायको आवडत नाहीं, येवढ्याच शुष्क कारणावरून वस्तुतः काडी मोडून देण्याचा त्यास जर अधिकार आहे,

आ....९

व तसें करून तो जर धर्मबाह्य होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास, तिनेंही त्याला काडी मोडून दिली तर तिच्या नांवानें मात्र खडे कां फोडावेत ? अटकाव करणें असेल तर दोघांसही करा, नसेल तर दोघांसही मोकळीक द्या. महार आणि ब्राह्मण, विधवा आणि विधुर व स्त्री आणि पुरुष यांच्यामधील अन्यायमूलक व्यवहार बंद करणें आपल्या स्वतःच्या हातीं असून तें करण्यासही ज्यांना नुसती वासनाही झाली नाहीं, अशा लोकांनीं जिंकणारे व जिंकलेले यांच्यांतील भेद मोडून टाकण्याचा विचार मनांत तरी कशास आणावा ? व आणला तरी तो सिद्धीस कसा जावा ?

तात्पर्य, लोकांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणास वाटतें, तसेंच आपणही दुसऱ्यांशीं वागण्यास तयार व्हावयाचें, त्यापासून हित असो वा अहित असो, त्याविषयीं विचार करीत बसावयाचें नाहीं. खरें बोलल्यापासून नफा होवो, नुकसान होवो, परंतु तसें करणें हें आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरें बोलावयाचें किंवा नीतीनें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असूनही जसें नित्याचरण सोडावयाचें नाहीं, तसेंच कोणतीहि गोष्ट असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपलें कर्तव्य आहे, एवढ्या विचारावरच तिच्या मागें लागावयाचें, त्यापासून होणाऱ्या सुखदुःखाची भवतिनभवति करीत बसावयाचें नाहीं, असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व नको हा तंटा मिटणार आहे व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होऊं लागतील. हल्लीं राजकीय सुधारणेस सर्व लोक अनुकूल आहेत, असें जरी बाह्यात्कारें दिसलें, तथापि त्यांत जीव नाहीं.राष्ट्रीय सभेसंबंधानें अंतःकरणापासून ज्यांनीं श्रम केले आहेत, व आपल्या पदरास ज्यांनीं खार लावून घेतला आहे, अशा सर्व इलाख्यांतील लोकांची याद केली असतां ते एकूण एक लोक जितके राजकीय सुधारणेचें चहाते आहेत तितकेच सामाजिक सुधारणेचे व धर्मसुधारणेचेही चहाते आहेत असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं; व सुधारक आमचे पुढारी नाहींत म्हणून कंठशोष करणारे लोक जसे सामाजिक सुधारणेच्या विरुद्ध आहेत, त्याप्रमाणेंच राजकीय सुधारणेंतही त्यांचें पाठबळ तितक्यापुरतेंच आहे, हेंही सिद्ध करून दाखविणें

कठीण नाहीं. व यावरून पाहतां सामाजिकपरिषदेची उत्तरोत्तर भरभराट होणें हेंच राष्ट्रीय सभेच्या खऱ्या भरभराटीचें चिन्ह होय.

◆ ◆ ◆

१६ : : लोकमतातर

(या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।)

रात्र आणि दिवस, पाणी आणि बर्फ, नवें आणि जुनें, तरुण आणि वृद्ध वगैरे शब्दांचा भिन्नार्थ आपणांस स्पष्टपणें कळतो. इतकेंच नाहीं, तर या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या वस्तूंचे भिन्नत्वही आपणांस चांगल्या रीतीनें समजतें. तथापि अशा वस्तूंचा अन्योन्य संबंध इतका सांनिकट आहे कीं, कोणत्याही एका विवक्षित क्षणीं त्यांतील भेद समजण्याची मोठी मुष्कील पडते. कोणत्या मिनिटांत रात्र संपून दिवस लागतो, पाण्याचा बर्फ होऊं लागलें असतां त्याचें पाणीपण नाहींसें होऊन त्याला बर्फपण केव्हां येतें, ज्याला आपण नवें वस्त्र म्हणतों त्याला जुनेंपण केव्हां येऊं लागतें, अथवा ज्याला आपण तरुण म्हणतों तो कोणत्या घटकेस वृद्ध होऊं लागतो, हें कोणास सांगता येणार आहे ? तथापि सूर्योदय झाल्यावर इकडून तिकडे फिरणाऱ्या सांवल्या, किंवा भरतीस आरंभ झाला असतां किनाऱ्यांवर पसरत जाणारें समुद्राचें पाणी यांची गति कोणत्याही विवक्षित क्षणीं इंद्रियगोचर नसली तरी तिच्या सत्यत्वाबद्दल ज्याप्रमाणें कोणासहि शंका राहिलेली नाहीं त्याप्रमाणें सामान्य जनास लोकमत कितीहि स्थिर आहे असें वाटत असलें तरी कित्येक क्षणीं त्यांत फेरफार होत असतो, ही गोष्ट स्वल्प विचाराअंतीं पाहिजे त्याच्या लक्षांत येण्यासारखी आहे. हे लोकमतांतर होण्यास समाजांतील मुख्य दोन पक्षांत जो नित्यकलह चाललेला असतो तो कारण होतो. या पक्षांपैकीं एक पक्ष जुन्या आचारांत व विचारांत त्याला जें चांगलें असें वाटत असतें त्याचें

संरक्षण करण्यास झटत असतो, व दुसरा त्यांत जें दूषणीय व अहितकारक आहे असें त्यांस वाईट वाटत असतें. तें दूर करण्यासाठीं झटत असतो. या उभयतांच्या अन्योन्य कलहामुळें समाजाच्या स्थितींत जें एकसारखें अंतर पडत असतें, तें सहसा ध्यानांत येण्यासारखें नसतें. तथापि तें होत असतें हें ज्यांना पहावयाचें असेल त्यांनीं समाजस्थितीचा पिढीजाद विचार करावा. सावलीच्या कडेवर किंवा पाण्याच्या वेळेवर खडा ठेऊन थोडें इकडे तिकडे फिरून आल्यास, ज्याप्रमाणें खड्यापासून सावली दूर गेली, किंवा तो पाण्यांत सांपडून तें वर चढलें असें झटदिशीं लक्षांत येतें, त्याप्रमाणें पिढी पिढीनें सामाजिक स्थितीचा किंवा लोकमताचा विचार केला असतां, त्यांत हटकून पडत जाणारें अंतर प्रत्ययास येतें. कोणत्याही विशेष कालाचा विचार केला असतां त्यांत तेवढ्याशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. जुन्या आचारांचे व कल्पनांचे संरक्षक नवीन आचारांच्या व कल्पनांच्या प्रचारकांस कुंठित करण्याविषयीं ज्याप्रमाणें आपली पराकाष्ठा करीत असतात, त्याप्रमाणें दुसरें पहिल्यास आपल्याबरोबर घेऊन जाण्यास आपली शर्थ करीत असतात. अशा प्रकारें जड व चल वस्तूंचा आणि अप्रबुद्ध व प्रबुद्ध जंतूंच्या प्रकृतींत फेरफार होत जाणें हा या विश्वाचा नित्य स्वभाव आहे. मनुष्य जातींत आजपर्यंत ज्या मोठमोठ्या राज्यक्रांत्या किंवा धर्मक्रांत्या झाल्या त्या ह्या केव्हांही खळ न पडणाऱ्या विश्वाच्या नित्य स्वभावामुळें झाल्या. या अपरिहार्य नियमांचे मनुष्यांस अज्ञान असतें तोंपर्यंत त्यांच्या कलहांत विशेष तीव्रता असते पण जसजसा ज्ञानप्रसार व ज्ञानवृद्धी होत जाते, तसतसा हा कलह सामोपचारांनीं होऊं लागतो. नवीन गोष्टींचा सामान्य मनुष्यास जात्या मोठा कंटाळा असतो, व तो असणें फार स्वाभाविक आहे. जुन्या गोष्टींत कांहीं दोष असले तरी विशेष परिचयामुळें त्यांची अडचण वाटेनाशी झालेली असते. नवीन गोष्टींचा तसा प्रकार नसतो. अनुभवांनीं त्या कशा दिसून येतील ते कोणासहि सांगतां येत नसल्यामुळें, व त्याचा विचार करणें प्रथम दर्शनीं मोठ्या गैरसोईचें असल्यामुळें, भावी विशेष सुखाच्या आशेवर हातचें सुख टाकून देण्याचें आणि त्रासदायक नवीन प्रयोग करून पाहण्याचें धैर्य सामान्य लोकांस होत नाहीं, याबद्दल त्यांना विशेष दोष लावणें हा

असमंजसपणा होय. आचाराचा स्वीकार करण्याची मनाची प्रवृत्ति होण्यापूर्वी त्यांवर विशेष प्रकारच्या शिक्षणाचा संस्कार व्हावा लागत असतो. तो ज्या व्यक्तीच्या मनांवर झाला नाहीं त्यानें तुमचे सुधारक सांगतील तें निमुटपणें ऐकावें आणि तदनुसार वर्तन करण्यास तयार व्हावें असें कसें होईल ? तथापि ज्याला एखादी नवीन गोष्ट लोकांनीं पत्करली असतां तीपासून त्यांचें हित होणार आहे, असें खात्रीपूर्वक वाटत असेल त्यानें उघडपणें तिची चर्चा न करावी, व तदनुसार होईल तेवढें आचरण करून दाखविण्याचा प्रयत्न न करावा तर काय करावें ? ज्याप्रमाणें हातीं असलेली 'अर्धी भाकर' टाकून देऊन दुसऱ्याच्या हातीं असलेल्या सगळ्या भाकरीसाठीं धांवत सुटणें हें वर्तन सामान्य लोकांस पसंत पडत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या आसमंतांतील स्थितींत असलेले दोष स्पष्टपणें नजरेस आले असून त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न न करणें हेंही एका प्रकारच्या विशेष प्रकृतीच्या लोकांस अत्यंत असह्य होते. जी गोष्ट निःसंशयपणें देशास अंतीं हितावह होईल अशी या लोकांची मनोदेवता त्यांस रात्रंदिवस सांगत असते त्या गोष्टीचा प्रसारकरण्यांत त्यांस कितीही कष्ट पडलें तरी त्याबद्दल त्यांना बिलकूल फिकीर वाटत नाहीं ! किंबहुना ते कष्ट साधण्यांतच आपलें जीवितसाफल्य आहे अशी त्यांची खात्री झाली असल्यामुळें ते कष्ट त्यांस कष्टासारखे वाटेनासे होतात. असें नसतें तर **साक्रेतिसा**सारख्या संत शिरोमणीनें आपल्या समकालीन लोकांकडून अनेक वर्षें 'छीः थूः' करून कशासाठीं घेतले असतें ? व अखेरीस निष्ठुर व दुराग्रही देशबांधवांनीं भरून दिलेला हमलॉक नांवाच्या विषाचा पेला शांतपणें तोंडास लावून आनंदानें परलोकप्रयाण कशासाठीं केलें असतें ? मनास शुद्ध वाटलेल्या धर्माचा प्रचार करण्याविषयीं परमेश्वराकडून आपणास आज्ञा झाली आहे, असें ख्रिस्तास व त्याच्या अनुयायांस न वाटतें तर त्यांनीं यहुदी व रोमन लोकांकडून आपला छळ कशाला करून घेतला असता ? व शेवटीं मेरी-तनय सुळीं कशाला जातां ? स्वतःच्या जीवितापेक्षां स्वमतत्याग करणें ब्रुनोस अधिक दुःसह होतें तर रोमपत्तनस्थ पोपकडून जाळून घेण्यास तो कशाला तयार झाला असता ? असें नसतें तर गौतमकुलदिनमणि बुद्ध राज्य, स्त्री व अपत्य यांचा त्याग करून वनवास व तपश्चर्या यांचे

कष्ट साहण्यास व अनेक संकटें सोसून वैदिक धर्माच्या उलट नवीन धर्म स्थापण्यास कशाला प्रवृत्त होता ? फार कशाला ज्या सत्पुरुषाचें नांव या घटकेस झाडून साऱ्या हिंदु लोकांच्या तोंडीं झालें आहे त्याला स्वमत-प्रतिपादण्याच्या कामीं जे हाल सोसावें लागले त्याची हकीकत ऐकून त्याच्या तोंडावाटें दुःखाचा सुस्कारा निघणार नाहीं असा कोण आहे ?

या थोर पुरुषांचीं चरित्रें ज्यांस थोडींबहुत माहित असतील त्यांनीं तरी कोणत्याही मताविषयीं विशेष आग्रह धरून उलट मताच्या लोकांवर तुटून पडणें प्रशस्त होणार नाहीं. साक्रेतिसाच्या आमदानींत त्याच्या विशेष प्रेमांतल्या शिष्यांशिवाय त्याला कोणीं बरें म्हटलें नाहीं हें जरी खरें आहे, तरी त्याच्या पश्चात् थोड्याच वर्षांत लोकांच्या मनांत इतकें अंतर पडलें कीं, ज्यांनीं साक्रेतिसास त्रास दिला होता, त्यांच्या मुलांबाळांस शिक्षा देण्यांत येऊन त्यांचीं घरें जमीनदोस्त केलीं व त्यांचे पाये देखील खणून टाकिले ! दुष्ट लोकांनीं सुळावर चढाविलेला क्रिस्त पृथ्वीवरील अत्यंत शूर, बुद्धिवान्, धार्मिक, ज्ञानसंपन्न अशा लोकांचा धर्म संस्थापक झाला ! थोड्या दिवसांपूर्वी रोम येथील खिस्ती शंकराचार्यांनीं ब्रुनोस संतमालिकेंत गोंवून, एका प्रसिद्ध ठिकाणीं त्याच्या पुतळ्याची स्थापना केली ! वैदिक धर्मास कंटाळलेल्या बुद्धानें जो कर्मप्रधान धर्म स्थापला त्याच्या अनुयायांचीं संख्या आजामित्तिस सर्वांपेक्षां मोठी आहे, व बौद्ध धर्मांतील तत्त्वांसारखीं तत्त्वें दुसऱ्या कोणत्याहीं धर्मांत नाहींत, असें अनेक विद्वानांचें म्हणणें आहे. थोड्या वर्षांपूर्वी कर्मठ खिस्त्याबरोबर ब्रॅडलॉचें नांव तोंडांतून चुकून निघालें असतें, तर ज्या आम्हीं " शांतं पापं असे म्हणून कदाचित् स्नानही केलें असतें, त्या ब्रॅडलॉच्या आकृतीचें टांक आमच्या इतर देवाबरोबर आज आम्ही पुजण्यास तयार झालों आहों ? या गतगोष्टी डोळ्यापुढें येऊन हळूहळूं लोकमतांतर होत जाणें किती अनिवार्य आहे, हे सांप्रतकालीं या देशांतील आग्रही लोकांच्या मनांत भरेल, तर रूढ धर्म कल्पना व धर्माचार ज्यास मान्य नाहींत अशांचा जो छळ होत आहे त्याची बरीच तीक्ष्णता कमी होईल ! यावर जर कोणी असा आक्षेप घेतील कीं, सध्यांच्या सुधारकांपैकीं एकालाही वर सांगितलेल्या थोर पुरुषांच्या दासाच्या दासाची योग्यता नाहीं, आणि म्हणून त्यास सभ्यतेनें

किंवा सौज्यन्यानें वागण्याची गरज नाहीं, तर त्यावर प्रत्युतर आहे कीं, सांप्रतकालीं पूर्व पद्धतीस अनुसरणाऱ्या असंख्य लोकांपैकीं एकालाही पहिल्या शंकराचार्याचा किंकरानुकिंकर होण्याची योग्यता नाहीं ! पण या लेखांत हा वाद उपस्थित करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. येथें वाचकांच्या नजरेस येवढेंच आणावयाचें होतें कीं धर्माभिमानामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही अभिनामुळें कोणत्याही व्यक्तीनें किंवा व्यक्तीसमुदायानें आपलीं मतें अगदीं निर्दोष आहेत असा हट्ट धरून बसून उलट मताच्या लोकांचा द्वेष करण्यांत कांहीं हाशील नाहीं. ज्ञानवृद्धी व ज्ञानप्रसार होईल त्याप्रमाणें लोकमतांतर झाल्याशिवाय राहत नाहीं. या संबंधानें पुढें दिलेली कालिदासोक्ति निरंतर ध्यानांत ठेवण्यासारखी आहेः—

पुराणमित्येव न साधु सर्वम् ।
न चापी काव्यं नवमित्यमवद्यम् ॥
संतः परीक्ष्यान्यतरद् भजन्ते ।
मूढः परप्रत्ययनेय बुद्धिः ॥

अर्थः—अमुक काव्य जुनें आहे म्हणून चांगलें, आणि अमुक नवें आहे म्हणून नादान असे होत नाहीं. गुणग्राही पुरुष परीक्षा करून बरेंवाईट ठरवितात. दुसरा म्हणेल त्यास होय म्हणणें हें मूर्खांचें काम होय.

◆ ◆ ◆

१७ : : राजकीय संस्थांविषयीं सामान्य विचार

राजकीय गोष्टींचा विचार करतांना मनाची स्थिती कशी असली पाहिजे याविषयीं जें सांगण्यासारखें होतें तें यापूर्वी सांगितलें आहे. आज राजकीय संस्थांविषयीं कांहीं सामान्य विचार सांगावयाचें आहेत.

हे विचार हा विषय नीट समजण्याला फार आवश्यक आहेत. सबब त्यांकडे वाचक अवधान देतील अशी आशा आहे.

आज आपण ज्या सुखांचा अनुभव घेत आहों तीं सुखें आपणांस आपण समाज करून रहात आहों, म्हणून प्राप्त होत आहेत, हें उघड आहे. अनेक व्यक्तींनीं एके ठिकाणीं राहून, एकमेकांस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें मदत करणें यापासून सर्वांच्याच सुखाची किती वृद्धि होते, हें ज्यास चांगल्या रीतीनें समजून घ्यावयाचें असेल त्यानें आपलें गांव, शहर, किंवा देश सोडून एखाद्या निर्जन प्रदेशांत जावें, किंवा गेलों आहे अशी कल्पना करावी. ज्या ठिकाणीं मनुष्याचे वारे सुद्धां यावयाचें नाहीं व मनुष्यकृत एकही वस्तु दृष्टीस पडावयाची नाहीं, अशा ठिकाणीं समाजांत वाढलेल्या मनुष्यास एक क्षणभरदेखील चैन पडावयाचें नाहीं, किंवा काडीचें सुख व्हावयाचें नाहीं. संसारांत अनेक वर्षें घालविल्यावर जीवितरवि मावळण्याच्या सुमारास अरण्याश्रय करावा आणि तेथें परमार्थसाधनांत व ईश्वर-चिंतनांत शेवटचे दिवस घालवावे, असें आपल्या लोकांचें म्हणणें आहे, व त्याप्रमाणें पूर्वी कधीं हिंदू लोक करीत असत, असें सांगतात. पण ज्यांना आपण अरण्यौकस असे म्हणतो ते अक्षरशः अरण्यौकस नव्हते. जो खरा अरण्यौकस असेल त्याची वृत्ति व्याघ्रसिंहासारख्या वन्य श्वापदाच्या वृत्तीहून भिन्न असण्याचा संभव नाहीं. एखाद्या उच्च शैलशिखरावर मोठी थोरली 'पर्णकुटी' किंवा बंगला बांधून, त्याच्या आसपास पाण्याची, धान्याची, फलमूलांची व इतर आवश्यक वस्तूंची सोय करून, आणि रानांतील श्वापदांपासून त्रास न होईल अशा प्रकारचा बंदोबस्त करून, तपश्चर्येंत दहापांच वर्षें काढणें हें शक्य आहे. पण येवढा काळही एकट्यानें कंठवेल किंवा नाहीं, शंका आहे. दहापांच वर्षें पुरण्यासारख्या धान्याचा पुरवठा करणें अशक्य आहे, व फलमूलांवर नित्य आहार करणें हेंही कांहीं सोपें नाहीं. तथापि क्षणभर असेंहि मानलें कीं, एखादा गृहस्थ असें करण्यास तयार झाला, व तशा स्थितींत त्यानें कांहीं वर्षें लोटलीं, तर तेवढ्यावरून असें म्हणतां येत नाहीं कीं, साऱ्याच मनुष्यांस तसें राहतां येईल. कारण एक तर अशा रीतीनें राहणारास प्रथम फारच मोठी तयारी करावी लागणार आहे, व या तयारीस दुसऱ्या मनुष्याचें सहाय्य घेणें अपरिहार्य आहे;

दुसरें : अशा स्थितींत रहाण्यासारखी प्रत्येक मनुष्याची प्रकृति असत नाहीं; तिसरें : एखादा सशक्त मनुष्य अशा रीतीनें कांहीं दिवस राहिला आणि पुढें त्यावर कांहीं संकट गुदरलें, किंवा त्याला दुखणेंबाणें आलें तर त्याची दशा काय होईल ? तात्पर्य, समाज सोडून एकांतवासांत राहण्यास जो तयार झाला त्यानें मरण्यास, किंवा वन्यपशूंच्या वृत्तीचें अवलंबन करण्यास सिद्ध झालें पाहिजे !

यावरून काय दिसतें कीं, मनुष्यसुखास श्रमसंयोगाची आवश्यकता आहे, व श्रमसंयोग समाज असल्याशिवाय अस्तित्वांत येण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें किल्ली आणि कुलुप यांचा संयोग झाल्याशिवाय, पेटीच्या झाकणांस किंवा घरच्या दारास सुरक्षितपणा यावयाचा नाहीं. अथवा स्त्रीपुरुषांचा संयोग झाल्याशिवाय संतानोत्पत्ति व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें समाज आणि श्रमसंयोग ही अस्तित्वांत आल्याशिवाय मनुष्यास सुखप्राप्ति व्हावयाची नाहीं. तसेंच जेथें श्रमसंयोग नाहीं तेथें समाज नाहीं. समाजाच्या अस्तित्वास श्रमसंयोग असेल तेथेंच समाज अस्तित्वांत येतो. समाज आणि श्रमसंयोग याचा अन्योन्य संबंध तंतू व पट यांच्या नित्य संबंधासारखा आहे. जेथें एक तेथें दुसरा, जेथें एक नाहीं तेथें दुसरा नाहीं.

समाज आणि श्रमसंयोग यांचा संबंध समजल्यावर जी गोष्ट ध्यानांत ठेवायची ती ही कीं, श्रमसंयोगास कशातरी प्रकारच्या संविधानाची आवश्यकता असते. सामाजिक संविधानाचे दोन प्रकार आहेत; एक स्वायत्त व दुसरा परायत्त. मनुष्यें आपापल्या धोरणानें व अन्योन्यसंमतीनें एकमेकांसाठीं जे परिश्रम करीत असतात, व त्यामुळें त्यास जो फायदा होत असतो, तें मनुष्यसमाजाचें स्वायत्त संविधान होय. संविधानास इंग्रजींत ऑरगॅनिझेशन (Organization) म्हणतात. ऑरगॅनिझेशन म्हणजे इंद्रियविन्यास किंवा इंद्रियसंविधान. ज्याप्रमाणें झाडाच्या किंवा प्राण्याच्या शरीरांतील श्रवणनेत्रादि निरानिराळीं इंद्रियें व हस्तपादादि निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें करून शरीराचें पोषण करतात, त्याप्रमाणें उत्पादक, विभाजक व व्यवस्थापक हे जे सामाजिक शरीराचे मुख्य तीन अवयव ते आपापलीं कार्यें करून समाजशरीराचें पोषण करीत असतात. क्षणभर मनुष्याच्या शरीराकडे पहा. त्याच्या कोठ्यांत शरीरास लागणाऱ्या रसाची तयारी होत असते. तो तेथें तयार झाल्यावर

हे विचार हा विषय नीट समजण्याला फार आवश्यक आहेत. सबब त्यांकडे वाचक अवधान देतील अशी आशा आहे.

आज आपण ज्या सुखांचा अनुभव घेत आहों तीं सुखें आपणांस आपण समाज करून रहात आहों, म्हणून प्राप्त होत आहेत, हें उघड आहे. अनेक व्यक्तींनीं एके ठिकाणीं राहून, एकमेकांस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें मदत करणें यापासून सर्वांच्याच सुखाची किती वृद्धि होते, हें ज्यास चांगल्या रीतीनें समजून घ्यावयाचें असेल त्यानें आपलें गांव, शहर, किंवा देश सोडून एखाद्या निर्जन प्रदेशांत जावें, किंवा गेलों आहे अशी कल्पना करावी. ज्या ठिकाणीं मनुष्याचे वारे सुद्धां यावयाचें नाहीं व मनुष्यकृत एकही वस्तु दृष्टीस पडावयाची नाहीं, अशा ठिकाणीं समाजांत वाढलेल्या मनुष्यास एक क्षणभरदेखील चैन पडावयाचें नाहीं, किंवा काडीचें सुख व्हावयाचें नाहीं. संसारांत अनेक वर्षें घालविल्यावर जीवितरवि मावळण्याच्या सुमारास अरण्याश्रय करावा आणि तेथें परमार्थसाधनांत व ईश्वर-चिंतनांत शेवटचे दिवस घालवावे, असें आपल्या लोकांचें म्हणणें आहे, व त्याप्रमाणें पूर्वी कधीं हिंदू लोक करीत असत, असें सांगतात. पण ज्यांना आपण अरण्यौकस असे म्हणतो ते अक्षरशः अरण्यौकस नव्हते. जो खरा अरण्यौकस असेल त्याची वृत्ति व्याघ्रसिंहासारख्या वन्य श्वापदाच्या वृत्तीहून भिन्न असण्याचा संभव नाहीं. एखाद्या उच्च शैलशिखरावर मोठी थोरली 'पर्णकुटी' किंवा बंगला बांधून, त्याच्या आसपास पाण्याची, धान्याची, फलमूलांची व इतर आवश्यक वस्तूंची सोय करून, आणि रानांतील श्वापदांपासून त्रास न होईल अशा प्रकारचा बंदोबस्त करून, तपश्चर्येंत दहापांच वर्षें काढणें हें शक्य आहे. पण येवढा काळही एकट्यानें कंठवेल किंवा नाहीं, शंका आहे. दहापांच वर्षें पुरण्यासारख्या धान्याचा पुरवठा करणें अशक्य आहे, व फलमूलांवर नित्य आहार करणें हेंही कांहीं सोपें नाहीं. तथापि क्षणभर असेंहि मानलें कीं, एखादा गृहस्थ असें करण्यास तयार झाला, व तशा स्थितींत त्यानें कांहीं वर्षें लोटलीं, तर तेवढ्यावरून असें म्हणतां येत नाहीं कीं, साऱ्याच मनुष्यांस तसें राहतां येईल. कारण एक तर अशा रीतीनें राहणारास प्रथम फारच मोठी तयारी करावी लागणार आहे, व या तयारीस दुसऱ्या मनुष्याचें साहाय्य घेणें अपरिहार्य आहे;

दुसरें : अशा स्थितींत रहाण्यासारखी प्रत्येक मनुष्याची प्रकृति असत नाहीं; तिसरें : एखादा सशक्त मनुष्य अशा रीतीनें कांहीं दिवस राहिला आणि पुढें त्यावर कांहीं संकट गुदरलें, किंवा त्याला दुखणेंबाणें आलें तर त्याची दशा काय होईल ? तात्पर्य, समाज सोडून एकांतवासांत राहण्यास जो तयार झाला त्यानें मरण्यास, किंवा वन्यपशूंच्या वृत्तीचें अवलंबन करण्यास सिद्ध झालें पाहिजे !

यावरून काय दिसतें कीं, मनुष्यसुखास श्रमसंयोगाची आवश्यकता आहे, व श्रमसंयोग समाज असल्याशिवाय अस्तित्वांत येण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें किल्ली आणि कुलुप यांचा संयोग झाल्याशिवाय, पेटीच्या झाकणांस किंवा घरच्या दारास सुरक्षितपणा यावयाचा नाहीं. अथवा स्त्रीपुरुषांचा संयोग झाल्याशिवाय संतानोत्पत्ति व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें समाज आणि श्रमसंयोग ही अस्तित्वांत आल्याशिवाय मनुष्यास सुखप्राप्ति व्हावयाची नाहीं. तसेंच जेथें श्रमसंयोग नाहीं तेथें समाज नाहीं. समाजाच्या अस्तित्वास श्रमसंयोग असेल तेथेंच समाज अस्तित्वांत येतो. समाज आणि श्रमसंयोग याचा अन्योन्य संबंध तंतू व पट यांच्या नित्य संबंधासारखा आहे. जेथें एक तेथें दुसरा, जेथें एक नाहीं तेथें दुसरा नाहीं.

समाज आणि श्रमसंयोग यांचा संबंध समजल्यावर जी गोष्ट ध्यानांत ठेवायची ती ही कीं, श्रमसंयोगास कशातरी प्रकारच्या संविधानाची आवश्यकता असते. सामाजिक संविधानाचे दोन प्रकार आहेत; एक स्वायत्त व दुसरा परायत्त. मनुष्यें आपापल्या धोरणानें व अन्योन्यसंमतीनें एकमेकांसाठीं जे परिश्रम करीत असतात, व त्यामुळें त्यास जो फायदा होत असतो, तें मनुष्यसमाजाचें स्वायत्त संविधान होय. संविधानास इंग्रजींत ऑरगॅनिझेशन (Organization) म्हणतात. ऑरगॅनिझेशन म्हणजे इंद्रियविन्यास किंवा इंद्रियसंविधान. ज्याप्रमाणें झाडाच्या किंवा प्राण्याच्या शरीरांतील श्रवणनेत्रादि निरानिराळीं इंद्रियें व हस्तपादादि निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें करून शरीराचें पोषण करतात, त्याप्रमाणें उत्पादक, विभाजक व व्यवस्थापक हे जे सामाजिक शरीराचे मुख्य तीन अवयव ते आपापलीं कार्यें करून समाजशरीराचें पोषण करीत असतात. क्षणभर मनुष्याच्या शरीराकडे पहा. त्याच्या कोठ्यांत शरीरास लागणाऱ्या रसाची तयारी होत असते. तो तेथें तयार झाल्यावर

रक्तवाहिन्यांच्या द्वारें शरीराच्या निरनिराळ्या भागांस जाऊन पोहोंचतो आणि त्यांचें पोषण करतो; व त्याचे हे व्यापार नीट चालविण्याचें काम डोक्यांतील मज्जातंतूंनीं आपणांकडे घेतलेले असतें. जशी मनुष्याच्या शरीरांत व्यवस्था आहे, तशीच समाज शरीरांतही आहे,असें म्हणण्यास हरकत नाहीं. समाजाच्या अवयवांस लागणारीं पोषकद्रव्यें कुणबी वगैरे उत्पादक लोक उत्पन्न करतात. उदमी वगैरे विभाजक लोक तीं तेथें नेऊन पोहोंचवितात, व या सर्वांचें व्यापार नीट रीतीनें चालविण्याचें काम सरकारी अमंलदार करतात. समाजांतील उत्पादक आणि विभाजक लोकांचे व्यवहार स्वायत्त आहेत त्यांपैकीं प्रत्येकाची दृष्टी पूर्णपणें स्वार्थाकडे असते. जो तो आपापला फायदा कसा होईल हें पहात असून, तदनुसार वर्तन करीत असतो. अशा प्रकारच्या स्वार्थपरायणतेपासूनही श्रमसंयोग उत्पन्न होतो, पण तो शुद्ध स्वायत्त किंवा आपखुषीचा असतो. आज जे हजारों कारखाने चालले आहेत, व पृथ्वीच्या एका शेवटाच्या वस्तू दुसऱ्या शेवटास येऊन दाखल होत आहेत, तें सारें स्वायत्त श्रमसंयोगाचें फळ आहे. अशा प्रकारच्या संयुक्त क्रियेपासून साऱ्या समाजाचें हित होत असतें हें खरें आहे; पण साऱ्या समाजाचें हित करावें ही बुद्धि अशा प्रकारच्या क्रिया करणाराचें अंतःकरणांत जागृत नसतें. त्याची दृष्टि स्वहितावर असते, व तें साधतांना साऱ्यांचें हित होतें. परायत्त श्रमसंयोगाची तशी गोष्ट नाहीं. त्यामुळें समाजांतील व्यक्तींच्या स्वातंत्र्यास छाट बसतो. तसेंच, या श्रमसंयोगाची मुख्य दृष्टी साऱ्या समाजाच्या कल्याणाकडे असते. तें प्रथम साधावयाचें, आणि मग व्यक्तींच्या कल्याणाकडे पहावयाचें, असा त्याचा झोक असतो. या दोनही प्रकारचे श्रमसंयोग अस्तित्वांत आल्याखेरीज चांगल्या प्रकारची समाज-घटना व्हावयाची नाहीं. उत्तरध्रुवाजवळच्या एस्किमो लोकांच्या समाजा-सारखें कांही समाज परायत्त श्रमसंयोगावांचून चालत असतील, नाहीं असें नाहीं. पण अशा समाजांतील लोकांची फारच दीनावस्था असते. शिवाय, त्यांचे प्रदेश फारच नापीक असल्यामुळें संपत्ति म्हणजे काय, हें त्या लोकांस बिलकुल ठाऊक नसतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ते कसें तरी जीव आणि शरीर यांच्या संयोगाचें रक्षण करीत असतात. अशा लोकांस परायत्त श्रमसंयोग नसला तरी चालतो. पण असे समाज व प्रदेश

फारच थोडे आहेत. पृथ्वींतील ज्या ज्या भागांत मनुष्यांनीं वस्ती केली आहे; व समाज स्थापिले आहेत, त्यांपैकीं बहुतेकांत थोडीबहुत संपत्ति उत्पन्न करण्यासारखी जमीन व हवा आहे. आणि संपत्ति अस्तित्वांत आली कीं तंट्यांस आरंभ झालाच, असें समजावें. समाज नीट चालण्यास हे तंटे तोडण्याचें काम कोणी तरी पत्करिलें पाहिजे, आणि ते तोडण्याचें काम ज्यांच्याकडे येतें त्यांसच अंमलदार किंवा अधिकारी म्हणतात. या अंमलदारांच्या समुदायास सरकार अशी सामान्य संज्ञा आहे. सरकार यांच्या अंमलामुळें रयतेस ज्या विशेष प्रकारच्या क्रिया कराव्या लागतात, त्या परायत्त क्रिया होत. कारण त्या सरकारच्या मर्जीप्रमाणें कराव्या लागतात. त्या करण्यांत रयतेला आपल्या मनाप्रमाणें वागता येत नाहीं. सरकारी अंमल रयतेच्या स्वातंत्र्याचा अपहार करणारा आहे. या अपहारापासून रयतेचा फायदा असतो ही गोष्ट निराळी, पण तो स्वातंत्र्यापहारी आहे, हें निर्विवाद आहे. स्वातंत्र्यापासूनच सुख होतें, आणि पारतंत्र्य हें सर्वथैव दुःखमूलक आहे, असें नसल्यामुळें सरकारच्या अंमलापासूनाहि समाजाच्या अवयवांस सुख होतें. तथापि जेवढी म्हणून स्वातंत्र्यहानि आहे तेवढी थोडीबहुत तत्क्षणीं दुःखकारक आहे, हें निर्विवाद आहे. तापकरी मनुष्याला पाणी प्यावेसें वाटलें, आणि तें त्यास मिळूं दिलें नाहीं, तर त्यापासून त्याला त्रास होतो, हें प्रत्येकास कबूल असलें पाहिजे. हा त्रास सोसण्यापासून पुढें पुष्कळ सुख होतें, ही गोष्ट निराळी; पण तापास किंवा दुसऱ्या कोणत्याहि आजारांत तहान लागल्याबरोबर पाणी न मिळणें हें दुःखावह आहे, यांत कांहीं संशय नाहीं. याप्रमाणेंच सरकारी अंमलाची गोष्ट आहे. परायत्तेपासून पुढें केवढाहि फायदा असला तरी तत्क्षणीं ती दुःसह झाल्याशिवाय रहात नाहीं, तात्पर्य, स्वायत्त श्रमसंयोग आणि परायत्त श्रमसंयोग यांची उत्पति आणि कार्यें अगदीं भिन्न प्रकारचीं आहेत. संपत्ति हें एकाचें तत्त्व आहें; बलात्कार, जबरदस्ती, किंवा सक्ती हें दुसऱ्याचें आहे. पहिला श्रमसंयोग व्यक्तीच्या हितासाठीं होत असतो, म्हणजे व्यक्तिकल्याण हा त्याचा आद्य किंवा प्रत्यक्ष हेतु असून, समाजहित हा त्याचा अप्रत्यक्ष हेतु आहे. दुसरा श्रमसंयोग समाजाच्या हितासाठीं होत असतो, म्हणजे साऱ्या समाजाचें हित साधणें हा त्याचा आद्य किंवा

प्रत्यक्ष हेतु असून, व्यक्तिहित हा त्याचा अप्रत्यक्ष हेतु असतो. परायत्त श्रमसंयोगावांचून म्हणजे सरकाराशिवाय समाज चालणार नाहीं. पण सरकाराशिवाय अस्तित्वांत असलेल्या समाजांची स्थिति फारच कष्टावह असते. चांगल्या समाजांत हे दोन्ही प्रकारचे श्रम हातांत हात घालून चालले असले पाहिजेत. समाजसंविधानाची, समाजरचनेची किंवा समाज-घटनेचीं हीं दोन मुख्यांगें होत असें म्हणावयास हरकत नाहीं.

स्वायत्त आणि परायत्त श्रमसंयोग उत्पन्न होऊन समाजसंविधान झालें किंवा समाजरचना अस्तित्वांत येऊन, त्यांत हे दोन प्रकारचे श्रम बरेच दृष्टीस पडूं लागले म्हणजे त्याच्या सुधारणेस आरंभ होतो. तथापि ती झपाट्यानें होऊं लागण्यास सरकारी अंमल व्यक्तीवर चालूं लागणें येवढेंच पुरें नाहीं. पांच चार लहान समाजांनीं मिळून एक मोठा समाज झाला असेल तर त्यापैकीं एकाचा बाकीच्यांवर अंमल बसला पाहिजे. नाहीं तर आपआपसांत नेहमीं भांडणें चालत राहून कोणासच सुख होत नाहीं. युरोपखंडांत जोंपर्यंत लहान लहान सरदार स्वतंत्रपणें वागत असत तोंपर्यंत त्यांचीं एकमेकांशीं भांडणें होत असून, कोणासही शांततेचा उपभोग घेतां येत नसे. प्रत्येकानें आपल्या किल्ल्याभोंवतीं मोठा तट बांधून व खंदक खणून लढाईस सिद्ध असावें व संधी सांपडली कीं शेजारच्या सरदारावर चालून जावें आणि मारामार व लुटालूट करून आपल्या किल्ल्यांत येऊन पडावें, असा प्रकार चालूं असे. अशा स्थितींत कोणासही आपल्या श्रमाचें फळ पूर्णपणें अनुभवतां येत नाहीं, व ज्या उद्योगास शांततेची आवश्यकता आहे अशांत पडतां येत नाहीं, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. अशा स्थितींत व्यापारधंदा मुळींच चालत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लढणारे आणि त्यांच्या चरितार्थासाठीं थोडेबहुत धान्य वगैरे जिन्नस उत्पन्न करणारे असे दोन प्रकारचे लोकच बहुधा अशा समाजांत असतात. या दोहोंपैकीं पाहिले आपणास अधिकारी किंवा स्वामी म्हणवितात. दुसऱ्यास दास्यस्थितींत आपलीं आयुष्यें कंठावीं लागतात. ही शोचनीय स्थिती नाहींशी होण्यास समाजांतलि तंटे मोडले पाहिजेत व ते मोडण्यास समाजाचे सगळे अवयव एका सरकारच्या अंमलांत वागूं लागले पाहिजेत. युरोपांतील सरदारांचा पाडाव होऊन जिकडे तिकडे

एकसत्तात्मक राज्याची स्थापना झाली तेव्हां तिकडील अर्वाचीन सुधारणेस आरंभ झाला. एकाच्या जुलुमापासून समाजांतील अवयवांस त्रास होत नाहीं असें नाहीं, पण साऱ्यांनीं रात्रंदिवस एकमेकांशीं भांडत असून जिकडेतिकडे झोटिंग पादशाहीचें साम्राज्य माजून राहण्यांत कोणास कधींच सुखानुभव होण्याचा संभव नाहीं. तात्पर्य, समाजाच्या विशिष्ट स्थितींत कोणाचा तरी सक्तीचा अंमल चालणें हेंच त्या समाजाच्या भावी हितास अवश्य आहे. दूर कशाला आपलेंच उदाहरण कां घ्याना? जोपर्यंत येथील मुसलमान बादशहांचा अंमल त्यांच्या सुभेदारांवर चांगल्या रीतीनें चालला होता, तोंपर्यंतच त्यांनीं जे पराक्रम केले ते केले. तो ढिला पडून गुजराथ, महाराष्ट्र, कानडा, बंगाल वगैरे प्रांतांत त्यांच्या सुभेदारांनीं स्वतंत्रता बळकावल्याबरोबर, मोंगल पदपादशाही डळमळूं लागली, व अखेरीस जमीनदोस्त झाली. आम्हां महाराष्ट्रीयांच्या अल्पकालीन वैभवाचीही अशीच गोष्ट आहे. मराठे व ब्राह्मण सरदार एकदिलानें वागत होते, तोंपर्यंत त्यांनीं कोणासही दाद दिली नाहीं. उत्तरोत्तर त्यांचा उत्कर्षच होत गेला. पण पुढें जेव्हां या उत्कर्ष करणाऱ्या सरदारांत भांडणें उत्पन्न झालीं, व मध्यस्त पेशव्यांचा हुकूम ते मानीनासे झाले, तेव्हां आमच्या राज्यरूप इमारतीस धक्के बसू लागून पिढी दोन पिढीच्या आंत तिचा चक्काचूर झाला! शिंदा स्वमतलबावर लक्ष देऊन मध्य हिंदुस्थानांत स्वतंत्र मुलुख बळकावून बसला. होळकरानेंही त्याच पंथांचें अनुकरण केलें. गायकवाडानें पेशव्यांस तोंडघशी देऊन इंग्रजांपासून आपलें कल्याण करून घेतलें. राजपुतान्यांतील राजे पेशव्यांच्या कह्यांत कधींच वागलें नाहींत म्हणून पेशवाईच्या नाशाबद्दल त्यांस मुळींच वाईट वाटलें नाहीं. याप्रमाणें चौघांचीं तोंडें चार दिशांस झाल्यामुळें, व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नसल्यामुळें आम्हां साऱ्यांसच पारतंत्र्यरूप वैधव्यानें ग्रासून टाकलें.

◆ ◆ ◆

१८ : : धर्मसंग्राम अथवा गृहकलह

सध्यां हिंदु लोक दोन प्रकारच्या संग्रामांत गुंतले आहेत; एक राजकीय व दुसरा धार्मिक. पैकीं पाहिल्या प्रकारचा संग्राम निकराचा नाहीं. तो अनेक शतकेंपर्यंत चालावयाचा आहे. तसेंच तो संग्राम दुसऱ्या प्रकारच्या संग्रामाप्रमाणें हिंदूहिंदूंत नाहीं. यांत एका बाजूला बलाढ्य इंग्रज लोक आणि दुसऱ्या बाजूला आम्ही सारे दुर्बळ हिंदु लोक आहेत.जेते व जित, शास्ते व शासित, किंवा राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यांतील हें रण आस्ते आस्ते चालणार आहे, व हळूहळू सर्व हिंदूंची एकजूट होऊन रक्तस्राव न होतां, कालांतरानें या रणाचा शेवट उभयपक्षांस संतोषकारक असा होणार आहे. तथापि या कामीं आमची एकजूट होऊन प्रतिवर्षी आमचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत जाणें, अथवा आमच्यांत फूट होऊन त्या कामाला बरीच मंदी येणें, हें घरच्या घरीं चालूं असलेल्या धर्मकलहावर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. राजकीय गोष्टींत आपआपसांत विशेष मतभेद नाहींत, हें जरी खरें आहे, तरी सर्वांस इष्ट असे राजकीय हेतु तडीस नेण्यासाठीं धर्मविषयक मतभेद एकीकडे ठेवून, राजकीय प्रकरणांत एकमतानें वागण्याइतकें चांगुलपणही आजमितीस आमच्या अंगांत नाहीं, व सांप्रत काळीं हा देश ज्या स्थितींत आहे तीवरून राजकीय कामें एकदिलानें चालविण्यासाठीं आम्हीं धर्मकलहांत पडणार नाहीं, असेंही चिन्ह दिसत नाहीं. उलट हा धर्मकलहच अधिकाधिक बळावत जाणार व त्यामुळें आमचा राज्यकलह थोडासा शिथिल पडणार, असें वाटतें. कोणत्याही देशांत राजक्रांति अथवा धर्मक्रांति होण्यास केव्हां कोणतीं कारणें होतात याविषयीं ज्यांनीं म्हणण्यासारखा विचार केलेला नाहीं, पण सध्यांच्या देशस्थितीवरून ज्यांना येवढें समजून आलें आहे कीं, सांप्रतकाळीं राज्यप्रकरणापेक्षां धर्मप्रकरणांत जेथें विशेष मतभेद आहे त्यांचें जुन्या धर्मावरील प्रेम विशेष दृढ असल्यामुळें म्हणा, किंवा आपआपसांत भांडत बसण्यापेक्षां सर्वांनीं एकदिलानें तिऱ्हाइताशीं भांडणें हें सर्वांस विशेष श्रेयस्कर आहे असें त्यांना वाटत असेल म्हणून म्हणा; एवढें खरें आहे

कीं, धर्मवादांत कोणी पडूं नये; सगळ्यास हितकर व इष्ट असें राज्यरण सर्वांनीं एकदिलानें करीत रहावें, आणि त्यासंबंधानें राष्ट्रीय मनोरथ परिपूर्ण झाले म्हणजे मग पाहिजे तर आपआपसांत धर्मसंगर करीत बसावें, अशा प्रकारचा उपदेश हे लोक नेहमीं करीत असतात, आणि त्या उपदेशानुसार वर्तन करण्यासारखी आमची स्थिति असती तर आम्हांसही पराकाष्ठेचा आनंद झाला असता; इतकेंच नाहीं, तर आमचा धर्म आम्हास कितीही अप्रिय असता तरी ती अप्रियता आम्हीं गुप्त ठेवून राजकीय प्रकरणांत एकमत करण्यासाठीं आमच्या हातून जे होण्यासारखें असतें तें केलें असतें. परंतु जसे युरोपीय देशांत राज्यकलहापूर्वी धर्मकलह होऊन गेले तसें येथेंही राज्यकलह जोराला लागण्यापूर्वी बरींच वर्षें जबरदस्त धर्मकलह चालत राहील; इतकेंच नाहीं, तर याच कलहापासून आमच्या राष्ट्रांत ज्या सामर्थ्याचा उद्भव होणार आहे, त्यापासून येथील भावी राज्यकलहासही पुष्कळ साहाय्य होणार आहे, अशी आमची खातरी झाली आहे. तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं चालूं असलेला धर्मसंग्राम किंवा धर्मकलह पाहून आम्हास वाईट वाटत नाहीं; इतकेंच नाहीं; तर तो जितक्या झपाट्यानें चालेल तितका चांगला असें आमचें मत आहे !

पूर्वी युरोपांत किंवा येथें जीं धर्मयुद्धें झालीं त्यांत कमीअधिक रक्तस्राव व प्राणनाश झाला. आमच्या सुदैवानें प्रस्तुतकालीं या देशांत ज्या धर्मयुद्धास आरंभ झाला आहे, तें युद्ध केवढ्याही विकोपास गेलें तरी त्यापासून पूर्वकालीं येथें किंवा अन्यत्र जी नासाडी झाली ती येथें होण्याचा बिलकुल संभव नाहीं. येथील धर्मयुद्ध टाकांनीं, जिभांनीं, व क्वचित् प्रसंगीं बारीकसारीक झटापटींनीं होत जाणार व तेवढ्याकरतांच तें जितक्या आवेशानें चालेल तितकें बरें, असें आम्हीं वर म्हटलें आहे. इंग्रजासारखे मानसिक व शारीरिक बलानें आम्हांहून शेकडोंपट श्रेष्ठ व आमच्या धर्माविषयीं आणि धर्मकलहाविषयीं अत्यंत उदासीन असे राज्यकर्ते आमच्या डोक्यावर नसतें, ते येथें असल्यामुळें आम्हांस आमचे धर्मयुद्ध फार वाईट थराला नेतां येणें अशक्य झालें आहे. पाहिजे त्यानें पाहिजे त्याला हवें तसें बोलावें, किंवा पाहिजे तर वाळींतही टाकावे ! पण धर्मवेडामुळें जर कोणीं कोणाच्या जिवाला अपाय कराल तर हिंदुस्थानांतील

पंचवीस कोटी लोकांनाहीं इंग्रजी न्यायाधिशांनीं त्या आपाय करणाराच्या गळ्याभोंवतीं घातलेला फांस सोडून टाकतां येणार नाहीं ! तेव्हां शुष्क वल्गना गाली प्रदान व बहिष्कार याहून कोणत्याही प्रकारची तिखट हत्यारें आम्हांस या रणांत वापरतां येणार नाहींत पण असल्या हत्यारांस आज-पर्यंत कोणी फारसा भ्याला नाहीं, व पुढेंही भिईल असेंहि दिसत नाहीं !

प्रस्तुत धर्मवादाच्या संबंधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्या-सारखी आहे. ती ही कीं, सध्यां हिंदू धर्माच्या तत्वाविषयीं मतभेद उत्पन्न होऊन, त्यामुळें दुही माजली आहे असें नाहीं. पूर्वी वैदिक धर्मानुयायांचें जे तंटेबखेडे झाले त्यांना उभय धर्मांतील विचारभेद कारण झाला होता. वैदिक धर्मानुयायी वेदास ईश्वरप्रणीत मानीत असून मांसाहार करणारे होते; तसेंच जातिभेद व मूर्तिपूजा यांचा त्या धर्मांत अंतर्भाव झालेला होता. बौद्ध धर्मांचीं तत्त्वें त्याच्या अगदीं उलट आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां या दोन धर्माच्या अनुयायांत जें भांडण झालें तें उभयतांच्या धर्मविषयक विचार भेदामुळें झालें असें म्हणणें भाग आहे. युरोपांतही हिदेन व ख्रिस्ति लोकांचीं जीं धर्मयुद्धें झालीं तींही अशाच प्रकारचीं होतीं. पुढें ख्रिस्ती धर्माच्या प्रमुख दोन शाखांच्या अनुयायांत म्हणजे क्याथोलिक व प्रॉटेस्टंट लोकांत जो तुंबळ धर्मसंग्राम झाला त्यालाही विचारभेदच कारण झाला. ख्रिस्ती आणि महंमदीय, किंवा महंमदीय आणि वैदिक धर्मानुयायांनीं एकमेकांशीं केलेलीं युद्धेंही आपापल्या धर्ममतांच्या मंडनार्थ व प्रसारार्थ केलीं, हें इतिहासप्रसिद्ध आहे. आम्हां सांप्रतचा धर्मवाद तसा नाहीं. वेदावर बिलकुल भरंवसा न ठेवणारा किंवा त्यास पौरुष म्हणणारा; कोणत्याही देवाच्या देवळांत कधींही पाय न ठेवणारा किंवा रामकृष्ण ऐतिहासिक पुरुष म्हणणारा, संध्या ब्रह्मयज्ञादि कर्में कधींच न करणारा किंवा श्राद्धादिकांस झूट म्हणणारा—सारांश, हिंदु धर्मांचें कोणतेंही महत्त्वाचें तत्त्व मला मान्य नाहीं असें उघडपणें म्हणणारा मनुष्य, सामान्य धर्माचार प्रसंगविशेषीं करण्यास तयार असेल तर तो कट्टया वैदिक धर्मानुयायांत मोडला जातो ! या शतकांत धर्मविचारास जें सर्व देशांत मांद्य आलें आहे त्यामुळें, आणि आमच्या देशांस प्राप्त झालेल्या विशेष स्थितीमुळें, वैदिक धर्माच्या आद्य तत्वाविषयीं चहूंकडे औदासीन्य वाढत चाललें आहे.

आहे. जो वाद चालला आहे तो फक्त एक दोन आचारांच्या संबंधानें चालला आहे. सर्व देशांप्रमाणें या देशांतही या वादाचा आरंभ उच्च वर्णांतल्या किंवा सुशिक्षित आणि विचार करणाऱ्या वर्गांतल्या लोकांत झाला आहे, शूद्रादि अशिक्षित वर्णांतील तुमच्या धर्मविषयक चळवळीचे अद्यापि बिलकूल भान नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, एकतर हिंदू धर्मांतील जे आचार त्यांना पाळावे लागत आहेत त्यांपैकीं कोणतेही आचार त्यांच्या वर्तनांत त्यांना नकळत जें अंतर पडत आहे त्यास विशेष प्रतिबंधक होत नाहींत; व दुसरें जे धर्मबंध शिथिल होण्यासाठीं उच्चवर्णांतील सुशिक्षित, विचारी व सदय लोक आतुर झाले आहेत, त्या धर्मबंधांनीं ते मुळींच बद्ध झालेले नाहींत.सध्यां आम्हां उच्च वर्णांतील लोकांस पुनर्विवाह करण्याची आणि पाहिजे त्या हिंदूच्या हातचें पाणी किंवा अन्न घेण्याची मोकळीक असावी असें वाटूं लागलें आहे.शूद्रादि अन्यवर्णांतील लोक तुमच्या पुनर्विवाहाच्या धामधुमीविषयीं कांहींच विचार करीत नाहींत. कारण त्या लोकांत पतिमरणोत्तर स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची मोकळीक आहे; इतकेंच नाहीं तर एकच नवरा जिवंत असला, पण कोणत्याही कारणानें तो नकोसा असला, तर त्याच्याशीं काडीमोड करून दुसऱ्याशीं पाट लावण्याच्या हक्काचा उपभोगही त्या इतर देशांतील सुखी स्त्रियांप्रमाणें घेत आहेत! पाहिजे त्याच्या हातचें अन्नपाणी घेण्याच्या संबंधानें जी आमची दुसरी नड ती त्यांना सामान्यपणें कधींच आड येत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. कारण, इतर कनिष्ठ वर्गांतील लोकांप्रमाणें मांसाहार किंवा मद्य-प्राशन उघडपणें करण्यास त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाहीं हें एक; व दुसऱ्या कोणत्याही वर्गापेक्षां त्यांचा वर्ग इतका मोठा आहे कीं, कोणत्याही ठिकाणीं त्यांस कोणत्याही प्रकारची म्हणण्यासारखी अडचण कधींच पडत नाहीं. पण जर कधींकाळीं कामाधामाच्या निमित्तानें ती थोडीबहुत पडली तर ते तिची पर्वा न करतां, आपणांस हितकारक असें वर्तन बेलाशक करतात. वरिष्ठ म्हणविणाऱ्या वर्गांतील लोकही तसें करूं लागले आहेत; पण आम्हीं तसें करतों असें उघडपणें कबूल करण्यास त्यांस अद्यापि बरीच लाज वाटत आहे! बाकी, रेल्वेच्या किंवा मेडिकल कॉलेजासारख्या विद्यालयांत जातिभेदास कोणी मुळींच विचारीत नाहीं,

हें सर्वांस ठाऊक आहे. स्टेशनवरील पोर्टरांत महारांची नेमणूक झाल्यामुळें व कंपनीच्या कामाच्या निमित्तानें घडोघडीं त्यांचा स्पर्शास्पर्श करून घेण्याचा प्रसंग येऊं लागल्यामुळें, अथवा आगगाडींतून प्रवास करणाऱ्या अतिशूद्रांचीं तिकीटें घेत असतां त्यांना शिवावें लागत असल्यामुळें संतापून जाऊन किती ब्राह्मण स्टेशनमास्तरांनीं आणि तार मास्तरांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला असेल, हें आम्हांस ठाऊक नाहीं ! याप्रमाणेंच इतर कारखान्यांतील ब्राह्मणादिकांची स्थिति आहे; हें सर्वांस कबूल केलें पाहिजे. तथापि शूद्रांच्या किंवा अतिशूद्रांच्या हातचें अन्न किंवा पाणी ब्राह्मणांनीं, प्रभूनीं, किंवा सारस्वतांनीं, घेण्यास कांहीं हरकत नाहीं, असें कोणी उघडपणें बोलला कीं, त्या त्या वर्गांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या धर्माभिमान्यांच्या पण पूर्वाचारास अंधपरंपरेनें बिलगणाऱ्या धर्माभिमान्यांच्या पायांतील आग त्यांच्या डोक्यांत चढली म्हणून समजावें ! खुळ्या धर्मरक्षकांनों डोळे उघडून पहा, आणि वास्तविक प्रकार कसा चालला आहे तें डोळे भरून पहा ! जें हातानें करीत असावें तें मी प्राण गेला तरी करूं देणार नाहीं; असा वाचिक आग्रह धरून बसणें हें खऱ्या मनुष्यपणास शोभते काय ? दूध पितांना मांजरानें आपलें डोळे झाकून घेतलें म्हणून त्यांचें तें चौर्य कर्म दुसऱ्यांस दिसत नाहीं काय ? ब्राह्मणानें ब्राह्मणेतर कोणत्याहि हिंदूच्या हातचें अन्नपाणी घेऊं नये या हट्टी मन्त्राचा जप करीत बसणाऱ्या ब्राह्मणाच्या प्रतिदिवशीं हव्या त्या हिंदूशीं जो प्रत्यक्षाप्रत्यक्ष समागम घडत आहे, तो दुसऱ्याच्या नजरेस येत नाहीं काय ? कामाच्या निमित्तानें एखाद्या अतिशूद्राला करांगुलीचा ईषत् स्पर्श करणें आणि सचैल स्नान न करतां घरांत शिरणें यांत आणि जाणून बुजून त्यांशीं शेकहॅांड करून किंवा त्यांनीं धुतलेलीं धोतरें नेसून जेवायला बसणें यांत काय अंतर आहे हें आम्हांस समजत नाहीं. तसें हलवायाच्या घरचा हवा तो जिन्नस, कुणब्याच्या हातची " शुक्रवारची काबली " किंवा मुसलमानाच्या किंवा अतिशूद्राच्या हातचें पाणी यांना निषिद्ध मानणें हें एकमेकाशीं असंबद्ध कसें नाहीं हें आम्हांस कळत नाहीं; किंवा ट्रेचरच्या दुकानांतील पाहिजे तें औषध राजरोस घेण्यास जर कोणताही प्रत्यवाय नाहीं तर खिस्ती लोकांच्या हातचा चहा पिण्यास का मनाई असावी हें कोणासही सांगतां

येणार नाहीं. पण " आम्हां सनातन वैदिक धर्मरक्षकांना तुमच्या कोटी-क्रमाची गरज नाहीं; जेवढे आचार रूढ झाले आहेत तेवढ्यांसच आम्हि धर्मसंमत म्हणणार; पण सर्वांगांनीं तत्सदृश पण आरूढ अशा आचारांस धर्मबाह्य मानून, जे कोणी उघडपणें त्यांचा अंगीकार करतील त्यांना बहिष्कार घालणार ! खुशाल घाला ! साऱ्या विचारशून्य लोकांचें वर्तना अशाच प्रकारचें असतें, तेव्हां तुमचेंच वर्तन त्यास अपवादक कोठून होणार ? पण ध्यानांत ठेवा कीं, ज्ञान आणि अज्ञान विचार आणि अविचार आंधळेपणा आणि डोळसपणा दुराग्रह आणि निराभिमान असद्धर्मरति आणि सद्धर्मप्रीति, किंवा दुःखावह आचरण आणि सुखावह आचरण यांच्या झगड्यांत अखेरीस तुमच्यासारख्यांची विटंबना, पराभव आणि निराशा होते ! वेळच्या वेळीं शुद्धीवर आला तर फजीत न पावतां, जगांतून आनंदानें निघून जाईल; नाहींतर तुमच्या डोळ्यांदेखत तुमचीं मुलें-बाळें हवे ते आचार करून, तुमचें जीवित अत्यंत कष्टमय करून सोडतील ! अमुक सवलत द्या म्हणून जोंपर्यंत नवीन पिढी पाठीमागें लागली आहे व तुमची विनवणी करीत आहे तोंपर्यंत ती देऊन टाकणें यांत तुमचा शहाणपणा आहे. तुमची पर्वा न करतां तिनें ती घेतली म्हणजे तुमची काय शोभा राहिली ? निष्कारण गृहकलह न माजावा येवढ्यासाठींच ही तुमची कानउघडणी फिरून फिरून करीत आहों, बाकी धर्माचें तत्त्व तुम्हांला किती समजलें आहे व धर्मानुसार तुमचें वर्तन किती होत आहे, हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे !

१९ : : इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार

मागें एकदां आम्ही बोलके सुधारक, कर्तें सुधारक आणि सुधारणाानिंदक असें जे लोकांचे तीन वर्ग दिले आहेत व त्यांच्या उत्पत्तीचे जे काल सांगितले आहेत, ते वाचकांच्या स्मरणांत असतीलच. आज या पत्राच्या चालकांस सुधारणेचा कोणता पंथ मान्य आहे, याचा विशेष खुलासा करावयाचा आहे. त्या खुलाशाचें सार " इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार " या शिरोलेखांत आणिलें आहे. पण त्यावरून साऱ्या वाचकांस स्पष्ट बोध होण्याचा संभव नाहीं, म्हणून थोडासा विस्तार करण्याची आवश्यकता आहे.

सांप्रत स्थितींत आपणांस कोणती गोष्ट प्रतिकूल आहे व कोणती अनुकूल होईल, ही गोष्ट यच्चयावत् बहुधा प्राणीमात्रास सहज स्वभावधर्मानें समजते. भूक लागली असतां कांहीं तरी अन्न खावें, तहान लागली असतां पाणी प्यावें, ऊन लागलें असतां सांवलींत जावें, थंडी लागूं लागल्यास उबाऱ्याची जागा पहावी, पीडा देणाऱ्याच्या हातून निसटून जाण्याचा प्रयत्न करावा—वगैरे जीवितरक्षणास अत्यवश्य लागणाऱ्या गोष्टींची संख्या अत्यंत स्वल्प आहे. व ती सहजगत्या जंतूंच्या वर्तनावर परिणाम करतें. किंबहुना असें न होईल तर जीवाची उत्पत्ति व अभिवृद्धि ही अशक्य होणार आहे. तेव्हां इतर प्राण्यांच्या समवेत मनुष्यांनीं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें येथें सांगण्याची गरज नाहीं. कारण त्या न केल्या तर मनुष्याची जातच राहणार नाहीं. तथापि जातां जातां ही गोष्ट येथें सांगण्यास हरकत नाहीं कीं, जरी इतर प्राण्यांप्रमाणें क्षुधादि इंद्रियसुखें हींच मनुष्यांचीं सारीं सुखें नाहींत, तरी तीं त्यांच्या इतर सुखांस अत्यंत आधारभूत असल्यामुळें प्रत्येक देशांतील लोकांनीं तीं संपादण्याविषयीं अत्यंत दक्ष असलें पाहिजे. ज्या राष्ट्रांतील लोकांस पोटभर अन्न मिळत नाहीं व थंडीवाऱ्यापासून आपलें रक्षण करतां येत नाहीं, असल्या राष्ट्रांतील लोकांस वरिष्ठ

सुखें मिळणें अशक्य आहे. तेव्हां बोलके सुधारक, कर्ते सुधारक, व सुधारणानिंदक या तिघांचा, जीवितरक्षणास लागणाऱ्या अत्यंत अवश्य गोष्टींच्या संबंधानें तरी मतभेद होण्याचा संभव नाहीं. प्राण सर्वांस प्रिय आहेत व त्यांचें रक्षण करणें सर्वांसच इष्ट वाटत आहे. तेव्हां धान्याची समृद्धि होण्यासाठीं शेतकीची सुधारणा करणें, वस्त्रादि शीतोष्णनिवारक साधनांची समृद्धि होण्यास यंत्रांचे कारखाने घालणें आणि यांत्रिक शिक्षणाचा प्रसार करणें, व्याधींच्या शमनार्थ वैद्यकादि शास्त्रांचा अभ्यास चालू ठेवणें वगैरे गोष्टींस कोणत्याही पक्षाकडून हरकत होण्याचा संभव नाहीं; परंतु मनुष्यांच्या सुखांचा व सुधारणेचा वैषयिक सुखांपाशीं व सुधारणेपाशींच शेवट होत नसल्यामुळें, त्यांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होण्यास कारणें होतात. इतर प्राण्यांच्या शरीररचनेपेक्षां मनुष्याची शरीररचना कांहीं निराळी असल्यामुळें किंवा झाल्यामुळें, आणि त्याची मानसिक रचना तर इतरांच्या रचनेहून फारच निराळी असल्यामुळें, इतर प्राण्यांच्या एका वर्गांतील निरानिराळ्या व्यक्तींच्या आचरणांत जितका भेद दृष्टीस पडतो, त्याहून शेंकडोंपट अधिक भेद मनुष्यवर्गांतील निरनिराळ्या व्यक्तींत दृष्टीस पडतो. धर्मकल्पना इतर प्राण्यांत असतील असें वाटत नाहीं, निदान त्या असल्या तरी आम्हांस समजण्याचा संभव नाहीं. संपत्ति जमविण्याची कल्पना किंवा साधन इतर प्राण्यांपाशीं नाहीं; तसेंच नाना प्रकारच्या सृष्टपदार्थांपासून नाना प्रकारचीं सुखें प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य त्यांस नाहीं;मनुष्यांच्या भाषेसारखी विस्तृत भाषा आणि भाषेहूनही कांहीं अंशीं विशेष उपयोगी अशी जी लेखन-कला ती त्यांस अवगत व साध्य नाहीं. या व अशाच दुसऱ्या अनेक कारणां-मुळें इतर प्राणिवर्गांतील व्यक्तींत मनुष्याइतका कलह दृष्टीस पडत नाहीं. मनुष्यांना आपल्या सुखांची वृद्धि करण्याचें व त्यांना चिरस्थाईपणा आणण्याचें सामर्थ्य आहे व एकमेकांस साहाय्य करून सर्वांस सारखा सुखोपभोग मिळेल अशी इच्छा धरून ती पुरविण्यासारखें वर्तन करण्याची अक्कल जरी त्यांना आहे, तरी याच गोष्टीमुळें इतर प्राण्यांपेक्षां त्यांच्या समाजांत विशेष क्रूर लढाया, विशेष श्रीमंती, विशेष दारिद्र्य, विशेष नीतिमत्ता, विशेष नीति पराङ्मुखता, विशेष ज्ञान, विशेष अज्ञान, विशेष प्रेम, विशेष द्वेष–यांसारख्या समाजोपकारी आणि समाजापकारीं वस्तूंचा आविर्भाव होतो. कोणता पाहिजे

तो मनुष्यसमाज घ्या, त्यांत अशा प्रकारच्या गोष्टींनीं नित्य कमी अधिक रण चाललें आहे असें दिसून येईल. हें एका समाजांतील व्यक्तीविषयीं झालें. पण दोन अथवा अधिक समाजांचा संबंध घेतला तरी त्यांतही हाच प्रकार दिसून येतो. कोणत्याही दोन समाजांची स्थिति सर्वांशीं सारखी असत नाहीं. तसेंच, विषयसुखाच्या किंवा आधिभौतिक संपत्तीच्या संबंधानें तर एकाचा दुसऱ्याशीं सतत कलह चाललेला असतो, त्यामुळें दोन असमान राष्ट्रांपैकीं श्रेष्ठाचा कनिष्ठावर अंमल झाला, म्हणजे कनिष्ठास किती पीडा भोगावी लागेल, याचें अनुमान करणें कठिण आहे. तात्पर्य, मनुष्यसमाजांतील व्यक्तींत व समाजासमाजांत तंटे होण्यास अनंत कारणें आहेत. तीं दूर होऊन ऐकमत्य व्हावें आणि सर्वांनीं एकादिलानें वागावें हें फार इष्ट आहे. पण हा योग आणखी दहापांच हजार वर्षांशिवाय येईल असें वाटत नाहीं ! व कधीं काळीं तो येणार असेल तर त्याला खऱ्या ज्ञानप्रसाराशिवाय दुसरें साधन नाहीं हें उघड आहे. यासाठीं ज्यांना आपल्या जातीचा म्हणजे मनुष्यजातीचा उद्धार व्हावा, असें मनापासून वाटत असेल त्यांनीं तो उद्धार होण्यासाठीं जीं साधनें आपणांस योग्य वाटत असतील त्यांचा निर्भीडपणें व निर्भयपणें रात्रंदिवस खल केला पाहिजे, आणि होतां होईलतों, मनास शुद्ध वाटलेल्या रीतीप्रमाणें वागवून दाखविलें पाहिजे.

तेव्हां आतां हें निर्विवाद झालें कीं, आणखी अनेक युगें मनुष्यांचीं भिन्न मतें आणि भिन्न आचार अस्तित्वांत राहून त्यांमध्यें अर्थातच कमीअधिक कलह चालणार. हा कलह कधीं मोठ्या निकरानें चालतो, व कधीं अगदीं मंदपणानें चालतो. सध्यां धार्मिक विषयांच्या संबंधानें, विशेषत: त्यांशीं संलग्न असलेल्या सामाजिक विषयांच्या संबंधानें, तो मोठ्या निकरानें चालविण्याचा प्रसंग या देशांत प्राप्त झाला आहे. मुसलमानांच्या धर्मवेडामुळें त्यांच्याशीं धर्मयुद्धें करावीं लागलीं. सांप्रतकाळीं पाश्चिमात्य शिक्षणामुळें येथें नवीन धर्मकल्पनांचा, नवीन राज्यकल्पनांचा व नवीन सामाजिक कल्पनांचा प्रादुर्भाव झाला आहे. नवीन पिढ्यांपैकीं कांहीं लोक या कल्पनांचे कट्टे भक्त बनले आहेत. ज्यांना पाश्चिमात्य शिक्षणाचा संपर्क लागलेला नाहीं, असे लोक एका बाजूस आणि वरील कट्टे भक्त दुसऱ्या बाजूस, असे दोन तट झाले आहेत. ज्यांच्यापासून लोकांस हें पाश्चिमात्य शिक्षण

मिळत आहे, त्या राज्यकर्त्यांनीं हिंदूंच्या धर्माचरणांत व सामाजिक आचारांत सहसा हात घालावयाचा नाहीं, असा संकल्प केला; कारण तसें करणें हितावह आहे असें त्यांस आपल्या इतिहासावरून व दुसऱ्यांच्या इतिहासावरून कळून आलें आहे. तथापि त्यांचा ओढा हिंदु सुधारकांकडे आहे, हें निर्विवाद आहे; कारण हे सुधारक त्यांचेकडून मिळत असलेल्या शिक्षणाचेंच फळ आहेत. जुन्या लोकांपैकीं समंजस लोकांस पाश्चिमात्यांची राज्यपद्धति व राज्यविषयक विचार पसंत पडूं लागून नवीन सुशिक्षितांबरोबर ते ती पद्धति आणि ते विचार अंगीकारूं लागले आहेत, हें राष्ट्रसभेस जी सामान्य अनुकूलता सर्वत्र दृष्टीस पडते तीवरून व्यक्त होत आहे. पण याच राष्ट्रसभेबरोबर किंवा वर्षभरानें तिच्या पाठीमागून अस्तित्वांत आलेली जी सामाजिक परिषद ती मात्र जुन्या लोकांस नको आहे ! पण ती कशी टळणार ! राष्ट्रसभा ज्या विद्येचें फळ आहे त्याच विद्येचें फळ सामाजिक परिषद आहे. ज्या ज्ञानामुळें तेलंग आणि रानडे यांस आमची राजकीय सुधारणा व्हावी असें वाटतें, त्याच ज्ञानामुळें त्यांस आमची सामाजिक सुधारणाही व्हावी असें वाटतें, व ज्या कारणामुळें त्यांचे राजकीय विचार आम्हांस मान्य होतात आणि ते व्यक्तिदृष्टीनें पूज्य वाटतात, त्याच कारणामुळें त्यांचे सामाजिक विचारही आम्हांस मान्य होऊन, व्यक्तिदृष्टीनें ते आम्हांस पूज्य झाले पाहिजेत. पण एका प्रकारच्या गोष्टींत आम्ही त्यांचा उत्सव करीत असतों, पवाडे गातो, आणि त्यांस आपले पुढारी म्हणवून त्यांचें अनुकरण करण्यास तयार होतों; व दुसऱ्या प्रकारच्या गोष्टींत त्यांची टवाळी करण्यास, त्यांना अद्वातद्वा दोष देण्यास, आणि हे आमचे पुढारी नव्हत म्हणून हिंदुस्थानसरकारकडे अर्ज करण्यास प्रवृत्त होतों, तेव्हां आमच्या असंबद्ध मूर्खपणास किंवा मूर्ख असंबद्धतेस काय म्हणावें कोण जाणें ! धार्मिक व सामाजिक विषयांच्या संबंधानें आमच्या लोकांचें ज्ञान " अकटो "पर्यंत जाऊन थडकलें होतें; राज्यविषयक गोष्टींत मात्र आम्ही दीर्घश्रवे होतों; तेव्हां पाश्चात्यांपासून व पाश्चात्यविद्यांकित हिंदूंपासून राज्यविचारांपलीकडे आम्हांस कांहींएक शिकावयाचें नाहीं, असा जुन्या पद्धतीच्या सर्व लोकांचा समज दिसतो ! पाश्चिमात्य शिक्षण मिळालेल्या नवीन पिढींतील ज्या लोकांनीं धार्मिक किंवा सामाजिक विषयांचा विचार केलेला नाहीं, किंवा करून ज्यांस

लोकसमुदायाची भीड तुटत नाहीं, असे लोकही रानडेतेलंगप्रभृति नवीन विद्वानांचा सामाजिक गोष्टींच्या संबंधानें उपहास करण्यास तयार होतात; पण या जुन्या पद्धतीच्या सर्व बड्या लोकांनीं आणि आंधळेपणानें त्यांच्या पाठीमागें जाणाऱ्या असंख्य मूढांनीं असें समजूं लागावें कीं, या देशांत ज्या विद्येचा पाय शिरला आहे तो आमच्या राज्यविषयक विचारांप्रमाणें आमच्या धार्मिक व सामाजिक विचारांतही प्रचंड क्रांति करणार आणि तदनुसार आमचें आचरण बदलत जाणार. हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीही भीति नाहीं. मनु आणि पाराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे. पण जें कांहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्यांचे स्थितींत ज्याच्या अपकारित्वाबद्दल संशय नाहीं, तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार ! एकाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय ? आमच्या अर्वाचीन विचारांस ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेंकडों मनूंचे व सहस्रावधी पाराशरांचे आधार दाखविलेत व त्यांचा प्रसार न व्हावा, म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान, आणि उठावणीचे आरडे यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफानवेगानें कड्यावरून पडूं लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होरपाळले जाण्याचा संभव आहे !

◆ ◆ ◆

२० : : महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें 'सुधारकां'त अलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यावर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याचप्रमाणें मराठा आणि केसरी पत्रांचा अवतार, प्रसार, आणि करवीरप्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इमस बरींच वर्षें एकमेकांशीं कसें वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे,त्यांना सुधारकासारख्या नवीन पत्राचें जनन,रा. टिळक व आगरकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेष व प्रस्तुत वादांत सुधारक व केसरी पत्रांच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडीमार पाहून या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस तीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत "ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर, आणि विशेशत: त्यांतील एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजानिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचितच मिळतें" अशीं दोन वाक्यें आहेत.हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस मोठा विस्मय वाटला! टिळक आणि आगरकर यांचा खासगी द्वेष! आणि तो कशासाठीं? टिळक आगरकरांचें किंवा आगरकर टिळकांचें कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा 'खासगी द्वेष' करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा बेबनाव व फुटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते, त्या

संस्था चालविण्याचा पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षांच्या साधनाविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला व याच मतभेदामुळें, प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षांचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं ! अशा रीतीनें आपापल्या देशाविषयक विचारांचें प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंजणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पाहत राहून व कौतुक करावयाचें विसरून जाऊन, अशा युद्धप्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच प्रेक्षकांनीं ' एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे,' किंवा कोणी कोणाचें 'खाजगी द्वेषाचे उट्टे काढून घेत आहे,' असा कुतर्क करणें अत्यंत अनुदार होय ! एका जननीच्या उदरांतून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भांडण किंवा मतभेद झाल्याशिवाय रहात नाहीं, तर ज्यांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाहीं, व ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार सर्वांशीं न जुळणें व ज्याला त्याला प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस आमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणारें नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल त्यानें ती धरणें, यांत नवल वाटण्यासारखें काय जाहे, हें आम्हांस समजत नाहीं ! बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतकें कशासाठीं भितां ? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें; व बहुधा आमचे लोक ' गतानुगतिक ' च असल्यामुळें हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे ! हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेविली पाहिजे. नाहींतर त्यापासून पुढें खऱ्या लढाया आणि रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक

आणि मंद सुधारक, थंडे सुधारक आणि गरम सुधारक अथवा नाना प्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक यांमध्यें सांप्रत कालीं जी दुही माजून राहिली आहे, ती पाहून घाबरून जाण्याचें बिलकूल कारण नाहीं ! पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेंत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चावळूं लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेनें पुनः एकवार चैतन्यावतार झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षी अगदीं यव प्रमाणांत कां होईना, पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों तो झपाट्यानें होऊं लागणार आहे. आतां किती झालें तरी कलह तो कलह ! तो कशाही प्रकारचा आणि कितीही सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाहीं, असें कोठून होणार ? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशीं संबंध आहे, त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधीं त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावें लागेल; कधीं एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधीं उभयतांनीं आरंभिलेल्या कामांतून अंग-काढून घेऊन विलग व्हावें लागेल; कधीं पदराला बराच खार लाऊन घ्यावा लागेल किंवा जिवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक व शारीरिक कष्ट करावे लागतील, पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं, प्रसारासाठीं भांडत आहों, असें प्रत्येकाच्या मनांत वागत राहील तोंपर्यंत न्यायसभेंत पक्षकारानें भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं, व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असें निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचें घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस, विशेष वाईट

वाटून डोळ्यांस पाणी येईल, व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल !

धर्म, राज्य व समाज यासंबंधानें अलीकडे जे औपपत्तिक सिद्धान्त सर्वमान्य होऊन बसले आहेत त्यांविषयीं आम्हां उभयतांत म्हणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचें व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीनें ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्त्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करित गेले पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं, याकरितां राजानिष्ठा यत्किंचित ढळूं न देतां राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्ही केलें पाहिजे; नीति प्रसार, संपत्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोकाशिक्षणाचें काम जितक्या झपाट्याने चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे, स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे वगैरे धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयासंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे एकाला तसे दुसऱ्यालाहि संमत आहेत. दोघांत जो मतभेद पडतो तो आज तारखेस हे सिद्धांत अंमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व तें कोणत्या साधनानें करता येईल यासंबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता आणि तिचीं साधनें यांविषयीं टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें, किंवा त्यांस मान्य असलेल्या विचारांबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचन्द्राकडून वदविलेल्या—

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

[अर्थः—स्नेह, दया, सौख्य, फार तर काय लोकांच्या संतोषासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं !] या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून, प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकच्छंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामांत सरकारचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धाळू, पांडितमन्य व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पांचशें रुपयांची नोकरी ज्यानें 'मला नको' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां, आज दहा अकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां, ज्यानें सात आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचे बऱ्या वाईट रीतीनें 'रकाने' भरून काढले, इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, येवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशांस अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक वाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्यांकडे बिलकूल लक्ष न देतां समान शीलाच्या व विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या सुधारणेचा आणि सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां, व लोकमत घड-

घडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगाचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाच काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर खांद्यावर खेळवून, ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे— अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. "हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे त्या अर्थी ती लोकांस अन्तीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी," असा विचार त्यांच्या मनांत येऊन, त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे; पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभवनाहीं; कारण, सारें जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम् ।
जानन्ति ते किमपि तानप्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

[अर्थः—खरोखरीच जे या गोष्टींत आमची निर्भत्सना करतात, त्यांना कांहींच समजत नाहीं, व त्यांच्याकरितां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शीलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल; पृथ्वी अफाट आहे व काल अनंत आहे !]

◆ ◆ ◆

२१ : : समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक व्यापारवृध्दि

आपल्या भाषेंतील 'व्यापार' शब्द अंत्यंत व्यापक आहे. शरीराच्या व मनाच्या कोणत्याही चलनावस्थेस व्यापार म्हणतात. 'व्यापारा'च्या या मूळ अर्थापासून बाकीचे अर्थ निघालेले आहेत. सांप्रत निबंधावलींत त्याचा सार्वत्रिक अर्थ घेऊन तत्संबंधानें कांहीं विचार वाचकांपुढें आणण्याचा इरादा आहे.

ज्यांनीं सामाजिक स्थित्यंतरांचा लक्षपूर्वक विचार केलेला नसतो, त्यांस असें वाटत असतें कीं, मृगयेवर चरितार्थ करून राहणारे रानटी लोक, पशु पालन किंवा कृषिकर्म करून राहणाऱ्या लोकांपेक्षां विशेष उद्योगी असतील, पण ही त्यांची चुकीची समजूत आहे. मांस, स्तन्य, आणि धान्य हीं मनुष्यांच्या उपजीविकेचीं मुख्य साधनें होत. यांपैकीं कोणत्याही एकावर, दोहोंवर किंवा साऱ्या तिहींवर मनुष्यास आपला चरितार्थ करतां येतो. शिकार करणें, मेंढरें, गाई, ससे, कोंबडीं, डुकरें वगैरे जनावरें पाळणें व दूधदुभतें करणें, आणि जमीन तयार करून तींत धान्य, भाजीपाला व फळ-फळावळ उत्पन्न करणें—या तीन गोष्टींपैकीं पाहिलीपेक्षां दुसरीस व दुसरीपेक्षां तिसरीस, अधिक श्रम, अधिक आत्मसंयमन व अधिक दूरदृष्टि लागतात, हें सहज समजण्यासारखें आहे. तेव्हां ज्या लोकांत उपजीविकेचीं हीं तिन्ही साधनें अस्तित्वांत आलीं असून त्यांची आवश्यकता पडूं लागली असेल, ते लोक पहिल्या, किंवा पहिल्या आणि दुसऱ्या साधनानें उपजीविका करणाऱ्या लोकांपेक्षां अधिक उद्योगी असले पाहिजेत, हें उघड आहे.

मनुष्याशिवाय इतर प्राण्यांपैकीं कांहीं केवळ मांसाहारी, कांहीं केवळ उद्भिज्जाहारी व कांहीं मांसोद्भिज्जाहारी असे आहेत. फक्त मनुष्य मात्र या तीन प्रकारांच्या आहारांपैकीं पाहिजे तो आहार करून राहूं शकतो. पण जसजशी त्याला उन्नतावस्था येत जाते, तसतसा त्याचा मांसाहार कमी होत जाऊन उद्भिज्जाहार वाढूं लागतो व शेवटीं तो केवळ उद्भिज्जाहारी होईल

किंवा होणें त्यास भाग पडेल, असें कित्येकांचें मत आहे. पण येथें आपणांस त्याची चर्चा करीत बसण्याची गरज नाहीं. येथें इतकेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे जे तीन वर्ग आहारभेदावरून वर केले आहेत, त्यांपैकीं कोणत्याही वर्गांतील प्राण्यास आपलें भक्ष्य 'गोपालवृत्ती' चें किंवा 'कृषीवलवृत्ती' चें अवलंबन करून संपादितां येत नाहीं. अशा रीतीनें आपला चरितार्थ करण्याची बुद्धि व सामर्थ्य फक्त मनुष्यांत आहे. मनुष्याशिवाय इतर प्राणिसंख्येची वृद्धि नैसर्गिक प्राण्युत्पत्तीवर व भूमिगत उद्भिज्जोत्पत्तीवर अवलंबून असते ती कमी झाली कीं त्यांची संख्या कमी होते व अधिक झाली कीं, अधिक होते. मनुष्याची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या शरिराच्या व मनाच्या विशिष्ट रचनेमुळें त्याला आपल्या उपजीविकेस लागणाऱ्या वस्तु ह्व्या तितक्या उत्पन्न करतां येतात. यामुळें मनुष्यांची संख्या आणि त्यांस लागणारें अन्न हीं एकसारखीं वाढत आहेत.

मनुष्यांत व इतर प्राण्यांत दुसरा आणखी एक भेद आहे तो हा कीं मनुष्यांची उपभोगेच्छा इतर प्राण्यांच्या उपभोगेच्छेसारखी मर्यादित नाहीं. इतर प्राण्यांस उदरपोषण आणि सजातिवर्धन याशिवाय इतर सुखांची कल्पनाही नसते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें त्यांच्या या दोन क्षुधांचें समाधान होत असलें म्हणजे ते सुखी असतात. मनुष्यांची तशी गोष्ट नाहीं. इतरांप्रमाणें या दोन क्षुधांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागली असून, शिवाय त्यांस अनेक प्रकारचे मानसिक व शारीरिक उपभोग घेतां येण्यासारखीं मनें व शरीरें प्राप्त झालीं आहेत, व या अनेकविध उपभोगांकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. हे अनेक उपभोग घेण्याचें त्यांचे अंगीं जें सामर्थ्य आहे त्यामुळें ते इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी आहेत किंवा नाहींत हा वादग्रस्त प्रश्न आहे, व याचें समाधानकारक उत्तर देतां येईल असेंही वाटत नाहीं. थोड्या वासना आणि थोडी तृप्ति व पुष्कळ वासना आणि पुष्कळ तृप्ति या दोन स्थितींपैकीं इष्टतर कोणती, याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे ? या वादांत समंजस मनुष्यानें कधींही पडूं नये. मनुष्यास विचार करतां येऊं लागल्यापासून कांहीं पहिला, व कांहीं दुसरा, पक्ष घेऊन भांडत आहेत, व तदनुरोधानें **निवृत्ति** व **प्रवृत्ति** असे दोन

विचार व आचारपंथ झाले आहेत. फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या भानगडींत पडूं नये, असे निवृत्तिपंथाचे प्रचारक आज शेंकडों वर्षें सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाधिक जात चाललें आहे. तेव्हां सामान्य विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, अनेक उपभोग भोगल्यापासून मनुष्य इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळींच न पडतां, अनेक उपभोगांची वाञ्छा करावी, ते प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटावें आणि त्यापासून होईल तितकें सुख प्राप्त करून घ्यावें, असा मनुष्यांचा सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळें मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनांत इतकें अंतर पडलें आहे.

मनुष्यांच्या आहारवस्तु कष्टसाध्य आहेत व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे, येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या म्हणजे त्यांस इतर प्राण्यांपेक्षां शेंकडोंपट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हें सहज समजणार आहे. हें ज्यास पक्कें समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वतः उद्योगी होईल इतकेंच नाहीं, तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्यांचें सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य घालविणें शक्य आहे. पण कोणत्याहि कारणानें उद्योगी मनुष्याशीं गांठ पडल्यास, एक तर त्यांच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या आधीन होऊन तो ठेवील त्या स्थितींत राहण्यास, तयार झालें पाहिजे. सध्यां आम्हां निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितींत ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध असलें पाहिजे. आमचें भावी स्वातंत्र्य, अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेत. एक नियामक व दुसरा उत्पादक. नियामक उद्योग

म्हणजे ज्या उद्योगामुळें मनुष्यांत आपल्या समाजांत व्यवस्था ठेवतां येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे; म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गांत येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील कांहीं लोक पहिल्या प्रकारचा, कांहीं दुसऱ्या प्रकारचा, व कांहीं दोन्ही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणें या निरानिराळ्या वर्गांतील लोकांचें प्रमाण कमी अधिक होत असतें. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते, तो विशेष सुखी असतो. अमेरिकेंत सध्यां अशी स्थिति आहे त्यामुळें तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षां प्रत्येक बाबतींत फार पुढें सरसावले आहेत. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणुं काय वेड लागून गेलें आहे, व त्यामुळें संयुक्त संस्थानें इंद्रलोकतुल्य होऊन गेलीं आहेत. या संस्थानांच्या खालोखाल इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्योग करण्याची स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील, व साऱ्यांस सारखें वैभव प्राप्त करून घेतां येईल, असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखें जें सुख अतेल तें त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीनें उद्योग केल्याशिवाय कधींही प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांहीं हौस असली तर नियामक उद्योगाची—असे लोक मोठेपणास कधींही चढणार नाहींत. पण सध्यां तर आमची तशी स्थिति होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनींच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यास चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण ? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करतां येणार ? अंमलदार मुळींच नकोत असें आमचें म्हणणें नाहीं. पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिति काय

कामाची ? १७८९ सालीं फ्रान्स देशांत जी मोठी राज्यक्रांति झाली तिच्या अनेक कारणांपैकीं फाजील अंमलदार हें एक मुख्य कारण होतें. जिकडे तिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळें देशांतील वार्षिक संपत्तीचें उत्पन्न अगदीं संपुष्टांत आलें होतें, इतकेंच नाहीं, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडी बहुत संपत्ति उत्पन्न करीत, त्यांवर पराकाष्ठेचा जुलूम होऊं लागला होता. अंमलदार वाजवीपेक्षां अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारासाठीं तिला आपल्या प्राप्तीचा बराच वांटा द्यावा लागतो. दुसरें, त्यांच्या जुलमामुळें केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशा-विषयीं तिला संशय येऊं लागतो. या दोन कारणामुळें उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचे अनुत्पादक लोक वाढल्यानेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजील शिक्षक फाजील अडते, फाजील लेखक (पत्रकर्ते, पुस्तककर्ते, वगैरे), फाजील वकील, फाजील राजकारस्थानी या सर्वांच्या फाजीलपणांत, म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां जास्त संख्या होण्यांत, कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. अशा प्रकारचे लोक मुळींच नसावेत, असें आमचें म्हणणें नाहीं. तसें झाल्यास समाज मुळींच सुरळीत चालावयाचा नाहीं. पण त्यांचें कमीपण त्याला जितकें विघातक आहे तितकें त्यांचें अधिकपणही विघातक आहे. आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरें ? हाडांची काडें करून, व शेंकडों रुपये खर्च करून, बी. ए पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय ? तर रेव्हिन्यू खात्यांत किंवा शाळा खात्यांत, २०।२५ रुपये दरमहाची नोकरी ! चांगला सुतार सुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५।३० रुपये सहज मिळवितो, हें या ग्राजुएटांस समजूं नये काय ? तसेंच कोठें १०।१२ रुपयांची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेंपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज ! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व ! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे

स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणा. आहे ? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वत च्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे ?

◆ ◆ ◆

२२ : : भांडवल गेलें, व्यापार गेला !

ज्याप्रमाणें शरीराला अन्नाची त्याप्रमाणें व्यापाराला भांडवलाची आवश्यकता आहे. ज्या देशांत भांडवल नाहीं, तेथें व्यापार कोठून चालणार ? मुसलमान लोकांनीं येथें अनेक शतकें राज्य केलें. पण त्यांच्या त्या दीर्घकालीन अंमलानें आम्ही जितकें डबघाईस आलों नाहीं, तितकें या शतसांवत्सरिक ब्रिटिश अंमलानें आलों आहों. याचें कारण उघड आहे. तैमूरलंग, झेंगीजखान, गिझनी महंमद यांनीं या देशावर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यामुळें आमचें अतोनात नुकसान झालें हें खरें आहे. पण तें नुकसान, ब्रिटिश अंमलामुळें आमचें जें नुकसान होत आहे त्यापुढें कांहींच नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमान लढवय्यांनीं जें द्रव्य लुटून नेलें तें सांचविलेलें द्रव्य होतें. त्याचा व्यापाराशीं तादृश्य संबंध नव्हता. शेंपन्नास वर्षांनीं एखादी झुंड येऊन कोटि दोन कोटि रुपयांची लूट घेऊन गेली तर तीपासून होणारें नुकसान आणि प्रतिवर्षी उत्पादक संपत्तीपैकीं बाहेर जात असलेल्या दहापांच कोटींपासून होत असणारें नुकसान यांची साम्यता कोठून होणार ! तसेंच हेंही ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, मुसलमानांचा अंमल येथें कायम झाल्यापासून, येथला पैसा बहुधा बाहेर गेला नाहीं. इंग्रजाप्रमाणें मुसलमान पिशवी भरली कीं विलायतेस पळणारे नसल्यामुळें, त्यांच्या अंमलापासून द्रव्यदृष्ट्या आमचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. आतांप्रमाणें त्या वेळेस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा जिंकणाऱ्यांच्या

जातभाईंस मिळत असत. परंतु त्यांचें नेहमींचें राहणें येथें पडल्यामुळें, त्यांचा सारा खर्च येथेंच होत असे व त्यामुळें व्यापारधंदा करणाऱ्या लोकांस किंवा कारागीर लोकांस मोठें नुकसान झाल्यासारखें वाटत नसे. मशीदीचे दगड घडविणें; किंवा देवळाचे दगड घडविणें; ताजमहाल बांधणें किंवा काशीविश्वेश्वराचें देऊळ बांधणें; पेशव्यांसाठीं शालजोड्या विणणें किंवा बादशहाकरितां मोलाचे गालीचे तयार करणें, मस्तानीसाठीं निवडक जवाहीर विकणें किंवा नूरजहानच्या सांगण्यावरून सारा देश धुंडाळून पाचेचे सर्वोत्कृष्ट खडे पैदा करणें—यांत त्या त्या कारागीरांस किंवा व्यापाऱ्यांस विशेष भेद वाटला नसेल, हें उघड आहे. पण सध्यांची स्थिति तशी नाहीं. इंग्लिश लोक ज्या वस्तु वापरतात, त्यांपैकीं बहुतेक इंग्लंडाहून येतात इतकेंच नाहीं, तर त्यांच्या यंत्रकृत वस्तू आमच्या हस्तकृत वस्तूंहून अधिक सवंग व सफाइदार असल्यामुळें, आमच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंपैकीं अनेक वस्तूहि आम्ही इंग्लंडापासूनच खरेदी करतों. यामुळें येथील कारांगिरास हवें तितकें काम मिळेनासें झालें आहे. याशिवाय, ज्या खर्चाबद्दल आम्हांस एका कवडीचाही मोबदला मिळत नाहीं, असाहि पुष्कळ खर्च होत आहे. या सर्व खर्चाचा 'होम चार्जीस' या नांवाखालीं समावेश करण्यास हरकत नाहीं. यांत हिंदुस्थानांत असलेल्या कर्जाबद्दल व्याजाची जी रक्कम प्रतिवर्षी इंग्लंडास पाठवावी लागते ती, नोकरी आटोपून किंवा साडून गेलेल्या नोकरांचीं पेन्शनें; सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलाचा खर्च आणि यांसारख्या ज्या इतर बाबी आहेत त्या येतात. या सर्वांबद्दल गेल्या वर्षीं सेक्रेटरी ऑफ स्टेट यानें आम्हापासून तेवीस कोट रुपये घेतले ! हिंदुस्थानच्या काळीचा एकंदर वसूल एकोणिस कोटि रुपये आहे, तेव्हां हिंदुस्थानच्या जामिनीचें सारें उत्पन्न जरी त्या प्रचंड अधिकाऱ्यांस अर्पण केलें तरी देखील त्यांचें पोट भरत नाहीं, हें उघड आहे. त्यांचें समाधान होण्यासाठीं आणखी चार कोटि रुपये कोठून तरी काढून द्यावे लागतात ! म्हणजे हिंदुस्थानच्या नक्त उत्पन्नापैकीं पक्के अर्धें उत्पन्न इंग्लंडांत जात असून त्याबद्दल आमचा काडीचा देखील फायदा होत नाहीं; व असा क्रम कमीअधिक प्रमाणानें आज शंभर वर्षें चालला आहे ! या गोष्टीं ज्याला समजल्या असतील त्याला 'आम्ही इतकें

दरिद्री कशासाठीं' हें तेव्हांच कळून येणार आहे. इंग्लिश लोक मोठे उद्योगी, कल्पक, साहसी व बुद्धिमान आहेत व या गुणामुळेंच त्यांनीं आपला देश सुवर्णमय करून टाकला आहे हें निर्विवाद आहे, तथापि या पुराण सुवर्णभूमींतलि बरेंच सुवर्णाहि त्यांच्या संपत्तिमत्त्वास कारण झालें आहे, हें त्यांचें त्यांनाच कबूल करावें लागेल. पण ज्या मानानें ते आमच्या देशांतून प्रतिवर्षीं उत्पादक संपत्ति तिकडे नेत आहेत, त्या मानानें आमची कंगालता अधिकाधिक दाट होत जाऊन, आमचे व्यापार बंद पडत चालले आहेत; पोटभर अन्न व अंगभर वस्त्र न मिळाल्यामुळें, नाना तऱ्हेचे रोग वाढत चालले आहेत; रोग आणि उपासमार यांच्यामुळें आम्ही व्यथित होऊन आमच्या तोंडावर अवकळा येत चालली आहे; आणि प्रतिवर्षीं रक्तपितीसारख्या महारोगग्रस्तांची व इतर जातींच्या रोग्यांची संख्या वाढत जाऊन, त्याच प्रमाणानें मृत्युसंख्याही वाढत चालली आहे. इंग्लिश लोक या भयंकर स्थितीच्या संबंधानें येथून पुढें पूर्ववत् डोळेझांक करतील तर उभय देशावरहि मोठ्या संकटाचा प्रसंग गुदरून त्यामुळें उभय देशांतील लोकांचेंहि अज्ञातपूर्वक नुकसान होणार आहे! ज्याप्रमाणें झाडाच्या चारदोन फांद्यांवर थोडीशी टवटवीत पालवी, व दहापांच फळें दृष्टीस पडतात; पण बारकाईनें त्यांकडे पाहिलें तर बुडख्यापासून शेंड्यापर्यंत तें किड्यांनीं पोखरून टाकिलें आहे, व थोड्याशा जोराच्या वाऱ्यानें एकदम मोडून पडण्यासारखें झालें आहे, असें दिसून येतें, त्याप्रमाणें या देशाची अवस्था झाली आहे. मुंबई, कलकत्ता किंवा मद्रास यांच्यासारख्या दहापांच टवटवीत शहरांवरून, किंवा लाख दोन लाखांत जो एखादा दुसरा खरा सुखवस्तु इसम दृष्टीस पडतो त्यावरून, चहूंकडे तशीच अबादानी असेल असें अनुमान करणें हा शुद्ध भ्रम होय. सर रिचर्ड टेंपलसारखे जे गृहस्थ जाणूनबुजून इंग्लिश पार्लमेंटांत व इंग्लिश लोकांस या मिथ्या भ्रमांत पाडीत आहेत, ते इंग्लंडचे अपरिमित नुकसान करीत आहेत, व या त्यांच्या अपराधाबद्दल उभय लोकांस भारी दंड द्यावा लागणार आहे. तेव्हां हा प्रसंग टाळण्यासाठीं आम्ही आपली खरी स्थिति इंग्लिश लोकांच्या नजरेस आणणें हें जितकें आमचें कर्तव्य आहे, तितकेंच इंग्लंडाचें खरें हित चिंतणाऱ्या आंग्लतनयांचेंहि आहे.

येथील बहुतेक उत्पादक भांडवल प्रतिवर्षी इंग्लंडास जाऊन येथील उद्योगधंदा नष्ट झाल्यामुळें येथील काम करणाऱ्या लोकसंख्येची कशी स्थिति झाली आहे, हें कोणास थोडक्यांत समजून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं पुढील आंकडे लक्ष लावून वाचावे. हिंदुस्थानांतील शंभर मनुष्यांपैकीं ८६ मनुष्यांचा संबंध शेतकीशीं आहे; इंग्लंडांत १४ चा आहे. गिरण्या वगैरे कारखान्यांत हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा १२ माणसें असतात; इंग्लंडांतील लोकांपैकीं अशाच कामांकडे शेंकडा ३० असतात, आणि इतर सर्व प्रकारच्या उद्योगांमुळें इंग्लंडांत शेंकडा पंचावन्न इसमांस जें काम मिळतें, तें येथें जेमतेम दोन इसमांस मात्र मिळतें ! अशा स्थितींत दुष्काळ आल्याबरोबर, लाखों लोकांस अन्नान्न करीत परलोकप्रयाण करावें लागतें, यांत कांहीं नवल आहे काय ? आमच्या व्यापाराची ही हृदयभेदक स्थिति समंजस इंग्लिश लोकांपुढें आणिली म्हणजे ते असा अभिप्राय देतात कीं, हिंदुस्थानची व्यापारवृद्धि झाली पाहिजे. तीवांचून दुसरा तरणोपाय नाहीं ! पण ही व्यापारवृद्धि कशी होणार, याचा मात्र विचार करण्यास कोणीं धजूं शकत नाहीं ! कारण तो करूं लागलें कीं, इंग्लंडच्या व्यापारावर थोडीबहुत गदा येईल, निदान त्याला थोडाबहुत तत्कालिक तरी धक्का पोहोंचेल अशा साधनांचा उपयोग केल्याशिवाय, हिंदुस्थानच्या व्यापारधंद्यास सांप्रत स्थितींत उत्तेजन देणें अशक्य आहे, हें दिसून येतें. तसें करण्याची आज-मित्तीस कोणाची प्राज्ञा आहे ? परोपकाराच्या लांब लांब गप्पा मारणें फार सोपें आहे ! व्यक्तीपेक्षां राष्ट्रास ही गोष्ट विशेष तऱ्हेनें लागू पडते. इंग्लंडानें आमचे व्यापार आटोपले असल्यामुळें, आमचें केवढें नुकसान होत आहे, हें जोंपर्यंत इंग्लंडचा माल येथें खपत आहे तोंपर्यंत इंग्लिश व्यापारी मनांत कशासाठीं आणतील ? ज्या वेळेस येथें एखादा मोठा दुष्काळ पडून, किंवा **टाइम्स ऑफ् इंडिया**नें म्हटल्याप्रमाणें, दारिद्र्यानें पिळून काढलेल्याला व भुकेनें गांजून गेलेल्या लोकांचें एखादें प्रचंड बंड होऊन, त्यांच्या व्यापारास एकाएकीं मोठा धक्का बसेल, व कोट्यवधि रुपयांचें नुकसान होईल, तेव्हां कोठें त्यांचे डोळे उघडणार ! तसें नसेल तर येथील व्यापाराची वृद्धि करणें काय कठिण आहे ? एकट्या कापसाच्या

व्यापारास थोडेंसें उत्तेजन दिलें तरी देखील आम्हांस आलेली अन्नान्नदशा कांहीं वर्षें दूर होणार आहे. इतकेंच नाहीं, तर अफूचा व्यापार बंद झाल्यास हिंदुस्थानच्या जमाबंदीच्या तटांत जें पांचसात कोटींचें अवाढव्य भगदाड पडण्याचा रंग दिसत आहे तेंहि बऱ्याच अंशीं भरून काढतां येणार आहे. अशा प्रसंगीं इंग्लंडहून येणाऱ्या कापडावर जबर जकात ठेवण्यास काय हरकत आहे ? तसें केल्यास, जमाबंदीस बरीच मदत होऊन, येथील कापसाच्या कारखान्यांसहि बरीच मदत होणार आहे. वास्तविक पाहतां कापसाची, मजुरांची व कापसाच्या कारखान्यांत लागणाऱ्या भांडवलाची आमचेपाशीं इतकी समृद्धि आहे कीं, जर उत्पन्न केलेला माल हटकून खपेल अशी आमची खात्री होईल, तर भरतभूमीस आपली लाज झांकण्यासाठीं इंग्लंडचा धांवा करावा लागणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर या व इतर खंडांत ज्या भूमिका उघड्या पडल्या असतील, त्यांच्या शरीरांवर ही भरतभूमि, आपलें एक अंगुष्ठ देखील उघडें पडूं न देतां हवीं तितकीं वस्त्रें घालील ! पण लँकेस्टरच्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान सरकारास असें करूं देणें म्हणजे स्वार्थरूप बाभळीच्या झाडाला अघटित घटनेनें फणस किंवा आंबे येण्यासारखें होय !

◆ ◆ ◆

२३ : : व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं.

इतक्या दिवस असा भ्रम असे कीं, चीन देशाची लोकसंख्या पंचेचाळीस कोटी आहे, तेव्हां पृथ्वींत मनुष्यांनीं विशेष गजबजलेला देश काय तो चीन देश. पण अलीकडे झालेल्या मनुष्यगणतीवरून असें समजतें कीं, चीनची लोकसंख्या हिंदुस्थानच्या लोकसंख्येइतकीच, म्हणजे पंचवीस कोटीच्या आंतबाहेर आहे. असें असतां चीनचे किती लोक नानातऱ्हेच्या व्यापारांवर पोट भरितात ? आमच्या देशांत शेतीच्या उपयोगाची पुष्कळ जमीन आहे, हें खरें. पण ती कधींच लागवडींत येऊन चुकली आहे.

कित्येक नेटिव संस्थानांत अद्यापि कांहीं पडीत जमीन आहे, व ती लागवडीस आणिली असतां, बराच फायदाही होणार आहे; पण त्याचा आम्हां ब्रिटिश अंमलाखालच्या प्रजेस काय उपयोग ? एकतर नेटिव संस्थानिक इकडील प्रजेस ती लागवडीस आणण्याची परवानगी देतील कीं नाहीं याचा संशय आहे, व देतील असें मानिलें, तरी आपलें घरदार सोडून परमुलखांत जाण्याचें धैर्य, व पडीत जमीन लागवडीस आणण्यास लागणारें भांडवल, ही आम्हांपाशीं कोठें आहेत ? ब्रिटिश अंमलांतील प्रजेपैकीं तीनचतुर्थांशांहून अधिक प्रजा केवळ शेतीवर चरितार्थ चालविते; यामुळें दुष्काळाच्या प्रसंगीं अन्नावांचून लाखों लोक प्राणास मुकतात. युरोपांतील निरनिराळ्या देशांत शेतीचा धंदा करणाऱ्यांचे इतर धंदेवाल्यांशीं प्रमाण आपल्याहून अगदीं भिन्न आहे. कोठें तीन, कोठें चार, कोठें पांच, कोठें सहा धंदेवाल्यास एक शेतकरी पडतो. त्यामुळें दुष्काळाच्या वेळीं चारपांच जणांस एकावर अवलंबून रहावें न लागतां, एकाला चारपांच जणावर रहावें लागल्यामुळें, त्याचा सहज बचाव होतो. ज्या देशांत व्यापार पुष्कळ चालतो, त्यांतील लोकांस उपाशी मरण्याची पाळी कधींही येत नाहीं. शेतकीच्या धंद्याला लागतात तेव्हां फार माणसें लागतात, नाहीं तेव्हां मुळींच लागत नाहींत, किंवा एकदोघांवर तो चालतो. पेरणी झाल्यापासून भांगलणीचा वेळ येईपर्यंत फारच थोड्या मनुष्यांची आवश्यकता असते. दाणा भरेपर्यंत राखणीचें काम करण्यास देखील एकादा मनुष्य बस्स होतो. पुष्कळ मनुष्यें लागण्याचा प्रसंग म्हणजे काय तो कापणीचा. जित्राप बागाईत असो किंवा जिराईत असो, पिकें कापून माल घरीं आणण्यास पुष्कळ मनुष्यांचें सहाय्य लागतें, व या कृत्यास युरोपांतील यांत्रिक कलेची मदत घेतल्यास यालाही फार मनुष्याची गरज पडणार नाहीं. ज्यांच्याकडे जिराईत जमीनी आहेत, त्यांना तर उन्हाळ्यांत कांहीं करावयाचें नसतें. आपलें आणि आपल्या जनावरांचें पोट भरण्यासाठीं कित्येकांना गाडीवानांचा धंदा करावा लागतो व कित्येक मुंबईकडे किंवा सोलापूराकडे गिरणींत काम पाहण्यास जातात. तसेंच रेल्वेवर व दुसरा एकादा कारखाना निघाला तर त्यांवर, हवें तेव्हां हवे तितके मजूर मिळण्याची मुळींच पंचाईत पडत नाहीं. यावरून काय सिद्ध झालें, कीं आमच्या देशांत पुरेसें काम

नाहीं, असे पुष्कळ लोक आहेत. त्यांना तें मिळण्यांस आपल्या देशांत लहानसान व्यापार काढले पाहिजेत. आजच वसईच्या पुलायेवढे पूल ओतण्याजोगे लोखंडाचे कारखाने, किंवा मांचिस्टरच्या येवढ्या टोलेजंग गिरण्या आम्हांस स्थापितां येणार नाहींत; व असल्या जाडी प्रकरणांत आरंभींच हात घालणें, म्हणजे यशाची मुळींच आशा सोडण्यासारखे होय. आजकाल शहरोशहरीं बारीकसारीक वस्तूंचे कारखाने निघाले, तरी कित्येक मोकळ्या बसणाऱ्या मजुरांस काम मिळून, इंग्लंडांतून येणाऱ्या पुष्कळ चिजा येथल्या येथें तयार होतील; व त्या येथें झाल्यानें फार स्वस्त पडतील. एके ठिकाणीं बसून कोणीही आपल्या समोंवती नजर फेकली असतां, त्याला असें दिसून येईल कीं, त्याच्या नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या शंभर जिनसांत सुमारें ९० जिनसा इंग्लंडाहून आलेल्या असतात. कुलपें, टांक, दौती, कागद, पुस्तकें, शाई, सुया साबण, नेसावयाचीं धोतरें व अंगांतील अंगरखे, सुताराची हत्यारें, तांबें, रुपें, सोनें, औषधांच्या बाटल्या, घड्याळें वगैरे सर्व साऱ्या परक्या देशांतून आलेल्या चिजा, आणि या सगळ्यांबद्दल आम्हीं परत काय देतों तर धान्य. या आणि असल्या अनेक वस्तू येथल्या येथें तयार करण्यांस फारसें भांडवल पाहिजें असें नाहीं. पण आमच्या लोकांस किरकोळ कारखाने काढण्याची चटच लागली नाहीं, त्यामुळें आमचे पराकाष्ठेचें नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या कायद्यामुळें ज्यांचें भांडवल मोकळें पडलें आहे, त्यांपैकीं दहापांच जणांनीं मिळून दहा पंधरा-हजार रुपयांच्या निरनिराळ्या रकमा उभ्या केल्या, व साबण, काड्याच्या पेट्या मेणबत्त्या, जाड कागद, अर्क, तेल, साखर वगैरे जिनसा करण्याचे जागोजाग कारखाने घातले तर, व्याजानें रुपये लावण्यापेक्षां त्यांस कमी फायदा पडणार आहे असें नाहीं. पण असल्या शुष्क कामास देखील लागणारें धाडस व माहिती आमच्या लोकांस आहे कोठें ! त्यांना बसल्या जागेवरून हलायला नको. घरच्या घरीं बसून फायदा होण्याची इच्छा मोठी. जे लोक आपले पैसे ब्यांकेंत टाकून शेंकडा चार रुपये व्याजांत समाधान मानून घेतात, त्यांनीं लहान लहान कंपन्या काढून, अशा प्रकारच्या कारखान्यांत आपले पैसे घातले, तर त्यांना निदान बारा रुपये व्याज पडणार आहे. परकी राज्य असल्यामुळें आम्हांस

प्रतिवर्षीं जी खंडणी द्यावी लागते, तीमुळें हा देश तर भिकार होत चाललाच आहे, पण तशांत आम्हीही हातपाय हलविण्याचें सोडलें, तर आम्हां सर्वांस लवकरच अन्नान्नदशा येईल. यासाठीं सर्व समंजस पैसेवाल्यांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं येत्या प्रदर्शनास स्वतः जाऊन, किंवा आपल्या वतीनें शिकलेले व हुषार लोक पाठवून, तेथें जीं नानातऱ्हेचीं यंत्रें आलीं असतील, त्यांपैकीं या देशांत कितीकांचा उपयोग करतां येईल त्याचा शोध करवावा, व ते ते कारखाने काढण्याची सुरुवात करावी.

हिंदुस्थानची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें, या देशांत व्यापारबुद्धीची किती आवश्यकता आहे, हें मागल्या निबंधांत सांगितलें. प्रस्तुत निबंधांत व्यापाराला आमची देशस्थिती किती अनुकूल आहे हें दाखवायचें आहे. व्यापाराच्या जिनसा उत्पन्न करण्यास मुख्य दोन गोष्टी लागतात; त्या कोणत्या म्हणाल तर मजुरी आणि कच्चा माल. देशांत नानातऱ्हेचे मजूर असल्याशिवाय, किंवा खंड्यांच्या खंड्या कच्चा माल उत्पन्न होत असल्याशिवाय त्यांत व्यापाराची भरभराटी व्हावयाची नाहीं. ह्या दोनही वस्तूंची आमच्या येथें समृद्धि आहे. सर्व संपत्तीचा मूळ झरा जमीन होय. संपत्ती म्हणजे जिला किंमत येते, अशी हरएक उपयोगी वस्तू होय, व क्षणभर विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं, प्रत्येक उपयोगी वस्तू जमिनींतून काढलेल्या, या नाहींतर त्या, द्रव्याची केलेली असते. कागद, दौती, धान्य, औषधें, कांच, कलाबतु, लोकर, रेशीम हीं सारीं जमीनीपासून निघालेली द्रव्यें होत! अज्ञान वाचकांस कलाबतु, लोकर, रेशीम वगैरे वस्तू जमिनींतून निघाल्या आहेत असें म्हणणें थट्टा वाटेल. परंतु अल्प विचारांनीं हें गूढ कोडें ह्याचें ह्यालाच सोडवितां येईल. कलाबतु सोन्याची किंवा रुप्याची करतात; पण ह्या दोनही धातू जमिनींतून काढलेल्या असतात. लोकर आणि रेशीम झाडपाल्यावर व वनस्पतीवर उपजीविका करणाऱ्या मेंढरापासून व किड्यापासून पैदा होतात, पण झाडें आणि वनस्पती जमिनीवर वाढतात, हें सर्वत्र ठाऊक आहे. याप्रमाणें हरएक वस्तु परंपरेनें जमिनीशीं लागून आहे असें दाखवितां येईल. तेव्हां ज्या देशाच्या जमिनीच्या पोटांत नाना प्रकारचे उपयोगी खनिज पदार्थ सांपडतात, व ज्या देशाची

जमीन सुपीक आहे, त्या देशांत व्यापारास अवश्य रीतीनें लागणाऱ्या दोन जिनसांपैकीं एक आहे असें सिद्ध होतें. या पहिल्या वस्तूपलीकडे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मजुरीची. कोळसा, लोखंड, तांबें, सोनें, रुपें वगैरे खनिज पदार्थ कितीही विपुल असले किंवा नुसतें बीं फेकून दिलें, तरी जींत उत्तम पीक येतें, अशी सुपीक जमीन असली, तरी ज्या देशांत नाना तऱ्हेचे धंदे करणारे चतुर कारागीर किंवा मजूर मिळत नाहींत, त्यांत त्या खनिज पदार्थांचा किंवा जमीनीच्या सुपीकपणाचा काय उपयोग ? व्यापाराचे जिन्नस तयार होण्यास ह्या दोनही गोष्टी असल्या पाहिजेत; व ईश्वरकृपेनें दोहोंचीही वाण आमच्या येथें नाहीं. असें असतां आमच्या येथें व्यापाराच्या जिनसा झपाट्यानें कां उत्पन्न होत नाहींत ? नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंदेखील आम्हीं परक्या देशापासून कां घेतों ? आमची जमीन इतकी सुपीक असतां दुष्काळांत लाखों लोक अन्नावांचून कां मरतात ? पृथ्वीवरील पुष्कळ राष्ट्रांपेक्षां आमचा देश नैसर्गिक किंवा सृष्ट संपत्तींत श्रेष्ठ असतां, दुसरीं राष्ट्रें स्वातंत्र्याचा आणि बाह्य सुखांचा पूर्ण अनुभव घेत आहेत, व आम्ही कंगाल स्थितींत आपलीं आयुष्यें कंठितों आहों, याचें कारण काय ? किती एक इतिहासकारांचें असें म्हणणें आहे, कीं हजार पंधराशें वर्षांपूर्वीं खरी सुधारणा अशी काय ती आशिया खंडांत, व विशेषेंकरून हिंदुस्थानांत होती, व बाकीं सारीं खंडें अज्ञान-निद्रेंत घोरत पडलीं होतीं. ह्या वेळच्या अंतरिक्षस्थ प्रेक्षकाला आशिया खंडांत मात्र कांहीं हालचाल दिसली; इतर खंडांत अगदीं सामसूम ! पण तोच अंतरिक्षस्थ प्रेक्षक पृथ्वीच्या आजच्या स्थितीकडे पाहील तर ह्याला असें वाटेल, कीं कांहीं हालचाल असेल तर ती युरोपांत व उत्तर अमेरिकेंत आहे; पूर्वीच्या जागृत आशिया खंडाला आतां चांगली झोंप लागली आहे. हें दुःखदायक स्थित्यंतर होण्यास काय बरें कारणें झालीं असावीं ? स्वित्झर्लंड-सारख्या खडकाळ देशाची भरभराट असावी व हिंदुस्थानसारखा सुपीक व जुना देश विपद्ग्रस्त असावा हें नवल नव्हे काय ? कांहीं अंशीं ह्यांत कांहीं नवल नाहीं. संतोषाची गोष्ट एवढीच, कीं ज्याप्रमाणें रानटी लोकांच्या झुंडीपुढें ग्रीक आणि रोमन लोकांच्या सुधारणेचा मागमूस नाहींसा झाला, त्याप्रमाणें मुसलमान, डच, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लीश

यांच्यापुढें आमच्या सुधारणेचा आणि अस्तित्वाचा पूर्ण लय न होतां, हिंदुस्थानांत कांहीं हिंदुत्व म्हणून अद्यापि कायम राहिलें आहे, व प्रस्तुतच्या चिन्हांवरून असें दिसत आहे, कीं काळाच्या आणि क्रांतीच्या फेऱ्यांतून तगलेलें हें हिंदुत्व फिनिक्स पक्षाप्रमाणें पुन्हां वाढीस लागून तारुण्यावस्थेंत येईल. ही तारुण्यावस्था प्राप्त करून घेणें किंवा न घेणें हें केवळ आमच्या परिश्रमावर अवलंबून आहे. आमचा देश परकीय अंमलाखालीं असल्यामुळें त्याच्यापासून होणाऱ्या तोटयाखालीं चीत न होता, कष्टानें आणि आयासानें आमचें डोकें आम्हांस वर काढावयाचें आहे. तेव्हां स्वतंत्र देशांतील लोकांपेक्षांही आमच्या लोकांनीं व्यापारबुद्धी, विद्यार्जन, एकी वगैरे गोष्टी घडवून आणण्यासाठीं विशेष मेहनत केली पाहिजे, हें कांहीं सांगावयाला नको. व्यापाराचीं अवश्य दोन अंगें तर आम्हांस अनुकूल आहेत. आतां त्यांचा उपयोग कोणत्या रीतीनें केला असतां व्यापारवृद्धी लवकर होईल हें दाखवावयाचें राहिलें.

मजुरी आणि कच्चा माल हीं जीं व्यापाराचीं आवश्यक अंगें तीं आपणांस अनुकूल आहेत हें मागल्या निबंधांत दाखविलें. चालूंत ती अनुकूल असतांही आमचा अभ्युदय कां होत नाहीं, हें दाखवावयाचें आहे. मजुरी आणि कच्चा माल हीं व्यापाराचीं आवश्यक अंगें खरीं; तथापि अलिकडे युरोप खंडांत यांत्रिक कलेचा विलक्षण प्रसार झाल्यामुळें, या दोनच साधनांपासून आम्हांस व्हावा तितका फायदा होत नाहीं. आम्हांमध्यें हस्तकला शिखरास जाऊन पोहोंचली होती, याबद्दल काळाच्या फेऱ्यांतून चुकलेल्या जुन्या जिनसा अजून साक्ष देत आहेत. लाकूड आणि दगड यांवरील नक्षीचें काम, सोन्यारुप्याच्या कलाबतूंचें नाना तऱ्हेचे वेल, पारावताच्या रंगाप्रमाणें क्षणोक्षणीं रंगांतर भासविणारी रेशमाची आणि लोकरीचीं वस्त्रें, स्पर्शानुकूल व दर्शनानंद असे गझनीचे, मखमालीचे, किनखापाचे पट, जे पूर्वी राजाश्रय मिळत असल्यामुळें प्रतिवर्षी तयार होत, अशा प्रकारच्या मौल्यवान चिजांला वर्षाच्या वर्षास लाखो रुपयांचे गिऱ्हाईक मिळत असल्यामुळें, त्यांचा पुष्कळ खप होऊन त्या त्या कारागिरांस उत्तेजन मिळे, व ते धंदे मोठ्या भरभराटीस असत. तसेंच, युरोपांतही हस्तकलेचा किंवा यांत्रिक कलेचा विशेष प्रसार झाला नसल्यामुळें,

हिंदुस्थानच्या मालावर युरोपीय लोकांची प्रत्येक वर्षी मोठी जबर मागणी असे; त्यामुळें इकडील कारागिरांस हवे तितकें काम मिळून त्या खंडांतून ह्या देशांत द्रव्याचा पाट चाले. मुसलमान लोक धर्मसंबंधानें पराकाष्ठेचे जुलमी खरे; पण त्यांस ऐषआरामाचा विशेष नाद असल्यामुळें, व हिंदुस्थान देशास त्यांनीं स्वगृह करून टाकल्यामुळें, त्यांची कारकीर्द येथील हस्त-कौशल्याच्या लयास कारण न होतां, तिच्या योगानें त्याची उन्नतीच झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत व कराचीपासून श्रीनगरापर्यंत, मुसलमान लोकांनीं जागोजाग टोलेजंग मनोरे, मशिदी, कबरस्थानें, वाडे व किल्ले उठवून दिले; त्यामुळें त्यांच्या अस्वस्थ अंमलांत देखील कलाकौशल्याचा ऱ्हास झाला नाहीं. इतिहासांतून अवरंगजेबाच्या दक्षिणेंतील छावणीचीं जीं वर्णनें दिलीं आहेत त्यावरून असें वाटतें, कीं प्रस्तुतच्या गव्हर्नर-जनरलाच्या छावणींत देखील त्याच्या दशांश किंमतीचें सामान नसेल. शिवाजीनें मराठी राज्याचा पाया घातल्यापासून, अखेरच्या पाजी बाजीच्या हातून त्याचा समूळ उच्छेद होईपर्यंत, स्वाभाविक रीत्या महाराष्ट्र देशांत सर्व प्रकारच्या कलाकौशल्यास राजाश्रय व लोकाश्रय मिळत जाऊन ते तरते राहिले. पेशवाईंत सारख्या लढाया चालल्या होत्या व देशाला स्वस्थतेचा अनुभव फार क्वचितच होत होता, तरी स्वराज्य असल्यामुळें कारागीर लोकांस कामाची आणि अन्नाची वाण कधींच पडली नाहीं. पण खडकीची लढाई होतांच सर्व मनू बदलून गेला! आमच्या सरदारांच्या आपापसांतील यादव्या आणि फुटाफुटी, व "अल्फिष्टन" साहेबासारखा कारस्थानी पुरुषांच्या कुटिल मसलती, ह्यांच्यामुळें शनिवारच्या वाड्यावर इंग्रजी निशाण फडकूं लागून सातारच्या छत्रपतीच्या सिंहासनावर पाटलूणवाल्या गोऱ्यांचे बूट चढले! व बाजीरावाला ब्रह्मावर्ताचा मार्ग सुधारावा लागला! येथून पुढें ज्या गोष्टी झाल्या त्या अत्यंत खेदकारक आहेत, व त्यांचा प्रस्तुत विषयाशीं संबंध नसल्यामुळें त्यांचा येथें उल्लेख करण्याची गरज नाहीं. तथापि इतकें सांगितलें पाहिजे, कीं या वेळेपासून हरएक नेटिव्ह गोष्टीला उतरती कळा लागून, परकीय गोष्टीचें प्रस्थ माजूं लागले. होतां होतां अखेरीस इतर देशीय सर्व कलांचा पूर्ण ऱ्हास होऊन, आतां आम्हांस ज्या त्या गोष्टीसाठीं इंग्लंडाकडे पहाण्याची पाळी आली आहे.

इंग्लीश लोक ज्ञानानें आणि शौर्यानें आम्हाहून फार श्रेष्ठ असल्यामुळें आमचें दुहेरी किंवा तिहेरी नुकसान होत आहे. ते आमच्या इतकेच अडाणी असते, किंवा आहेत तितकेच सुधारलेले असून आपलीं घरेंदारें येथें करून रहाते, तर द्रव्यदृष्ट्या आमचें इतके नुकसान होत ना. तें दुरून राज्य करीत असल्यामुळें हिंदुस्थानच्या वार्षिक वसुलाचा सुमारें तीन चतुर्थांश भाग देशाबाहेर जातो तो जातोच; पण यांत्रिक कलेंतही ते आम्हांपेक्षां शतपट पुढें असल्यामुळें व्यापारसंबंधानेंही ते आम्हांस वर डोकें करूं देत नाहींत. इतक्या अडचणींतून आम्हांस आपली उन्नति करून घ्यावयाची आहे. तेव्हां आम्हांस कोण भगीरथ प्रयत्न केला पाहिजे, याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल. प्रस्तुत निबंधांत राज्यविषयक गोष्टीचा कांहीं अर्थार्थी संबंध नाहीं, म्हणून ती दिशा अजिबात सोडून, इंग्रज लोकांत यांत्रिक कलेचा प्रसार कसा झाला, व तो येथें होण्यास काय उपाय करावें, याचा आतां विचार करणें जरूर आहे. यंत्र-कलेचा प्रसार होण्यास यंत्ररचनेस लागणाऱ्या वस्तु आणि ज्ञान हीं असलीं पाहिजेत. इंग्लंडांत लोखंड आणि कोळसे यांच्या असंख्य खाणी असल्या-मुळें, यंत्ररचनेस लागणाऱ्या आवश्यक वस्तूंपैकीं एक तेथें थोडक्या श्रमानें आणि द्रव्यानें प्राप्त होतें; व दुसरी आवश्यक वस्तु, म्हणजे ज्ञान. त्याचीही आतां तेथें उणीव पडेनाशी झाली आहे. विद्येच्या सर्व शाखांचा युरोप-खंडांत पुष्कळ प्रसार झाला असल्यामुळें, व आगगाड्या आणि वर्तमानपत्रें यांच्यामुळें, एका राष्ट्रांतील लोकांचें विचार आणि कल्पना, दुसऱ्या राष्ट्रांस हमेश कळत असल्यामुळें युरोपाच्या एकाद्या भागांत कांहीं युक्ति निघाली कीं ती महिन्या पंधरा दिवसांच्या आंत सगळ्या युरोपभर होते. शिवाय नवीन युक्ति काढणारास राजाकडून इनाम मिळतें, किंवा त्या युक्तिपासून कांहीं वर्षें होईल तितका फायदा करून घेण्याबद्दल कायद्याची मदत मिळते. या रीतीनें कल्पक व चतुर लोकांस प्रत्यक्ष किंवा परोक्ष उत्तेजन मिळत असल्यामुळें तिकडे प्रतिवर्षी कांहीं ना कांहीं नवीन शोध लागतात, नवीन यंत्रें निघतात, व जुन्या यंत्रांत सुधारणाही होतात. वाफ, वीज, पाणी, वारा, वगैरे सृष्ट व कृत्रिम पदार्थांचा यांत्रिक कलेकडे उपयोग होऊं लागल्यापासून युरोप-खंडांतील लोकांच्या चालचलणुकीवर, रीतीभातींवर व आचारविचारांवर

जे परिणाम घडले आहेत, किंवा घडत आहेत, त्यांचें संक्षिप्त वर्णन करणें देखील अत्यंत दुरापास्त आहे. तिकडे यंत्रकलेच्या अचाट कार्यशक्तीमुळें हस्तकला अगदीं मागें पडून गेली; व कांहीं वर्षांनीं तिचा समूळ अभाव होण्याचा संभव दिसत आहे. पूर्वी एक माग चालविण्यास एक मनुष्य लागे; आतां पांचपंचवीस मनुष्यांच्या क्षुल्लक साहाय्यानें एकटें यंत्र चारशें किंवा पांचशें माग चालवूं शकतें ! याप्रमाणेंच इतर धंद्यांची स्थिति झाली आहे. काम हाकणारे असले जबरदस्त ब्रह्मराक्षस तिकडे मनुष्यांनीं भारून टाकून आपल्या सेवेस लाविले असल्यामुळें त्यांनीं ते देशसंपत्तीनें आणि तज्जन्य सुखानें भरून टाकिले आहेत. असल्या राक्षसांशीं आमच्या इकडील साळी, कोष्टी किंवा सुतार हातमागांनीं व हात करवतांनीं कसली प्रतिस्पर्धा करणार ? दररोज खंड्याच्या खंड्या जवस आणि तीळ चिरडून टाकणाऱ्या यंत्रापुढें आमच्या घाण्याच्या बैलांकडून आमचे तेलीबोवा किती घाणे उतरणार ? तर इंग्लंडसारख्या देशांशीं टिकाव धरतां येण्यास मजूर आणि कच्चा माल या दोन गोष्टींची अनुकूलता असली म्हणजे पुरें आहे असें नाहीं, तर यंत्रशक्तीही बऱ्याच उपयोगांत आली असली पाहिजे.

◆ ◆ ◆

२४ : : सृष्टयवलोकन

वरील विषयाकडे सांप्रतच्या एकंदर शिक्षणपद्धतींत जें दुर्लक्ष दिसून येतें, त्या योगानें आपल्या देशाचें बरेंच नुकसान होत आहे; असें सर्वांस विचाराअंतीं दिसून येईल. लहान मुलें मराठी शाळेंत जाऊं लागली कीं त्यांच्या मागें, हल्लींच्या शिक्षणक्रमाच्या योगानें; घोकीव विद्येचा इतका जाच लागतो कीं त्यास घर सोडून गांवांतल्या गांवांतही बाहेर हिंडण्या-फिरण्यास फारसा वेळ सांपडत नाहीं. ह्या अत्यंत शोचनीय स्थितीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे साधारण लोकांस सृष्ट्यवलोकनाचें महत्व कळत

नाहीं. व हल्लींच्या स्थितीप्रमाणें शिक्षक लोकांची नजर आपल्या फायद्यावर जशी असते त्याप्रमाणें मुलांच्या किंवा स्वदेशाच्या फायद्यावर बहुधा नसतें. पहा कीं, आजपर्यंत मराठी शाळा मास्तरांनीं जीं पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांतील बहुतेक पाहिलीं तर घोकीव काम उत्कृष्ट होऊन आपला शिक्षणक्रम सुलभ कसा होईल व वार्षिक परीक्षेंत मुलांची बाह्यात्कारीं हुशारी दाखवून परीक्षक इन्स्पेक्टरांची मजी खुष कशी राखितां येईल, या मुख्य हेतुस अनुसरून लिहिलेलीं आहेत. उदाहरणार्थ; हल्लीं पाहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वगैरे मराठी क्रमिक पुस्तकांतिल कविताचे अर्थान्वय व कठीण शब्दांच्या परिभाषा मुलांस सुलभ रीतीनें पाठ करिता याव्या या हेतूनें प्रसिद्ध केलेलीं अनेक पुस्तकें बहुतेक शाळांतून सुरू आहेत, परंतु मुलांस बाह्यसृष्टि पाहण्याची हौस वाटावी आणि सृष्टिचमत्कार पाहून त्यांच्या भिन्न भिन्न मनोवृत्ति जागृत व्हाव्या अशा उद्देशानें लिहिलेलीं पुस्तकें अद्याप कोठेंहि दृष्टिस पडत नाहींत, व कोणी मास्तरानें आपल्या शाळेंत अशा प्रकारचे परिश्रम केल्याचेहि आमच्या ऐकिवांत नाहीं. त्याप्रमाणें मास्तरांची स्थिति; आणि मातापितरांची ही स्थिति त्यांस अनुकुल अशीच आहे. आपला मुलगा, पहिल्या यत्तेंतून दुसरींत, दुसरींतून तिसरींत, तिसरींतून चवथींत, चवथींतून इंग्रजी शाळेंत केव्हां जाईल, अशा प्रकारची अतिशय घाई त्यांस सुटलेली असते; परंतु त्या घाईनें मुलांचें सर्व बाबतींत वास्तविक किती नुकसान होतें हें त्यांच्या बिलकुल नजरेस येत नाहीं; परंतु तें नुकसान होण्याचें प्रधान कारण काय म्हटलें तर या त्यांच्या घाईमुळें मुलांस सृष्टिचमत्कार पाहण्यास मुळींच सवड सांपडत नाहीं; आणि त्या चमत्काराविषयीं ती बहूधा शेवटपर्यंत अज्ञानी रहातात.

या विषयाचें पूर्ण विवेचन करण्यापूर्वी सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत या विषयाचें संबंधानें कशी स्थिती आहे हें पाहिलें असतां बरें पडेल; व आपण उदाहरणार्थ इंग्लंड देश घेऊं. हा देश फार लहान असल्याकारणानें आणि प्रवास करणारास इकडच्यापेक्षां तिकडे अधिक सोयी असल्याकारणानें देशांतील देशांत या भागांतून त्या भागांत जाण्यास मुळींच प्रयास पडत नाहींत; असें म्हटल्यास चालेल. शिवाय हा देश सर्व बाजूंनीं समुद्रवेष्टित आहे, त्यांत म्हणण्यासारखे मोठे पर्वत

किंवा नद्या नाहींत; आणि हिंवाळ्याखेरीज बाकी सर्व ऋतु तेथें सौम्य असतात. या सर्व कारणामुळें सृष्टींतिल मुख्य मुख्य चमत्कार तेथें थोड्या-बहुत अंशानें दृष्टिस पडण्यास हरकत नाहीं व त्या देशांत हे चमत्कार पहाण्यास आबालवृद्धांस जी हौस वाटते ती येथें वर्णनही करतां येत नाहीं. तिकडील कोणतेंहि लहान मोठें काव्य घेतलें तर त्यांत सृष्टिवैभवाचें हृदयंगम वर्णन नाहीं असें होत नाहीं. तिकडील काल्पित कथा पहा; तिकडील शाळांतून चालणारीं पुस्तकें पहा; तिकडील लहानमोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचा; सर्वत्र सृष्टीबद्दल पूज्यबुद्धी आपणांस दृष्टीस पडते आणि सृष्टीचमत्काराबद्दल दिदक्षा नसणें म्हणजे एकप्रकारचें पापच त्यांच्या लोकांत गणिलें आहे.

सृष्टिसंबंधानें ही पूज्यता त्या देशांत उत्पन्न होण्यास अनेक कारणें आहेत; तीं येथें सर्व सांगतां येत नाहींत; तथापि सांप्रतच्या काळांत लहान मुलांस तीं बाल्यापासून प्राप्त होण्यास कांहीं अंशीं तिकडील स्त्रिया कारण आहेत. तिकडे स्त्रियांस विद्या शिकविण्याचा जरी फार दिवस प्रघात आहे, तथापि स्त्रियांस जी आजकाल विद्या शिकवितात ती पुरुषांच्या विद्येपासून बरीच भिन्न असते. स्त्रियांच्या अंगीं अवश्य असावे असे मानिलेले गुण म्हटले म्हणजे पुढें सांगितलेले होत. नाटकें, कविता व कादंबऱ्या, इंग्रजी किंवा फ्रेंच उत्तम वाचतां येऊन आपलें व दुसऱ्याचें मनोरंजन करतां येणें; समोर ठेवलेल्या पदार्थांचें, अथवा देखाव्याचें अथवा मनुष्याचें हुबेहूब चित्र काढणें, गाणें-बजावणें आणि शिवणकाम जाणणें, बागेंतील मोठ्या झाडांचीं, फुलझाडांचीं, फुलांचीं, फळांचीं व पशुपक्ष्यादिकांचीं नांवें व कांहीं गुण माहित असणें, आणि अशाच प्रकारचे दुसऱ्या कांहीं सर्वांस आवडणाऱ्या विषयांची माहिती. हे गुण आपल्या मुलींच्या अंगीं येण्याविषयीं बहुधा सर्व सभ्य गृहस्थ तिकडे काळजी घेतात. हे गुण स्त्रियांच्या साहजिक मनोहारित्वाचें किती साहाय्य करितात, आणि त्यांस किती श्रेष्ठत्व आणतात ह्याची वाचकांनीं कल्पना केली असतां स्त्री म्हणजे कांहीं अंशीं अधिदेवताच तिकडे होऊन गेली आहे यांत त्यांस फारसें नवल वाटणार नाहीं. असो, ह्याचा प्रस्तुत विचार करणें नाहीं; तथापि वरतीं सांगितलेल्या गुणांचा साक्षात् सृष्टीशीं

किती संबंध आहे व ते संपादन करणारास सृष्टीचें मन लावून कसें अवलोकन केलें पाहिजे, हें वाचकांस सांगावयाला नको. मग पुढें अशा स्त्रियांस संतति झाली व ती बाल्यावस्थेंत असतां तिची सर्व काळजी त्यांच्यावर पडली म्हणजे त्या या पूर्वसंपादित गुणांचा आपल्या बालकांस, सुखांत व आनंदांत ठेविण्याकडे उपयोग करितात, हें साहजिकच आहे. व त्यांच्या या वर्तनामुळें सृष्टिचमत्कार पाहण्याची ते पाहून आपले मनोविकार मातापितरांजवळ प्रकट करण्याची व ते पुन्हा केव्हां घडतील, ते कोण घडविते, इत्यादि प्रश्न त्यांस विचारण्याची, मोठी उमेद व हौस अल्पवयांतच बालकांस वाटूं लागते. बालकांच्या अंगीं अशा कारणांनीं तिकडे किती अमोलिक गुण उत्पन्न होतात, त्यांचा धार्मिक, लौकिक व प्रापंचिक सुखसंपादनास आणि आयुष्यात किती उपयोग होतो; व अखेरीस समाजाचें उत्कर्ष व हित त्याच गुणांनीं कसें होतें हें या विषयाचें विवेचनांत पूर्णपणें दाखविलें जाईल.

उंच उंच पर्वत व त्यांतील दऱ्या, मोठमोठ्या नद्या व विस्तीर्ण सरोवरें, ज्यांमध्यें अनेक वृक्ष व वेली निबिड उगवलेल्या आहेत, आणि असंख्य वनपशु व पक्षी वास करीत आहेत अशीं अफाट अरण्यें, आणि निर-निराळ्या ऋतूंत व निरनिराळ्या ठिकाणीं भिन्नभिन्न स्वरूप धारणकरणारे असें आकाश व त्याप्रमाणें समुद्र, हेच वास्तविकपणें सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याचें मुख्य प्रदेश होत. अशा प्रदेशांत प्रेक्षकांस जणूं काय मोहून टाकावें म्हणून सृष्टि आपला आवरणपट निर्भीडपणें एकीकडे करून आपल्या सर्वांगाचें सौंदर्य व सर्वसमंतात चकाकणाऱ्या पदार्थरत्नांची शोभा प्रेक्षकांच्या दृष्टीस पाडते. परंतु असें सौंदर्य बहुधा मनुष्यांची जेथें दाट वस्ती असते, तेथें आविष्कृत केलेलें नसते. तें पहाण्यास शहारापासून बहुधा दूर जावें लागतें. परंतु हें सौंदर्य पहाण्याची प्रथम अभिरुचि आणि इच्छा उत्पन्न होण्यास, सृष्टीनें आपल्या अव्याहत केलिक्रमांत सर्वत्र इतस्ततः विखरलेलीं लहान मोठीं रत्नें मनुष्यानें लहानपणापासून वेचिलीं पाहिजे; आणि तीं वेंचण्यास शहरापासून फारसें लांब जावयास नको.

मनुष्यास सृष्टींतील नानाविध चमत्कार पहाण्याची गोडी लहानपणीं बहुधा साहजिकपणें लागत नाहीं; ती लावण्याचा प्रयत्न

मातापितरांनीं केला पाहिजे; परंतु त्या विषयासंबंधानें सांप्रत मातापितरांसच खुद्द अज्ञान असल्यानें आपल्या संततीचे अंगीं वरील गुण आणणें त्यांच्यानें होत नाहीं, आणि आपले अन्य व्यवसाय टाकून आपलीं कोमल बुद्धीचीं बालकें बरोबर घेऊन हिंडावयास जाणें हेंही बहुतेकांस आवडत नाहीं. अशा स्थितींत साधारण स्वतंत्रपणें शहराचे आसपास फिरावयास जाण्याइतपत ज्यांचें वय झालें आहे, अशा लहान मुलांवरच वरील गुण संपादन करण्याचें काम पडावयाचें, आणि त्यांचे हातून तें सिद्धीस जाण्यास त्यांस अभ्यासाच्या कांचांतून थोडें सोडवून कांहीं स्वतंत्रताही त्यांस दिली पाहिजे.

सृष्टीतील चमत्कार पहाण्यास शहरापासून निदान मैल अर्ध मैल तरी गेलें पाहिजे. कधीं एखाद्या सपाट मैदानांत, कधीं शेतांत किंवा बागेंत, कधीं एखाद्या उंच टेकडीवर व कधीं नदीचे कांठीं अशा ठिकाणीं जाण्याचा नेहमीं प्रघात ठेविल्यानें होणारांपैकीं पहिला फायदा म्हटला म्हणजे आरोग्यरक्षण हा होय; आणि ह्या फायद्याकडे आजकाल बहुतेकांचें लक्ष लागत चालले आहे आणि ह्याचा अनुभवही बरेच लोक घेऊ लागले आहेत. शरीरांतील सर्व व्यापार उत्कृष्ट चालण्यास स्वच्छ हवेंत वागणें आणि शरिरास योग्य व्यायाम देणें अवश्य आहे. सृष्ट्यवलोकन करण्याची ज्यांस एकवार गोडी लागली त्यांस ह्या दोन्ही गोष्टी साहजिकपणेंच प्राप्त होतात. शहरांत राहून कालक्रमण करणारा जो मोठा प्राणिसमुदाय, त्याच्या निरंतर श्वासोच्छ्वासानें उच्छिष्ट झालेली, सर्वत्र घरभर पसरून त्याच्या प्रतिबंधानें चालना न पावणारी, आणि दुसऱ्या अनेक मनुष्यसंबंधीं दुर्गंधांनीं दूषित झालेली, हवा अनेक उपायांनीं शुद्ध करण्याचा सृष्टीचा थोरला कारखाना वरती सांगितल्या ठिकाणीं सदोदित सुरूं आहे, हें बहुतेकास माहीत आहेच. अशा ठिकाणीं मनुष्य गेला असतां त्यास बराच व्यायाम होऊन दिवसांच्या दगदगीनें कंटाळलेलें मन पुन्हां उल्हास पावतें हें सर्वांच्या अनुभवास आलें आहे. जेथें फारशी मनुष्यांची वस्ती नाहीं व जेथें मनुष्यास हरवक्त शेतांत, कुरणांत किंवा नदीवर जावें लागतें अशा खेड्यापाड्यांतील लोकांची प्रकृति बहुधा अरोगी व सुदृढ असते, ह्याचें कारण त्यांचा उघड्या हवेंतील व्यायाम हें स्पष्ट आहे. अशा लोकांत जे कधीं कधीं रोग किंवा वाखे उत्पन्न होतात ह्याचीं मुख्य कारणें ह्या लोकांचें

अज्ञान व तज्जनित वेडेविद्रे आचार व घरांतील अस्वच्छता, हीं होत. त्यांच्या अंगचें हें अज्ञान जर कांहीं अंशीं दूर झालें व आरोग्यशास्त्राची व चांगल्या आचारांचीं जर थोडीं तत्त्वें त्यांस कळूं लागलीं तर ह्या बाबतींत त्यांच्यासारखे सुखी लोक कोणीच असणार नाहींत. वर्षांतून एखादेवेळीं सवड करून खेडेगांवांत जाऊन राहण्याची, व शहरांतील अनेक व्यापारांनीं होणारी सर्व कटकट एकीकडे ठेवून, तेथील शांतता, साधेपणा वगैरे सौम्य सुखाचा अनुभव घेण्याची गोडी अद्याप युरोपीयन लोकांप्रमाणें आम्हांस लागली नाहीं. तथापि अशी गोडी असणें सर्वांशीं इष्ट आहे. कारण तिच्या योगानें अज्ञान आणि सज्ञान लोकांचें थोडे बहुत संघटन होऊन परस्परांचेंही हित होते. असो, यांवर सांगितलेल्या फायद्याविषयीं अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

वरच्या सारख्या ठिकाणीं गेल्यावर सृष्टींतील लहानसहानही गोष्टी कशा पहाव्या, त्यांचे पहिल्यानें मनोवृत्तीवर काय परिणाम होतात, आपली जिज्ञासा व कल्पनाशक्ती कशी जागृत होते वगैरे अनेक गोष्टींचा विचार करण्यास ह्या निबंधांत जागा नाहीं. त्यांचा विचार पुढें करूं.

सृष्टींतील जी जी वस्तु पहावी, तिच्या तिच्यामध्यें एक प्रकारची मनोहरता असतेच. अशा सर्व वस्तूंचें वर्णन करण्याचा आमचा उद्देश नाहीं. सृष्टींतील कांहीं मनोरम वस्तु उदाहरणार्थ घेऊन त्यांच्या अवलोकनानें अंतःकरणाचे स्वास्थ्य व समाधान कसें करून घ्यावें, व त्यांवर विचार-शक्ति व कल्पना यांचा कसा प्रयोग करावा, याचा थोडक्यांत मासला दाखवून, विचारी लोकांची तिकडे प्रवृत्ति करावी इतकेंच आम्ही आपलें कर्तव्य समजतों.

एकाद्या उंच टेकडीवर बसून, प्रातःकाळचे किंवा सायंकाळचे वेळीं आकाशाकडे नजर फिरविली असतां, क्षणोक्षणीं भिन्न भिन्न आकृति धारण करणाऱ्या अशा ढगांचीं पटलें सूर्याचे आसपास व क्षितिजाचे दुसरें कांहीं भागांवर आपणांस बहुधा दिसतात. अस्तोदय समयींच्या रक्तसूर्यकिरणांतही मेघपटलांचा वर्ण नेहमीं तांबडाच असतो असें नाहीं. कोठें पिवळा, कोठें पारवा, कोठें निळा, कोठें काळा याप्रमाणें आकाशाच्या अल्प भागांतही

एकांत एक मिसळून जाणाऱ्या व मानवी भाषेनें ज्यांचें वर्णन करणें अत्यंत दुर्घट, व मानवी कृतीनें ज्यांचें यथावत् अनुकरण करणें अत्यंत अशक्य, अशा असंख्य रंगांची प्रभा एकदम डोळ्यांवर पडून, मनुष्याचें अंतःकरण अगदीं मोहून जातें. हें सृष्टीचें नैसर्गिक लावण्य पहाण्यासाठीं सांसारिक सर्व विवंचना विसरून घटकाभर तिकडेच टक लावणारा कोण विचारी मनुष्य आपल्या नेत्रांचें सार्थक्यच झालें असें मानणार नाहीं ? ज्यांस थोडीबहुत शक्ति असेल, त्यास असा देखावा पाहून, तो वर्णन करण्याची स्फूर्ति खरोखर होईल. ज्यास चित्रकर्माचा व्यासंग असेल, त्यास अशा देखाव्याचें होईल तितकें करून हुबेहुब चित्र आपल्या संग्रहास ठेवण्याची मनीषा उत्पन्न होईल. ज्यानें सृष्टिशास्त्राचा अभ्यास केला आहे, त्याची ही बुद्धि हें वर्णवैचित्र्य पाहून चकित झाल्यावांचून रहाणार नाहीं. याप्रमाणें, ज्यास ज्या गोष्टीचें विशेष परिशीलन; त्याचे मनांत त्या त्या गोष्टींच्या कल्पना एकदम उभ्या राहून सर्वांचेच एकदम समाधान झाल्यावांचून रहाणार नाहीं. असे देखावे कदाचित् वारंवार पाहिल्यानें कोणाच्या मनांतील त्याविषयींची आश्चर्यबुद्धि नाहींशी होण्याचा संभव आहे. तथापि एक ढगच पहाण्याचा जर कोणी निश्चय केला तर त्यांस किती विचार करण्यास जागा आहे ! त्यांची बाष्परूपानें उत्पत्ति कोठें अफाट समुद्रांत; तेथून त्यांचे आकाशांत हिमालयाच्या अत्युच्च शिखराहूनही उंच आरोहण; त्यांचे वायुसाहाय्यानें सर्वतोगामित्व; व अखेरीस जलरूपानें सर्व भूमंडळावर कालभेदानें त्याची वृष्टी या सर्व गोष्टींचा मनुष्यानें विचार केला असतां सृष्टीव्यापाराची अनूपम विशालता त्यांचें मनावर पूर्णपणें बिंबल्यावांचून रहाणार नाहीं. मग भूगर्भशास्त्राचें प्रमाणावरून जेव्हां त्यांचे लक्षांत येईल कीं असा क्रम मानवोत्पत्तीच्याही पूर्वीच्या अगणित कालापासून सृष्टीनें अव्याहत चालविला आहे, त्या वेळीं सृष्टीच्या भव्यपणानें त्याचें मन थक्क होईल यांत नवल काय ? परंतु जर अशा मनुष्याचा ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण भरंवसा असेल तर त्यांत या केवळ मेघावलोकनानेंही ईश्वराच्या अगाध चातुर्याची व कृपेची कल्पना झाल्यावांचून रहाणार नाहीं. पहा कीं; सूर्याच्या कोट्यवधि कोसांवरून येणाऱ्या उष्णतेचा समुद्रांवर बाष्पीकरणाकडे विनियोग झाल्यामुळें, आज आम्हां प्राणि-

समुदायांकरितां शेंकडोंशें कोस जमीन सुपीक होत आहे, सहस्रावधि वृक्षांचें योग्य प्रतिपालन होत आहे, लक्षावधि जलचर प्राण्यांस आश्रयभूत असे नद, नद्या, सरोवरें, तलाव व झरे प्रतिवर्षी भरत आहेत, व याप्रमाणें यच्चयावत् भूमंडळावर सुख, समाधान, व सौंदर्य यांची समृद्धि होणें आहे. या अद्भुत निसर्गचातुर्याचा जर त्यानें विचार केला, तर या एका उदाहरणावरूनही ईश्वराचे सर्वज्ञतेबद्दल व कृपाळूपणाबद्दल त्याला जितकी पूज्यबुद्धि व कृतज्ञता उत्पन्न होईल तितकी व्यवहारांतील राज्यप्राप्तीसारख्या महान् लाभांनाही कदापि होणार नाहीं.

याप्रमाणें या उदाहरणावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, जर विचारी पुरुषानें सृष्टींतील साधारण पदार्थही प्रसंगविशेष पाहिजे, आणि त्याच्या उत्पत्तीचा, स्थितीचा व विनियोगाचा शक्त्यनुसार विचार केला; तर प्रथम इंद्रियसुख, नंतर आश्चर्यवृत्ति, नंतर कल्पना व जिज्ञासा ह्यांचा हृदयांत प्रादुर्भाव होतो; व शेवटीं सृष्टीच्या प्रचंड व्यापारापासून होणारा चकितपणा अथवा ईश्वराच्या अनुपम चातुर्यापासून होणारी दृढ भक्ती, कृतज्ञता, व समाधान, इतक्या मनोवृत्तींचा क्रमानें उदय होऊन त्याचे अंतःकरणास प्रसन्नता व उत्साह येतो; त्याची संसारविवंचनेंतून सुटका होऊन त्यास शांतता मिळते; आणि विचारशक्ती प्रगल्भदशेस येऊन मनाची क्षुद्रता व आत्मपरता नाहिशीं होते.

प्रत्येकानें वरील गोष्टींचा स्वतः प्रत्यय घेणें अवश्य आहे.सृष्टिशास्त्राच्या साधारण अज्ञानामुळें कित्येकांच्या सर्वच गोष्टी अनुभवास येतील असें नाहीं; तथापि अवलोकनांत आलेल्या गोष्टी समजून घेण्याचा जर प्रयत्न केला तर तसें होण्यास हरकत दिसत नाहीं. जी गोष्ट आपणांस समजून आनंद झाला, ती इष्ट मित्रास व विशेषतः लहान मुलास समजावून देऊन, त्यास सृष्ट्यवलोकनाची व शास्त्राभ्यासाची जर आपण अभिरुचि लावून दिली, तर आपले त्यावर व देशावर खरोखर उपकार होतील. केवळ आळस व निरुद्योग हींच ज्यांचीं सुखप्राप्तीचीं स्थानें, त्यास वरील गोष्टी खऱ्या वाटणार नाहींत. परंतु त्यांनीं आपल्या संततीस तरी आत्मानुरूपता न द्यावी व त्यांची बालजिज्ञासा वरील उपायानें वाढत असतां तिला विघ्न करूं नये.

सृष्ट्यवलोकनाची आणखी कांहीं उदाहरणें पुढें खेपेस देऊं व नंतर ह्या विषयाच्या दुसऱ्या कांहीं भागांचा विचार करूं.

ज्यावेळीं मनुष्यजाती आपल्या अत्यंत बाल्यावस्थेंत होती व ज्यावेळचा इतिहास आतां परम दुरुपलब्ध झाला आहे, अशा अतिप्राचीन कालापासून अंतरिक्षांतील तारांगणांकडे पाहून मानवी प्राण्यांचें अंतःकरण आश्चर्यानें थक्क होऊन एक प्रकारच्या आनंदानें भारून गेलें असावें, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध होतें. ज्यावेळीं भूमितीच्या अगदीं स्वल्प सिद्धांताचेंही मनुष्यांस ज्ञान नव्हतें, जेव्हां यंत्रादि कृत्रिम साधनांचा पूर्ण अभाव होता, आणि जेव्हां उपजीविका मिळविण्याच्या, व क्रूर श्वापदांपासून आपलें संरक्षण करण्याच्या विवंचनेंतच्च आयुष्याचा बहुतेक भाग मनुष्यास खर्चावा लागे, अशा काळींही वर्षेंचीं वर्षें गगनतलाचें सारखें अवलोकन करून सूर्यचंद्राची आकाशांतील बाह्यगति व त्याचा मार्ग प्राचीन लोकांनीं ठरविला. त्या मार्गांतील तारकापुंज निश्चित करून त्यावर आपल्या कल्पनेनें चित्रें काढलीं व तदनुसार ह्यास संज्ञा दिल्या व अशा प्रकारें त्यांनीं एक चित्रमय राशीचक्र निर्माण केलें, आकाशाकडे नजर फेंकतांच तेथें एकसारखे झळकणारे अगणित तारे पाहून जर त्यांचें अंतःकरण आश्चर्यानें चकित झालें नसतें, व त्यांच्या पुनः पुन्हां अवलोकनानें जर त्यांचें हृदय आनंद पावले नसतें, तर अशा प्रकारचा महान प्रयास त्यांनीं कदापि केला नसता. इतर सर्व शास्त्रांच्या पूर्वी ज्योतिःशास्त्राचा जगांत प्रादुर्भाव झाला, तो होण्यास वरती सांगितलेला आनंदच कारणीभूत होय.

सृष्ट्यवलोकनापासून चित्तास समाधान व आनंद करून घेण्याचें जे अनेक मार्ग आहेत, त्यांतीलच्च अंतरिक्षाचें अवलोकन हा होय, हें वरील गोष्टीवरून सिद्ध होईल; आतां तो कोणत्या प्रकारचा आहे व तो कसा प्राप्त होतो, ह्याचा थोडा विचार करूं. आकाशाच्या अवलोकनास आमची सध्यांची स्थिती जितकी अनुकूल आहे तितकींच प्रतिकूल आहे, असें

म्हणण्यास चिंता नाहीं. सुधारणेचा जों जों अधिक अधिक उत्कर्ष होत चालला आहे, तों तों आमच्या आवश्यकताही साहजिकच वाढत आहेत. जेथें पूर्वी मृगयेनें किंवा कंदमूलांनीं किंवा थोड्या शेतकीनें लोकांचा निर्वाह होत असे, आणि वृक्षांच्या मृदु त्वचांपासून केलेल्या अथवा चर्ममय वस्त्रांनीं आणि लहानशा पर्णकुटिकेनें त्यांचें शीतोष्णनिवारण होत असें, तेथें आतां अनेक प्रकारचीं धान्यें, फळें व शाका उत्पन्न करून, नानातऱ्हेचीं पेयें तयार करून व वस्त्रें विणूनही मनुष्याचें समाधान होत नाहीं. ह्याप्रमाणें इकडे जों जों आवश्यकता वाढत आहेत तों तों कलाकौशल्यें वाढून श्रमविभागामुळें प्रत्येकाच्या हातीं एखादी दुसरी कला लागते, व तींवर त्यांस आपल्या सर्व आवश्यकता भागवाव्या लागतात. अशा स्थितींत करावे तितके श्रम थोडेच; मग अन्य व्यवसायांत घालविण्यास मनुष्यास वेळ कोठून मिळणार ? तसेंच सुधारणेमुळें सर्वत्र ज्ञानवृद्धि होऊन मनुष्यांत परस्परांबद्दल विशेष बंधुत्व व कळकळ वाटूं लागली आहे; व नित्य श्रमाव्यतिरिक्त कांहीं काल उरलाच तर तो आप्तवर्गांत किंवा स्नेहीवर्गांत बसून तत्संबंधीं, किंवा ग्रामसंबंधीं, अथवा देशसंबंधी किंवा जगासंबंधी सुखदुःखाच्या किंवा घडामोडीच्या गोष्टी सांगण्यांत व माहिती मिळविण्यांत जाणार. अशाच प्रकारच्या अनेक विघ्नांनीं सुधारणेपासून सृष्ट्यवलोकनासारख्या एकांतांतील आणि मनोवृत्ती सदोदित प्रफुल्लित राखणाऱ्या सुखाच्या संपादनास प्रतिबंध होतो.

आतां आमची स्थिती सृष्ट्यवलोकनास व मुख्यत्वेंकरून आकाशाच्या अवलोकनास अनुकूल कोणत्या प्रकारें आहे हें पुढील गोष्टीवरून ध्यानांत येईल. दुर्बिण वगैरे अनेक यंत्रें निघून सूर्य, ग्रह, तारे वगैरे सर्व मोठे करून आपणांस पहातां येतात. इतकेंच नव्हे, तर कोट्यवधि नवीन तारे आपल्या दृष्टिगोचर होतात. दुसरें, ज्योतिषशास्त्राची ज्यांस विशेष गोडी, अशा लोकांनीं परिश्रम करून काढिलेले आकाशाचे नकाशेही सध्यां सुलभ झाले आहेत; व त्यांनीं लाविलेले शोधही एकसारखे प्रसिद्धीस येत आहेत. ह्या सर्व साधनांमुळें आकाशाची माहिती होण्यास पूर्वीइतके आतां प्रयास पडत नाहींत.

अंतरिक्षाचें ज्यांस अवलोकन करण्याचें असेल त्यानें रात्रींच्या शांत वेळीं उंच गच्चीवर किंवा सपाट मैदानांत गेलें पाहिजे हें उघड आहे. अशा ठिकाणीं बसलें असतां सर्व आकाश ताऱ्यांनीं खचलेलें दिसतें. अत्यंत नील अशा आकाशावर विखरलेलीं हीं तारकारत्नें व त्यांचा अस्खलित प्रकाश पाहून मनुष्याच्या नेत्रांस खचित आनंद होईल. जसा एखादा मोठा हिरा फुटून त्याचीं लक्षावधि शकलें व्हावींत व तीं उंच अधांतरीं लोंबत रहावीत, त्याप्रमाणें हे तारे कोणास भासतील; परंतु त्यांचा स्वयंप्रकाश व त्यांच्या प्रकाशाचें सदोदित भ्रमणही पाहून हिऱ्याची उपमा त्यांस शोभत नाहीं असें त्यास वाटेल व वास्तविकच तें अनुपमेय आहे. ते किती दूर असतील याची तर त्यांस कल्पनाच करितां येणार नाहीं. घटकोघटकीं पूर्वेस नवे तारे दिसूं लागतात, कित्येकांचा पश्चिमेकडे अस्त होतो व सर्वांची पश्चिमेकडे गति दिसते. असें दिसण्याचें कारण कांहीं असो, परंतु त्या गतीपासून आश्चर्य वाटेल. अशी गति ह्या पृथ्वीवर त्यांस कोठेंही आढळणार नाहीं. साधारण पदार्थांची गति पाहिली असतां तीपासून घरघर वगैरे शब्द निघतात; शांत आकाशांत तुरळक ढग आपणांस निःशब्द हालतांना दिसतात, परंतु त्यांची आकृति स्थिर राहत नाहीं. तसेंच आकाशांत लक्षावधि तारे निरंतर पश्चिमेकडे धांव घेत असून लेशमात्र शब्द नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या परस्परांमधील अंतर कधींही बदललेलें दिसत नाहीं. जो कवि असेल त्यास तर ही गति पाहून फारच आनंद वाटेल. अशा प्रकारची गति लोकांच्या समजास केव्हां येईल असें त्यांस वाटेल.प्रत्येक आपापल्या क्षितीच्या भागांत जन्म घेतो, पुढें अधिकाधिक प्रकाश पाडित आपल्या अत्युच्च पदावर आरूढ होतो; परंतु इतरांस त्यांपासून कधींही धक्का नाहीं, व त्यांच्या प्रकाशास यांचेपासून कधींही न्यूनता नाहीं. कित्येक क्षितिजावर फार वेळ राहून आपला प्रकाश पृथ्वीस फार वेळ पुरवितात; कित्येक अल्पकाळपर्यंतच क्षितिजावर असतात, परंतु प्रत्येकाचा प्रकाश त्याच्या त्याच्या मोठेपणावर अवलंबून रहातो, क्षितिजांत कोठें जन्मला व किती वेळ वर राहिला, ह्यावर नसतो. अखेरीस सर्व आपलें नियत मार्गक्रमण करून क्षितिजाखालीं अंतर्धान पावतात. लक्षावधींचा ह्याप्रमाणें क्रम, तथापि त्यांच्या सर्व अस्तित्वांत परस्परांशीं घर्षण, किंवा बेबनाव किंवा अंतरभंग कोणाच्याही

लक्षांत येत नाहीं. अशा प्रकारचे अनेक विचार आकाशांतील सृष्टीचें सौंदर्य पाहून त्यांचें मनन करणाराचें मनांत येतील व त्यांस शेवटीं अत्यंत हर्ष वाटेल. या प्रकारच्या सुखास विशेष महत्त्व दिलें पाहिजे. कारण नानाविध मनोवृत्ति त्यापासून जागृत होतात, मनांत शांतता व समाधान रहाते, आणि इतरांस त्यापासून कधींही त्रास होत नाहीं, व त्यांच्या हृदयांत आपणाविषयीं मत्सरादि दुष्टवृत्ति उत्पन्न होत नाहींत. ह्या सुखाचा अनुभव दरिद्र्यास व श्रीमंतास सारखाच मिळूं शकतो.

◆ ◆ ◆

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 20449 वि. निबंध
वर्गांक ... १०४२ ... नोंद दि. ३/६/१९९८



REFBK-001091 5

मॉडर्न बुकडेपोनें प्रकाशित केलेले
कांहीं उत्तम ग्रंथ

	रु.	आ.
सुदाम्याचे निवडलेले पोहे : श्री. कृ. कोल्हटकर	२	०
दुटप्पी कीं दुहेरी : श्री. कृ. कोल्हटकर	२	५
मतिविकार : श्री. कृ. कोल्हटकर	३	८
विचार-विलास : वा. म. जोशी	३	०
आश्रमहरिणी : वा. म. जोशी	१	४
संपूर्ण आगरकर (भाग १) संपादक प्रा. अळतेकर	२	०
,, ,, ,, २ ,, ,,	३	
,, ,, ,, ३ ,, ,,	२	०
हिंदु धर्म आणि सुधारणा : प्रि. म. शि. गोळे	३	०
मराठी भाषा : उद्गम आणि विकास : —प्रा. कृ. पां. कुलकर्णी	८	०
समग्र किर्लोस्कर : आण्णासाहेब किर्लोस्कर	५	०
महर्षि अण्णासाहेब पटवर्धन चरित्र : —प्रा. ग. स. दीक्षित	५	०
वाग्वैजयंती : गोविंदाग्रज	३	८
प्रो. फडके यांचीं गाजलेलीं भाषणें : प्रा. ना.सि.फडके	१	६
संस्कृत वाङ्मयाचा सोपपत्तिक इतिहास : —डॉ. वि. वा. करंबेळकर	५	०
सावरकर चरित्र : शि. ल. करंदीकर	१०	०
मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्रा. द. ल. मांजरेकर	२	४
कल्पित आणि सत्य : पं. महादेवशास्त्री जोशी	२	४
राजहंस–निवडक गोविंदाग्रज	२	०
केशवसुत : संत–गाडगीळ	१	०
करदर्शन : ल. के. तांबे	३	८
भूगोलाचें अध्यापन : प्रा. ना. वि. पाटणकर	३	०
गणिताचें अध्यापन : प्रा. कुमठेकर–देशमुख	५	०